# गुरूंचे गुरू



हिंगोरी

# गुरूंचे गुरू

# गुरूंचे गुरू

-हिंगोरी

मराठी अनुवाद- अदिति जमखंडीकर

*www.gurudevonline.com*
*answers@gurudevonline.com*

## सर्व हक्क स्वाधीन

प्रकाशकाच्या लेखी परवानगीशिवाय या पुस्तकातला मजकूर उध्दृत करता येणार नाही, साठवता येणार नाही, कुठल्याही रूपात त्याची नक्कल करता येणार नाही; (संगणकाचा द्वारा, फोटोकॉपी अथवा दुसऱ्या कोणताही प्रकारे) छापताही येणार नाही, याला अपवाद म्हणजे फक्त परीक्षणात वापरलेले उतारे.

## अस्वीकार

या पुस्तकातील दृष्टिकोन व मतं ही लेखकांची स्वत:ची आहेत आणि गोष्टी जशा घडल्या आहेत तशा दिल्या आहेत. त्यांच्याविषीयी जेवढी पडताळणी करणं शक्य आहे तेवढी केली आहे.

**दिली आहे त्यांना भेट**
**जे आहेत लायक**

# विषय सामग्री




१
**विहंगावलोकन**





७
**त्यांचं जीवन**

**०८ सुरवातीची वर्षं**
*०९ राजांचा राजा जन्माला आला*
*१५ आध्यात्मिक प्रारंभ*
*१९ मैत्रीचे बंध*

**३० कुटुंबवत्सल माणूस**
*३१ शिव -शक्तीचं मीलन*
*३९ पिता*
*४५ पुत्र*
*४९ भाऊ*

**५६ एक रहस्यपूर्ण व्यक्ती**
*५७ एक गूढ मार्गदर्शक*
*६३ अघोरीचा सन्मानार्थ काव्यांजली*

**७० महागुरू**
*७१ महागुरू जागृत होतात*
*७५ पहिला शिष्य*
*८१ आध्यात्मिक वृक्षाचं बीजारोपण*
*८७ एक आध्यात्मिक वृक्ष मूळ धरतो*
*९३ त्यांच्या चमत्कारांची गूढ योजना*
*९९ असामान्य उपचारक*
*१०७ सेवेकरी, सेवा करून घेणारे नव्हेत*
*११३ कर्मयोगी*
*११७ परिवर्तक*
*१२१ आध्यात्मिक ऊर्जास्रोत*
*१२७ आध्यात्मिक होकायंत्र*
*१४३ महागुरूंचं स्वस्थानी प्रस्थान*
*१४७ निरंतरतेत*




## १५०
## असामान्य उद्योजक

*१५४ आर्थिक व्यवस्थापन*
*१५५ वेळेचं व्यवस्थापन*
*१५८ भरती*
*१६० लोकांचं व्यवस्थापन*
*१६५ कार्यक्षेत्रापेक्षा अन्य ठिकाणं*
*१६६ कार्यकारी प्रशिक्षण*
*१६८ संस्था- व्यवस्थापन*
*१७२ अडथळ्यांच्या मार्गाचं संचालन*





## १७४
## तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष कृती

**१७७ एक से अनेक, अनेक से एक (अद्वैतातून द्वैत, द्वैतातून अद्वैत)**
**१८३ टप्पे आध्यात्मिक परिवर्तनाचे**
*१८४ श्रध्दा*
*१८५ विश्वास*
*१८८ सेवा*
*१९० ग्यान*
*१९१ भक्ती*
*१९३ दिव्य ग्यान*

**१९७ आध्यात्मिक परिवर्तनाची साधनं**
*१९८ गुण*
*२०१ मंत्र*
*२०९ सेवा*

**२१३ इंद्रियांच्या पलिकडे**
*२१५ इंद्रियांचं व्यवस्थापन*
*२२२ मेंदूची लवचिकता*
*२२५ मन*
*२२६ थोडक्यात*

**२२७ निरंतर जागृतावस्था**
*२३३ सचेत जागृतावस्था*
*२३६ ॐ आणि आज्ञा*
*२३९ मानसिक कल्पनाचित्रांचं प्रकटीकरण*

**२४१ विशिष्ट दिवस**
*२४१ बडा गुरुवार*
*२४४ सोमवारचे उपवासविशिष्ट उपवास*
*२४७ गुरू पूर्णिमा*

*२४९ दशेहरा, धनतेरस आणि दिवाली*
*२५० इतर महत्त्वाचे दिवस*



**२५१**
**स्वच्छता**

**२५५ सामाजिक स्वच्छता**
*२५५ कृतज्ञता आणि परोपकार*
*२५८ समाज-केंद्रित श्रध्दा*
**२६१ आर्थिक स्वच्छता**
**२६९ मानसिक स्वच्छता**
**२७५ आध्यात्मिक स्वच्छता**
*२७६ तांब्याचा कडा (कडं)*
*२७७ अन्न, द्रवपदार्थ आणि कपडे*
*२७८ गुरुवारचे नियम*
*२७९ तुमची आभा आणि तुम्ही*
*२८१ अंतिम स्थिती*



**२८२**
**उपचार**

*२८५ नकारात्मक ऊर्जांचं चुंबकीकरण*
*२८७ उपचारकेंद्रित दृष्टिकोन*
*२८९ वेदनांपासून मुक्ती*
*२९३ उपचार-पध्दती*



**२९९**
**अलौकिकता**

*३०१ अनेकविध व्यक्तिमत्त्वं*
*३०५ शक्ति-प्रतीकं*
*३११ मूलभूत घटकांचे समन्वय*
*३१५ शरीर, मन आणि त्यांपलीकडले*
*३१७ आध्यात्मिक प्रभुत्व*
*३२० आच्छादनाचा त्याग*



**३२१**
**उल्लेखनीय व्यक्तींची ओळख-निर्देशिका**

**३३९**
**शब्दकोश**

**३५४**
**लेखकाविषयी**



# ०१

# विहंगावलोकन

***अपरिमेयाचं शब्दांमध्ये कधीच मोजमाप करता येत नाही.***
***तथापि जी शब्दचित्र आहेत, त्यांबद्दल सांगितलंच पाहिजे.***
***आम्ही पुन्हा उजाळा देतोय कोमल आठवणींना महागुरूंच्या,***
***जे महागुरू अतिशय महान आहेत आमच्या आकलनापेक्षाही.***

ज्यांच्या अस्तित्वामुळे आणि तत्त्वज्ञानामुळे अनेक जीवांच्या कथांचं पुनर्लेखन झालं, अशा महागुरूंच्या चरित्राचं शब्दांकन करणं अशक्यप्राय आहे. त्यामुळे, काही दशकांनंतर, लेखणीला ते काय होते आणि आम्ही त्यांना काय समजलो यात फरक करणं अशक्य आहे, याच्याशी मी सहमत आहे.

या जीवनात, गुरुदेवांबरोबरचं माझं सहचर्य सुरू झालं १९७७ साली, परंतु, मी त्यांच्या चरित्राचं *संशोधन* करायला सुरवात केली ती मात्र २००९ साली. ते प्रत्यक्ष कागदावर उतरवायला ११ वर्षं लागली. या कालावधीत, त्यांचे अनेक शिष्य निवर्तले, कधीकाळी माहीत असलेल्या कहाण्यांची कुजबुज मागे ठेवून. महागुरू हे संकोची स्वभावाचे होते. ते छायाचित्रकार किंवा कोणत्याही प्रसिध्दीपासून दूर रहण्याचा प्रयत्न करत. त्यामुळे, त्यांच्याबद्दलची सर्व माहिती ही माझ्या, त्यांच्या शिष्यांच्या, भक्तांच्या आणि कुटुंबाच्या वैयक्तिक ज्ञानातून आलेली आहे.

काळानुसार अनेक आठवणी धूसर होतात. आपण मोठे पराक्रम लक्षात ठेवतो. परंतु, छोट्या छोट्या गोष्टी विसरतो, ज्या खरं म्हणजे, पूर्ण कथेचं

स्वरूप समजण्यासाठी अतिशय महत्त्वाच्या असतात. म्हणून, जरी माझ्याकडे गुरुदेवांच्या कहाण्यांचा मोठा साठा असला, ज्यांत तथ्यं ही कल्पनाविलासाला मागे टाकत असली, तरी, मी जाणूनबुजून त्या सांगायच्या नाहीत असं ठरवलंय. कारण, त्या तुम्हाला विश्वास ठेवता येणार नाहीत एवढ्या खऱ्या वाटण्याऐवजी, जास्त काल्पनिकच वाटतील.

काळ सुध्दा माणसाला, अधूनमधून विरामचिन्हं वेडीवाकडी करत, कथेची पुनर्कल्पना करायला लावतो. दर दिवशीच्या कथनांमध्ये स्वल्पविराम हे नेहमी उद्गारवाचकात बदलतात. याच कारणास्तव, ज्या किश्श्यांचे अंशतःच स्पष्टीकरण करता येतं, ते या चरित्रातून वगळलेत. तर जे उरले आहेत, त्यांची महागुरूंच्या जीवन कथा, तत्त्वज्ञान, रहस्यांचे सराव, सुपरहिरो (सुपरमॅन सारख्या अतिमानवी शक्ती असलेलं एक परोपकारी काल्पनिक पात्र) आणि महासत्ता अशा विविध भागांमध्ये विभागणी केली आहे.


भरपूर मार्मिकता आणि सहजसुंदर साधेपणा असणाऱ्या या माणसाला अलंकारप्रचुर ओळी, जलद घडणाऱ्या क्रिया किंवा घटनांविषयी न लिहिता सादर करणं आवश्यक आहे. आध्यात्मिक शिखरावर पोहोचण्याकरता त्यांनी ज्या संकटांचा सामना केला, त्यांचा वाक्प्रचार किंवा म्हणींबरोबर सौदा केला जाऊ शकत नाही. या पुस्तकाचा तपशीलरूपी गुच्छ हा खातरजमा केलेल्या माहितीतून निवडलेला आहे. बाकीचं सर्व काही साहजिकच वगळलंय. अशा कृतित अस्सल खरेपणा असला, तरी तो गुरुदेवांच्या सर्वव्यापकतेविषयी आकलनक्षमा मर्यादित करू शकतो.

*एक सच्चा सामान्य माणूस म्हणून त्यांचं मोजमाप करता येईल एकवेळ,*
*परंतु, ते अपरिमेय रहातात महागुरू म्हणून.*

या चरित्राचं प्रयोजन हे आध्यात्मिक सुविख्यात व्यक्तीचं अशा रीतीनं इतिवृत्त द्यायचंय, की जे धाक दाखवत नाही, पण, महागुरूंनी केलेल्या करामती आपल्याला साधता याव्यात यासाठी प्रेरणा देईल. कोणतीही प्रेरणादायी कथा ही अपूर्ण असते, जोपर्यंत ती काहीजणांची महत्त्वाकांक्षा बनत नाही. ज्यांना स्वातंत्र्य किंवा मुक्ती मिळवण्याची मनीषा असते, त्यांच्यासाठी महागुरूंच्या तत्त्वज्ञानाशी वचनबध्द होण्याची क्षमता आणि त्यांच्या कृपेला संपूर्ण शरण जाणं हे निर्धारक ठरेल.

दैवाच्या लॉटरीमध्ये, मी तुम्हाला शुभेच्छा देतो.

Hingori



*आम्ही त्यांना मानवी रूपात असणाऱ्या प्रगत आध्यात्मिक आत्म्यापेक्षा एक असा माणूस म्हणून पाहिलं ज्यांचा आत्मा प्रगत होता. ते नेहमी दावा करायचे की आम्हाला ते नक्की कोण आहेत, हे कधीच कळणार नाही. आणि ते तितकंच सत्य आहे जितकी त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट सत्य आहे!*





# ०२

# त्यांचं जीवन

# सुरवातीची वर्षं

**Early Years** हा Podcast महागुरूंच्या बालपणाचा आणि तारुण्याचा पुन्हा मागोवा घेतो. महागुरू म्हणून आकाराला येणाऱ्या वर्षांच्या कथेत शिवाच्या सर्वव्यापी आविष्काराची मुळं कशी रुजलेली आहेत, ते स्पष्ट करतो. www.gurudevonline. com वर ऐका.

सुरवातीची वर्षं

# राजांचा राजा जन्माला आला

*एका पावसाळी दिवशी जन्माला आला एक साक्षात्कारी संत*
*जेव्हा बोचऱ्या थंडीचं झालं वसंतात परिवर्तन.*
*ते त्यांना दिलेल्या नावाप्रमाणे जगणार होते,*
*राजांचा राजा म्हणून उदयाला येणार होते.*

१९३८ साली वसंत ऋतूचं आगमन होताच, एका ढगाळ दिवशी गुरुदेवांचा जन्म एका साध्या ब्राह्मण कुटुंबात झाला. गुरुदेवांच्या कुटुंबात आईवडील, मोठी बहीण आणि आईच्या आईवडिलांचा समावेश होता. व्यवसायानं रसायनांचे व्यापारी असलेले त्यांचे वडील भगतरामजी आणि त्यांची आई राम प्यारीजी हे एक साध नि प्रेमळ जोडपं होतं.

गुरुदेवांचं जन्मठिकाण हरियाणा हे भारतातील पंजाब राज्याच्या होशियारपूर जिल्ह्यात एक छोटंसं खेडं होतं. त्या गावाची हिंदू आणि मुस्लीम मिळून जी छोटीशी लोकसंख्या होती, ती म्हणजे जातीय सुसंवादाचा एक आदर्श नमुना होती. गुरुदेवांच्या जन्माअगोदर, हरियाणाला स्थलांतर करण्यापूर्वी, त्यांचं कुटुंब हे अमृतसर या राजधानीच्या ठिकाणी रहात होतं. गुरुदेवांच्या आईला, विमला या पहिल्या मुलीच्या जन्मानंतर, गर्भधारणा होत नव्हती. म्हणून, गुरुदेवांच्या वडिलांच्या वडिलांनी ईश्वरी साहाय्य मिळवण्याकरता सुवर्ण मंदिरातील एका

संतांशी संपर्क साधला. त्या *संतांनी* गुरुदेवांच्या आईला ४० दिवसांकरता *जल* (पवित्र पाणी किंवा तीर्थ) प्राशन करण्याकरता म्हणून दिलं. त्यानंतर, लगेचच गुरुदेवांच्या आईला दिवस गेले. संतांनी गुरुदेवांच्या आईवडिलांना असा आदेश दिला होता की त्यांनी त्यांच्या नवजात मुलाचं नाव सन्त प्रकाश अर्थात साक्षात्कारी संत असं ठेवावं. तथापि, गुरुदेवांच्या जन्मानंतर, जेव्हा लवकरच आकाश निरभ्र झालं, तेव्हा त्यांच्या वडिलांच्या आईला ते ढगाळ हवामान म्हणजे एक शुभ शकुन वाटला. पर्जन्यदेवतेनं आपल्याला आशीर्वाद दिलाय असं समजून, तिच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची इच्छा बाळगून, तिनं आग्रह धरला की आपल्या नातवाच्या नांवात 'इंद्र' (हिंदू पुराणांनुसार पर्जन्यदेवता) हा शब्द असावा. तिच्या इच्छेचा मान राखण्याकरता, गुरुदेवांच्या आईवडिलांनी आपल्या नवजात मुलाचं नांव 'राजिंदर' असं ठेवलं. त्याचा अर्थ होतो 'राजांचा राजा'. काही दशकांनंतर, गुरुदेव निसर्गातील पर्जन्य आणि इतर अनेक भूतांना नियंत्रित करण्याची शक्ती प्राप्त करणार होते.

---

हिंदू धर्मात जे सात महान ऋषी आहेत, त्यांच्यापैकी भृगू या ऋषींनी हजार वर्षांपूर्वी लिहिलेल्या भृगू संहितेत असं म्हटलंय की या ज्ञानी जीवाचं नाव संत प्रकाश नाही, तर राजिंदर असं ठेवलं जाईल. संहितेत गुरुदेवांविषयी असंही कथन केलंय की - शिवाचा एक *अंश* हरियाणा नावाच्या खेडेगावात जन्म घेईल आणि त्याच्या नावाच्या सुरवातीला 'राज' हा शब्द असेल.

---

गुरुदेव केवळ काही आठवड्यांचे असतानाच असं सूचित झालं की या मुलाचं भवितव्य सामान्य नसेल. त्यांच्या वडिलांच्या ओळखीच्या एका मुस्लीम सुतारानं गुरुदेवांच्या परिवाराला हस्तकलाकुसर असलेला एक लाकडी पाळणा बाळाच्या जन्मानिमित्तानं भेट म्हणून दिला. वसंत ऋतूत एका सकाळी, गुरुदेवांच्या आईनं त्यांच्या घराच्या गच्चीवर, त्या पाळण्यात त्या तान्ह्या बाळाला ठेवलं. अगदी काही मिनिटांनीच ती परत आली, तर, तिला त्या तान्हुल्याच्या अंगावर फणा काढून एक साप बसलेला आढळला. ती तर,

भीतीनं एका जागी खिळल्यासारखी उभी होती, तेवढ्यातच, तो साप सळसळत गेला नि भिंतीला असलेल्या विवरात दिसेनासा झाला. साप दिसण्याचा नेमका अर्थ काय हे माहीत नसल्यामुळे, गुरुदेवांच्या आईवडिलांनी मंदिरातील एका पुजाऱ्याचा सल्ला घेतला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, हा बाळाचं उत्कृष्ट भविष्य सूचित करणारा एक शकुन होता. काही वर्षांनंतर, गुरुदेवांच्या घरी भेट देणाऱ्या एका साधूनं अशीच भविष्यवाणी केली होती. त्यानं गुरुदेवांच्या आईला सांगितलं होतं की वयाच्या ३५व्या वर्षी तिचा मुलगा 'शिवासमान' कोणी एक शक्तिशाली संत बनेल.


---

शिव म्हणजे गुण आणि विशेषांच्या समुदायाचा एक शक्ति-संयोग आहे. जो मुक्तीची अवस्था प्राप्त करण्याएवढा आध्यात्मिकरीत्या प्रगत झालेला असतो, त्याची शिवाचा आविष्कार अशी व्याख्या करता येते. असा आत्मा हा एकतर मनुष्यरूपात असू शकतो किंवा दिव्य रूपात असू शकतो. मनुष्यरूपातील शिवाचा आविष्कार म्हणजे हनुमान, परशुराम, गुरुदेव, बुड्ढे बाबा, गोरक्षनाथ, येशू, गुरू नानक, गुरू गोबिंद सिंग इत्यादी.

---

गुरुदेवांचं भविष्य सामान्य नसून, काही वेगळं असण्याची भाकितं असूनही, त्यांची सुरवातीची वर्षं सामान्य स्थितीत गेली. अंदाजे पाच वर्षांचे असताना, ते हरियाणाच्या DAV Modern School मध्ये जायला लागले. तिथं ते हिंदी, उर्दू आणि फारसी भाषा शिकले. गुरुदेवांच्या शालेय सोबत्यांना तो एक खुशालचेंडू मुलगा म्हणून आठवत होता, ज्याचा अभ्यासापेक्षा मस्ती करण्याकडे जास्त कल होता आणि ज्याची दुसऱ्यांशी चटकन मैत्री व्हायची. १९४८ साली, एका परिचित इसमानं दिलेलं अन्न खाल्यानंतर, दुर्बल बनवणाऱ्या एका आजारपणानं गुरुदेवांना घेरून टाकलं. वैद्यकीय मदत मिळूनही, त्यांना अजिबात आराम मिळाला नाही आणि अखेरीस, ते बिछान्याला खिळून राहिले. उपायांसाठी हवालदिल झालेल्या गुरुदेवांच्या आईनं त्यांना हिमाचल प्रदेशातील





*शेतांमधून फळं तोडल्यामुळे गुरुदेव नि त्यांचा मित्र सुभाष यांचा खवळलेले शेतकरी पाठलाग करतात.*

प्रसिध्द असलेल्या बाबा बालक नाथ मंदिरात घेऊन जाण्याचा आग्रह धरला. गुरुदेवांच्या आईवडिलांनी मंदिराकडे जाणाऱ्या डोंगराळ रस्त्यावरून कित्येंक किलोमीटरपर्यंत, हालचाल करायला असमर्थ असणाऱ्या आपल्या मुलाला उचलून घेऊन जाण्याची अतिशय अवघड कामगिरी स्वीकारली. तिकडे पोहोचल्यावर, बाबा बालक नाथांच्या एका शिष्यानं गुरुदेवांना *जल* (तीर्थ- मंतरलेलं पाणी) प्यायला दिलं आणि ते प्यायल्यावर, त्यांना ताक आणि *मसाण* (राख) यांची उलटी झाली.

गुरुदेवांच्या पत्नीचा माताजींचा असा विश्वास होता की त्यानंतर गुरुदेवांचं आश्चर्यकारकपणे बरं होणं या गोष्टीचा गुरुदेवांवर एक कायमस्वरूपी ठसा राहिला आणि तो त्यांच्यात आध्यात्मिक ज्ञानाची तीव्र इच्छा निर्माण करायला कारणीभूत झाला असेल.

बरं झाल्यानंतर आणि हिंडू-फिरू लागल्यावर, गुरुदेव त्यांच्या मिश्किल मार्गांवर परत गेले. ते आणि त्यांचे शालेय सोबती सुभाष सब्रवाल हे शाळेतून परत येताना धावण्याची स्पर्धा लावायचे आणि त्यांच्या मार्गावर ओळीनं असणाऱ्या शेतांमधली फळं तोडण्याकरता ठराविक ठिकाणी थांबे घ्यायचे. ज्या शेतकऱ्यांची फळं तोडली जायची, ते खवळायचे. त्यांच्या तक्रारींवर कारवाई करत, ''तू जर तुझे चाळे थांबवले नाहीस, तर, तुझे कान उपटीन आणि वाईट परिणाम होतील,'' अशी गुरुदेवांचे वडील गुरुदेवांना धमकी देत असत. परंतु, त्यांचा मुलगा निश्चिंत राहिला.

दर्ग्यात फळं तोडण्याच्या अविचारी साहसाच्या दरम्यांन, गुरुदेव नि सुभाष हे तिथं रहाणाऱ्या एका फकिराकडून प्रत्यक्ष फळं तोडताना पकडले गेले. त्यानं मुलांना त्या कृत्याचं परिमार्जन म्हणून त्या कबरीपुढे डोकं टेकवायला सांगितलं. त्या दोघांनी सांगितल्याप्रमाणे केलं. या प्रसंगानंतर, गुरुदेव नियमितपणे, त्या दर्ग्यात फकिराबरोबर वेळ घालवण्याकरता येऊ लागले. या वेळेला त्यांचं लक्ष्य होतं आध्यात्मिक ज्ञानाचं फळ.

सुरवातीची वर्षं

# आध्यात्मिक प्रारंभ

***पटलांच्या ऐकण्याच्या नि बघण्याच्या पलीकडे,***
***काय आहे हे जाणण्याच्या शोधात***
***ते घालवत कित्येक तास आणि दिवस ज्ञानी माणसांबरोबर,***
***आत्मसात करत जे काही ते गोळा करू शकत.***

गुरुदेवांची अध्यात्मातल्या आवडीनं भरारी घेतल्यामुळे, ते त्यांच्या घरापासून एका हाकेंच्या अंतरावर असलेल्या शीतला देवीच्या मंदिराला भेट देणाऱ्या *साधू* आणि गूढवाद्यांबरोबर वेळ घालवण्यासाठी म्हणून शाळा बुडवत. यादरम्यान, दसुआ चे सीतारामजी हे गुरुदेवांचे पहिले आध्यात्मिक मार्गदर्शक बनले.

गुरुदेवांनी दसुआच्या सीतारामजींच्या मार्गदर्शनाखाली अनेक *सिध्दी* कमावल्या आणि त्यामुळेच, त्यांना अध्यात्मवादी करू शकतील अशा पुष्कळ गोष्टी करण्याचं सामर्थ्य प्राप्त झालं. या *सिध्दी* महागुरू म्हणून प्राप्त झालेल्या शक्तींच्या तुलनेत सामान्य असल्या, तरी त्यांनी गुरुदेवांना अध्यात्मवादात गुंतून रहाण्यासाठी सक्षम बनवलं, आणि त्यांच्या आयुष्याला आध्यात्मिक सुविख्यात व्यक्ती म्हणून विधिलिखित वळण मिळालं. योग्यवेळी, महागुरू म्हणून आपली उन्नती होण्यापूर्वी, त्यांनी या सगळ्या *सिध्दींचा* त्याग केला.



*गुरुदेव दर्ग्यात चिराग लावण्याकरता*
*गुडघाभर पाण्यातून मार्ग काढत जातात*

एक तरुण अध्यात्मवादी म्हणून गुरुदेव हे त्यांच्या गावाच्या वेशीवर स्थित असलेल्या सडक शाह वालीच्या दर्ग्यात *चिराग* (तेलाचा दिवा) लावायला जात. त्या भागात अतिवृष्टी होणं ही सामान्य गोष्ट होती. गुरुदेवांच्या गावात फार लवकर पूर यायचा नि दैनंदिन जीवन विस्कळित व्हायचं. एका गुरुवारी, जेव्हा त्यांचं गाव अंशत: पाण्यात बुडालं होतं, त्यावेळी, गुडघाभर पाण्यातून मार्ग काढत, ते *चिराग* लावायला गेले आणि जोराच्या वाऱ्यानं तो विझू नये म्हणून त्याला आपल्या शरीराची ढाल दिली. त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीमुळें अत्यंत कोवळ्या वयात मूळ धरलं.

आपल्या सुरवातीच्या काळात, गुरुदेवांची मानव आणि प्राणी अशा सर्व जीवांप्रती वृध्दिंगत झालेली सहानुभूती दिसू लागली. ते आपल्याला वडिलांनी दिलेल्या किरकोळ पैश्यांमधून काही *आण्णा* (आणे) प्राणी, पक्षी आणि माश्यासाठी अन्न खरेदी करण्यावर खर्च करत. हरियाणाचे एक रहिवासी मोहन सिंग चिरा, जे मागाहून त्यांचे शिष्य बनले, त्यांनी एक आठवण सांगितली आहे की गुरुदेव हे किरकोळ पैश्यांमधले शिल्लक राहिलेले पैसे आपल्या मित्रांसाठी कोल्ड ड्रिंक्स खरेदी करण्याकरता खर्च करत. गुरुदेव स्वत:वर क्वचितच खर्च करायचे. अगदी लहान वयात सुध्दा, गुरुदेवांचं हृदय त्यांच्या छातीपेक्षा अधिक मोठं होतं!

***काही वर्षांमध्ये, स्वत:आधी दुसऱ्यांचा विचार करण्याची वृत्ती वाढली खूप मोठ्या प्रमाणात, ज्यामुळे बनली ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रबळ गुणधर्म.***

तथापि, त्यांच्या आध्यात्मिक पाठपुराव्याला शिक्षणाची किंमत मोजावीच लागली. शाळेतल्या त्यांच्या उदासीन वृत्तीमुळें शिक्षकांकडून येणाऱ्या तक्रारींनी त्यांचे आईवडील अगदी बेजार झाले होते. गुरुदेवांना शिक्षणाकडे वळवण्याकरता, त्यांनी पालकांच्या नियमपुस्तिकेमधील प्रत्येक युक्तीचा

वापर करून बघितला, परंतु, त्यांच्या पदरात फारच थोडं यश पडलं. जेव्हा गुरुदेव साधारण गुण मिळवून माध्यमिक शाळेतून बाहेर पडले, तेव्हा त्यांच्या पालकांची धक्का आणि दिलासा अशी संमिश्र भावना होती. पालकांनी निर्णय घेतला की आता गुरुदेवांना अशा ठिकाणी ठेवायची वेळ आली आहे की जिथं व्यावसायिक संधी मुबलक असतील आणि आध्यात्मिक व्यवधानविरहित असेल. गुरुदेवांना त्यानंतर दिल्लीला हलवणं ही गुरुदेवांच्या व्यावसायिक आयुष्याची आणि त्यांच्या आध्यात्मिक बर्हिमंडलात चढाईची सुरवात ठरली.

सुरवातीची वर्षं

# मैत्रीचे बंध

***बनवले गुरुदेवांनी नवीन मित्र गजबजलेल्या ठिकाणी
ज्यांना वाटायचं की गुरुदेव आहेत मजेदार व्यक्तिमत्त्व.
परंतु, कसं समजलं असतं त्यांना की दिवस हे वर्षांमध्ये
विरघळून गेल्यावर गुरुदेव महान बनले असतील.***

१९५५ साली, गुरुदेव हे दिल्लीत शाहदरा येथील आपल्या काकांच्या घरी रहायला गेले. आपल्या नातेवाईकांवर भार बनून रहाण्याची इच्छा नसल्यामुळे, त्यांनी पेन, टॉफी विकणं यांसारखी मासलेवाईक कामं केली आणि बस कंडक्टर म्हणून सुध्दा काम केलं. आपल्या काकांच्या कुटुंबाप्रती कृतज्ञता फेडण्याकरता म्हणून, गुरुदेव घरातली कष्टाची कामं सुध्दा स्वेच्छेनं करत असत. अनेकदा, ते आपल्या पाठीवर १५-२० किलोंनी भरलेली धान्याची पोती पिठाच्या गिरणीपर्यंत वाहून नेत असत. ते ओझं वाहणं खरं म्हणजे, त्यांच्याकरता खूप अवघड व्हायचं, तरीही, ते आपलं मंत्रपठण करत रहायचे आणि कष्टप्रद काम पुढे चालू ठेवायचे.

एकदा घराच्या आसपास फेरफटका मारत असताना, त्यांनी एका वृध्द स्त्रीला गायीचं दूध काढायचा अयशस्वी प्रयत्न करताना पाहिलं आणि म्हणून, त्यांनी तिला मदत करायची इच्छा व्यक्त केली. त्यांनी गायीला हलकेच थोपटले आणि गायीनं दूध द्यायला सुरवात केली. त्यानंतर, गुरुदेव हे त्या स्त्रीसाठी भाग्यच ठरले. जेव्हा जेव्हा गायीचं दूध काढायचं असेल, तेव्हा तेव्हा

ती त्यांची मदत मागू लागली. अशाच गप्पा मारण्याच्या ओघात, त्या स्त्रीनं गुरुदेवांना त्यांच्या शिक्षणाबद्दल विचारलं. त्यांनी स्पष्टच सांगितलं ''मी या शहरात नवखा आहे आणि त्यामुळे मी अशा कुणाही व्यक्तीला ओळखत नाही की जी मला शिक्षणाच्या बाबतीत मार्गदर्शन करू शकेल. म्हणून, मी अशी कामं करतोय जी निरुद्देश्य आहेत." जेव्हा तिनं हे सगळं ऐकलं, तेव्हा तिनं मार्गदर्शनाच्या संदर्भात आपल्या नवऱ्याला भेटायला सांगितलं. तिचा नवरा हा PUSA या संस्थेचा मुख्याध्यापक होता. त्यांच्या सांगण्यावरून, गुरुदेवांनी भारत सेवक समाज (BSS) या भारत सरकारनं नियुक्त केलेल्या विकास संस्थेत दोन वर्षांच्या *तांत्रिक* कोर्ससाठी आपलं नाव नोंदवलं. १९५८ साली, तो कोर्स पूर्ण केल्यावर, ते भारतीय कृषि संशोधन संस्थेच्या (IARI) अखिल भारतीय जमीन आणि भू-विनियोग सर्वेक्षण विभागात रुजू झाले. जेव्हा पहिला पगार म्हणून १५० रुपये मिळाले, तेव्हा ते २१ वर्षांचे होते.

कामाच्या ठिकाणी, गुरुदेवांनी ज्या तरुणाशी पहिली मैत्री केली, त्यांचं नाव होतं किशनलाल नागपाल. गुरुदेव त्यांना प्रेमानं 'नागा' अशी हाक मारायचे. नशीबानं नागाजींना हात दिला आणि त्यांच्याकडून अनवधानानं झालेल्या एका चुकीमुळे, त्यांना गुरुदेव जिथं काम करायचे, त्याच विभागात नोकरी मिळाली. नागपालजींनी आपला अर्ज K. L. Nagpal या नावानं भरला होता. त्यांच्या नकळत, एका वजनदार राजकारण्याच्या मुलानं देखील त्याच आद्याक्षरांनी अर्ज भरला होता. त्या दोघांचं आडनाव एकाच पदाकरता स्पर्धा करत होतं. जेव्हा नोकरी वाटपाची वेळ आली, तेव्हा विभागाच्या अधिकाऱ्यांची चुकीची समजूत झाली की नागपालजी हे त्या राजकारणी व्यक्तीचा मुलगा आहेत, आणि म्हणून त्यांनी नागपालजींना नियुक्त केलं. अशा प्रकारे, त्यांनी नागपालजींकरता व्यासपीठ तयार केलं, जेणेकरून त्यांचा अशा व्यक्तीशी परिचय व्हावा की जी त्यांचं आयुष्य बदलवून टाकेल. हे अशा योगायोगांपैकी काही थोडे होते ज्यांची, गुरुदेवांचं रेखाचित्राच्या गुंतागुंतीच्या जिगसॉ पझलमध्ये चपखल बसण्याकरता कलात्मक रचना केली गेली होती!

ज्यावेळी गुरुदेवांना दिल्लीत रहायला जागा हवी होती, त्यावेळी, 'मी तुमच्या फ्लॅटमध्ये राहू शकतो का?' असं त्यांनी नागपालजींना विचारलं होतं. पहारगंज भागात नागपालजी हे घरमालक आणि आपला मित्र असलेल्या द्वारकानाथजी यांच्यासह १२० स्क्वेअर फीटच्या एका खोलीत रहात होते. द्वारकानाथजी हे केंद्रीय बांधकाम खात्याचे (CWD) एक कर्मचारी होते. द्वारकानाथजींनी गुरुदेवांना भेटायचा आग्रह धरला, जेणेकरून गुरुदेव हे योग्य रूममेट बनू शकतील का नाही याची त्यांना खात्री करून घ्यायची होती. त्यांच्या महत्त्वाच्या भेटीच्या काही मिनिटांमध्येच, त्यांच्या समोरच बसलेल्या त्या तरुण माणसाशी द्वारकानाथजींच्या मनाच्या तारा जुळल्या. त्यांनी आपल्या आठवणीत सांगितलंय, ''जेव्हा मी गुरुदेवांशी प्रथम बोलायला सुरवात केली, तेव्हाच मी अतिशय प्रभावित झालो. ते कमालीचे बुध्दिमान होते आणि त्यांना प्रत्येक गोष्टीचं नीट आकलन व्हायचं. त्यांच्याशी गप्पा मारणं अद्‌भुत होतं आणि मला जाणीव झाली की आमचे स्वभाव परस्परांशी अगदी जुळणारे होते." जेव्हा, अशा प्रकारे, त्या तिघांनी एकत्र रहायला प्रारंभ केला, तेव्हा दर महिन्याला खाणावळ निधी म्हणून ३० रुपये द्यायचं ठरवलं.

ते तिघेजण आपल्या तुटपुंज्या मिळकतीमुळे काटकसरीनं रहात होते. तिघंही नाश्त्याला आणि दुपारच्या जेवणात साधे *पराठे* खात असत. ते वेळप्रसंगीच, त्यांच्या फ्लॅटजवळच्या धाब्यावर एकमेकांना *पकोऱ्यांची* मेजवानी द्यायचे. तथापि, बहुधा, दाल, दही आणि आधीच्या रात्री शिल्लक राहिलेले पदार्थ मिसळून बनवलेला भात असं त्यांचं रात्रीचं साधं जेवण असायचं.

गुरुदेव हे साध्या साध्या बाबतीत सुखावणारी व्यक्ती होते. प्रत्येक रविवारी ते आणि त्यांचे घरातले अन्य सहकारी दिल्लीतील आणि दिल्लीच्या आसपासच्या स्थळांना भेट देण्याचा बेत आखायचे. चित्रपटांची आवड असल्यामुळे, त्यांना थिएटरमध्ये जाऊन नवीन लागलेले चित्रपट बघायला आवडायचं. नागपालजी हे नेहमी साहसं करायला तयार असायचे. परंतु, द्वारकानाथजींची आपल्या



कुतुब मीनार इथं गुरुदेव (उजवीकडे),
नागपालजी (डावीकडे) आणि द्वारकानाथजी (मधोमध)



मित्रांसमवेत जाण्याकरता मिनतवारी करावी लागायची. द्वारकानाथजी सकाळी लवकर उठायचे. त्यामुळे, रात्रीचा उशीराचा शो असेल, तर ते हमखास झोपायचे. गुरुदेवांनी या कठीण समस्येवर एक भन्नाट तोडगा काढला. द्वारकानाथजींना गुरुदेव आणि नागपालजी यांच्या मधोमध बसायला भाग पाडलं जायचं, जेणेकरून, जेव्हा द्वारकानाथजींना झोप अनावर व्हायची, तेव्हा त्यांना जागं ठेवण्याकरता, दोन्ही बाजूंनी चिमटे काढणं शक्य व्हायचं.

लोकांना जागं ठेवण्याकरता नावीन्यपूर्ण तोडगे शोधून काढण्याव्यतिरिक्त, गुरुदेव आपल्या विनोदबुध्दीनं सर्वांनाच मनमुराद हसवत. ते आपल्या मित्रांचं, त्यांच्या ओळखीच्या लोकांची तंतोतंत छाप पाडून आणि त्यांना माहीत नसलेल्या लोकांबद्दल मनोरंजक किस्से सांगून, मनोरंजन करायचे. लोकांना त्यांचा सहवास इतका आवडायचा की द्वारकानाथांचा मोठा भाऊ आपल्या धाकट्या भावाला तेव्हाच भेटायला यायचा, जेव्हा गुरुदेव तिथं उपस्थित असायचे. गुरुदेवांचा आपल्या रूममेट्सबरोबर असलेला सहज सौहार्द हा संसर्गजन्य होता. लवकरच, गुरुदेवांचे एक सहकारी जैन साहेब आणि एक शेजारी कुंदनलाला सहानी त्यांच्या मौजमजेत सामील झाले. ते त्यांच्या कित्येक संध्याकाळी द्वारकानाथजींच्या छोट्याशा फ्लॅटमध्ये *पकोरे* खाण्यात आणि सुप्रसन्नतेत सहभागी होत घालवत. जेव्हा जेव्हा त्यांना अर्थगर्भ सुरेल गाणी ऐकायची इच्छा व्हायची, तेव्हा तेव्हा गुरुदेवांचा जादुई स्पर्श त्यांच्या मदतीला धावून यायचा. द्वारकानाथजींकडे एक जुना रेडियो होता. तो कधी चालू व्हायचा नाही. पण जेव्हा जेव्हा गुरुदेव त्याच्या गंजलेल्या पृष्ठभागावर थापट मारायचे, तेव्हा तेव्हा तो वाजायला लागायचा. या गोष्टीची त्यांच्या मित्रांना खूप मजा वाटायची.

गुरुदेवांनी प्रेमाची इतकी ऊब दिली की हिमाचल प्रदेशात होणाऱ्या शिबिरांच्या ठिकाणी गुरुदेवांना भेटण्यासाठी म्हणून, कुंदनलाल आणि द्वारकानाथजी हे आपल्या कामातून वेळ काढत असत. आपल्या पाहुण्यांची व्यवस्थित काळजी

घेतली जातेय का नाही याची खात्री करण्याकरता गुरुदेव आकाशपाताळ एक करायचे. शिबिरातील मनोरंजनाच्या कार्यक्रमांमध्ये बुध्दिबळ खेळणं आणि पत्त्यांचे डाव टाकणं यांचा समावेश असायचा. त्यांत गुरुदेव नेहमीच जिंकायचे. गुरुदेवांचं नशीब त्यांच्या बाजूनं असतं, हे जाणून, गुरुदेवांचे सहकारी त्यांना आपल्या वतीनं खेळायला सांगायचे. गुरुदेव सुध्दा सहकाऱ्यांच्या बाजूंचं पारडं जड करत, स्वेच्छेनं त्यांच्या वतीनं खेळायचे. तथापि, महागुरू बनल्यानंतर मात्र, ते जुगार आणि सट्ट्यापासून परावृत्त झाले.

गुरुदेव हे अतिशय उदार होते आणि लोकांसाठी मदतीचा हात पुढे करताना ते अजिबात दुसऱ्यांदा विचार करत नसत. तथापि, लोक त्यांच्या दयाळूपणाचा नेहमी फायदा घेत. जेव्हा द्वारकानाथांनी ही गोष्ट ध्यानात आणून दिली, तेव्हा गुरुदेव म्हणाले, ‘‘मला त्याची जाणीव आहे. परंतु, जेव्हा कुणी मदत मागतं, तेव्हा मी ती नाकारू शकतच नाही.’’

बाह्य मजामस्ती करूनही, गुरुदेवांची आध्यात्मिक ओढ त्यांच्या रूममेट्सना स्पष्ट दिसायची. ते मध्यरात्री गुरुदेवांना ब्लँकेटच्या आत ध्यान करत असल्याचे बघत असत. द्वारकानाथजींना इतरही असे प्रसंग आठवतात की ज्यांतून सूचित व्हायचं की गुरुदेव हे सामान्य माणूस नव्हते. ते आणि नागपालजी हे शिवभक्त होते. त्यामुळे, नागपालजी गुरुदेवांना त्यांच्या फ्लॅटजवळच्या शिव मंदिराला भेट देण्यासाठी बरोबर यावं म्हणून जबरदस्ती करत असत. गुरुदेव मंदिराबाहेर थांबायचा आग्रह धरत. तर बाकीचे मंदिराच्या आत नमस्कार करण्याकरता जात. ही गोष्ट गुरुदेवांच्या रूममेट्सना बुचकळ्यात टाकायची. कारण, त्यांना माहीत होतं की गुरुदेव शिवमंत्र म्हणायचे.

द्वारकानाथजींनी असंही निरीक्षण केलं की गुरुदेव जे भाकीत करत, ते खरं व्हायचं. ते आणि नागपालजी हे मूळचे आग्र्याचे असल्यामुळे, त्यांनी एकदा आग्रा शहराची दिवसाची सफर करायचं ठरवलं. निघायच्या आदल्या दिवशी,

त्यांनी गुरुदेवांना हा बेत सांगितला. त्यामुळे, आपल्याला वगळलंय, हे पाहून, गुरुदेवांची चिडचिड झाली. त्यांनी टिप्पणी केली, ''माझ्यशिवाय, तुम्हाला ताज महलच्या भूमीत प्रवेश करता येणार नाही.'' बर्थचं बुकिंग केल्यामुळे, आपली सहल निश्चितपणे होणार याची खात्री असल्यानं, हे शब्द एका चिडलेल्या मित्राचे आहेत, असं समजून, द्वारकानाथजींनी गुरुदेवांच्या शब्दांकडे दुर्लक्ष केलं. दुसऱ्या दिवशी ती जोडगोळी स्टेशनकडे रवाना झाली, ट्रेन पाच तास उशीरानं येणार होती, हे जाणून घेण्याकरता. त्यांच्या लक्षात आलं की दुसऱ्या दिवशी कामावर हजर रहाण्याकरता ते वेळेवर परत येऊ शकले नसते. गुरुदेवांनी त्या दोघांचं आपल्या परिचित हास्यानं आणि त्यांच्या पंजाबी आवडत्या शब्दांनी कसं स्वागत केलं होतं, हे आठवून द्वारकानाथजींना हसायला आलं!

---

स्वत:च्या वैयक्तिक अनुभवामधून मला शोध लागला की गुरुदेवांनी कधीही मंदिरांमध्ये प्रवेश केला नाही. गुरुदेव नि मी बिना येथील स्टेशनवर दिल्लीला जाणाऱ्या ट्रेनची वाट बघत असताना, मी आध्यात्मिक अतिउत्साहाच्या लाटेत आणि कट्टरतावादाच्या विदूषकी चाळ्यांमध्ये वाहून गेलो. गुरुदेव जरी माझ्या बाजूला बसले होते, तरी सुध्दा, मी जवळच्याच एका झाडाखाली असलेल्या छोट्याशा मंदिरात गुरुदेवांच्या प्रति आदर म्हणून एक *दिया* लावायचं ठरवलं. जेव्हा मी ज्योत पेटवली, तेव्हा माझ्या शरीराला झटके बसले. कारण, मी अजाणतेपणाने, माझ्या अंतरात असणाऱ्या छोट्या मंदिरातल्या शक्तीला चुंबकीय केलं होतं. जर ते मंदिर अधिक शक्तिशाली असतं, तर कदाचित, माझ्या डोक्यावर घुमट उगवले असते. गुरुदेवांना शिव मंदिरांवरील मालकीहक्काची प्रकर्षानं जाणीव होत असावी आणि म्हणून, ते शिव मंदिरांमध्ये प्रवेश करत नसत. त्यांना मंदिरांच्या शक्तींचा समतोल ढळू द्यायचा नसे.

---

या विचित्र प्रसंगांव्यतिरिक्त, गुरुदेवांचे मित्र आपल्या चेष्टा-मस्ती प्रिय असणाऱ्या, सिगरेट ओढणाऱ्या मित्राचा एक गंभीर अध्यात्मवाद्याच्या प्रतिमेशी

मेळ घालण्याकरता मनोमन झगडायचे. जेव्हा गुरुदेवांनी जैन साहेबांना सांगितलं की अनेकांचा गुरू बनण्याचं आपल्या नशिबात लिहून ठेवलंय, तेव्हा जैन साहेबांना ते भविष्य इतकं अनाकलनीय वाटलं की त्यांना हास्याची उकळी फुटली. परंतु, नशीबानं आपल्या योजनांसह प्रगती केली. काही वर्षांनी, गुरुदेव हे महागुरू बनले, द्वारकानाथजी आणि नागपालजी हे आपल्या पूर्वाश्रमीच्या मित्राचे भक्त झाले, तर जैन साहेब हे गुरुदेवांच्या अत्यंत प्रभावशाली शिष्यांपैकी एक बनले.

गुरुदेवांच्या ज्या जादुई स्पर्शानं गायींना दूध द्यायला आणि रेडियोला सुरू व्हायला उद्युक्त केलं, तो भविष्यकाळात खूप उपयोगाचा ठरणार होता आमचे कान खेचून आम्हाला त्यांच्या तालावर नाचवण्याकरता.



परिवाराचं चित्र - (डावीकडून उजवीकडे)- रेणू, इला,
गुरुदेव, पुनीत, परवेश, माताजी आणि अलका



# कुटुंबवत्सल माणूस

ही पानं काय सांगतात, त्याहून अधिक जाणण्याकरता
wwwgurudevonline.com यावर
**The Family Man** हा podcast ऐका

# शिव-शक्तीचं मीलन

*ज्या राणीशी त्यांनी विवाह केला, ती त्यांच्या शक्तीचा आधारस्तंभ बनली. तिच्या शिवाची शक्ती बनली. तिनं त्यांच्या कुळासाठी (शिष्य नि भक्तांसाठी) मातृत्वाचं आवरण धारण केलं, जिवंत असेतोवर नि:स्वार्थीपणे सेवा करत राहीली.*

गुरुदेव हे नोकरीत स्थिरस्थावर झाले न झाले, तोच गुरुदेवांचे आईवडील गुरुदेवासाठी अनुरूप वधू शोधायला लागले. १९६०साली त्यांचं वधू-संशोधन संपलं, जेव्हा गुरुदेवांनी सुदेश शर्मा नावाच्या २१ वर्षांच्या मुलीशी विवाह केला. सुदेश शर्मा ही पंजाबमधील लुधियाना येथील एका अत्यंत आदरणीय परिवारातली होती. काही वर्षांनी, तिचा उल्लेख आदरानं माताजी (आई) असा होऊ लागला.

माताजींचे वडील हे कोळश्याचे व्यापारी होते. माताजी लहान असतानाच, ते निवर्तले. माताजी या सात बहिणींमध्ये सर्वात लहान होत्या. त्यांचा सर्वात मोठा भाऊ हा एक सुप्रसिध्द स्वातंत्र्यसेनानी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा सभासद होता. तर दुसरा एक भाऊ रुद्रजी हा शिक्षक होता.

माताजींच्या मृत्यूपूर्वी मी त्यांची एक मुलाखत घेतली होती, तेव्हा त्यांनी मला एक पूर्वीची आठवण सांगितली- ज्यावेळेस त्यांचं लग्न झालं, त्यावेळेस,

त्यांना गुरुदेवांच्या आध्यात्मिक ओढीविषयी अजिबात कल्पना नव्हती. विवाहानंतर, एका आठवड्याने, माताजींना गुरुदेव बिछान्यावर बेशुध्दावस्थेत आढळले. काहीतरी भयंकर घडलंय, असं समजून, त्या त्यांच्या नणंदेच्या खोलीकडे धावतच गेल्या, मदत कर म्हणून विनवणी करायला. गुरुदेवांच्या बहिणीनं त्यांना सांगितलं की *पाथच्या* (ध्यानाच्या) दरम्यान ते कोमासारख्या अवस्थेत जातात. तेव्हा घाबरायचं काही कारण नाही. त्यानंतरच, माताजी शांत झाल्या. आपल्या पतीच्या आध्यात्मिक अंगाशी झालेली पहिली भेट माताजींना आठवली आणि त्यांना हसायला आलं.

अनेकजणांच्या विवाहांप्रमाणे त्यांच्या विवाहात सुध्दा, सुरवातीच्या काळातील तात्पुरत्या समस्या होत्या. काही आठवड्यांनतर, गुरुदेवांनी आधुनिक पध्दतीनं संन्यासमार्गाचा अवलंब करायचा निश्चय केला. एक संन्यासी म्हणून, आध्यात्मिक सिध्दींचा पाठपुरावा करण्यासाठी, त्यांनी आपलं रहातं घर सोडलं. पाच वर्षांनंतर, एकदा, अमृतसरमधील संतोसकार साहेब गुरुद्वारात गुरुदेव ध्यान लावून बसले होते. त्यावेळी, त्यांनी आवाज ऐकला- 'तू पती म्हणून तुझ्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतरच, तुझं अंतिम ध्येय साध्य होईल.' त्यानंतर, लवकरच, गुरुदेव आपल्या पत्नीकडे परत आले आणि त्यांनी एका गृहस्थाचं आयुष्य सुरू केलं. काही वर्षांनी, त्यांनी आपल्या शिष्यांना गृहस्थ आश्रमाची संकल्पना शिकवली.

गुरुदेव आपल्या पत्नीला प्रेमानं मास्टर म्हणायचे. ते एक दयाळू नि दक्ष पती होते. त्यांच्या विनोदबुध्दीमुळे, तिला हसू फुटायचं. महागुरू म्हणून प्रगती होण्यापूर्वी, त्यांची आयुष्यं साध्यासुध्या सुखांनी भरलेली होती, जसं गुरुदेवांच्या स्कूटर बसून फिरणं, रात्री खूप उशीरा चित्रपट बघणं इत्यादी. जेव्हा त्यांनी एकदा तिला सांगितलं, ''मास्टर, प्रतीक्षा कर नि बघ मी ३५ व्या वर्षी कोण होतो ते!'' तिनं निरागसपणे गृहीत धरलं की भाकिताचा अर्थ म्हणजे नोकरीत बढती आणि पगारात वाढ. तिला थोडंच माहीत होतं की ते त्या वयाचा संदर्भ देत होते की जेव्हा ते आध्यात्मिक साधकापासून महागुरूपर्यंतच्या दिशेनं

वळवले जाणार होते! माताजींना स्वत:च्याच आडाख्याची खिल्ली उडवणारी ही गोष्ट नंतर आठवत असे.

गुरुदेव जे पैसे देत, आणि माताजी स्वत: शाळेतली एक शिक्षिका म्हणून जे काही कमवायच्या, त्यात त्या घरखर्च चालवत असत. त्यांनी कधीही तक्रार केली नाही, तरीही, लहान मुलांना वाढवण, तुटपुंज्या मिळकतीमध्ये घर चालवणं हे अजिबात सोपं नव्हतं. आपल्या पतीच्या (आध्यात्मिक) प्रवासात त्या एक साहाय्यक सहचर नि समर्थ मदतनीस ठरल्या. गुरुदेवांनी आपल्या सेवेवर लक्ष केंद्रित केलं असताना, घर सांभाळण्याची जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेत, माताजी गुरुदेवांच्या शिवाची (पुलिंग तत्त्व) शक्ती (स्त्रीलिंगी तत्त्व) झाल्या होत्या.

आध्यात्मिक सर्व गोष्टींविषयी आपल्या पतीची जाण पाहून, माताजी अनेकदा गोंधळात पडत. पूर्वीच्या महान ऋषी आणि गुरूंच्या ज्ञानाच्या तोडीस तोड असणाऱ्या गुरुदेवांच्या ज्ञानाच्या स्रोताची त्या कल्पनाच करू शकत नसत. त्यांनी गुरुदेवांना फक्त उर्दू वर्तमानपत्रं किंवा कर्नल विनोद यांसारख्या रहस्यकथाच वाचताना बघितलं होतं, इतर काही नाही. त्यांच्या विवाहाच्या सुरवातीच्या वर्षांमध्ये, माताजी इतक्या साध्या होत्या की गुरुदेवांचा तिसरा डोळा उघडणं ही संकल्पना आणि त्यांच्या हेतूंमधील अंतर्निहित शक्ती या गोष्टी स्वीकारणं त्यांना अशक्य होतं.

गुरुदेवांनी माताजींवर कधीही आपली विश्वास प्रणाली लादली नाही. ते व्यावहारिक होते. ते माताजींना अनेकदा त्यांच्या स्वत:च्या आध्यात्मिक आणि धार्मिक सवयींना चिकटून रहाण्याविषयी उत्तेजन देत. त्यांनी माताजींना एकदा सांगितलं, ''तुला एकही मंत्र म्हणायची गरज नाही. कारण, माझ्या निस्वार्थ सेवेचा आणि पाथ चा अर्धा लाभ तसाही तुला लाभणारच आहे.'' काही वर्षांनी, गुरुदेवांनी माताजींना अत्यंत शक्तिशाली असा महागायत्री मंत्र दिला. माताजींना आठवलं की गुरुदेवांनी चेष्टा केली आणि सांगितलं, ''तू मंत्रपठण


DOST

गुरुदेव आणि माताजी स्कूटरवरून
थिएटरमध्ये चित्रपट बघण्यासाठी जातात



थांबव. नाहीतर, तू माझ्यापेक्षा जास्त सामर्थ्यशील होशील.'' त्या दोघांनाही एकमेकांच्या सुरक्षाकवचात चिंतेची जाणीव असूनही, त्यांच्या चांगल्या स्वभावातली चेष्टामस्करी बघणं आनंददायी असे. परंतु, खरं सांगायचं तर, जन्माला आलेला कोणताही नवरा स्त्रीत्वानं वाचलेला नाही.

गुरुदेव हे कडकपणे, सतत काम करून घेणारे होते. ते आपल्या शिष्यांना पुष्कळवेळा अग्निदिव्यांमधून जायला लावायचे. त्यांनी आमच्याकरता जे उच्च मापदंड ठरवले होते, ते आम्ही पूर्ण करू शकलो नाही. त्यामुळे, त्यांनी केलेल्या निंदेला नियमितपणे अंगावर घेणं हा आमचा दैनंदिन भाग झाला होता. त्यानंतर मग, माताजी आमच्या वतीनं आमची राखण करणाऱ्या खतरनाक वकील बनायच्या नि गुरुदेवांच्या न्यायालयात धाडसानं आमचे खटले चालवायच्या. त्यावेळी आम्ही गुरुदेवांच्या नजरेपासून स्वत:ला लपवायचो. अरेरे! देवांवर आणि महापुरुषांवर काव्यात्मक न्याय होतो, तो त्यांना त्यांच्या पत्नींनी सरळ केल्यामुळे!

माताजींनी आम्हाला स्वत:च्या मुलांप्रमाणे वागवलं. त्या आमच्या वतीनं लढल्या, त्यांनी आमच्या भल्याची काळजी घेतली आणि आम्ही गुरुवादाच्या सापशिडीवर संचालन करत असताना, त्यांनी आम्हाला प्रोत्साहन दिलं. स्वत:च्या अखत्यारीत एक आध्यात्मिक शक्ती असूनही, त्या आपल्या पतीची समर्थ पाठीराखीण आणि गुरुदेवांच्या शिष्यांना आईसमान होत्या.

जेव्हा एका शिष्यानं आपल्या मुलीच्या साखरपुड्याचा समारंभ आयोजित केला होता, तेव्हा, आमंत्रित केल्यापेक्षाही जास्त पाहुणे आल्यामुळे, त्याला आश्चर्य वाटलं होतं. अन्न कमी पडेल, आणि पाहुणे भुकेलेले रहातील, या शक्यतेमुळे, तो भयभीत झाला होता. म्हणून, त्यानं माताजींना मदत करायची विनंती केली. माताजी त्याच्याबरोबर स्वयंपाकघरात गेल्या. त्यांनी जेवणाच्या भांड्यांमध्ये डोकावून बघितलं आणि मग, ती भांडी त्यांनी झाकणांनी झाकून टाकली. त्यांनतर, त्यांनी तिथं हजर असलेल्या लोकांना सूचना दिली, ''जेवण

वाढताना भांड्यांमध्ये डोकावून बघू नका.'' याचा परिणाम असा झाला की १५० लोकांकरता बनवलेलं अन्न २५० लोकांपेक्षाही जास्त लोकांना पुरलं. जेव्हा त्या शिष्यानं गुरुदेवांना जे काही घडलं त्याबद्दल माहिती दिली, तेव्हा गुरुदेवांनी प्रतिक्रिया दिली, ''तुझी आई अन्नपूर्णा (अन्न आणि पुष्टी देणारी) आहे.''

जेव्हा एका शिष्याच्या मुलाला कारच्या अपघातात कवटीला एकाधिक फ्रॅक्चर झाली, तेव्हा त्याच्या वडिलांनी स्थानाकडून (मदत आणि उपचार केंद्र) मदत मागितली. दुसऱ्या दिवशी माताजी हॉस्पिटलमध्ये पोहोचल्या. त्यांनी मुलाच्या डोक्यावर आपले हात ठेवले. ''सगळं काही ठीक होईल,'' असा त्याच्या पालकांना दिलासा देऊन, त्या निघून गेल्या. एका आठवड्यानंतर, MRI Scan मध्ये उलगडा झाला की त्याच्या कवटीवर फक्त एक छोटसं फ्रॅक्चर होतं.

गुरुदेवांचं निर्वाण झाल्यानंतर, गुरुदेवांच्या निस्वार्थ सेवेचा वारसा माताजींनी आपल्या अविचल समर्पणबुध्दीनं पुढे चालू ठेवला. गुरुदेवांच्या उद्देशाप्रति माताजींची जी निष्ठा होती, तिच्यातून त्यांचं आपल्या पतीप्रति आणि त्यांच्या निःस्वार्थी कार्याप्रति असणारं प्रेम प्रतिबिंबित व्हायचं.

माताजी २०१४ साली मे महिन्यात निवर्तल्या. त्यांचं निर्वाण झालं, त्या वेळेला, तारे हे पवित्रपणे संरेखित होते. तो राणीचा *मुहूरत* होता की जो फार थोड्या लोकांना दिला जातो. यातून माताजींची उत्तुंग आध्यात्मिक अवस्था सूचित होते.

गुरुदेव आणि माताजींचं नातं हे भले एका विवाहित जोडप्याच्या नात्यासमान राहिलं असेल. परंतु, ही एक अपवादात्मक अशी शक्तिशाली आध्यात्मिक युती होती आणि शक्यतो कायम राहिली आहे.



*गुरुदेव आपल्या मुलांबरोबर शिबिरात वेळ घालवतात*

कुटुंबवत्सल माणूस

# पिता

***मुलांनी पाहिलंय त्यांना ताठ उभं रहाताना प्रत्येक वादळात,
इथं आणि आत्ता स्वीकारत. ना होता तिथं भपका, ना द्यायची
होती प्रवचनं ते फक्त जगले नि त्यांनी शिकवलं
मुलांना कसं जगायचं.***

पालक म्हणून गुरुदेवांनी आपल्या प्रेमाचं कधीही अतिरिक्त प्रदर्शन केलं नाही. त्यांचं मुलांप्रति असलेलं प्रेम त्यांनी मुलांना दिलेल्या शहाणपणातून आणि स्वत:ला घेऊ दिलेल्या पितृत्वाच्या काही क्षणांतून दिसायचं.

जेव्हा एका प्रसिध्द भारतीय अभिनेत्याला चित्रपटाच्या सेटवर गंभीर जखमा झाल्या, तेव्हा गुरुदेवांची मुलगी रेणुजी आणि मुलगा परवेशजी यांनी आपल्या वडिलांना मदत करण्याविषयी गळ घातली. कारण, त्यांना खात्री होती की त्यांची कृती अभिनेत्याचा जीव वाचवेल. रडत असलेल्या दोन चाहत्यांची फौज पाहून, गुरुदेवांनी त्यांना आपली विनंती एका कागदावर लिहायला सांगितली आणि अभिनेत्याच्या फोटोसह तो कागद स्थानात ठेवायला सांगितला. अभिनेत्याचं नशीब बलवत्तर असेल, म्हणून, तो त्या संकटातून वाचला आणि गुरुदेवांच्या मुलांना कठीण वाटणारी गोष्ट मिळाली.

गुरुदेव जरी आपला जास्तीत जास्त वेळ दुसऱ्यांची सेवा करण्यात घालवत असत, तरी त्यांना एक पिता म्हणून असणाऱ्या आपल्या कर्तव्यांची जाणीव होती. मुलींना जेव्हा गरज भासायची, तेव्हा गुरुदेवांनी त्यांच्यासाठी

सल्लागाराप्रमाणे काम केलं. बसंत पंचमीच्या दिवशी, ते आपल्या मुलांकरता पतंग बनवायचे आणि त्यांना पतंग उडवायचे बारकावे शिकवायचे. त्यांचं कुटुंब हे उन्हाळ्याच्या सुट्टया गुरुदेवांच्या एखाद्या भू-सर्वेक्षण शिबरित घालवायचं. आपल्याकडे मुलांकडे लक्ष देण्यासाठी कमी वेळ आहे, हे माहीत असल्यामुळे, ते या सहलींचे काटेकोरपणे बेत आखायचे. ते आपल्याबरोबर व्हिडियो कॅसेट प्लेअर आणि कितीतरी व्हिडियो टेप्स आणायचे जेणेकरून, ते आपल्या रात्री चित्रपट बघण्यात घालवू शकत.

वेळप्रसंगी, गुरुदेव *पोहा* आणि *उपमा* यांसारखे साधे-सोपे पदार्थ बनवत. ते पदार्थ अन्न म्हणून सामान्य माणसाची बाब जरी असली, तरी, ना ते तयार करणारे गुरुदेवांचे हात, ना गुरुदेवांच्या डोळ्यांतून बाहेर पडणारी ऊर्जा सामान्य होती.

रेणुजींनी मान्य केलं होतं की एक तरुण मुलगी म्हणून, तिला वाटायचं की आपल्या वडिलांनी आपल्या मुलांबरोबर अधिक वेळ आणि आपल्या घरी मदतीसाठी आणि उपचारासाठी येणाऱ्या अभ्यागतांबरोबर कमी वेळ घालवावा. जेव्हा तिनं आपल्या आईकडे आपली निराशा व्यक्त केली, तेव्हा माताजी म्हणाल्या, ''बेटा, जर तुझ्या वडिलांची काही मिनिटं वेदनेत असणाऱ्या माणसाला आराम देऊ शकत असतील, तर आपण त्याला प्राधान्य द्यायला नको का?'' रेणुजींनी पुन्हा त्याबद्दल मग कधीच तक्रार केली नाही, आणि काही वर्षांनी, आपल्या वडिलांच्या कनवाळूपणामुळे रेणुजींना गरीबांना अन्न देण्यासाठी आणि घराजवळच काम करणाऱ्या स्थलांतरित मजुरांच्या मुलांना शिकवण्यासाठी प्रोत्साहन मिळालं.

रेणुजी गुरुदेवांच्या व्यवस्थापन-कौशल्यामुळे सुध्दा प्रभावित होत असत, जेव्हा गुरुदेव अल्प नियोजन किंवा कमी खर्चात लोकांच्या मोठमोठ्या समूहांना सहलींना घेऊन जायचे. उत्तराखंडमधील मसुरी या प्रेक्षणीय अशा थंड हवेच्या ठिकाणी सहलीला गेले असताना, त्या एक अनमोल धडा शिकल्या.

गुरुदेवांनी इंदू शर्मा नावाच्या एका शिष्येला, सहलीला निघण्यापूर्वी, अगदी माताजींसकट प्रत्येकाचं दुपारचं जेवण झालंय ना हे बघायला सांगितलं होतं. इंदुजींनी स्वयंपाकघरात नजर टाकली आणि बटाटा-सिमला मिरची घालून *सब्झी* आणि *रोटी* बनवल्या. इंदुजी सोडून सर्वांचं जेवण झालं. त्यानंतर, त्यांनी रेणुजींना सांगितलं, ''गुरुदेवांना विचारा की मी त्यांना जेवायला वाढू शकते का?'' जेव्हा रेणुजींनी आपल्या वडिलांपर्यंत हा निरोप पोचवला, तेव्हा गुरुदेव मुद्दामहून इंदुजींना न कळू देता, स्वयंपाकघरापर्यंत आले. गुरुदेवांना त्यांच्या खोलीत जेवण वाढून द्यायची परवानगी आपल्याला मिळावी अशी इंदुजींनी अनेकवार विनंती करूनही, गुरुदेवांनी आग्रह धरला की त्यांना तिथेच स्वयंपाकघरात जेवण वाढलं जावं. नाखुषीनंच, इंदुजींनी कढईवरचं झाकण काढलं. त्यामुळे, कढईमध्ये *सब्झी* अगदी थोड्याशा प्रमाणात शिल्लक होती हे उघड झालं. त्यांनी *सब्झी* आणि दोन *रोटी* ताटात वाढल्या आणि ते ताट गुरुदेवांना दिलं. तर उलट, गुरुदेवांनी दुसरं ताट घेतलं, जेवणाचे दोन भाग केले आणि एक ताट इंदुजींना दिलं आणि त्यांनाही जेवायला सांगितलं. रेणुजींनी बघितलं की जेवत असताना गुरुदेवांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य विलसत होतं. जेवण झाल्यावर, गुरुदेव इंदुजींकडे वळले आणि म्हणाले, ''*पुत्त, जेन्नु खेल्लान छे, मझा आ गया ना, खाने दा मझा नहीं रेंहदा*''. या पंजाबी शब्दांचा अनुवाद केला तर असा अर्थ होतो:

***ज्याला दुसऱ्याला अन्न द्यायचा आनंद होतो,***
***तो क्वचितच स्वत:च्या अन्नाचा विचार करतो !***


गुरुदेव हे परिपूर्ण यजमान होते. ते आपल्या पाहुण्यांना साधं तरीही रुचकर पदार्थ जेवू घालायचे. असं कधीही व्हायचं नाही की काहीतरी विशेष फक्त त्यांच्याकरताच बनवलं गेलं. ते आपल्याला दिलेलं प्रत्येक जेवण कृतज्ञतेनं आणि कुरकुर न करता जेवत असत.

पिता म्हणून, गुरुदेवांनी आपल्या मुलांना कसं जगायचं हे कधीही शिकवलं नाही. गुरुदेव स्वत: जगले नि ते कसे जगले हे पहायची मुभा त्यांनी आपल्या मुलांना दिली. त्यांनी उदाहरणाद्वारा नेतृत्व केलं, मुलांना आपले विचार उत्क्रांत करायला उत्तेजन दिलं आणि सहसंवेदना नि दया यांनी युक्त असं जीवन जगण्याचा सल्ला दिला. परवेशजी आणि पुनीतजी हे त्यांचे दोन मुलगे सेवेत कार्यरत असतात, तर त्यांच्या रेणुजी, इलाजी आणि अलकाजी या तीन मुली विवाहित आहेत आणि भारताच्या विभिन्न भागात रहातात. आपल्या वडिलांच्या सुज्ञ सल्ल्यामुळे त्यांची छान प्रगती झाली आहे.

गुरुदेव हे आपल्या पोटच्या मुलांसाठी पिता आणि असंख्य इतरांकरता पितातुल्य होते, जे त्यांचा आदर करत. गुरगाव स्थानातील निक्कु, पप्पु, बिट्टु आणि गग्गु - हे चार बाहुबली त्यांच्या मानलेल्या मुलांपैकी होते. या घरेलू प्रभावशाली चारजणांनी गुरुदेवांच्या आयुष्यात एक बलवत्तर स्थान मिळवलं होतं. ते गुरुदेवांच्या दैनंदिन गरजांकडे लक्ष द्यायचे, स्थानात येणाऱ्या अभ्यागतांचं रोस्टर सांभाळायचे आणि अशा प्रकारची मोठी संस्था चालवताना करावी लागणारी बारीक-सारीक कामं पार पाडायचे. जर गुरुदेव वेळेवर जेवले नाहीत किंवा त्यांनी आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष केलं, तर ते गुरुदेवांची शाळा घ्यायचे. कारण, ते अपरिवर्तनीय गुंड होते, जे गुरुदेवांवर अतोनात प्रेम करायचे. या चौकडीचं गुरुदेवांवर असलेले वर्चस्व बघणं चमत्कारिक होतं. त्यांच्या उपस्थितीत, गुरुदेव हे शांत नि सहनशील पित्याची परिपूर्ण भूमिका वठवत, शरणागतीचं ऑस्करला पात्र ठरेल असं सादरीकरण करायचे.

***परिस्थितीनुसार बदल घडवून आणण्याच्या***
***गुरुदेवांच्या जन्मजात पात्रतेमुळे ते लाडके झाले सर्वांचे.***

गुरुदेवांच्या व्यक्तिमत्त्वाच्या या पैलूचं उदाहरण देणारा एक विनोदी प्रसंग बिट्टुजींना आठवला. एकदा, गुरुदेव हे बिट्टुजी आणि त्यांच्या मित्रांबरोबर गल्लीत क्रिकेट खेळत होते. ते क्रीझवर बॅटिंग करत होते.



*गुरुदेव गल्लीत क्रिकेट खेळत आहेत*

गुरुदेवांचा शॉट चुकला, आणि क्रिकेटचा बॉल त्यांच्या लुंगीत जाऊन अडकला. ही लेग बिफोर द विकेट ची बाब आहे, याची खात्री असल्यामुळे, बॉलरनं जोरदार आवाहन केलं. ''आउट नाही!'' असा निर्धार करून, आणि क्रीझ सोडून जायला नकार देत, गुरुदेवांनी त्यांच्या विरोधात केलेलं आवाहन अमान्य केलं. न शोभणाऱ्या *लुंगी* नाचानं सर्वांना हसायला आलं आणि दाखवून दिलं की गुरू असणं आणि आपल्याकडून जी भूमिका केली जावी अशी अपेक्षा असे, त्यात ते कसे बदल करत. आपल्या पुऱ्या आयुष्यात, गुरुदेवांनी गुरूसह, पती, पिता, मुलगा, भाऊ आणि मित्र अशा अनेक भूमिका केल्या, सर्वच भूमिका भावनांचा अभिनय करत भावनाविरहितपणे.

गुरुदेव हे काही क्रिकेटर बनायला आले नव्हते. सुदैवानं, त्यांच्याकडे ना स्क्वेअर लेग होता, ना डीप फाइन लेग होता, ना त्यांनी मेडन ओव्हर टाकण्यात आपला वेळ घालवला. तरीही, त्यांना आध्यात्मिक रेषा आणि लांबी कळत होती. त्यांचे अनेक धडे हे त्यांच्या शिष्यांकरता बाउन्सर्स असायचे. परंतु, महागुरूंची आध्यात्मिक मुलं असल्यामुळे, आम्ही आध्यात्मिक टॉस जिंकायला शिकलो आणि आमचं खेळातलं कौशल्य हे चांगल्या खेळातून विकसित झालं.

*गुरुदेव आपली आई राम प्यारीजी यांच्यासमवेत*



# पुत्र

***एक लहान खोडकर मुलगा, तिच्या दृष्टीनं जलद पावलं टाकणारा, परिवर्तित झाला लवकरच मुलापासून पुरुषात. परंतु, तो कधीच विसरला नाही तिनं केलेले त्याग जे करू शकते फक्त एक आईच.***

गुरुदेव नेहमी म्हणायचे की माणसाच्या आयुष्यात तीन गुरू असतात: त्याचे आईवडील, शिक्षक आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यांचे आध्यात्मिक मार्गदर्शक आणि सल्लागार.

आपल्यावर आपल्या आईवडिलांचं प्रचंड ऋण असतं, याची जाणीव असल्यामुळे, गुरुदेव हे आपल्या शिष्यांना, भक्तांना आणि अनुयायांना आपल्या आईवडिलांची काळजी घ्यायला नि त्यांचा आदर करायचा सल्ला देत.

गुरुदेवांना आपल्या आईवडिलांबद्दल खूप जवळीक वाटायची, विशेषत: आपल्या आईबद्दल. लहानपणी, ते आजूबाजूला फिरणं थांबवतील आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील, या आशेनं त्यांच्या मागोमाग पळापळ करण्यात, त्यांच्या आईच्या पायाच्या तळव्यावर फोड आले, तिनं आपल्या सशक्त नि दणकट शरीराचं कौशल्य पणाला लावलं, तरीही, ती काही आपल्या मुलाच्या खोडकर छटेला आवर घालू शकली नाही. तिच्या भक्तिभावानं गुरुदेवांच्यात खोल कृतज्ञता निर्माण झाली असावी. नि:स्वार्थपणें दुसऱ्याची सेवा करण्याच्या तत्त्वज्ञानाचा यातूनच विकास झाला असावा.

जसजसं गुरुदेवांचं वय वाढत गेलं, तसतसं त्यांचं अध्यात्माविषयीचं आकर्षण वाढीला लागलं. जगात ज्यावेळी मोबाईल फोन हा भविष्यकालीन शोध होता, त्यावेळी, गुरुदेवांचा आध्यात्मिक धाडसीपणा त्यांच्या आईच्या कायम ताण-तणावाचं कारण असायचं. गुरुदेव हे गूढवादी लोकांच्या सहवासात आध्यात्मिक अंतर्ज्ञान गोळा करत, कधी तास न् तास, तर कधी दिवसच्या दिवस अदृश्य व्हायचे.

माध्यमिक शाळेतून यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यानंतर, गुरुदेवांना सैन्यात भरती करण्यात आलं.

गुरुदेवांच्या आईचा आपल्या सर्वात मोठ्या मुलानं अतिशय धोकादायक व्यवसाय निवडावा याला विरोध होता. म्हणून, त्यानं (गुरुदेवांनी), तिच्या आग्रहाखातर, भारतीय सशस्त्र सेनेत (इंडियन आर्म्ड फोर्सेस मध्ये) कारकीर्द करण्यापासून माघार घेतली. गुरुदेव अभिनेता बनण्याच्या कल्पनेशी खेळले. कारण, ते हपापलेले (हावरट) चित्रपटशौकीन होते. सुदैवानं, लाखो लोकांची ते भविष्यात सेवा करतील म्हणून, त्यांचा भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला (फिल्म अँड टेलिविजन इन्स्टिटयूटला) केलेला अर्ज फेटाळण्यात आला.

जरी गुरुदेवांची चित्रपटाविषयीची स्वप्नं ही कलिकावस्थेतच खुडली गेली, तरीही कित्येकजणांपेक्षा चांगली भूमिका करण्याची कला ते शिकले. मी एकदा गुरगावमधील खांडसा शेतावर गुरुदेवांच्या अभिनय कौशल्याचं एक जबरदस्त सादरीकरण पाहिलंय.

बिल्लू नावाच्या एका भक्ताचं आपल्या यकृतापेक्षा आपल्या दारूवर अधिक प्रेम होतं. त्यांचं आपल्या गुरूंशी एक गोंधळात टाकणारं असं नातं होतं.

गुरुदेव बिल्लूंना दारू सोडायला सांगायचे.

बिल्लू वचन घायचा की तो सोडणार.
बिल्लू त्यांचं वचन मोडायचा.
दारू. वचन. पुन्हा दारू.

एका संध्याकाळी, गुरुदेव हे गायीच्या गोठ्यात बसून मला आध्यात्मिक संज्ञा समजावून सांगत असताना बिल्लू आत शिरले, दारूच्या नशेत आणि तुटलेली आश्वासनं घेऊन. बिल्लूंना बघितल्यावर, गुरुदेवांचे आविर्भाव बदलले. जेव्हा बिल्लूंनी दारू सोडण्यात आपल्या असमर्थतेचं समर्थन करायचा लंगडा प्रयत्न केला, तेव्हा गुरुदेवांचा संयम सुटला. बिल्लूंना अशा प्रकारचा राग सोसावा लागला, जो या अगोदर माझ्या गुरूंनी कधीही व्यक्त केल्याचं मी पाहिलं नव्हतं. जेव्हा गुरुदेवांच्या रागाचा भडका उडाला, तेव्हा बिल्लू आणि मी अंग चोरून बसलो होतो, भीतीनं थरथरत होतो. कठोर आरडाओरडा झाल्यानंतर, आपल्या पायांमध्ये शेपूट घालून, बिल्लू गोठा सोडून निघून गेला. तो दिसेनासे होतात न होतात, तोच गुरुदेव माझ्याकडे वळले, हसले आणि म्हणाले, *''बरखुरदार, कैसी लगी हमारी ॲक्टिंग?''* (कसा वाटला तुला माझा अभिनय?) माझा जबडा जमिनीवर आदळल्यामुळे, माझ्या तोंडातून शब्दच फुटेना.

गुरुदेवांनी भूमिका बजावणं हे एक परिणामकारक हत्यार म्हणून वापरलं. जेव्हा ते पित्याची भूमिका करायचे, तेव्हा ते कडक किंवा क्षमाशील असत. एक मित्र म्हणून, त्यांच्या बुध्दिमत्तेच्या शस्त्रास्त्रानं आम्हाला खदाखदा हसायला लावलं, परंतु, महागुरू म्हणून, ते आपल्या वागण्यात कडक आणि औपचारिक होते, प्रेरणादायी विस्मय आणि आदर निर्माण करत. भूमिका निभावणाऱ्या गुरूंना कृती करताना पाहून, मला नि इतर काहीजणांना आपली भूमिका निभावण्याचं कौशल्य शिकायला प्रवृत्त केलं.

अभिनेता बनायचं गुरुदेवांचं अर्धवट राहिलेलं स्वप्न हा प्रारब्धाचा खेळ होता. कारण, जगानं आत्तापर्यंत कधीही न पाहिलेला आध्यात्मिक नायक बनणं हे त्यांचं विधिलिखित होतं



# भाऊ

***प्रलोभनात अडकून, त्यांनी गुरुदेवांचं ऐकलं***
***आणि गुरुदेवांनी जे करायला सांगितलं, ते त्यांनी केलं.***
***पिन्नीच्या बदल्यात, त्यांनी मागितल्या गुदगुल्या,***
***भावंडानं केली देवाणघेवाण एका किंवा दोन चमत्कारांची.***

गुरुदेवांना सहा भावंडं होती. सर्वात मोठी होती त्यांची बहीण बिमला, तर त्यांचा भाऊ सतीश आणि बहिणी सुदेश, रमेश, प्रेमलता आणि इंदिरा या गुरुदेवांपेक्षा लहान होत्या.

सतीशजी, जे प्रेमानं चाचा म्हणुन ओळखले जायचे, त्यांचं गुरुदेवांवर अलोट प्रेम होतं. ते गुरुदेवांचा पापाजी असा आदरपूर्वक उल्लेख करायचे. ते सर्व लहान असताना, त्यांची आई गुरुदेवांना खोड्या करण्याबद्दल जेवायला न देऊन शिक्षा करायची. चाचा त्यांच्या वाट्यामधला ब्रेड नि थोडा गूळ वाचवायचे, जेणेकरून, त्यांचा थोरला भाऊ उपाशी रहायचा नाही.

चाचा हे मोठे झाल्यावर, एक उंच आणि देखणा माणूस झाले. त्यांच्या डोळ्यांमध्ये एक खोडकर मिश्किल चमक होती. गुरुदेवांनी चाचांच्यावर आध्यात्मिक शक्तींचा कृपावर्षाव केला आणि त्यांना हरियाणात सेवा करायचा आणि खांडसा इथं असलेल्या आपल्या शेतीची देखभाल करायचा आदेश दिला.

चाचा हे अतिशय प्रभावशाली अध्यात्मवादी जरी असले, तरी त्यांचं उत्तम वर्णन तणावमुक्त नि बिनधास्त माणूस असं करता येतं. त्यांच्या अध्यात्माप्रति असलेल्या सहज दृष्टिकोनामुळे असंख्य लोकांना मदत झाली आणि ते बरे झाले. ते अनेक गूढ, रोगनिवारक औषधं तयार करण्याच्या अशा कृतींचे राखणदार होते, ज्यात केस रंगवण्याच्या कृतीचा पण समावेश होता. तिच्यामुळे अनेक केस रंगवणाऱ्या कंपन्यांना व्यवसायापासून दूर ठेवलं असतं. परंतु, या कंपन्यांच्या सुदैवानं, पांढरे केस काळे करण्याचा फॉर्म्युला चाचांबरोबर उच्च क्षेत्रापर्यंत पोहोचला.

चाचांच्या या बेफिकिरीमुळे, लोक त्यांच्या आध्यात्मिक क्षमतांना कमी लेखायचे. हरियाणात त्यांचा एक शेजारी *तांत्रिक* (जादूटोणा करणारा) होता. त्याला अशी सिध्दी प्राप्त झाली होती की तिच्या योगे तो आत्म्यांवर विजय मिळवायचा (आत्म्यांना पकडून ठेवायचा). तो त्या आत्म्यांचा स्वत:च्या उपजीविकेकरता उपयोग करत असल्यामुळे, त्याला लोकांना विनाशुल्क मदत करणारे नि त्यांना बरे करणारे चाचा हे एक धोकाच वाटले. द्वेषापोटी, त्या *तांत्रिकानं* काही आत्म्यांची चाचांना आणि त्यांच्या कुटुंबाला अपाय करण्याकरता नेमणूक केली. तथापि, ते चाचांच्या विश्वाला एकही चरा पाडू शकले नाहीत.

ज्या दोन बाटल्यांमध्ये त्या *तांत्रिकानं* आत्म्यांना कैद करून ठेवलं होतं, त्या काही दिवसांनी फुटल्या. जेव्हा हे घडलं, त्याच वेळी, घराच्या छपरावर खेळत असलेली *तांत्रिकाची* तरुण मुलं खाली पडली आणि गतप्राण झाली. *तांत्रिकाला* खात्री होती की सुटलेल्या आत्म्यांनी सूड घेत त्याच्या मुलांना मारलं होतं आणि त्याची पण तशीच गत व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणून तो, चाचांकडे क्षमा मागण्यासाठी आणि त्यानंच निर्माण केलेल्या राक्षसांपासून संरक्षण मिळावं म्हणून पळत आला. चाचांनी त्याला केवळ क्षमाच केली, नि त्याचं संरक्षणच केलं असं नाही, तर उलट, त्याचं आयुष्यच बदलून टाकलं. *तांत्रिकानं* पैसे

मिळवण्याकरता आपल्या *सिध्दीचा* उपयोग करायचं बंद केलं आणि सात्त्विक क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित केलं.

दुसऱ्या एका *तांत्रिकानं* चाचांची शांत वृत्ती म्हणजे आध्यात्मिक दुबळेपणा आहे असा गैरसमज करून घेतला. मात्र त्याला असा धडा शिकायला मिळाला की जो तो कधीच विसरला नसता. त्या *तांत्रिकानं* खांडसा शेताला पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या पंपावर करणी केली. त्यामुळे त्याच्यात बिघाड निर्माण झाला. जेव्हा, त्यानं स्वत:वर खूष होऊन मंदस्मित केलं आणि ते बिघडलेलं उपकरण दुरुस्त करण्याकरता चाचांना त्यांच्या आध्यात्मिक शक्ती वापरण्याचं आव्हान केलं, तेव्हा चाचांनी अगदी सहजगत्या त्या उपकरणावर *जल* शिंपडलं. हे *जल* शिंपडताच, तो पाण्याचा पंप मोठा आवाज करत कार्यशील झाला. विहिरीच्या भिंतीवर बसलेल्या *तांत्रिकानं* हे सर्व स्वत: पाहिलं नि तो विहिरीत पडला! आध्यात्मिकरीत्या मोठ्या प्रमाणावर त्याचं नुकसान झाल्यानंतरच, तो रांगत रांगत बाहेर आला आणि त्यानं चाचांकडे दयेची भीक मागितली. त्या बेफिकिर माणसानं त्याला सहजपणे माफ केलं.

चाचा जरी गुरुदेवांचे भाऊ होते, तरीही त्यांनी आपल्या नात्याचा स्वत:च्या फायद्याकरता कधीही वापर केला नाही. चाचांच्या विनम्रतेमुळे नि उदासीनतेमुळे त्यांचं सौजन्य मात्र वाढलं. त्यांना आपल्या मोठ्या भावाचा संताप सोडला, तर इतर कशानंही त्रास झाला नाही.

चाचांना त्यांच्या शेवटच्या दिवसांमध्ये चंदिगडच्या PGI हॉस्पिटलमध्ये दाखल केलं होतं. गुरुदेव त्यांच्या जवळ त्यांची प्रत्येक गरज भागवत राहिले होते. १२व्या दिवशी गुरुदेवांनी चंदिगड सोडलं. कारण, त्यांना गुरगावात गुरुपूर्णिमेकरता हजर रहायचं होतं. जेव्हा त्यांनी आपल्या लाडक्या भावाचा निरोप घेतला, तेव्हा, ते मृदुपणानं म्हणाले, ''गुरुपूर्णिमेपूर्वी प्राणत्याग करू नकोस.'' दोन दिवसांनी, म्हणजेच, २ ऑगस्ट, १९८८ रोजी, चाचा आपल्या

आजारपणाला बळी पडले. आपल्या मोठ्या भावाची सेवा खंडित होणार नाही, याची त्यांनी खात्री करून घेतली. चाचांच्या पश्चात, त्यांची पत्नी स्नेहलता आणि त्यांचे दोन मुलगे आहेत.

गुरुदेवांच्या बहिणींकडे सांगण्यासारख्या अनेक कहाण्या आहेत. त्यांना आठवतंय की लहान असताना, त्यांच्या भावाचं त्यांच्या घरातल्या गणपतीच्या मूर्तीशी एक असामान्य नातं होतं. पुष्कळदा, ते त्या मूर्तीची मदत मागायचे आणि जर त्यांचं काम केलं गेलं नाही, तर तिचा विध्वंस करायची धमकी द्यायचे. अति कल्पक मुलाचे भरकटलेले शब्द म्हणून, गुरुदेवांच्या कुटुंबानं सुरवातीला त्यांच्या शब्दांकडे दुर्लक्ष केलं. तरीही, कालांतरानं, ही गोष्ट स्पष्ट झाली की नजरेला दिसत होतं त्याहीपेक्षा या नात्यात जास्त काही गूढ होतं. एका भावंडाशी म्हणजेच बहीण बिमलाशी भांडण झाल्यानंतर, गुरुदेवांनी गणपतीच्या मूर्तीला आपली मोठी बहीण बिमला आगामी परीक्षेत नापास होवो, याचा खात्री करून द्यायला सांगितली. आपली इच्छा जर पूर्ण झाली, तर आपण मिठाई वाटू असंही त्यांनी जाहीर केलं. रात्र-रात्र दिवे जाळून मेहनतीनं अभ्यास करणाऱ्या बिमलाजींनी त्यावेळी, वडिलांकडे याची तक्रार केली. वडिलांनी मग आपल्या मुलाला त्याच्या क्रूर शब्दांबद्दल फटकारलं. जेव्हा बिमलाजी परीक्षेत नापास झाल्या, तेव्हा, त्या ओक्साबोक्शी रडत होत्या आणि त्यांनी आपल्या अपयशाचा दोष भावाला दिला. त्यांच्या वडिलांनी, अर्थातच, आपल्या मुलाला काठीनं चांगलंच बदडून काढलं!

काही वर्षांनंतर, दुसऱ्या एका बाबतीत गणपती गुरुदेवांच्या उपयोगी पडला. गुरुदेवांना अभ्यासात रुची नसल्यामुळे उद्विग्न झालेल्या त्यांच्या आईवडिलांनी गुरुदेवांना शिक्षणाच्या दिशेला अधिकाधिक वळवण्याच्या दृष्टीनं चुलत बहिणीच्या नवऱ्याची मदत घेतली. कडक शिस्तीत काम करून घेणारी कठोर व्यक्ती म्हणून त्या माणसाची ख्याती होती. ते चाबकानं मारायला सुध्दा कचरायचे नाहीत. त्यांनी गुरुदेवांना सरळ करण्याकरता पराकाष्ठेचे

प्रयत्न केले. तथापि, त्यांच्या लवकरच लक्षात आलं की त्यांचा नवीन विद्यार्थी हा काही आपले मार्ग बदलायला इच्छुक नाही. गुरुदेवांच्या आडमुठेपणामुळे रागावलेल्या आणि आपल्या अपयशामुळे हताश झालेल्या त्यांनी घोषित करून टाकलं की आगामी परीक्षेत गुरुदेवांना यश मिळणं अशक्य आहे. या निकालाची त्यांना इतकी खात्री होती की त्यांनी अशीही पुस्ती जोडली की जर गुरुदेव उत्तीर्ण झाले, तर पंजाब विद्यापीठ बंद होईल! हे शब्द ऐकून, गुरुदेव गणपतीच्या मूर्तीपाशी धावले आणि त्यांनी तिला 'जर मी परीक्षेत नापास झालो, तर मी तुला फोडून तुझे बारीक बारीक तुकडे करून टाकीन' अशी धमकी दिली. धमकीनं काम केलं. गुरुदेव परीक्षेत साधारण मार्कांनी उत्तीर्ण झाले आणि मॅट्रिक उत्तीर्ण व्यक्ती जन्माला आली.

गुरुदेवांच्या लहान बहिणींना स्मरतंय की त्यांचा भाऊ दयाळू होता. तो त्यांच्याशी प्रेमानं नि अवखळपणानं वागायचा. गुरुदेवांच्या शक्तींना अद्याप परिपक्व आध्यात्मिक अभिव्यक्ती लाभली नव्हती. त्यामुळे त्यांची बहिणींवर छाप पडत नसे. त्यांच्या नजरेत, गुरुदेवांच्या मती गुंग करणाऱ्या माकडचेष्टा म्हणजे स्पष्टपणे, मजेदार शेवट करणारं एक निव्वळ साधन होत्या.

*पिन्नी* ही उत्तर भारताची प्रसिध्द मिठाई तुमची कंबर एका इंचानं वाढवते नि त्यायोगे, तुमच्या आयुष्याचं एक वर्ष कमी करते. अनेक पंजाबी लोकांप्रमाणे, गुरुदेवांच्या लहान बहिणींना अशा आनंददायी मेजवान्यांवर ताव मारायला आवडायचं. गुरुदेवांनी आपल्या बहिणींच्या इंद्रियाची कमजोरी बहिणींनी आपली मागणी मान्य करावी म्हणून सौदा करायचं एक साधन म्हणून वापरली. आपली पाठ खाजवून देण्याच्या बदल्यात ते त्यांना *पिन्नी* द्यायचं कबूल करायचे. व्वा! बहिणी आनंदानं गुरुदेवांची पाठ खाजवून द्यायच्या.

सर्व गोड पदार्थांच्या बाबतीत आपल्या मुलांची असलेली अतिशय उत्कट इच्छा ही अपायकारक आहे, याची गुरुदेवांच्या आईला जाणीव होती. म्हणून,

ती घरी बनवलेल्या *पिन्नी* कपाटात कुलुपबंद करून ठेवायची आणि चावी कधीही आपल्या नजरेआड होऊ द्यायची नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, कुलुपात किल्ली न घालताही, गुरुदेव त्या प्रत्यक्षात काढू शकायचे. जेव्हा केव्हा गुरुदेवांची आई कपाटाचं कुलूप काढायची, तेव्हा तिच्या मुलींना आढळायचं की गुरुदेवांनी जेवढ्या *पिन्नी* फस्त केलेल्या असायच्या, तेवढ्याच त्या साठवलेल्या गठ्ठ्यातून गायब झालेल्या असायच्या! तरीही, आपला भाऊ ज्या अनेक गोष्टी करू शकत होता, त्यांच्या लांबलचक यादीपैकी ही एक असं समजून, कुलुपबंद कपाटांमधून *पिन्नी* काढण्याच्या त्याच्या या आश्चर्यजनक प्रभावशाली पध्दतीकडे त्यांनी दुर्लक्ष केलं.

स्वत: लहान पोरसवदा मुलगा असल्यामुळे, गुरुदेवांना अद्याप स्वत:मधल्या दिव्यत्वाची ओळख झाली नव्हती. तरीही, भविष्यात ज्या काही क्षमता उपयोगात आल्या असत्या, त्यांची ओझरती पूर्व झलक दिसत होती. ती झलक भले त्यांच्या बहिणींची भूक तृप्त करणारी नव्हती, परंतु, असंख्य लोकांना आध्यात्मिक परिवर्तनाच्या मार्गावर घेऊन जाणारी होती हे निश्चित!

एक माणूस म्हणून, ज्यानं आपल्या अलौकिकतेला गुप्त ठेवायचं ठरवलं, त्यानं स्वत:च्या कुटुंबासमोर आपलं आध्यात्मिक परिवर्तन प्रकट केलं नाही. काही वर्षांनंतर, दैवयोगानं, गुरुदेवांच्या बहिणींना कळलं की आपला भाऊ गुरू बनलाय. गुरुदेवांना नोकरीनिमित्तानं काही महिने ऑफीसच्या दौऱ्यांवर जायची आवश्यकता असायची. त्यामुळे ते बहिणींना स्वत:च्या ठावठिकाणाविषयी माहिती देणारं पत्र पाठवायचे. १९७६ च्या उन्हाळ्यात त्यांना गुरुदेवांकडून असं सूचित करणारं पत्र मिळालं की ते हिमाचल प्रदेशात कथोग या ठिकाणी मुक्कामाला आहोत. बहिणींनी कथोगबद्दल कधीही ऐकलं नव्हतं. म्हणून, त्यांच्यापैकी एकीनं ज्वालाजी या ठिकाणी स्थायिक असणाऱ्या आपल्या दिलबाग नावाच्या वर्गमैत्रिणीकडून कथोगबद्दल माहिती मिळवली. दिलबागनं त्यांना माहिती पुरवली की नुकतीच कथोगला *'ओमवाले बाबा'* (ॐ न युक्त

असलेले संत) या नावानं ओळखल्या जाणाऱ्या अशा एका माणसामुळे प्रसिध्दी मिळाल्ये जो रोग बरे करणारे अविश्वसनीय असे चमत्कार करतो. जेव्हा गुरुदेव गुरगावला जाताना वाटेत हरियाणा इथं थांबले होते, तेव्हा त्यांच्या बहिणीनं, ''तू *ओमवाल्या बाबांना* भेटलास का ?'' असं विचारलं. त्यांनतरच, गुरुदेवांनी कबूल केलं की तिनं प्रश्नात ज्याचा उल्लेख केला, तो माणूस ते स्वत:च होते.

गुरुदेव हे त्यांच्या भावंडांच्या आयुष्याचा मुख्य आधार होते. त्यांनी आपल्या भावंडांचं पालनपोषण केलं, त्यांचे लाड पुरवले नि त्यांचं संरक्षण सुध्दा केलं. चमत्कार करणारा एक छोटा माणूस ते अकल्पनीय शक्ती असणारे एक महागुरू अशा गुरुदेवांच्या अकल्पनीय प्रवासाची ती भावंडं साक्षीदार होती.

# एक रहस्यपूर्ण व्यक्ती

www.gurudevonline.com
वरील Podcast **Buddhe Baba Mystery Tour** एक धडा आहे मती गुंग करणारा. बुद्धे बाबांच्या व्यक्तित्वाबद्दल लोक काय म्हणतात, ते ऐका!

एक रहस्यपूर्ण व्यक्ता

# एक गूढ मार्गदर्शक

***शिक्षकाचा एक शिक्षक होता,***
***कुणीतरी वृध्द, ज्ञानी आणि सच्चा.***
***बुढ्ढे बाबा म्हणत ते त्यांना***
***आणि कितीही अपरिमित उत्खनन केलं तरी,***
***बस, त्यांच्याबद्दल तेवढंच माहीत होतं आम्हाला!***

गूढमय बुढ्ढे बाबांविषयी फार थोडं ज्ञात आहे. त्यांचं वर्णन गुरुदेव आपल्या स्वत:च्या आणि आमच्या आयुष्यांचा एक सर्वव्यापी भाग म्हणून करायचे. गुरुदेव हे नेहमीच स्पष्टपणे सांगण्यात तत्पर असायचे की ''मी कर्ता नाही आणि मी करत असलेल्या सेवेचं सर्व श्रेय हे पूर्णपणे माझ्या आध्यात्मिक मार्गदर्शकांना जातं.'' कधीकधी, जेव्हा आम्ही अतिशय गहन प्रश्न विचारायचो, तेव्हा ते म्हणायचे, ''उत्तर देण्यापूर्वी मी बुढ्ढे बाबांकडे खात्री करून घेतो.''

महाशिवरात्री किंवा गुरुपूर्णिमा अशा विशिष्ट प्रसंगी स्थानाला भेट देणारे भक्त हे दोन हार अर्पण करायचे - एक स्थानाला नि दुसरा गुरुदेवांना. महाशिवरात्रीच्या दिवशी, गुरू हे काही लोकांना आपल्याला हार घालायची परवानगी देताना आणि इतर अनेकांना तसं करायला मना करताना बघून, एक शिष्य थक्क झाला. भेदभाव न करणं असा गुरुदेवांचा पूर्वेतिहास असल्यामुळे, शिष्यानं त्यांना कारण विचारलं. महागुरूंनी ठामपणे सांगितलं, '''माझ्या गुरूंच्या गळ्यात आहेत, त्यापेक्षा अधिक हार मी माझ्या गळ्यात घालू इच्छित नाही.''

१९७० साली, आपल्या सर्व *सिध्दींचा* त्याग करण्याच्या काही काळ अगोदर, गुरुदेव बुड्ढे बाबांना भेटल्याचं सांगितलं जातं. त्यांना ते आपले आध्यात्मिक मार्गदर्शक आणि सल्लागार म्हणून आवाहन करायचे.

ते सगळं असं झालं. गुरुदेवांनी मध्य प्रदेशातील खूप दूर एका लहानशा खेड्यात एक छावणी उभारली होती. जंगलात, छावणीच्या जवळच, आपले मंत्र म्हणत असताना, गुरुदेवांना एका ओसाड मंदिरात एक वृध्द *साधू* भेटले. गुरुदेव तंबाखू चघळत होते. म्हणून, त्या साधूंनी थोडासा तंबाखू द्यायची विनंती केली. त्या मोबदल्यात, त्यांनी गुरुदेवांना सांगितलं की ते जो मंत्र म्हणत होते, तो अपूर्ण आहे. त्यांनी त्यात आठ शब्द वाढवण्याबद्दल सुचवलं आणि घोषित केलं की जास्तीचे शब्द गुरुदेवांच्या आध्यात्मिक मार्गाची गती वाढवतील. त्यांनी असंही भाकीत केलं की गुरुदेवांना त्यांच्या उशीखाली एक स्टीलचा *कडा* (कडं) मिळेल. त्या रात्री, गुरुदेवांनी सहजच, वाढीव मंत्र म्हणायला सुरवात केली. दुसऱ्या दिवशी सकाळी, जेव्हा त्यांनी आपल्या उशीखाली बघितलं, तेव्हा त्यांना एक स्टीलचा *कडा* दिसला. त्यावर संस्कृत अक्षरं कोरलेली होती. साधूंना भेटण्यासाठी उत्सुक असलेले गुरुदेव मंदिराकडे परतले. परंतु, तो ज्ञानी माणूस कुठेच सापडला नाही. जेव्हा जवळच बसलेल्या एका वृध्द माणसाला गुरुदेवांनी त्या साधूच्या ठावठिकाण्याविषयी विचारलं, तेव्हा त्यानं गुरुदेवांना सांगितलं, ‘‘हे मंदिर बऱ्याच काळापासून रिकामं आहे.’’

गुरुदेव त्यांनतर छावणीत परत आले आणि त्यांनी मंत्र म्हणायला सुरवात केली. यावेळी, एका आवाजानं त्यांना सांगितलं, ‘‘तू जे शोधतोयंस, ते सर्व काही आधीपासूनच तुझ्या अंतरात आहे आणि आता तुझी वेळ आली आहे लोकांची उपचाररूप निस्वार्थ सेवा सुरू करायची.’’ जेव्हा गुरुदेव म्हणाले, ‘‘लोकांवर कसे उपचार करायचे, हे मला माहीत नाही.’’ तेव्हा त्या आवाजानं त्यांना सांगितलं, ‘‘तू ज्या कुणाला स्पर्श करशील, तो बरा होईल आणि ज्यावेळी तुला मार्गदर्शनाची गरज असेल, त्यावेळी, एक *साधू* तुला मार्गदर्शन करेल.’’ या घटनेनं सुरवात झाली किंवा, कदाचित गुरुदेवांनी पवित्र मानलेलं नातं पुन्हा

जागृत केलं गेलं. गुरुदेवांनी कधीही बुड्ढे बाबांची ओळख उघड केली नाही, आणि अनेक अनुमानांना वाव मिळाला.

या गूढ आध्यात्मिक मार्गदर्शकाला आपण भेटलो आहोत, असा दावा करणारे जे थोडे फार लोक होते, त्यांच्यापैकी एक होती गुरुदेवांची लहान बहीण. एकदा, तिनं गुरुदेवांना आपल्या शिष्यांना असं सांगताना ऐकलं, ''मी निघून गेल्यानंतरच, माझे उपदेश तुम्हाला समजतील,'' तेव्हा, ती अत्यंत भावविवश झाली. त्यांचे शब्द म्हणजे अपशकुन आहे, असा अर्थ लावून, गुरुदेवांशिवाय जगण्याच्या कल्पनेमुळे ती अस्वस्थ झाली होती. गुरुदेवांच्या बेडरूममध्ये जमिनीवर ती हुंदके देत पडून होती. त्यावेळी, तिला भिंतीच्या एका छिद्रातून लालसर प्रकाशाचा प्रवाह दिसला. त्या प्रकाशानं आच्छादलेली, पांढरा पोशाख परिधान केलेली, तेजस्वी चेहरा, लांब पांढरे केस, विरळ दाढी असलेली एक आकृती दिसत होती. गुरुदेवांची बहीण उठून बसली, थक्क होऊन! त्या वृध्द साधूनं तिला विचारलं, ''तू का नाराज आहेस?'' हुंदके देतच, तिनं आपल्या भावानं त्याच्या शिष्यांना सांगितलेले शब्द उध्दृत केले. *साधू* तिला म्हणाला, ''कदाचित, गुरुदेव काही आठवड्यांतच, ऑफीसच्या शिबिरासाठी जात असल्याचं सांगत असतील.'' हे ऐकल्यावर, तिला खूप हायसं वाटलं. तिला आश्वासित केल्यावर, थोड्याच वेळानं, तो *साधू* अंतर्धान पावला. जेव्हा तिनं आपल्या भावाला हा अनुभव सांगितला, तेव्हा ते म्हणाले, ''तुला बुड्ढे बाबांना पहाण्याचं सद्भाग्य लाभलं.''

माताजींना सुध्दा आपल्या पतीच्या गूढ मार्गदर्शकाशी मनोरंजक भेट झाल्याचं आठवलं. एका रात्री, सहज जाग आली, तेव्हा त्यांना गुरुदेव बिछान्यावर बसलेले दिसले. ते 'बाबा' असं संबोधत कुणाशी तरी बोलत होते. काही कारणास्तव, त्यांनी आपलं संभाषण एकाएकी थांबवलं. दुसऱ्या दिवशी, त्यांनी स्पष्ट केलं, ''मला बुड्ढे बाबांबरोबरचं संभाषण आटोपतं घ्यावं लागलं. कारण त्यांनी मला सांगितलं की तू ते चोरून ऐकत होतीस.''



*एका निर्जन मंदिरात गुरुदेव बुड्ढे बाबांना पहिल्यांदा भेटतात*

गुरुदेवांच्या स्वत:च्या कुटुंबातील अजून एक व्यक्ती होती की जिनं बुड्ढे बाबांना पाहिलं होतं. ती होती गुरुदेवांची मुलगी रेणुजी. एक दिवस ताप भरल्यामुळे, तिची शाळा बुडाली. घरी एकटीच असताना, तिच्या लक्षात आलं की तिच्या खोलीच्या विरुध्द दिशेला जी सामान ठेवण्याची खोली आहे, त्या खोलीतून एक पांढऱ्या केसांचा, पांढरे कपडे परिधान केलेला माणूस प्रकट झाला नि अंतर्धान पावला! तिनं भीतीपोटी ब्लँकेटनं आपला चेहरा झाकला, अशा

आशेनं की तिचं अस्तित्व त्या वृध्द आगंतुक व्यक्तीला जाणवणार नाही. काही तासांनंतर, तिची आई शाळेतून परत आल्यावरच, तिनं कसंबसं धैर्य गोळा केलं नि ब्लँकेट दूर केलं. तिनं जे पाहिलं त्याबद्दलची संपूर्ण हकीकत जेव्हा तिनं सांगितली, तेव्हा माताजींनी ध्वनित केलं की ती व्यक्ती बुड्ढे बाबा असावी. गुरुदेवांचे अनेक भक्त आणि शिष्य आपण बुड्ढे बाबांना स्वप्नावस्थेत पाहिल्याचा दावा करतात. पूरनजींना एक स्वप्न पडलं ज्यात त्यांनी बुड्ढे बाबांप्रति आपला आदर व्यक्त केला, जेव्हा ते गरजूंना अन्नधान्याचं वाटप करत होते. रूपालजी या दुसऱ्या एका भक्त स्त्रीनं, स्वप्नात आपण ज्या स्थानाला भेट दिली, त्या स्थानाच्या भिंतीवर बुड्ढे बाबांचा टांगलेला फोटो पाहिल्याची आठवण सांगितली. गंमत म्हणजे, जरी पूरनजी आणि रूपालजी बुड्ढे बाबांना कधीही भेटलेले नव्हते किंवा त्यांच्याशी बोललेले नव्हते, तरीही, त्यांनी या गूढ आकृतीच्या शारीरिक वैशिष्ट्यांची समान वर्णनं सांगितली.

काही जणांचा विश्वास आहे की बुड्ढे बाबा हे शिवाची साकार अभिव्यक्ती आहेत, तर इतरांची अशी श्रध्दा आहे की बुड्ढे बाबा म्हणजे बनारसचे सितारामजी आहेत. गुरुदेवांचे गुरू अर्थात सुरवातीचे आध्यात्मिक मार्गदर्शक असणारे दसुआ येथील सितारामजी. हा गोंधळ उद्भवतो या वस्तुस्थितीमुळे की बनारसचे सितारामजी हे सिध्द संत होते की जे येशू ख्रिस्त नि गुरू नानक देवांप्रमाणे मृत्यूनंतर *सदेह शरीर* निघून गेले.

---

मृत्यूनंतर *सेह शरीर* निघून जाणं ही गोष्ट मानवी देहाच्या अणुसंरचनेच्या पुनर्रचनेद्वारा, त्याचं अभौतिकीकरण करण्याची क्षमता सूचित करते- असं कौशल्य इतिहासात फारच थोड्या अध्यात्मवाद्यांनी मिळवलंय.

---

बनारसचे सितारामजी हे आपल्या भारदस्त उंचीमुळे शिव म्हणून घ्यायला पात्र ठरतात. म्हणूनच, बुढ्ढेबाबा शिव असल्याचे गुरुदेवांचे संकेत गोंधळ वाढवतात. महागुरूंनी बुढ्ढे बाबांची ओळख कधीच प्रकट न केल्यामुळे, आम्ही फक्त अंदाज लावू शकतो, परंतु, कधीही खात्री बाळगू शकत नाही.

एक रहस्यपूर्ण व्यक्ती

# अघोरीच्या सन्मानार्थ काव्यांजली

*एक पिशाच माणसाच्या पोशाखातलं स्वेच्छेनं प्रकट होणारं आणि वृध्दिंगत होणारं डोळे चमकणारे लाल माणकासमान आणि ऐटबाज चाल तो अजूनही, त्याला पाहिजे तिथे दिसतो.*

आणखी एक व्यक्ती जिचा गुरुदेवांच्या कहाण्यांमध्ये वारंवार उल्लेख आढळतो, ती म्हणजे गुरुदेवांचा एक गूढ शिष्य अघोरी. अघोरी हा अघोर पंथाचा प्रमुख आहे आणि त्याचं आध्यात्मिक कार्यक्षेत्र हरिद्वार नि त्याच्या लगतच्या प्रदेशांमध्ये विस्तारलेलं आहे.

अघोरी म्हणजे शक्तिविरहित एकट्या शिवाची साकार अभिव्यक्ती आहे. स्वेच्छेनं, तो अनेक ठिकाणी विविध मानवी रूपांमध्ये प्रकट होतो आणि इंद्रियांशिवाय इतर माध्यमांद्वारे विचार किंवा कल्पनांचा संवाद साधतो. अघोरी हा गुरुदेवांचा शिष्य होता, त्याचे अनुयायी मात्र गुरुदेवांचे शिष्य नाहीत.

रवी त्रेहानजींच्या मते, गुरुदेव हे अघोरीचा उल्लेख आपल्या शिष्यांचा मोठा भाऊ असा करत, ज्याच्याकडे ते आध्यात्मिक बाबतीत मदतीसाठी जाऊ शकत. गुरुदेवांच्या अनेक शिष्यांनी अघोरीला विनंती केली असता, त्यांना अघोरीचा

आधार मिळालाय. सुरेंदर तनेजा यांच्या पत्नी शोभाजी यांनी सांसारिक इच्छा पूर्ण करण्याकरता अघोरीला व्यक्तिगत *जिन्न* (अरबी लोकसाहित्यातील आत्मा/ भूत) म्हणून वापरला. तथापि, काहीजण अघोरीच्या अव्यक्त रूपाच्या अमूर्तपणाशी संबंध जोडू शकले नाहीत आणि त्यामुळे, त्यांना त्याच्या आध्यात्मिक सामर्थ्याचा फायदा होऊ शकला नाही.

---

अघोर ही एक मनाची अवस्था आहे की जी विरोधाभास नि भेदभाव यांपासून मुक्त असते. अघोर *विद्या* ही सामान्यपणे निम्न स्तरावरची *तांत्रिक* पूजा म्हणून ओळखली जाते. तथापि, हा गैरसमज वाढवला गेलाय तो अघोरींच्या मृत देह आणि मलमूत्र भक्षण करणं, स्वास्थ्यरहित स्वच्छता राखणं, स्मशान-भूमींवर ध्यान करणं अशा पध्दतींमुळे. अघोर तत्त्वज्ञान हे अद्वैताचा शोध घेतं. त्यामुळे, या विलक्षण पध्दती अघोरींना अशा अवस्था प्राप्त करण्याची अनुमती देतात की ज्यांमध्ये दुर्गंधी आणि इतर संवेदनात्मक उत्तेजना त्यांना किळसवाण्या वाटत नाहीत. जरी त्यांच्या प्रथा घाणेरड्या समजल्या जातात, तरीही, हे सत्य आहे की अघोर तत्त्वज्ञान हे वरवर पहाता गोंधळात टाकणाऱ्या दृष्टिविद्येच्या पलीकडे अत्यंत विकसित झालंय. अद्वैताचा सराव करून, अघोरी हे मायेच्या किंवा सांसारिक भ्रमाच्या काटक मंडपातून मुक्त होण्याची आकांक्षा बाळगतात.


---

अघोरी हा मानवी स्वरूपात असताना, हरिद्वारला जाताना गुरुदेव त्याला भेटत असत. एका संध्याकाळी, हर की पौरी इथं आरतीच्या वेळी जमलेल्या जमावात गुरुदेव उभे असताना, त्यांनी आपल्या शिष्यांना थोडं दूर उभं रहायचा आदेश दिला आणि मग माताजींना नदीच्या किनाऱ्याच्या अधिक जवळ यायला सांगितलं. ते ठिकाण अधिक सोयीचं होतं. कारण, तिथून माताजींना पूजेचा सोहळा नीट दिसू शकला असता. माताजींना कळून चुकलं की अघोरीशी होणाऱ्या संभाव्य भेटीसाठी तयारीचा भाग म्हणून आपला नवरा आपला पिच्छा सोडवू इच्छितोय. गूढ शिष्याला बघायला उत्सुक असल्यामुळे, माताजींनी

तिथंच रहायचा आग्रह धरला. तथापि, आरती सुरू होताच, शंख, थाळ्या आणि मंत्रांच्या कर्णकर्कश आवाजानं त्यांचं लक्ष विचलित केलं. काही मिनिटांनंतर, त्या गुरुदेवांकडे वळल्या आणि त्यांनी सफेद कुर्ता-पायजमा घातलेल्या एका पगडीधारी माणसाला गुरुदेवांच्या चरणांना स्पर्श करताना पाहिलं. काय घडतंय याचा अर्थ त्यांच्या लक्षात येण्यापूर्वीच, तो माणूस वळला आणि चालत निघून गेला, त्यानंतर, त्यांचा नवराही गेला. काही सेकंदांतच, ते दोघे गर्दीत दिसेनासे झाले.

गुरुदेवांची अनुपस्थिती लक्षात आल्यावर, सर्व शिष्य हे माताजींच्या दिशेनं धावत गेले आणि त्यांनी माताजींना गुरुदेवांचा ठावठिकाणा विचारला. माताजींनी त्यांना काय घडलं, ते सांगितलं. वेड्यासारखा शोध घेऊनही, शिष्य आपल्या गुरूंना शोधू शकले नाहीत. जेव्हा गुरुदेव काही वेळानं परतले, तेव्हा त्यांनी दुजोरा दिला की ते ज्या माणसाबरोबर निघून गेले होते, तो अघोरीच होता. त्यांनी आपल्या पत्नीलाही सांगितलं की अघोरीनं त्यांच्या पायाला स्पर्श केला तो आदराचं चिन्ह म्हणून. तथापि, माताजींना त्याबद्दल खात्री नव्हती. कारण, त्यांना ते आठवत नव्हतं.

पुष्कळ वर्षांनी, ऋषीकेशला गुरुदेवांसोबत गेल्या असताना, माताजींना अघोरीबरोबर झालेली दुसरी भेट आठवली. त्या प्रवासात अनेक शिष्य आणि त्यांचे परिवार सुध्दा सहभागी झाले होते. लक्ष्मण झूला ओलांडल्यानंतर, त्यांच्या कार्यकर्त्यांनी एका घाटाजवळ आपला प्रवास थांबवला. तिथं साधूंचा एक जमाव आराम करत होता आणि पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेला एक माणूस एका लांब बाकावर झोपलेला होता. गुरुदेव त्या बाकावरच त्या माणसाच्या पायांपाशी बसले. त्यानंतर, त्यांनी आपल्या गटातल्या माणसांना गंगेत डुबकी मारायचा आदेश दिला, तर आपल्या पत्नीसह इतर स्त्रियांना ताजेतवाने होण्यासाठी स्त्रियांच्या स्नानाच्या ठिकाणी जायला सांगितलं.



*लक्ष्मण झूलाजवळच्या घाटावर*
*गुरुदेव अघोरीला भेटले*

स्नानाच्या ठिकाणी जाण्यापूर्वी, ''मी माझ्या तरुण मुलाला आपल्या बाजूला ठेवू शकते का ?'' अशी शोभाजींनी गुरुदेवांची परवानगी मागितली. आपल्या मुलाला बाकावर ठेवताच, एक कपडा गुंडाळलेला माणूस आपल्या मोठ्या लाल डोळ्यांनी आपल्याकडे बघतोय, हे पाहून त्या जोरानं किंचाळल्या. गुरुदेवांनी त्यांना ताबडतोब त्यांच्या मुलाला आपल्या देखरेखीखाली ठेवून निघून जायला आणि इतर स्त्रियांना सामील व्हायला साांगितलं. शोभाजींचे पती सुरेंदरजी हे गंगेत डुबकी मारणार, इतक्यात त्यांनी पाहिलं की एका अति वृध्द माणसानं आपल्या मुलाच्या पायांवर स्वतःचे हात ठेवले आहेत, तर गुरुदेवांनी त्याच्या डोक्यावर आपले हात ठेवले आहेत. एखाद-दोन सेकंदांनंतर, सुरेंदरजी पाण्यातून डुबकी मारून वर आले, तेव्हा त्यांना तो अति वृध्द माणूस कुठेच दिसला नाही. त्यांना आणि इतर शिष्यांना लगेचच स्पष्ट झालं की तो माणूस म्हणजे त्यांचा गूढ *गुरुभाई* अघोरी होता. ''*क्या वो अघोरी थे?*'' (ते अघोरी होते का ?), त्यांनी गुरुदेवांना विचारलं. त्यांच्या गुरूंनी होकारार्थी मान हलवली.

ज्यावेळी गुरुदेवांनी सुभाष सब्रवाल आणि मला माताजींबरोबर त्यांच्या जन्मगावी जायचा आदेश दिला होता, त्यावेळी अघोरीबरोबर माझी पहिली भेट झाली. माताजींच्या कुटुंबाच्या घरी पोचल्यानंतर, आम्ही कोपऱ्यावरच्या दुकानात तंबाखू आणण्यासाठी चालत गेलो. आम्ही त्या दुकानाच्या वाटेनं जात असताना, एक दारू प्यायलेला नि केस पिंजारलेला माणूस आमच्या दिशेनं येत असलेला आम्ही पाहिला. आमच्या दिशेनं चालत असता, तो त्याची सायकल खेचत येत होता. जेव्हा आम्ही घराकडे वळलो, तेव्हा तो आमच्या मार्गात उभा राहिला, आमचा मार्ग अडवत. त्यानं भेदक डोळ्यांनी आमच्याकडे बघितलं आणि एक मंत्र म्हणायला सुरवात केली. त्यावेळी मी मनातल्या मनात जो मंत्र म्हणत होतो, तोच मंत्र त्याला म्हणताना ऐकून मला धक्का बसला! मला जाणवलं की या माणसाला क्षुद्र समजू नये. म्हणून मी आणि सुभाषनं घाईघाईनं माघार घेतली.

मी पाहिलं की तो माणूस रात्रभर घराभोवती सायकल चालवत होता. जेव्हा पहाट झाली, तेव्हा तो निघून गेला. मला आठवत नाही की गुरुदेवांनी त्या माणसाची अघोरी अशी ओळख पटवली का अंत:प्रेरणेनं मला तसा निष्कर्ष काढायला भाग पाडलं. परंतु, मला नक्की आठवतंय की अघोरीनं संपूर्ण रात्रभर त्या घराचं रक्षण केलं, जिथं त्याच्या गुरूंची पत्नी रहात होती.

त्यांनतरची अघोरीबरोबरची माझी भेट काही वर्षांपूर्वी झाली, जेव्हा मी डेहराडूनमध्ये अस्थाल या नयनरम्य खेडेगावांत माझ्या सेवेला सुरवात केली. तो भाग अघोरीच्या अधिकारक्षेत्राखाली येत असल्यामुळे, मी त्याला भेटण्याविषयी मानसिक निमंत्रण दिलं. अस्थाल इथं सेवेच्या पहिल्या काही दिवसांपैकी एके दिवशी, आत्मविश्वास असलेला, मद्यधुंद असला, तरी तोऱ्यात चालत आलेल्या आणि ज्या खोलीत मी उपचारासाठी आलेल्या लोकांची काळजी घेत होतो, त्या खोलीच्या बाहेर येऊन उभा राहिलेल्या एका माणसाला मी पाहिलं. त्यानं मला एक ओळखीचं स्मित दिलं आणि माझ्याकडे भेदक डोळ्यांनी बघितलं. दृष्टिक्षेपांची देवाणघेवाण खूप काही सांगून गेली. जेव्हा एका *सेवादारानं* त्याला पाहुण्यांना दिल्या जाणाऱ्या अल्पोपहारात सहभागी व्हायला सांगितलं, तेव्हा त्यानं शेरा मारला की तो तिथं निमंत्रणाचा सन्मान राखण्याकरता आलाय. त्या क्षणापर्यंत, अशी फक्त एकच व्यक्ती होती की जिला मी अस्थालला बोलावलं होतं. त्यामुळे, जे मला अगोदर माहीत होतं, त्याला पुन्हा पुष्टी मिळाली - आमच्यामधला तो माणूस म्हणजे गुरुदेवांचा गूढ शिष्य अघोरी होता. काही तरुण शिष्य त्यांच्या मागोमाग गेटच्या बाहेर गेले, तेव्हा त्यांच्या निव्वळ लक्षात आलं की तो गायब झालाय आणि कुठेच आढळला नाही!

दुसऱ्या एका प्रसंगी, गुरुदेवांचे एक लाडके शिष्य राजी शर्मा एके रात्री खूप उशीरा गुरुदेवांना भेटायला गुरगावला आले. त्यावेळी त्यांना चहा करून द्यायचं काम माझ्यावर सोपवलं होतं. ज्यानं आपल्या आयुष्यात कधीही एक कप

चहा देखील केला नव्हता, त्याच्याकडून एक फार मोठी अपेक्षा होती! मदत मिळण्याच्या आशेनं, मी त्या खोलीकडे धावलो, जिथं स्थानातली निक्कु, पप्पु, बिट्टु आणि गग्गु ही भयंकर चौकडी गाढ झोपलेली होती. त्या चौकडीपैकी एकालाही मी त्याच्या झोपेतून हलवू शकलो नाही. त्यामुळे, स्वतः चहा बनवण्याशिवाय माझ्याकडें पर्याय नव्हता.

मी स्टोव्ह पेटवला आणि त्याच्यावर चहाच्या पानांसह पाण्याचं भांडं ठेवलं. मग, मी माझ्या मोठ्या भावाला अघोरीला सर्वोत्कृष्ट चहा बनवायला मदत करायला सांगितलं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पहिली सूचना मला विचार-लहरी म्हणून आली: अर्ध भांडं रिकामं कर आणि ते ताज्या पाण्यानं भर. मग मला आणखी एक विचार आला, ज्यानं मला चायच्या मसाल्याची जागा निर्देशित केली, ती निर्देशित केल्याप्रमाणे तंतोतंत बरोबर होती. दूध आणि साखर किती प्रमाणात वापरायची, चहा तयार करण्याकरता किती उकळ्या आणायच्या यासंबंधी मला अतिरिक्त सूचना देण्यात आल्या. जेव्हा चहा तयार झाला, तेव्हा मी तो दोन कपांमध्ये ओतला आणि घाबरतच गुरुदेवांच्या खोलीची वाट धरली. चहा देऊन झाल्यावर, मी खोलीतून बाहेर आलो, जेणेकरून, गुरुदेव आणि राजीजींना त्यांचं संभाषण पुढे सुरू ठेवता आलं असतं. काही क्षणांनंतर, गुरुदेव सांगत असताना माझ्या कानांवर पडलं, *''ओये, चाय बहुत बढिया बनायी है''* (तू मस्त चहा बनवलायस). ''तुम्हाला अजून एक कप चहा हवाय का?'' मी त्यांना विचारलं. त्यांनी ''हो'' म्हटलं. वाचकहो, मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की मी इतरांपेक्षा चांगला चहा बनवू शकतो. माझ्या मायावी *गुरुभाई* अघोरीनं मला पाठवलेल्या टेलिपॅथिक रेसिपीबद्दल धन्यवाद.

# महागुरू

# महागुरू जागृत होतात

***जेव्हा त्यांनी सगळ्याचा त्याग केला, तेव्हा त्यांनी मिळवलं.***
***हा आहे आध्यात्मिक विरोधाभास, माझ्या मित्रा.***
***माहीत होतं त्यांना की श्रीमंती नसते सोन्यात***
***परंतु असते ती दुसऱ्या कुणाचा अंतिम हेतू साध्य***
***करण्यासाठी साधन बनण्यात.***

असं म्हणतात की बुड्ढे बाबांनी १९७० साली गुरुदेवांना हर की पावरी इथं आपल्या सर्व *सिध्दी* सोडण्याचा सल्ला दिला होता. दसुआच्या सितारामजींच्या मार्गदर्शनाखाली शिकत असताना गुरुदेवांनी या सर्व *सिध्दी* प्राप्त केल्या होत्या. जेव्हा गुरुदेवांनी आपल्या आध्यात्मिक *सिध्दींपासून* आपली सुटका व्हावी, म्हणून नदीत आपले दोन्ही हात बुडवले, तेव्हा एका *सिध्दीनं* त्यांना विनंती केली, ''मला जाऊ देऊ नकोस. त्या बदल्यात, तुला जे हवं ते देईन, असं आश्वासन देते.'' मोहानं विचलित न होता आणि बुड्ढे बाबांच्या आदेशाचं पालन करण्यात स्थिर राहून, गुरुदेव नदीच्या बाहेर आले, सालोसाल आपल्या गोळा केलेल्या शक्ती काढून टाकून. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्वत:च्या शक्ती गमावल्यानं महागुरू म्हणून त्यांच्या अवताराची सुरवात झाली.

१९७३ साली, गुरुदेव आणि त्यांच्या चमूनं मध्य प्रदेशात कुरवाई नावांच्या एका छोट्या शहरात शिबिर आयोजित केलं होतं. या प्रवासात, नागपालजी गुरुदेवांसोबत होते. त्यांना आठवतंय की धन्ना नावाच्या ज्या माणसाच्या

*बुड्ढे बाबांच्या आदेशावरून, गुरुदेव आपल्या सर्व*
*सिध्दी हर की पावरी इथं सोडून देतात*





जमिनीवर शिबिर आयोजित केलं होतं, त्याला खूप ताप आला होता. अखेरीस, जेव्हा चार दिवसांनी तो आला, तेव्हा त्यानं आपल्या आजाराचा उल्लेख केला. गुरुदेवांनी त्याच्यावर *जल* शिंपडलं, त्याच्या कपाळावर आपला हात ठेवला आणि एका मिनिटात, धन्नाला बरं वाटलं.

दुसऱ्या दिवशी, धन्नाच्या आदेशावरून दुसरा एकजण गुरुदेवांकडे आला. पोटातील तीव्र स्वरूपाच्या वेदनांपासून आपल्याला आराम मिळावा, अशी त्यानं विनवणी केली. जेव्हा गुरुदेवांनी त्या माणसाचं पोट चोळलं, तेव्हा त्याच्या पोटातील वेदना थांबल्या. तेव्हापासून, लोक हे वाढत्या संख्येनं, आपल्या समस्यांवर उपाय शोधण्याकरता शिबिराला भेट द्यायला लागले.

काही दिवसांनी हा चमू कुरवाईपासून ७० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या अशोक नगर मध्ये गेला. गुरुदेवांच्या अद्भुत स्पर्शाबद्दल माहिती पसरल्यामुळे, त्यांना भेटायला लोक बैलगाड्यांमधून यायचे. जे शारीरिक किंवा मानसिक आजार घेऊन यायचे, ते शिबिराची जागा सोडण्यापूर्वी काही अंशी किंवा पूर्णपणे बरे झालेले असायचे.

खूप वर्षांनंतर, काही शिष्यांशी संभाषण करण्यादरम्यान गुरुदेवांनी उल्लेख केला की बुड्ढे बाबांनी निस्वार्थ सेवा करायचा आदेश दिल्यामुळे, कुरवाईत सार्वजनिक उपचाराला प्रारंभ झाला. गुरुदेव हे सुरवातीला काही लोकांना मदत करायला नि त्यांना बरं करायला काचकुच करत होते. कारण, त्या लोकांनी भूतकाळात खूप चुका

केल्या अहेत हे ते जाणून होते. परंतु, याउलट, पूर्वग्रह न ठेवता, सेवा करायची आज्ञा बुड्ढेबाबांकडून आल्यामुळे, गुरुदेवांनी ती केली.

जेव्हा गुरुदेवांनी कुरवाईत प्रथम सार्वजनिक उपचार केले, तेव्हा ते ३५ वर्षांचे होते. 'शिवासमान कुणीतरी' म्हणून त्यांचा उदय होण्याची भविष्यवाणी खरी ठरली होती.

या घटनेपूर्वी, गुरुदेवांनी प्राप्त केलेल्या आध्यात्मिक शक्तींचं प्रतिनिधित्व करणारी ओम् आणि ज्योत ही प्रतीकं त्यांच्या हातांवर दिसू लागली. त्यांच्या छातीवर नि पाठीवर सुध्दा ओम् दिसायला लागला.

गुरुदेवांमध्ये प्रकट झालेल्या आध्यात्मिक शक्तींसंबंधी तुम्ही अलौकिकता या विभागात अधिक वाचू शकता.

***गुरुदेव हे बनले मूर्तिमंत मंदिर***
***प्रकट होण्यामुळे असंख्य शक्तींच्या.***
***त्यांची पूजा म्हणजे पूजा होती***
***चालत्या-बोलत्या शिवालयाची.***


गुरुदेवांची प्रार्थना करून, असंख्य लोक गुरुदेवांमध्ये रहाणाऱ्या आध्यात्मिक शक्तींप्रति आपला आदरभाव दर्शवत. अधूमधून, गुरुदेव या शक्तींची आणि आपले सहयोगी असणाऱ्या प्रतीकांची आपल्या शिष्यांवर आणि भक्तांवर खैरात करत. महागुरू म्हणून जागृत झाल्यानंतरच्या वर्षांमध्ये, या शक्ती येणाऱ्या लाखो जणांची सेवा करणार होत्या आणि त्यांचा फायदा करून देणार होत्या.

# पहिला शिष्य


गुरुदेवांची नोकरी ही भू-सर्वेक्षकाची असल्यामुळे, त्यांना आपल्या कुटुंबापासून काही महिने दूर, दुर्गम भागांमध्ये तळ ठोकायला लागायचा. त्यामुळे, त्यांना वानप्रस्थ आश्रमाचा सराव करणं शक्य व्हायचं. त्यांचा पाच-सहा जणांचा गट *पंचायत* इमारतींमध्ये किंवा अतिथिगृहांमध्ये वास्तव्य करायचे. दुर्गम भागांमध्ये दुसरे कोणते पर्याय शिल्लक नसतील, तर ते तंबूंमध्ये तळ ठोकायचे.

१९६३ साली, हिमाचल प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या संयुक्त दौऱ्यादरम्यान गुरुदेवांची आर. सी. मल्होत्रा या सहकाऱ्याशी मैत्री झाली. मल्होत्राजी हे गुरुदेवांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि आध्यात्मिक ओढ यांमुळे प्रभावित झाले होते. त्यांच्या लक्षात आलं की गुरुदेवांना पैश्याची आसक्ती नाही किंवा भौतिक संपत्तीबद्दल वासना नाही. उलटपक्षी, त्यांनी गुरुदेवांच्या परोपकाराची अनेक उदाहरणं बारकाईनं पाहिली. जर सहकाऱ्याला आपलं भाडं भरणं शक्य झालं नाही, तर महागुरू आपल्या रकमेतला काही वाटा देत; जर शिपायाला आपल्या मुलीचं लग्न करणं परवडलं नाही, तर ते आपल्या पगारातला काही भाग त्याला देत, इत्यादी, इत्यादी.

मल्होत्राजी हे गुरुदेवांचे आध्यात्मिक प्रशिक्षणार्थी झाले आणि अध्यात्माच्या जगतात हळूहळू खोलवर ओढले गेले. १९७१ साली, गंगेत महागुरूंच्या चरणी साष्टांग दंडवत घालत असताना, त्यांना शिष्यत्वाची दीक्षा मिळाली. ज्यांच्यावर गुरुदेवांनी आपल्या शक्तींचा वारसा सोपवला, अशा अनेक शिष्यांपैकी ते पहिले शिष्य बनले.



*गुरुदेव मल्होत्राजींना हर की पौरी इथं शिष्यत्वाची दीक्षा देतात*



दीक्षा-विधीच्या दरम्यान, गुरुदेवांनी मल्होत्राजींना सूचना केली की त्यांनी पाण्याखाली आडवं पडत आपल्या चरणांना स्पर्श करावा. मल्होत्राजींना आठवलं,''मी का-कू करत होतो. कारण, पाण्याचा प्रवाह माझ्याकरता फार जबरदस्त होता आणि मला तर पोहता येत नव्हतं. परंतु, त्यांनी मला त्यांच्या सूचना पाळायला सांगितल्या आणि मी पूर्णपणे आश्चर्यचकित झालो की गंगा निश्चल झाली. दीक्षा-विधी पूर्ण होईपर्यंत, मी त्यांचा आदेश पाळला.'' ''नदी कशी काय निश्चल झाली ?'', असं थक्क झालेल्या मल्होत्राजींनी जेव्हा विचारलं, तेव्हा त्यांच्या गुरूंनी शांतपणे उत्तर दिलं, ''निसर्गातील पंचमहाभूतं माझ्या नियंत्रणाखाली आहेत.''

मित्र ते शिष्य हे अवस्थांतर करण्यासाठी मल्होत्राजींना सुरवातीला मनोमन खूप झगडावं लागलं. मित्राला गुरू म्हणून स्वीकारण्यात अडचणी येत असतानाही, शेवटी त्यांनी मित्राला गुरू म्हणून स्वीकारलं!

गुरुदेवांच्या नि:स्वार्थ सेवेच्या तत्त्वज्ञानाचा सर्वांत निपुण समर्थकांपैकी एक म्हणून मल्होत्राजींनी आध्यात्मिक श्रेष्ठत्व गाठलं. अन्य शिष्यांना प्रशिक्षण देण्यासाठीं आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठीं मल्होत्राजींनी महागुरूंना मदत पण केली आणि स्वत:चं सेवार्थीपेक्षा सेवेकरी म्हणून रूपांतर केलं. महागुरूंच्या सूचनांनुसार,



*एक प्रसंग जो जवळजवळ घडला*

ते मला गति किंवा अतिवेगवान सूक्ष्म प्रवासाचं तंत्र शिकवण्याकरता माझ्या स्वप्नात आले होते.

मल्होत्राजींचं औदार्य हे स्वप्नांच्या क्षेत्रापलीकडे गेलं. अनेक प्रसंगी, ते महागुरूंसमोर आपल्या *गुरुभाईंची* वकीली करत. तथापि, असे काही प्रसंग होते की आम्हाला मल्होत्राजींच्या खोडकर छटा सहन कराव्या लागत. त्यांची निरुपद्रवी कृत्यं गुरुदेवांचा क्रोध जागृत करण्याकरता असत. कारण, ते जाणून होते की महागुरूंच्या कठोरपणात पण आशीर्वाद दडलेले असत.

मल्होत्राजींच्या खोड्यांनी गुरुदेवांच्या एका नवीन शिष्याला लक्ष्य बनवलं, जो अखेरीस एक निष्णात अध्यात्मवादी बनला. महामृत्युंजय मंत्र-पठणाचा योग्य मार्ग म्हणजे म्हशीच्या पाठीवर, तिच्या शेपटीकडे तोंड करून पद्मासनात बसून पठण करणं, यावर मल्होत्राजींनी त्या शिष्याला विश्वास ठेवायला लावला आणि त्याची दिशाभूल केली. विहित विधीच्या विचित्रपणामुळे आश्चर्यचकित होऊन, शिष्यानं आपल्या गुरूंकडून याबाबत पुष्टी मागितली. गुरुदेवांना मजा वाटली. अशी चुकीची माहिती कुणी दिली, याबद्दल त्यांनी शिष्याला विचारलं. परिणामी मल्होत्राजींना गुरुदेवांच्या खोलीत येण्याचा आदेश दिला गेला. गुरूंची भूमिका बजावणाऱ्यांनी आपल्या प्रथम शिष्याला सौम्यपणे फटकारलं. मल्होत्राजींनी बालिशपणे हसून ती चूक मान्य केली. गुरुदेवांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे, म्हशीच्या दुर्दैवानं, शक्तिशाली अध्यात्मवादी तिच्यावर बसू शकला नाही!

महागुरूंच्या जीवितकार्यासाठी आपलं जीवन समर्पित केल्यानंतर, २०१९ साली मल्होत्राजींचं निधन झालं. ते अध्यात्मवाद्यांच्या फौजेत होते, ज्यांनी गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली महान आध्यात्मिक उंची गाठली.

---

गुरुदेवांनी आपल्या मागच्या जन्मातल्या ११ शिष्यांना पुढे नेलं, असा एक व्यापक समज आहे. या आयुष्यात त्यांनी इतर अनेकांची आपल्या शिष्यांमध्ये आणि त्यांच्या शिष्यांच्या शिष्यांमध्ये भरती केली, ज्यामुळे, एक बहुस्तरीय आध्यात्मिक पिरॅमिड तयार झालं. त्यांनी पुष्कळ *गण* किंवा आध्यात्मिक वारसदार गोळा केले, ज्यांच्यात आपल्या आध्यात्मिक गुरूंच्या पातळीवर उत्क्रांत होण्याचं अव्यक्त सामर्थ्य होतं.

---




*गुप्ताजींचा चहा आणि ज्यूसच्या स्टॉलवर गुरुदेव त्यांचा भक्तांसह*

# आध्यात्मिक वृक्षाचं बीजारोपण

*बिया पेरल्या त्यांनी ज्या वाढल्या एके दिवशी*
*एका जंगलाच्या रूपात वृक्षांनी भरलेल्या.*
*झाडांची रोपं त्यांनी जोपासलेली*
*बनली वारस त्यांच्या आध्यात्मिक वारश्यांची.*

गुरुदेवांच्या जीवितकार्याला नशिबानं साथ दिली त्यांच्या आध्यात्मिक जिगसॉ पझलच्या काही महत्त्वाच्या तुकड्यांची योग्य मांडणी करून, जे त्यांच्याच काळात जन्माला आले. गुरुदेवांनी त्याच कार्यालयात काम केलं जिथं मल्होत्राजी, एफ. सी. शर्माजी, डॉक्टर शंकरनारायण, आर. पी. शर्माजी, जैन साहेब, आर. के शर्माजी आणि सूरज शर्माजी काम करायचे. त्यामुळे गुरुदेवांना या सर्वांना भेटणं आणि प्रशिक्षित करणं अधिक सोपं झालं. महागुरूंनी आपल्या आध्यात्मिक कुटुंबाचं बीज आपल्या कार्यालयात पेरलं.

जेव्हा सहकाऱ्यांबरोबरच्या अनौपचारिक संभाषणांतून वेदना नि त्रास व्यक्त करायचे, तेव्हा गुरुदेव त्यांना मदत करायला नेहमी पुढे असायचे. लवकरच, गुरुदेवांच्या उपचार आणि भविष्यसूचक शक्तींविषयी संपूर्ण कार्यालयात बातमी पसरली आणि अनेकजण त्यांच्याकडे आधार आणि सल्ल्यासाठी येऊ लागले. त्यांच्यापैकी एक होत्या सौ. सुशीला चौधरी.

सुशीलाजींना एक चार वर्षांची मुलगी होती. डॉक्टरांनी सुशीलाजींना सांगितलं होतं की त्यांना पुन्हा कधीही गर्भधारणा होणं शक्य नाही. अत्यंत व्याकुळ झालेल्या सुशीलाजींनी गुरुदेवांकडे धाव घेतली. गुरुदेवांनी त्यांना आश्वासन दिलं की चार मुलांची आई होणं त्यांच्या प्राक्तनात होतं आणि त्या चारांपैकी तीन मुलगे असणार होते. या संभाषणानंतर, एका वर्षानं, सुशीलाजींनी एका मुलाला जन्म दिला नि दुसऱ्याला तीन वर्षांनी जन्म दिला.

आपल्या दुसऱ्या मुलाच्या (तिसऱ्या अपत्याच्या) जन्मानंतर, लवकरच जेव्हा सुशीलाजी गुरुदेवांना भेटल्या, तेव्हा गुरुदेवांनी त्यांना सांगितलं की आता त्यांनी तिसऱ्या मुलाला जन्म देण्याची वेळ आल्ये. सुशीलाजींनी नम्रपणे नकार दिला, त्याचबरोबर, तीन सुदृढ मुलांचं वरदान दिल्याबद्दल गुरुदेवांचे आभार मानले. जेव्हा गुरुदेवांनी पुनरुच्चार केला की त्यांच्या प्राक्तनात तिसरा मुलगा आहे, तेव्हा सुशीलाजींनी गयावया केली की गुरुदेवांनी ते मूल दुसऱ्या कुणाला तरी द्यावं. कारण, त्यांना आणखी मूल नको होतं.

जेव्हा खूप वर्षांनंतर, सुशीलाजी गुरुदेवांकडे, त्यांनी आपल्या कुटुंबाला सतावणाऱ्या समस्यांचं निवारण करावं अशी विनंती करायला आल्या होत्या, तेव्हा गुरुदेव सुशीलाजींना म्हणाले, ‘‘ज्या एका उत्क्रांत आत्म्याला तुम्ही मानवी जन्म द्यावा अशी माझी इच्छा होती, तो आत्मा तुमच्या मृत वडिलांचा होता. तथापि, आणखी एक मूल जन्माला घालण्याच्या तुमच्या सततच्या अनिच्छेमुळे, मला त्या आत्म्याला दुसऱ्या कुटुंबात मानवी जन्म द्यावा लागला. जर तुम्ही तुमचा गर्भाशय द्यायचं मान्य केलं असतंत, तर त्या आत्म्यानं तुमच्या सगळ्या समस्या सोडवल्या असत्या.’’ सुशीलाजींना कळून चुकलं की गुरुदेवांचं न ऐकून, त्यांनी चूक केली होती.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सुशीलाजींची मुलासाठीची तीव्र इच्छा त्यांच्या नवऱ्याच्या आध्यात्मिक परिवर्तनाला कारणीभूत ठरली. गुरुदेवांनी सुशीलाजींना दोन

सुदृढ मुलांचं वरदान दिलं आणि त्यांच्या पतीवर श्री. चौधरींवर दिल्लीत पटेल नगर येथील स्थानाचं व्यवस्थापन सोपवायचा आरंभ करून, त्यांच्या कुटुंबाचं आपल्या गटात स्वागत केलं.

एक वरिष्ठ सहकारी डॉक्टर शंकर नारायण हे दुसरे गृहस्थ होते, ज्यांचं आयुष्य गुरुदेवांची भेट झाल्यानंतर नाट्यमय रीतीनं बदललं. शंकर नारायणजींचं कुटुंब अनेक समस्यांना तोंड देत होतं. सर्वात गंभीर मामला होता तो त्यांच्या लहान मुलीच्या वैशालीच्या आरोग्याचा. तिला अधूनमधून फिट्स आणि सतत ताप यायचा. ज्यावेळी, शंकरनारायणजींनी तिच्या तब्येत बिघडल्याचा गुरुदेवांकडे उल्लेख केला, त्यावेळी गुरुदेव हसले, पण काही बोलले नाहीत.

कालांतरानं, शंकर नारायणजींचा गुरुदेवांच्या आध्यात्मिक शक्तींवरचा विश्वास वाढला. हा माणूस सामान्य उपचार करणारा नाही, या गुरुदेवांवरच्या पूर्ण विश्वासानं, त्यांना आपल्या मुलीची औषधं फेकून द्यायला उद्युक्त केलं. त्यांची खात्री झाली की तिला त्या औषधांची मुळीच गरज पडणार नाही. हे केल्यानंतर, वैशालीची प्रकृती हळूहळू सुधारत, पूर्णपणे बरी झाली, गेली. डॉक्टर शंकरनारायणजी हे अशी पहिली व्यक्ती होते की जिनं आपल्या मुलीला बरं करणाऱ्या माणसाचा उल्लेख 'गुरुजी' असा केला. त्यानंतर, लवकरच, गुरुदेवांनी त्यांना शिष्य म्हणून दीक्षा दिली.

कामावर असताना, गुरुदेव हे आपल्या काही शिष्यांसमवेत हरिबाबू गुप्ता यांच्या चहा आणि ज्यूसच्या स्टॉलवर गप्पा मारायचे. हा स्टॉल कर्झन रोडवर, गुरुदेवांच्या ऑफीसच्या बरोबर खाली होता. जेव्हा गुप्ताजींनी पहिल्यांदा पाहिलं की माणसं गुरुदेवांच्या चरणांना आदरानं नमस्कार करत आहेत, तेव्हा गुरुदेव हे उच्च पदस्थ अधिकारी आहेत असं त्यांनी गृहीत धरलं. त्यांना नंतर कळलं की गुरुदेवांनी जो आदर कमावला होता, तो त्यांच्या पदापेक्षा आध्यात्मिक महानतेमुळे होता. अखेरीस, गुप्ताजी गुरुदेवांचे भक्त बनले आणि त्यांचा

स्टॉल हा महागुरू आणि त्यांची मदत मागायला येणाऱ्यांकरता भेटण्याचं ठिकाण बनला.

गुप्ताजींच्या स्टॉलवर पाहुण्यांना भेट देताना, आपल्या जवळ असणाऱ्या सहकाऱ्यांनाही गुरुदेव चहा द्यायचे. अनेक लोक गुरुदेवांच्या औदार्याचा फायदा घेत आणि त्यांच्या पैश्यातून फुकट पेय पीत असत. ''तुम्ही इतक्या सहजपणे कसे काय फसता?'' असं त्यांना विचारलं, तर ते उत्तर द्यायचे, *''ये कल भी पीते थे, हम कल भी पिलाते थे. ये आज भी पीते हैं. हम आज भी पिलाते हैं. ये कल भी पिएंगे, हम कल भी पिलाएंगे.''* गुरुदेवांच्या म्हणण्याचा असा अर्थ होता की सेवा करणं हे त्यांचं प्राक्तन होतं आणि ती निरपेक्षपणे करणं ही त्यांची जबाबदारी होती.

गुरुदेव ऑफीसमध्ये लोकांची सेवा करायचे आणि जवळच असलेल्या आपल्या बहिणीच्या घरी कित्येक जेवणाच्या सुट्ट्या सेवा करण्यात घालवायचे. एक सहकारी, आनंद पराशर यांना आठवतंय,''जेवणाच्या तासादरम्यान, गुरुदेव हे ऑफीसच्या बाहेर त्यांची वाट बघणाऱ्या लोकांना भेटायचे. त्यांनी कुणातही भेदभाव केला नाही का कुणालाही मदत नाकारली नाही.''

जरी, गुरुदेव हे गरज असणाऱ्या प्रत्येकाला मदत करायला तयार असायचे, तरी कामाच्या ठिकाणी अचानक लक्ष वेधलं गेल्यामुळे ते अस्वस्थ व्हायचे. कारण, ते प्रसिध्दी किंवा गौरवाच्या मागे नव्हते. गोष्टींचा गाजावाजा न करणं, त्यांना कमी महत्त्व देणं याकरता उत्तम प्रयत्न करून सुध्दा, गुरुदेवांच्या ऑफीसच्या भिंतींच्या पार पलीकडे त्यांच्या असामान्य शक्तींविषयी बातमी पसरली. गुप्ताजींना आठवतंय की ऑफीसच्या आठही प्रवेशद्वारांच्या आसपास लोक येरझारा घालायचे, या आशेनं की गुरुदेवांना इमारतीच्या आत येताना आणि इमारतीच्या बाहेर जाताना ओझरतं पहाता आलं असतं किंवा त्यांच्याशी थोडक्यात बोलता आलं असतं. परंतु, गुप्ताजी महागुरूंची स्कूटर

चालवायचे नि महागुरू आपला चेहरा हेल्मेटच्या मागे झाकून, मागच्या सीटवर बसायचे आणि सटकायचे. शिष्यांची नि भक्तांची संख्या वाढत असली, तरी गुरुदेव विनम्रच राहिले. ते आपल्या वरिष्ठांना 'सर' अशी हाक मारायचे आणि त्यांच्या ऑफीसमध्ये परवानगीशिवाय कधीही प्रवेश करत नसत.

गुरुदेवांचे अगोदरचे वरिष्ठ प्रताप सिंगजी यांनी गुरुदेवांचं एक सुखी-समाधानी, अति दयाळू माणूस असं वर्णन केलंय. त्यांनी गुरुदेवांचं कौतुक केलंय की गुरुदेवांनी आपल्या सेवेला व्यावसायिक जबाबदाऱ्यांपेक्षा प्राधान्य दिलं नाही. ते म्हणतात, ''गुरुदेवांचे शिष्य आणि इतर ज्यांना मदतीची गरज असे, ते नेहमीच आमच्या ऑफीसमध्ये हजर असायचे.'' मला त्याची सवय झाली होती. कारण, गुरुदेव इतरांना मदत करण्याकरता विशेष प्रयत्न करायचे आणि त्यांना त्यांच्या क्लेशातून आराम मिळवून द्यायचे. जे महान चांगल्या गोष्टीसाठी खूप मेहनत घेत होते, त्यांना मी पाठिंबा कसा काय देणार नाही? मला नाही वाटत की मी त्यांच्या बाबतीत दयाळू होतो. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की त्यांनी माझ्या दयाळूपणाचा कधीही फायदा घेतला नाही. जेव्हा मी त्यांच्या छावण्यांना भेट द्यायचो, तेव्हा ते माझ्याशी खूप आदरानं वागायचे आणि माझ्याकरता जेवण सुध्दा बनवायचे.''

जमिनीचं वैयक्तिक सर्वेक्षण आणि मातीची परीक्षा केल्यानंतरच अधिकृत अहवालांवर सह्या करणाऱ्या गुरुदेवांनी पुष्कळांपेक्षा जास्त मेहनत घेतली, अनेकांपेक्षा जास्त काळ काम केलं. कामासाठी दुर्गम ठिकाणी प्रवास करण्यास ते कायम तयार असायचे, मग प्रवास कितीही अवघड किंवा गैरसोयीचा असला तरीही. एकदा ते बिट्टुजींना म्हणाले होते, ''मी माझा पगार भारत सरकारकडून घेतो. मी माझी व्यावसायिक कर्तव्यं कळकळीनं आणि प्रामाणिकपणे पार पाडायला बांधील आहे. ही अशी गोष्ट आहे की त्या बाबतीत मी कधीही तडजोड करणार नाही.''

आध्यात्मिक मार्गावर असताना, गुरुदेवांची आपल्या कामाप्रति असलेली श्रध्दा ही त्यांच्या शिष्यांसाठी, भक्तांसाठी आणि अनुयायांसाठी एक उदाहरण म्हणून उपयुक्त ठरली.

काम म्हणजे पूजा ही एक जुनी क्लृप्ती आहे. त्यांच्या
बाबतीत, पूजा केली जाणं हे काम होतं. तरीही,
त्यांनी कामात कार्यक्षमता दाखवली आणि परिश्रमासाठी
प्रतिष्ठा मिळवली. ऐका **The workplace**
www.gurudevonline.com वर

# एक आध्यात्मिक वृक्ष मूळ धरतो

*त्यांनी आपल्या शक्ती बहाल केल्या शंभर संतांना*
*त्यांची घरं बनली त्यांची मंदिरं. त्यांच्या तत्त्वज्ञानानं मूळ धरलं*
*लहानशा खेड्यांमध्ये नि शहरांमध्ये जिथं असंख्यांची अजूनही*
*केली जाते सेवा त्यांच्या नावे.*

जसजसा गुरुदेवांचा आध्यात्मिक परिवार वृध्दिंगत झाला, तशी त्यांना आपल्या शिष्यांच्या घरांमध्ये स्थानं सुरू उघडण्याची अभिनव कल्पना सुचली.

१९७३ साली, गुरुदेवांनी दिल्लीत शादिपूर इथं मल्होत्राजींच्या घरी स्थान उघडून सेवा सुरू केली. एका वर्षानंतर, गुरगाव मधील शिवपुरी इथं गुरुदेवांच्या घरात या सेवेचं स्थलांतर झालं. हे पाऊल उचलण्याअगोदर एक विशेष घटना घडल्याचं माताजींनी सांगितलं. ते असं झालं की, त्या वर्षादरम्यान, रोहटकमधून दोन स्त्रिया गुरुदेवांच्या शिवपुरीमधील घरी आल्या आणि गुरुदेवांचं नाव घेऊन त्यांच्यासंबंधी त्यांनी विचारपूस केली. त्यांनी गुरुदेवांना सांगितलं की त्यांना त्या व्यक्तीला भेटायचंय की जिनं गुरुवारी चमत्कार घडवलेत. गुरुदेवांनी प्रतिसाद दिला, ‘‘तुम्ही ज्याला शोधताय, तो मीच आहे. परंतु, मी काही चमत्कार घडवणारा नाहीये.’’ त्या निघून गेल्या,







स्त्री गुरुदेवांच्या सूचनांचे उल्लंघन
करते आणि तिचा गर्भपात होतो

पण काही दिवसांनी परत आल्या आणि त्यांनी गुरुदेवांना मदत करायची विनंती केली. गुरुदेवांनी त्यांना ४० दिवसांनंतरच्या पहिल्या गुरुवारी स्थानावर परत यायला सांगितलं.

जेव्हा त्या ४० दिवसांनी परत आल्या, तेव्हा त्या दोघींपैकी एकीनं गुरुदेवांना तिच्या गुरूंनी दिलेल्या शापाचा भंग करायची विनंती केली. ती त्यांना सांगायला लागली की जेव्हा तिचे गुरू तिच्या कुटुंबाला भेटायला आले, तेव्हा ती चार महिन्यांची गर्भवती होती. तिच्या नवऱ्यानं तिला कृतज्ञतेचं एक प्रतीक गुरूंना बहाल करायला सांगितलं. कारण तिच्या गर्भधारणेकरता गुरूंची कृपा कारणीभूत होती. जेव्हा तिनं आपल्या गुरूंना ''आपल्याला काय हवंय?'' असं विचारलं, तेव्हा त्यांनी उत्तर दिलं,''मला कोणतीही भौतिक इच्छा नाही. परंतु, तू मला पुढच्या स्टॉपपर्यंतचं बसचं भाडं देऊ शकतेस.'' काही अकथनीय कारणामुळे, तिनं पैसे द्यायला नकार दिला. गुरूंनी खवळून, तिला शाप दिला आणि जाहीर केलं, ''तू जशी आहेस, तशीच नेहमी रहाशील''. त्यानंतर, लगेचच तिचा गर्भपात झाला.

गुरूंचा शाप अत्यंत प्रभावी होता. प्रत्येक वर्षी ती गर्भार रहायची, परंतु, चौथ्या महिन्यात तिचा गर्भपात व्हायचा. ज्यावर्षी, ती गुरुदेवांकडे आली, तेव्हा ती पुन्हा गर्भार होती. तिनं आपल्या न जन्मलेल्या मुलाचं अस्तित्व सुनिश्चित करण्यासाठी गुरुदेवांकडे संरक्षणाची मागणी केली. ती तिची कहाणी सांगत असतानाच, तिच्या गुरूंच्या आत्म्यानं स्थानात प्रवेश केला आणि स्थानाच्या काही भागाला आग लावली. जेव्हा गुरुदेवांनी ज्वाळा विझवल्या, तेव्हा, त्या आत्म्यानं गुरुदेवांना ''शाप मोडू नका,'' असा इशारा दिला. गुरुदेवांनी आत्म्याला सांगितलं,'' मी या स्त्रीला नाही म्हणू शकणार नाही. कारण, ती तिच्या इच्छेनं स्थानात आली आहे.'' तेव्हा त्या आत्म्यानं गुरुदेवांना सांगितलं, ''त्या स्त्रीला माझी क्षमा मागण्याकरता माझ्या आश्रमात पाठवा. '' गुरुदेवांनी

त्या स्त्रीला हा निरोप पोचवला, परंतु, त्यांनी धोक्याची सूचना दिली की जेव्हा ती तिथं जाईल, तेव्हा तिनं कुणाकडूनही काहीही स्वीकारू नये. तथापि, तिनं आश्रमात *तावीझ* स्वीकारला, त्यानंतर लगेचच, तिच्या गर्भातील मुलाचा मृत्यू झाला.

### *सिध्द गुरूंचा शब्द असतो*
### *अत्यंत मूल्यवान नि उपयुक्त!*

या घटनेनंतर, गुरुदेवांनी शिवपुरी इथं सेवा सुरू केली. सुरुवातीला, आठवड्यात प्रत्येक दिवशी लोक मदत मागायला यायचे. जशी गर्दी वाढायला लागली, तसं गुरुदेवांनी ठरवून टाकलं की प्रत्येक महिन्यात *अमावास्येनंतर* येणारा पहिला गुरुवार हा पूर्णपणे सेवेकरता समर्पित केला जाईल. या दिवसाला *बडा* गुरुवार असं नाव दिलंय. *बड्या* गुरुवारी जगभरातील अनेक स्थानांमध्ये एकाच वेळी सेवा केली जाते. ज्यांना सेवा दिली जाते, त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी या स्थानांनी अनुकूल बदल केले आहेत. काही स्थानांच्या ठिकाणी शनिवारी सेवा केली जाते, काही इतर स्थानांमध्ये रविवारी सेवा-दिवस असतो.

स्थानांच्या वाढत्या संख्येनं प्रेरित होऊन, गुरुदेवांच्या आध्यात्मिक योजनेनं भारतात छोटी खेडी, नगरं, शहरांमध्ये आणि जगभर मूळ धरलं. घरगुती स्थानांनी अतिरिक्त पायाभूत सुविधांचा खर्च ओढवून न घेता, सेवा घडावी यासाठी अनुमती दिली आहे. महागुरूंनी किंवा त्यांच्या शिष्यांनी स्थापन केलेल्या कोणत्याही स्थानावर, मदतीच्या मोबदल्यात पैसा किंवा भेटवस्तू स्वीकारणं मना आहे.

आपल्या काही शिष्यांची गुरू म्हणून नेमणूक करून आणि आपल्या शक्ती त्यांना बहाल करून, गुरुदेवांनी आपला अजूनही विस्तारत असलेला आध्यात्मिक उपक्रम सुरू केला. इतर अनेकजण गुरुदेवांच्या शिष्यांचे शिष्य

झाले. गुरुदेवांनी अनेक स्तर असलेली आध्यात्मिक रचना तयार केली. परंतु, त्यांच्या मनात असलेला नेमका संबंध कधीच उघड केला नाही. त्यांनी परिश्रम, सराव, आणि बुद्धे बाबांचं मार्गदर्शन यांच्या द्वारा, नवीन गुरू ते महागुरू अशी प्रगती केली. अखेरीस, एकल झाड वाढून अनेक वृक्षांची फळबाग बनली, ज्यातला प्रत्येक वृक्ष हा स्वयंपूर्ण होण्यास समर्थ आहे.

कसा एक वृक्ष फळबाग बनला, याचं
अधिक समृध्द आकलन होण्यासाठी ऐका
**Collection Centre** वर.
www.gurudevonline.com वर
podcast चं सादरीकरण केलंय




*हिमाचल प्रदेशाचा नकाशा हा केवळ प्रतिनिधित्वासाठी आहे*

# चमत्कारांची गूढ योजना

*उत्तरेकडच्या शहरात प्राचीन टेकड्यांमध्ये*
*त्यांनी केली मदत लाख किंवा लाखांपेक्षा अधिक लोकांना.*
*सरळ केले गेले वाकलेले मणके*
*आणि बरं केलं गेलं आजारी लोकांना*
*त्यांच्या आजारांपासून, ज्यांवर नव्हता कोणताही इलाज.*

हिमाचल प्रदेश हा त्यांच्या शक्ती मंदिरांसाठी प्रसिध्द आहे. त्यांपैकी नैना देवी, ज्वालामुखी, चिंतपूर्णी, चामुंडा देवी आणि ब्रजेश्वरी देवी ही सर्वात सुविख्यात मंदिरं आहेत.

कांग्रा जिल्ह्यांत कथोग हे विरळ लोकसंख्या असलेलं शहर आहे. तिथं १९७६ साली गुरुदेव आणि त्यांच्या माती सर्वेक्षण पथकानं एका शाळेच्या रस्त्यापलीकडे असलेल्या शिक्षकांच्या वसतिगृहात मुक्काम केला होता. त्यावर्षीच्या मे महिन्यात गुरुदेवांनी तिथं सेवेचा आरंभ करायचं ठरवलं. त्यांनी दिल्लीमधील आपल्या काही शिष्यांना आपल्यात सामील व्हायला सांगितलं. एखाद्याला आश्चर्य वाटेल अशा रीतीनं, जवळपासच्या भागांमधले हजारो लोक गुरुदेवांची मदत, त्यांचे उपचार आणि आशीर्वाद घेण्यासाठी येऊ लागले.

वसतिगृहाच्या रस्त्यापलीकडे असलेल्या एका छोट्या झोपडीत रहाणारा थापा नावाचा एक *तांत्रिक* या सगळ्या घटनांबद्दल संशयी नि साशंक होता. त्याची खात्री पटली होती की ज्या माणसानं आपल्या हातावरील ओम आणि त्रिशूळ प्रदर्शित करून कथोगच्या लोकांना चकित केलंय, तो जादूगार आहे. एका रात्री थापानं ठरवलं की या जादूगाराच्या खोट्या आभासाबद्दल संशय व्यक्त करायची वेळ आली आहे. त्यानं आपल्या आदेशात असणाऱ्या एका सामर्थ्यशाली आत्म्याला गुरुदेवांच्या मनात ईश्वराची भीती निर्माण करण्याकरता पाठवलं. नंतर, तो त्या आत्म्याच्या परत येण्याची वाट बघत बसला आणि जेव्हा सेकंद मिनिटांमध्ये आणि मिनिटं तासांमध्ये बदलली,तेव्हा, तो अतिशय खवळला. जेव्हा सूर्य उगवला, तेव्हा, काय घडलंय हे शोधून काढण्याकरता तो स्वत: वसतिगृहात गेला. जेव्हा गुरुदेवांनी त्याला थोड्याशा किलकिल्या दरवाज्यातून आत बारीक नजरेनं डोकावून बघताना पाहिलं, तेव्हा त्यांनी त्याला आतमध्ये बोलावलं. जेव्हा थापा सावधपणे खोलीत शिरला, तेव्हा, महागुरू हसले आणि म्हणाले, ''तुम्हाला अशा मूर्ख परीक्षा घेणं थांबवायची गरज आहे!'' थापाला त्याच वेळेला नि तिथंच कळून चुकलं की गुरुदेव हे जादूगार किंवा मायावी नव्हते. त्यानं त्यांची क्षमा मागितली आणि शंकेचं भक्तीत रूपांतर झालं.

सुरेश कोहली हे वसतिगृहापलीकडे असलेल्या शाळेत शिक्षक होते. त्यांना थापाकडून गुरुदेवांबद्दलची माहिती मिळाली. सुरेशजींनी थापाचे शब्द फेटाळून लावले असं गृहीत धरून की त्यानं ते दारूच्या नशेत उच्चारलेत. कारण, थापा नियमितपणे दारू प्यायचा. तरीही, सुरेशजींची जिज्ञासा इतकी शिगेला पोचली की ते त्या माणसाला भेटायला तयार झाले ज्याच्या चमत्कारांनी छोट्या शहराला मोहीत केलं होतं.

गुरुदेवांनी सुरेशजींचं स्नेहपूर्वक स्वागत केलं आणि चहाचा कप पुढे केला. पुढील संभाषणादरम्यान, सुरेशजींनी गुरुदेवांना विचारलं, ''आपण मला परमात्म्याची भेट घडवण्यास मदत करू शकाल का?'' गुरुदेवांनी सुरेशजींना रात्री स्वत:जवळ पाण्यानं भरलेला पेला घेऊन, ध्यान करण्याची सूचना केली.

सुरेशजींना स्मरतंय की ते जेव्हा त्या रात्री ध्यानात बसले होते, तेव्हा त्यांना गुरुदेव आपल्या घरच्या मंदिरात असल्याचं दृश्य दिसलं. ही प्रतिमा सलग ओळीनं सात रात्री प्रकट झाली. मात्र, आठव्या रात्री काहीच घडलं नाही.

तथापि, नवव्या रात्री सुरेशजी महागुरूंना भेटायला आले. गुरुदेवांनी त्यांचं अशा शब्दांत स्वागत केलं, *''हूं मैनु इस्स तरह वेखिया मास्टरजी, ते समझना रब नु पा लिता!"* (आता यापुढे केव्हाही माझं दृश्य दिसलं, तर समजा की तुम्हाला परमात्मा भेटलाय.) सुरेशजी गुरुदेवांना एखाद्या संतापेक्षा जास्त महत्त्वाचे समजायला लागले आणि त्यांच्या चरणांवर लोटांगण घालायचे.

जशी कथोगला गर्दी वाढायला लागली, तशी, मोठ्या संख्येत येणाऱ्या लोकांना समाविष्ट करून घेण्याकरता गुरुदेवांनी शाळेच्या आवारात सेवेला सुरवात केली. जेव्हा त्यांना कुशलतेनं काम करणाऱ्या माणसांची गरज पडली, तेव्हा, त्यांनी त्याच शाळेतल्या सुरेशजी, शंभुजी, संतोषजी अशा पुष्कळ शिक्षकांना आपण उष्टावलेलं *जल* प्यायला लावून, सेवेसंबंधी प्रशिक्षण दिलं. पुढील काही दिवसांत, (या जन्मी) अध्यात्माविषयी काहीही ज्ञान नसलेले पुरुष आध्यात्मिक उपचारक बनले.

कथोगमध्ये गुरुदेवांनी काही असामान्य आध्यात्मिक पराक्रम केले. ते मोठ्या जमावावर *जल* शिंपडायचे आणि आजारी असणाऱ्यांना तात्काळ बरे करायचे. एके दिवशी, त्यांनी ज्या एका माणसाचा मणका वाकला होता, त्याच्या पाठीवर आणि धडावर आपला हात चोळला आणि काही मिनिटांतच, त्याचा मणका कायमचा सरळ केला.

राजी शर्माजींच्या मते, आध्यात्मिक बहिर्मंडलापर्यंत गुरुदेवांची उन्नती होण्याकरता कथोगनं आधारमंच म्हणून काम केलं. असं म्हणतात की या छोट्या गावात गुरुदेवांनी लाखो लोकांना मदत केली आणि बरं केलंय. त्यामुळेच, त्यांना *'ओम वाले बाबा'* असं टोपण नाव मिळालंय.

*कथोगमध्ये एका माणसाचा*
*वाकलेला मणका गुरुदेव बरा करतात*



गुरुदेवांनी कित्येक महिने माती सर्वेक्षण छावण्यांमध्ये घालवले जिथं हजारो लोक यायचे त्यांची मदत आणि आशीर्वाद मागायला. ऐका podcast **Camps** www.gurudevonline.com वर





# असामान्य उपचारक

*करार केला गेला अमर आत्म्याबरोबर*
*मानवजातीच्या मदतीसाठी नि सेवेसाठी.*
*सहयोग करत आलेत ते आजपर्यंत*
*क्लेश कमी करण्याकरता तनाचे नि मनाचे.*

हिमाचल प्रदेशात सिरमौर जिल्ह्यातील रेणुका हे एक छोटसं शहर आहे. हे शहर रेणुका देवी आणि त्यांचे पती सप्तर्षी जमदग्नी यांचा अमर पुत्र परशुरामजी यांच्या आध्यात्मिक कार्यक्षेत्राचा भाग मानलं जातं.

१९८० साली रेणुका शहरात श्री.चंद्रमणी वसिष्ठ नावाच्या एका स्थानिक राजकारण्याच्या मालकीच्या जमिनीच्या तुकड्यावर छावणी टाकली होती. तिथं स्थिरस्थावर झाल्यानंतर, गुरुदेवांनी बिट्टुजींना छावणीच्या ठिकाणी असलेलं जुनं शिवलिंग स्वच्छ करून पुन्हा नव्यासारखं करायला सांगितलं. काही आठवड्यांनतर, शिवलिंगाची पूजा करण्याकरता वसिष्ठजी छावणीत आले. त्यावेळी, महागुरू दिल्लीत असल्यामुळे, त्यांनी बिट्टुजींकडे चौकशी केली की महागुरू चष्मा वापरतात का. ''महागुरू चष्मा वापरत नाहीत'', असं सांगितलं गेल्यावर, ते गोंधळलेल्या आविर्भावासह निघून गेले.

महागुरू काही दिवसांनी परतल्यावर, वसिष्ठजींनी तोच प्रश्न पुन्हा उपस्थित केला. गुरुदेव हसले. ''मी तरुण आहे. मला अजून तरी चष्म्याची गरज नाही.'' वसिष्ठजींना चहा दिल्यानंतर, गुरुदेवांनी त्यांना आपल्या हातावरील ॐ दाखवला. ते तेजस्वी प्रतीक पाहिल्यावर, वसिष्ठजींनी गुरुदेवांच्या चरणांवर साष्टांग दंडवत घातलं. आपण ध्यान करताना विविध देवतांच्या प्रतिमा क्रमशः चमकताना पाहिल्याचं त्यांनी कबूल केलं. हा ध्यानाचा स्लाइड शो नेहमी संपायचा गुरुदेवांसारख्या दिसणाऱ्या, पँट नि शर्ट परिधान केलेल्या, चष्मा घातलेल्या माणसाच्या चित्रानं. ''मुला, मला इथं १९७० साली यायचं होतं, परंतु १९८० साली आलो'', गुरुदेव हसत म्हणाले. ''तू माझी दहा वर्षं वाट बघतोयस.''

लवकरच, गुरुदेवांनी रेणुका इथं सेवा सुरू करायचं ठरवलं. त्यांनी आपल्या काही शिष्यांना त्याच्यात सहभागी व्हायची सूचना केली. त्यांनी एकामागोमाग एक अशा तोंडी सूचना द्यायला सुरवात केली. शिष्यांना गुरुदेवांची ओळख लपवायला लागायची आणि सेवेचा चेहरा बनावावा लागायचा. रेणुकेची लोकसंख्या तुरळक असल्यामुळे, शिष्यांना मोठ्या जमावांची अपेक्षा नव्हती. तथापि, जसे तास उलटले, तसे, अगणित लोक जवळपासच्या भागांतून त्या दुर्गम ठिकाणीं आकस्मिकपणे अवतरले.

जेव्हां त्या दिवशीची सेवा समाप्त झाली, तेव्हा गुरुदेवांनी आपल्या शिष्यांना आणि हजर असलेल्या इतर काहीं लोकांना पुढील गुरुवारी रेणुकाला परत यायला सांगितलं. गुरुदेवांनी त्यांना कळवलं, ''माझा आवाज डोंगरांच्या पलीकडे पोहोचलाय आणि त्यामुळे मोठा जमाव अपेक्षित आहे.'' त्यांनी अशीहीं सूचना दिली की सेवा-दिवसाच्या आदल्या रात्री शिष्यांनी तिथं यावं. म्हणून दहा किंवा अकरा शिष्यांचा समूह पुढील बुधवारी रात्री त्या छावणीच्या ठिकाणी आला, तर त्यांना दोन किलोमीटर लांब रांग त्यांची वाट बघत असल्याचं दिसलं. गुरुदेवांनी त्यांना ''लवकरात लवकर त्या लोकांकडे लक्ष द्या'', असा आदेश दिला.

त्या रात्री सुरू झालेली सेवा दुसऱ्या दिवसापर्यंत चालली. एका शिष्यानं आठवण सांगितली की सतरा तासांच्या सलग सेवेनंतर, लोकांवर उपचार करायला तो आपला हात वर उचलू शकत नव्हता. त्याची अस्वस्थता जाणवून, गुरुदेवांनी त्याला एक पेला *जल* प्यायला दिलं आणि त्याला त्वरित ताजतवानं वाटलं.


तीन दिवसांच्या सेवेदरम्यान, रेणुकामध्ये खूप दूरवरून अभ्यागत भेटायला आले. काही लोक त्या ठिकाणापर्यंत चालत, तर काही गाडीनं आले. दर काही तासांच्या अंतरानं हिमाचल प्रदेश आणि हरयाणा, पंजाब तसेच राजस्थान या शेजारील राज्यांमधून प्रवाश्यांना बसेसनी आणून सोडलं. खरं तर, हरयाणा नि पंजाब रोडवेजनी अनपेक्षित मागणी पुरी करण्याकरता, काही बसेस रेणुकाकडे खास करून वळवल्या.

रेणुकामध्ये आलेल्या पुष्कळ लोकांमध्ये एक तरुण मुलगी अशी होती की जिला आधाराशिवाय उभं रहाता येत नव्हतं. तिचे आईवडील एका दूरवरच्या छोट्या खेड्यात रहायचे. आपल्या पंगू मुलीला पाठुंगळी घेऊन, ते रेणुकापर्यंतचा पुष्कळसे चढण असलेला रस्ता चालत आले होते. ते ज्या रांगेत उभे होते, त्या रांगेची देखभाल करणारे गुरुदेवांचे शिष्य सीताराम टाकीजी यांना त्यांनी आपल्या मुलीला बरं करण्याची विनवणी केली. सीतारामजींनी आपल्या गुरूंचं मार्गदर्शन मिळवलं. महागुरूंच्या सल्ल्यानुसार, सीतारामजी मुलीच्या पायाच्या बोटांवर उभे राहिले, तर आर. पी. शर्माजींनी तिचे हात पकडले आणि तिला जोरानं वर उचललं. ती मुलगी उभी राहिली आणि सावधपणे पहिल्यांदाच चालायला लागली. प्रत्येकजण अवाक् झाला. तिच्या आईवडिलांना आनंदानं रडू फुटलं आणि उपचार करणाऱ्यांना त्यांनी धन्यवाद दिले. ते म्हणाले, *''आपका भला हो!''*(आपलं भलं होवो!).

रेणुकामधली चमत्कारांची बातमी जशी पसरली, तशी, हिमाचल सरकारनं चौकशीसाठी ऑफीसर्सचा एक चमू पाठवला. ते *जलाचा* नमुना जवळपासच्या



*आध्यात्मिक युती स्थापन करण्यासाठी*
*गुरुदेव परशुरामजींना भेटतात*



प्रयोगशाळेत घेऊन गेले. ते *जल* अत्यंत शुध्द आहे असं त्यांना आढळलं. Tribute सारख्या वर्तमानपत्रांनी त्या शहरातल्या, अनेकांनी अगोदर कधीच न ऐकलेल्या अशा घटनांची तपशीलवार नोंद घेण्याकरता बातमीदार पाठवले.

रेणुकामधील शिबिरानं गुरुदेवांच्या अथांग आध्यात्मिक शक्तींबद्दल केवळ प्रात्यक्षिकच दाखवलं असं नाही, तर सेवेला त्यागाची आवश्यकता असते, याची आठवण करून द्यायचं पण काम केलं. महागुरूंच्या शिष्यांनी आपला स्वत:चा आराम किंवा स्वास्थ्य यांची कदर न करता, लोकांची अथक सेवा केली.

***निस्वार्थ सेवा ही होती,***
***आहे आणि नेहमीच राहील***
***कोनशीला***
***गुरुदेवांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची.***

रेणुकामध्ये सेवा सुरू करण्यापूर्वी गुरुदेवांच्या परशुरामजींबरोबर आध्यात्मिक भेटी झाल्या असल्याचं गुरुदेव म्हणाले होते. १९८० मध्ये त्या दोघांनी एक युती केली. त्यामुळे स्थान स्थापन झालं. गुरुदेवांचे शिष्य वसिष्ठजी आणि परशुरामजी यांनी पदभार स्वीकारला. वसिष्ठजींनी आपल्या मृत्यूपूर्वी दिनेशजी या आपल्या शिष्याची सेवेचा अधिकारदंड वाहून नेण्यासाठी नेमणूक केली. असं मानलं जातं की गोष्टींवर लक्ष ठेवण्यासाठी, परशुरामजी अजूनही त्या स्थानाला भेट देतात.


गुरुदेवांनी रेणुका नि कथोगसह अनेक ठिकाणी शिबिरं घेतली आणि त्या ठिकाणी अधिराज्य करणाऱ्या देवतांशी युती केली. परशुरामजी, रेणुका देवी आणि हिमाचलच्या स्त्रीदेवतांव्यतिरिक्त, महागुरूंनी सेवेसाठी अनेक अन्य संतांशी युती केली. यांच्यात ख्वाजा माइनुद्दीन चिस्ती, श्री मार्कंडेश्वर, बाबा

बालक नाथ, गणपती, गुरू नानक देव, गुरू गोबिंद सिंग आणि गुरू अंगद देव हे शीख गुरू, हनुमानजी, दोन अश्विन कुमार, दत्तात्रेय, शिरडीचे साईबाबा, इंद्र आणि कदाचित इतर अनेकांचा समावेश आहे.

---

कृपया मनन करा- परशुरामजींसारख्या एका आध्यात्मिक सर्वश्रेष्ठ व्यक्तीला स्थान स्थापन करणं नि त्याच्या चरितार्थात सहभागी होणं योग्य वाटलं. जर त्यांच्यासारख्या चिरंजीव, आध्यात्मिक दिग्गजाकरता सेवा ही प्रेरक बनायला कारणीभूत ठरू शकते, तर, कदाचित, प्रत्येकानं नि:स्वार्थ सेवेचं तत्त्वज्ञान आणि सराव यांच्याकडे अधिक लक्ष द्यायला हवं.

---



*कारनं प्रवास करताना,*
*गुरुदेव आपल्या शिष्यांना शीतपेयं देतात*

# सेवेकरी, सेवा करून घेणारे नव्हेत

*जेव्हा आम्ही चालू शकत नव्हतो, तेव्हा पंख दिले त्यांनी*
*आम्हाला आणि दिला विश्वास की उडू शकतो आम्ही.*
*आणि आम्ही उडालो, त्यांच्या नि:स्वार्थी नजरेखाली*
*न ऐकलेल्या आध्यात्मिक शिखरांवर.*

एका दृष्टांतात मी स्व:ला गुरुदेव आणि त्यांच्या काही शिष्यांसमवेत बसलेला पाहिलं. शंभराहून अधिक उत्क्रांत झालेल्या आत्म्यांच्या पृथ्वीवरील अवतरणावर आम्ही देखरेख करत होतो. सर्व आत्म्यांना टक्कल पडलं होतं आाणि त्यांनी फिकट रंगाचे टोगे (टोगा म्हणजे प्राचीन रामन लोकांचा सैलसर झगा) घातलेले होते. मी ओळखलं की या उलगडणाऱ्या प्रात्यक्षिकाचा माझ्या गुरूंच्या जीवितकार्याशी संबंध होता. काही वर्षांनंतर, जेव्हा गुरुदेवांनी सहजपणे उल्लेख केला की त्यांनी मागील ५०० वर्षं आपले शिष्य जमा करण्यात घालवली आहेत, तेव्हा मला या दृश्याचा अर्थ कळला. त्यांनी पृथ्वीवरील आमचं अस्तित्व आपल्या स्वत:च्या अस्तित्वाशी जुळवलं होतं, जेणेकरून, मानवजातीला आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत करण्याच्या त्यांच्या जीवितकार्यात आम्ही भाग घेऊ शकलो असतो.

गुरुदेवांच्या वैविध्यपूर्ण शिष्यांचा गट, हा या ना त्या कारणानं, त्यांच्या दारात दिसायचा. काही जण रुग्ण म्हणून आले, तर काही सहकाऱ्यांच्या वेशात आले.

काहीजण त्यांची उत्सुकता पूर्ण करण्याकरता आले, तर, काहींना आपल्या स्वप्नावस्थेत आपल्या भावी गुरूंबद्दलचे संदेश मिळाले. गुरुदेवांनी विविध आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांच्या या निवडक मिश्रणाला आपल्या छत्राखाली घेतलं. त्यांनी त्यांच्या पाट्या स्वच्छ केल्या आणि नंतर त्यांच्या आयुष्याच्या कथा पुन्हा लिहिल्या. गुरुदेवांच्या दक्ष नजरेखाली, (वर्तमान जन्मात) त्या शिष्यांचं अध्यात्माचं थोडंसं किंवा काहीही ज्ञान नसलेल्या नवशिक्यांपासून ते आध्यात्मिक उपचारकांमध्ये रूपांतर झालं.

---

अनेक स्वप्नं आणि दृष्टांत हे भूतकालीन किंवा भविष्यकालीन घटनांची चित्रणं असतात. माझा दृष्टांत हा माझ्या जन्माअगोदरच्या घटनेसंबंधी असला, तरी त्यात मी स्वत:ला या वर्तमान शारीरिक अवताराच्या चेहऱ्यासह पाहिलं. गुरुदेवांनी रवीजींना त्यांच्या पूर्वजन्मातील एक दृश्य दाखवलं, ज्यात रवीजी आणि गुरुदेव दोघेही त्यांच्या वर्तमान अवतारांशी मिळतेजुळते दिसत होते. त्यामुळे पूर्वजन्माची अधिकृत ओळख आणि पूर्वजन्माशी संबंध लावणं शक्य झालं.

---

महागुरू हे आमच्या आध्यात्मिक प्रवासात खूप गुंतले होते आणि पुष्कळदा, आमचा हात धरत होते, आणि म्हणून, आम्हाला आमची दिशा सापडली. चैतन्याच्या अधिक उच्च स्तरांवर आमच्या भराऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केलं आणि आम्ही त्यांच्यापेक्षा अधिक उंच उडावं अशी इच्छा बाळगली. जेव्हा आम्ही अयशस्वी झालो, तेव्हा त्यांनी आम्हाला प्रेरणा दिली आणि जेव्हा आमच्यात आत्मविश्वास नसायचा, तेव्हा त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवला. त्यांनी आमचे भ्रम छिन्नविच्छिन्न केले आणि नंतर आम्हाला अध्यात्मवादी बनवलं आणि आम्ही बनलो. कालांतरानं, आम्ही आमचं देवत्व ओळखलं आणि मागाहून, इतरांना त्यांचं देवत्व समजण्याकरता मदत केली.

माझ्या एका *गुरुभाईंनी* गुरुदेवांचं *उल्टा गुरू* (अद्वितीय गुरू) असं वर्णन केलंय. अगोदरची रूढी बदलण्याबाबत गुरुदेवांच्या नैसर्गिक प्रवृत्तीला आदरांजली वहाण्यासाठी या शब्दाची निर्मिती करण्यात आली होती. परंपरा आज्ञा करते की शिष्यांनी आपल्या गुरूंची सेवा केली पाहिजे. परंतु महागुरूंच्या राज्यात, इतरांप्रमाणे, शिष्यांना पण तेवढीच सेवा दिली गेली. आध्यात्मिक लोकवादाच्या असामान्य प्रकारासाठी त्यांनी पादपीठ टाळलं.

गुरुदेवांचा आध्यात्मिक दृष्ट्या भारदस्त नैतिक पातळी असूनही, त्यांनी कुणालाही आपल्यापेक्षा कमी दर्जाचं मानलं नाही. त्यांनी आत्म्याच्या समानतेचा केवळ उपदेशच नाही केला, तर तो त्यांनी कृतीतही आणला. कधी, ते जमिनीवर बसून आमच्याबरोबर जेवत. आपल्या सभोवतालच्या लोकांपेक्षा आपल्याला श्रेष्ठ म्हणून वागवलेलं त्यांना आवडायचं नाही. जेव्हा, स्वत:पेक्षा स्वत:च्या शिष्यांना अधिक प्राधान्यानं वागणूक दिली जायची, तेव्हा ते त्याचं कौतुक करायचे. त्यांनी प्रत्येकाला समान म्हणून पाहिलं, परंतु त्याच्या उत्क्रांतीच्या प्रवासात वेगवेगळ्या टप्प्यांवर.

गुरुदेवांनी, आपले आध्यात्मिक मार्गदर्शक बुड्ढे बाबा यांच्या आदेशावरून, जे कुणी त्यांचा आशीर्वाद घ्यायला येत, त्या सर्वांचा *पुत्त* असा उल्लेख करायला सुरवात केली. *पुत्त* ही दोन्ही लिंगांच्या मुलांकरता पंजाबी भाषेतील एक ममतेची संज्ञा आहे. आपल्या शिष्यांना आध्यात्मिक उंचीवर नेण्याबाबत मार्गदर्शन करताना, महागुरूंनी गुरु-शिष्य नात्याला एक आकर्षक वळण देणारा मसूदा तयार केला. ते हेतुपुरस्कर सेवा करून घेणारे नाही, तर सेवेकरी बनले.

जेव्हा गुरुदेव शिवपुरीतील दोन छोट्या खोल्यांच्या घरातून गुरगावमध्ये थोड्या जास्त प्रशस्त घरात गेले, तेव्हा त्यांनी आपल्या नवीन घराचे दरवाजे आमच्याकरता खुले केले. ज्या दिवशी, त्यांच्याकडे मर्यादेपेक्षा जास्त शिष्य

आणि त्यांचे परिवार असत, तेव्हा ते कोठाराच्या खोलीत एका जुन्या कॉटवर झोपायचे. ते एकदा म्हणाले होते, ''जोवर माझे शिष्य आरामात आहेत तोवर, मला गैरसोय झाली तरी हरकत नाही.''

महाशिवरात्रीसारख्या प्रसंगी, जगाच्या विविध भागांमधून शिष्य आणि भक्तांची फौज गुरगावला यायची, तेव्हा, त्यांना आरामदायी निवासस्थानात ठेवण्यात आलंय, याची ते खात्री करून घ्यायचे. एका महाशिवरात्रीच्या दिवशी, त्यांनी एकट्यानं आपल्या शिष्यांकरता आलू गोबीचं जेवण बनवलं आणि शिष्य जेवल्यानंतरच, ते जेवले.

परवाणू येथील एक शिष्य गुप्ताजी यांना आठवतंय की जेव्हा ते गुरुदेवांसोबत कारनं प्रवास करायचे, तेव्हा महागुरू आपल्या शिष्यांसाठी चहा वगैरे पेय घेण्याकरता *धाब्यांपाशी* कार थांबवायचे. वाहनात आरामशीर बसून, दुसऱ्यांना आपली सेवा करायला लावण्याऐवजी, त्यांनी स्वत:च्या आधी आपल्या शिष्यांच्या गरजांना प्राधान्य दिलं आणि त्यांची सेवा करणं पसंत केलं.

एकदा एका शिष्यानं गुरगाव स्थानात *लंगरमध्ये* दिलं जाणारं जेवण सपक असल्याची तक्रार केली. त्यानं *दाल* मध्ये *देसी घी* आणि *सरसों का साग* मध्ये लोणी घालण्याची मागणी केली. जेव्हा शिष्याच्या अवास्तव मागण्यांविषयीची बातमी गुरुदेवांपर्यंत पोहोचली, तेव्हा, त्या शिष्यावर नाराज होण्याऐवजी, त्यांनी *सेवादाराला* शिष्याच्या इच्छेनुसार जेवण बनवून द्यायला सांगितलं.

तथापि, अशा काही प्रसंगी असं घडायचं की महागुरू चालू स्थिती हादरवून टाकत. रेणुकामध्ये शिबिरात आल्यानंतर, पहिले काही दिवस गुरुदेव बिट्टुजींना पहाटे तीन वाजता उठवत नि त्यांना एक कप चहा पाजत. बिट्टुजी, आपल्या गुरूंनी बनवलेल्या पहाटेच्या चहाचा आस्वाद घेऊन, कप न धुता तसाच ठेवायचे नि परत झोपी जायचे. तीन दिवस, आपल्या गुरूंनी आपली सेवा केल्याचा आनंद त्यांनी लुटला. परंतु, चौथ्या दिवशी, गुरुदेवांनी त्यांची

खरडपट्टी काढली. आपल्या कर्तव्यांमध्ये कसूर केल्याबद्दल गुरुदेवांकडून फटकारलं गेल्यामुळे, बिट्टुजींनी स्वतःच्या सुखाशी फारकत घेतली. त्यानंतर, बिट्टुजींनी केवळ चहाच बनवला नाही, तर कप सुध्दा धुतले.

आमचा आध्यात्मिक प्रवास गतिमान बनवण्यासाठी गुरुदेवांनी त्यांच्या स्वतःच्या शक्ती आम्हाला बहाल केल्या. ते मंत्र त्यांनी आम्हाला दिले, जे त्यांनी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनी नि जिद्दीनं मिळवले होते. पुष्कळदा, आमचा आध्यात्मिक उत्कर्ष त्वरित करण्यासाठी, ते आम्हाला त्यांच्या मंत्रसंख्येचा वाटा देऊन आमच्या आत्मसंतुष्टतेची पायमल्ली करायचे.

एके दिवशी, त्यांनी मला त्यांच्या खोलीत बोलावलं, एक *लौंग* (लवंग) गिळायला सांगितली आणि जाहीर केलं की मी आता एका विशिष्ट मंत्रात *सिध्द* झालोय. मी गोंधळून गेलो. कारण, मला त्या मंत्राचं एक अक्षरही माहीत नव्हतं! मी माझा गोंधळ व्यक्त करू शकलो नाही. कारण, त्यांच्या उपस्थितीत मी बहुधा भारावलेला असायचो. माझ्या जिज्ञासेनं अखेरीस मला कृती करायला लावली. काही दिवसांनी, जेव्हा मी त्यांना ज्या मंत्रात मी अगोदरच *सिध्द* झालो होतो, त्या मंत्रातले शब्द विचारले, तेव्हा, त्यांनी ते मला फोनवर सांगितले.

रविजींनी आठवण सांगितली, ''गुरुदेवांनी मला दर दिवशी रात्री अकरा ते पहाटे दोन या वेळेत माझा *पाथ* करायची सूचना केली आणि सांगितलं की ते माझ्या वतीने दर दिवशी पहाटे दोन ते पाच या वेळेत *पाथ* करतील, नि त्याचा लाभ माझ्याकरता राखून ठेवतील. त्यांची महानता आणि निःस्वार्थता अमाप होती.''

ही अशी काही उदाहरणं आहेत गुरुदेवांनी आम्हाला स्वतःच्या शक्तींनी कसं सशस्त्र केलं याची. यामुळे, आम्ही जास्त वेगानं वाढू शकलो आणि आध्यात्मिकदृष्ट्या खूप काही प्राप्त करू शकलो. त्यांनी आम्हाला दिलेले अनेक प्रगत मंत्र बदलले आणि त्यांत स्वतःची विशेष हातोटी जोडली.

मला विश्वास आहे की त्यांच्या स्वच्छ हेतूमुळेच ते मंत्र अधिक सामर्थ्यवान नि शक्तिशाली झाले.

कधी कधी, महागुरूंच्या मनाच्या मोठेपणानं आमच्यापैकी काही जणांना आत्मसंतुष्ट बनवलं. महागुरूंनी बिट्टुजी आणि पप्पुजींना आपापल्या मंत्रांचा जप करण्यात अधिक वेळ घालवायचा वारंवार सल्ला दिला होता. परंतु, त्यांनी तसं कधीच केलं नाही. एके दिवशी, महागुरू म्हणाले, ''जर तुम्ही स्वत:हून आणखी काही आध्यात्मिक गुण मिळवण्याचा प्रयत्न केला नाहीत, तर मी माझ्या मंत्रसंख्येचा वाटा तुमच्यासाठी राखून ठेवू शकत नाही!''

गुरुदेवांनी आपल्या तपस्येची फळं उदारपणे आम्हाला हस्तांतरित केली आणि आमच्या परिवर्तनाला गती दिली. आमच्याकरता काम करून, त्यांनी खात्री करून घेतली की आम्ही इतरांकरता काम करू शकू. त्याच्या मोबदल्यात, गुरुदेवांची सेवा करण्याच्या आमच्या ज्या पध्दती होत्या, त्यांत त्यांच्या कपड्यांना इस्त्री करणं, त्यांना ऑफीसपर्यंत कारनं नेणं नि ऑफीसमधून कारनं परत आणणं, त्यांच्यासाठी जेवण तयार करणं अशा नेहमीच्या कामांचा समावेश होता. कृतज्ञता नि भक्तीच्या या छोट्या कृतींची तुलना गुरुदेवांनी केलेल्या त्यागाशी आणि आमच्या नातेसंबंधात त्यांनी दाखवलेल्या नि:स्वार्थतेशी कधीही होऊ शकत नाही.

गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानानं आणि कृपेनं माझ्या जीवनाला अर्थ दिला, आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे माझ्या संभाव्य मरणाला सुध्दा!

Incomparable Mentor - podcast
त्यांच्या अभूतपूर्व मार्गदर्शनाबद्दल आहे.
अनुभवा, आनंद घ्या
www.gurudevonline.com वर

# कर्मयोगी

***मुक्त होण्यासाठी चक्रापासून जन्म-मरणाच्या,***
***पुसून टाका आंतरिक पाटी. खोडून टाका प्रत्येक खरडलेलं.***
***काढून टाका सहज मारलेल्या रेघोट्या.***
***मुक्त व्हा कर्माच्या निर्दयी निर्मम भारापासून.***

गुरुदेवांनी कर्मयोगावर प्रभुत्व मिळवलं होतं. त्यांना जीवनाचं व्यावहारिक स्वरूप इतरांपेक्षा चांगलं समजलं होतं. आपल्या कर्मांचं ऋण संपवण्याकरता त्यांनी जाणीवपूर्वक काम केलं आणि ते करण्याचं साधन म्हणून, जागा हिरवंगार करण्याच्या सेवेत व्यस्त रहात बराच वेळ घालवला. त्यांचं खांडसा इथलं शेत हे फक्त निसर्गानं नटलेलं अभयारण्यच बनलं नाही, तर एक हिरवीगार वर्गखोली सुध्दा बनलं, जिथं आम्ही सूटमध्ये शिकायला आलो नि चिखलानं माखलेल्या बुटांनी घरी परतलो.

गुरुदेव त्यांच्या अतुलनीय शैलीत, शेतावरील गुरांना देवतांची नावं देऊन, आम्हाला आत्म्याच्या समानतेची आठवण करून देत. जेव्हा ते गायींना नावानं हाक मारायचे, तेव्हा त्या हंबरून प्रतिसाद द्यायच्या. ते शेताच्या प्रवेशद्वारातून चालत यायच्या काही मिनिटं अगोदरच गायींना त्यांच्या येण्याची चाहूल लागायची. गायींच्या आनंदी आवाजानं शेतावरील मजुरांना सावध केलं जायचं की त्यांचे गुरू त्यांच्या वाटेवर आहेत. तथापि, शेतावरील सगळेच प्राणी काही चांगलं वर्तन करायचे नाहीत. त्या सगळ्यांमध्ये सर्वात वाईट स्वभावाचं होतं गुरुदेवांचं लाडकं बजरंग नावाचं माकड. त्याचे बेलगाम मार्ग



गुरुदेव खांडसा शेतावर
गायीचं दूध काढतात.

शेतातील मजुरांना अपायकारक ठरत. कारण, ते खांडसाचं 'डेनिस द मेनेस' होतं. महागुरूंच्या भोवती मात्र त्याचं संत बजरंगात रूपांतर व्हायचं!

जेव्हा एका दुपारी, गुरुदेव नि गिरीजी नावाचे शिष्य शेतावर आले, तेव्हा त्यांना बजरंग एका कोपऱ्यात रुसून बसल्याचं दिसलं.

गुरुदेवांनी प्रेमानं विचारलं, *''ओये बजरंग, कैसा है?''* (बजरंग, तू कसा आहेस?) माकडानं पाठ फिरवून आपली नाराजी व्यक्त केली. महागुरूंनी लाडानं त्याला ढोसलं, आणि बजरंगानं अगम्य ध्वनीनं प्रतिसाद दिला. गुरुदेवांनी मान हलवली आणि म्हणाले, *''तेरा काम हो जाएगा''* (तुझं काम होईल). गुरुदेवांच्या आश्वासनानंतर, बजरंग पुन्हा आपली संताची भूमिका करायला लागला (अर्थात फक्त गुरुदेवांभोवतीच). नुकतंच काय घडलं या विचारानं गिरीजींची करमणूक झाली.

दुसऱ्या दिवशी दुपारी, जेव्हा गुरुदेव आणि गिरीजी शेतावर परतले, तेव्हा त्यांना बजरंग खुशीत दिसला. गुरुदेव माकडाजवळ गेले आणि विचारलं, *''अब खूश है?''* (आता खूश आहेस?). बजरंगाची प्रतिक्रिया म्हणजे आनंदी नाच होता. गिरीजींचा गोंधळ झालाय हे लक्षात आल्यावर, महागुरूंनी भिंतीकडे बोट केलं जिथं भिंतीच्या कठड्यावर एक माकडीण लाजल्याचा बहाणा करत बसली होती. गिरीजी हसले. कारण, त्यांना समजलं की की त्यांच्या गुरूंनी बजरंगासाठी विवाह जुळवणाऱ्याची भूमिका निभावली होती. 'मी कुणाचाच नाही' असा दावा करणाऱ्या माणसानं आपल्या माकडासाठी खास प्रयत्न केला होता, जसा एक पिता आपल्या मुलासाठी करतो!

गुरुदेवांनी बराच वेळ शेतावर घालवत. ते स्वतःच्या ट्रॅक्टरवर बसून शेत नांगरत, भाज्या खुडत आणि गायींचं दूध काढत. एखादं वासरू जवळपास असलं, तर गुरुदेव त्याच्या आईच्या आचळातून दूध काढत आणि वासराच्या मुखात धार सोडत. कापणीच्या हंगामात, ते भुसा वेगळा करायला सुध्दा मदत करत.

बिट्टुजींना आठवतंय की शेतावरचं काम जरी शारीरिकदृष्ट्या थकवा आणणारं असलं आणि काम करतानाची परिस्थिती फार काही चांगली नसली, तरी, महागुरूंनी कधीही तक्रार केली नाही. कधी कधी, जड उचलल्यामुळे, त्यांच्या हातांवर फोड यायचे. एके दिवशी, जेव्हा बिट्टुजींनी शेतीच्या कामामुळे, गुरुदेवांच्या होणाऱ्या नुकसानाबाबत विषय काढला, तेव्हा महागुरूंनी समजावून सांगितलं, ''एक माणूस म्हणून माझ्या गरजा माफक आहेत. लोकांना मदत करण्यासाठी माझी आर्थिक ताकद मर्यादित आहे. काम करताना कितीही शारीरिक कष्ट करावे लागले, तरी त्याची पर्वा न करता, मी माझ्या शरीराचा उपयोग सेवा देण्यासाठी करीन. मी पण इथं रहाणाऱ्या गायींचं दूध पितो आणि इथं पिकवलेल्या भाज्या खातो. म्हणून, मला त्यांची देखभाल करण्यासाठी सेवा केलीच पाहिजे.''

१९८८ मध्ये गिरीजींनी गुरगावजवळ असलेल्या मोहम्मदपूर गावात जमिनीचा एक लहान तुकडा खरेदी केला. त्या भागातली बहुतेक जमीन लागवडीसाठी योग्य नव्हती. भूप्रदेशातील कोरडेपणा आणि उत्पन्नाची कमतरता असल्यामुळे, अनेक शेतकऱ्यांनी स्थलांतर केलं होतं. गुरुदेवांनी व्यक्तिशः या गवताळ भूखंडाचं निरीक्षण केलं, मातीची मशागत केली, जमीन नांगरली, बियाणं पेरलं आणि झाडं लावली. त्यानंतर, लवकरच, शेत लागवडीला योग्य झालं. त्यामुळे, इतर शेतकऱ्यांना आपल्या जमिनींवर पुन्हा लागवड करण्याची प्रेरणा मिळाली. थोड्याच काळात, छोटं खेडं हिरवंगार झालं.

महागुरूंच्या या कृतींनी, आम्हाला कर्मयोगाचा सोपा आणि साधा मार्ग दाखवला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे, आम्ही आमच्या मनोवृत्ती आणि कृती यांचा मेळ घालण्यास त्याचप्रमाणे, आमच्या मनोवृत्ती नि कर्मांचा अर्थ लावण्यास शिकलो. कोणतंही कर्म करताना 'मी कर्ता आहे' ही भावना नसणं, विरक्त वृत्ती ठेवणं नि आत्म-निरीक्षण करणं या गोष्टींचा समावेश होईल असं जीवन जगायला शिकलो.

# परिवर्तक

***लाकडी हातोडा आणि छिन्नीनं ते दूर फेकत राहिले***
***आवश्यक नसलेलं सर्व काही संपेपर्यंत.***
***त्यांनी प्रत्येक पैलूला चकचकीत केलं, गुळगुळीत केल्या कडा,***
***जोपर्यंत आमची चांगली रूपं विकसित झाली नाहीत.***

गुरुदेवांनी केवळ आपल्या मनोवृत्ती किंवा आपला वैयक्तिक स्वभाव बदलण्यावरच लक्ष केंद्रित केलं असं नाही, तर त्यांनी आपल्या शिष्यांवर सुध्दा आपल्या परिवर्तनाची जादू चालवली.

अशोक भल्लाजी या शिष्यानं आपल्या परिवर्तनाची कथा सांगितली आहे. अशोकजी वारंवार आपल्या कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करायचे. कारण ते भडक माथ्याचे होते. गुरुदेवांनी सल्ला देऊनही, ते आपल्या रागावर ताबा मिळवू शकले नाहीत. त्यांचा चेहरा खिन्न व्हायचा, जेव्हां जेव्हां गुरुदेव विचारत, *''बेटा, गुस्सा कम हुआ?''* (मुला, तुझा राग कमी झाला का?) आपल्या गुरूंच्या सल्ल्याचं पालन न केल्यामुळे, अशोकजी स्वत:वरच नाराज झाले आणि त्यांनी आपल्या रागाची समस्या हाताळण्यासाठी काहीही प्रयत्न करायचा संकल्प केला. ते तीन महिने भांडणात पडले नाहीत किंवा त्यांचा रागावरचा ताबा सुटला नाही. त्यांनी शांतपणे आशा बाळगली होती की गुरू आपल्या प्रगतीबद्दल विचारपूस करतील. परंतु, गुरुदेवांनी चौकशी केली नाही.

जेव्हा कारखान्यात काम करणारा एक कामगार पैश्यांची चोरी करताना पकडला गेला, तेव्हा, अशोकजींचा संकल्प भंग पावला. वारंवार विनंती करूनही, कामगारानं आपली चूक कबूल करायची आणि चोरलेल्या वस्तू परत करायच्या नाकारलं. अशोकजींच्या रागाचा पारा चढला आणि त्यांनी जवळजवळ त्या कामगारावर हल्ला केला. परंतु, जेव्हा ते कामगाराच्या अंगावर वार करायला एखादी वस्तू घेण्यासाठी पोहोचले, तेव्हा एका अदृश्य शक्तीनं आपल्याला थांबवलं असं त्यांना वाटलं!

काही दिवसांनी, अशोकजी गुरुदेवांना भेटले, तेव्हा गुरूदेवांनी विचारलं, *''बेटा, गुस्सा कम हुआ?''* चूक कबूल करण्याच्या इराद्यानं ते महागुरूंजवळ गेले. परंतु, अशोकजींनी शांत रहावं असं सुचवत, गुरुदेवांनी आपलं बोट अशोकजींच्या ओठांवर ठेवलं. खोलीतली गर्दी पांगल्यावर गुरुदेव म्हणाले, ''जरी तुला खात्री असली की कुणीतरी तुझे पैसे घेतलेत, तरी, जर ती व्यक्ती आपण निरपराध असल्याची विनंती करत असेल, तर तू तिच्यावर विश्वास ठेवला पाहिजेस.'' सर्वज्ञ महागुरूंना आपल्या शिष्यानं काय केलंय हे अगोदरच कळलं होतं! आपली चूक लक्षात आल्यावर, अशोकजींचा दृष्टिकोन बदलला. तेव्हापासून, ते टीकेची तमा बाळगत नाहीत किंवा त्यांच्यावर कठोरपणाचा परिणाम होत नाही.

गुरुजींनी, आपल्या हळुवार स्पर्शानं अशोकजींना भावनिक नियंत्रणाचं प्रशिक्षण दिलं, तर गिरीजींचा काळ अधिक कठीण होता. मुंबईच्या सीमेलगत गिरीजींचा कारखाना होता. आपल्या कार्यालयातील कर्मचारी सदस्याशी गैरवर्तन केल्याबद्दल त्यांनी एका कामगाराच्या थोबाडीत मारली. त्या रात्री जेव्हा ते घरी परतले, तेव्हा त्यांच्या बहिणीनं दार उघडलं आणि म्हणाली, ''गुरुदेव फोनवर आहेत, आणि त्यांना तुझ्याशी बोलायचंय.'' गुरुदेवांनी गिरीजींना त्यांच्या हिंसक वर्तनाबद्दल शिक्षा दिली आणि ज्या हातानं त्यांनी कामगाराच्या थोबाडीत मारली होती, तो हात तोडण्याची धमकी दिली. गिरीजींना कळलं होतं की हे त्यांच्या भल्यासाठीच होतं!

अपरिहार्य भीतीनं, गिरीजी तीन दिवस घराबाहेर पडले नाहीत. चौथ्या दिवशी सकाळी, गिरीजींच्या वडिलांनी त्यांना फर्मावलं, ''व्यावसायिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणं थांबव आणि कामावर रुजू हो.'' कारमधून कारखान्यात जात असताना, संभाव्य आपत्तीचा जोर कमी करण्यासाठी म्हणून, गिरीजींनी एका बाजूला वडील नि एका बाजूला काका यांच्या मधोमध कारमध्ये मागच्या सीटवर बसण्याचा आग्रह धरला. काहीही इजा न होता, जेव्हा ते सगळे कारखान्यात पोहोचले, तेव्हा गिरीजींनी सुटकेचा मोठा नि:श्वास टाकला. त्या संध्याकाळी, गिरीजींच्या वडिलांनी त्यांना काही कामासाठी जवळच असलेल्या एका कारखान्यात तीन-एक मिनिटांचा जलद फेरफटका मारून यायला सांगितला. गिरीजींनी स्कूटरवरून अंतर पार करायचं ठरवलं. त्यांनी स्कूटर गोगलगायीच्या गतीनं चालवली. जेव्हा ते वाहनतळापाशी पोहोचले, तेव्हा कुठूनतरी अचानक एका मोटारसायकलस्वारानं त्यांना धडक दिली. त्या आघाताच्या जोरामुळे त्यांचा तोच हात मोडला, ज्या हातानं त्यांनी कामगाराच्या थोबाडीत मारली होती. धडा शिकून झाला होता. गिरीजींचं नुसतं हाडच मोडलं नाही, तर लोकांशी कसं वागावं, या नियमाची शिकवण त्यांतून मिळाली होती!

गुरगावांत, माझ्या आध्यात्मिक प्रवासाच्या प्रारंभिक टप्प्यांमध्ये मोहन सिंग चिरा हे मला धमकवायचे. मी त्यांचं हे वागणं चालू दिलं. त्यामुळे, त्यांना अधिकच प्रोत्साहन मिळालं. मला तेथील अलिखित नियम माहीत नव्हते आणि मला आकाडतांडव करायचं नव्हतं. चिरा यांचा हेतू नेहमीच जरी चांगला असायचा, तरी त्यांच्या घृणास्पद वागण्यानं माझा स्वाभिमान कमी केला आणि आत्मविश्वासाचं खच्चीकरण झालं. एके दिवशीं, जेव्हा माझ्या आसपास असलेले चिरा मला आदेश देत होते, तेव्हां गुरुदेवांनी मला त्यांच्या खोलीत बोलावलं. गुरुदेवांनी त्यांचा हात माझ्या मस्तकावर ठेवला आणि म्हणाले, ''तू कुणालाही तुझ्यावर वर्चस्व गाजवू देऊ नकोस.'' त्यांनी समजावलं की मी माझ्या आयुष्यात अशा एका ठिकाणी पोहोचलो होतो की जिथं मला आपला स्वत:चा तितकाच आदर करायला हवा होता, जितका मी इतरांचा करत होतो.

भविष्यात, मी कुणाही माणसासमोर किंवा आध्यात्मिक शक्तीसमोर झुकणार नव्हतो. त्यांचे शब्द माझ्या स्वाभिमानाच्या पुनरुत्थानासाठी मुख्य स्रोत होते आणि माझ्यातील मांजरीचं शूर सिंहामध्ये रूपांतर झालं!

एकदा जिथं चिरा बसले होते, त्या खोलीत मी प्रवेश केला, तेव्हा, त्यांनी मला खिजवणं पुन्हा सुरू केलं. पण, यावेळेस, त्यांचा भांडखोरपणा सहन करणं मला शक्य नव्हतं आणि जोरदार प्रतिआक्रमण करून, मी त्यांना आश्चर्याचा धक्काच दिला. तेव्हापासून, ते जरा मला बिचकूनच राहिले.

गुरुदेव हे सर्वव्यापी होते आणि आमच्या जीवनाचे कोणते पैलू सुधारायला, तटस्थ करायला किंवा बदलायला हवेत, हे त्यांना माहीत होतं. त्यांनी आमच्या ठराविक सवयी, वृत्ती आणि संस्कारांचे तण काढून टाकून, आमच्या उदयाचा पाया घातला. कारण, आम्ही अखेरीस अत्यंत विकसित आत्मे होणार हे त्यांना ठाऊक होतं.

**Paaras** महागुरूंच्या या विलक्षण बदल
घडवून आणणाच्या वृत्तीचा शोध घेतो.
www.gurudevonline.com
वर podcast ऐका

# आध्यात्मिक ऊर्जास्रोत

***ते मेघांना आदेश देऊ शकायचे आणि थांबवू शकायचे पाऊस.***
***ते स्पर्श करू शकायचे जखमींना आणि कमी करायचे त्यांच्या वेदना.***
***ते आमचा उत्कर्ष साधायचे अज्ञात लोकांपर्यंत.***
***ते एक महान शक्तिशाली माणूस होते, परंतु होते अत्यंत नम्र.***

कुणीतरी एकदा म्हटलंय, ''श्रध्दा अदृश्य पाहू शकते, अविश्वसनीयावर विश्वास ठेवते आणि अशक्याची प्राप्ती करते.'' आपल्या शक्तींचं प्रकटीकरण आणि त्यांच्या उपाययोजनेद्वारा, महागुरूंनी असं विश्व निर्माण केलं ज्यात श्रध्दा आणि चमत्कारांनी एक मोहक वाल्ट्ज नृत्य (यात नृत्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या जोड्या वाटोळ्या फिरतात) केलं. ते मृत्यूच्या तारखा पुढे ढकलू शकले, लोकांना अशा आजारांपासून बरं करू शकले, ज्यांच्यावर कोणताही वैद्यकीय उपचार परिणाम दाखवत नव्हता, आणि आपल्या शिष्यांना नि भक्तांना अविश्वसनीयाचा अनुभव घेण्यात आणि अशक्याची प्राप्ती करण्यात मदत करू शकले.

संतलालजींना हिमाचल प्रदेशात मणिकर्णजवळील दुर्गम डोंगरात घडलेली एक घटना आठवली. जेव्हा गुरुदेव नि संतलालजी खडकाळ भूप्रदेश चढले, तेव्हा, महागुरूंनी त्यांना धबधबा आणि त्याच्या खडकांमधील एका अरुंद, लपलेल्या खिंडीतून नेलं. ती खिंड प्रचंड खडकानं बनलेल्या रस्त्याच्या शेवटापर्यंत जात

होती. संतलालजींनी गुरुदेवांना एका दगडावर चित्त एकाग्र करताना पाहिलं, तेवढ्यात तो दगड सरकला नि एका खोल गुहेचं तोंड उघडलं. संतलालजींना आश्चर्य वाटलं. त्वचा कोमेजलेले आणि भुवया जास्त वाढलेले असे एक वृध्द ऋषी त्यांचं स्वागत करण्यासाठी थांबले होते. गुहेत शिरल्यावर, महागुरू आणि ते ऋषी संभाषणात मग्न झाले. त्यावेळी, संतलालजी हे बोलणं ऐकू येईल इतक्या अंतरावर उभे राहिले होते.

पाच मिनिटांनंतर, ते वृध्द ऋषी आणि गुरुदेव गुहेच्या तोंडापाशी परतले. गुरुदेवांनी तोंडातल्या तोंडात मंत्र पुटपुटताच, तोंडावरचा दगड सरकून उघडला.

ऋषींना मागे सोडून, ते दोघे मणिकर्णला परतले. वाटेत, गुरुदेवांनी संतलालजींना सांगितलं की ज्या ऋषींना ते भेटले, ते जवळजवळ ५०० वर्षांपूर्वी गुरुदेवांचे शिष्य बनले होते. हे शिष्य त्याच देहात जवळजवळ ५०० वर्षं राहिले होते. कारण, त्यांनी हठ योगावर प्रभुत्व मिळवलं होतं. दर ५ वर्षांनंतर, गुरुदेव त्या ऋषींना भेटण्याकरता प्रवास करायचे. कारण ते ऋषी आपली गुहा सोडू शकत नव्हते.

---

हठ योगाच्या अभ्यासकांनुसार, मस्तकातील सूक्ष्म केंद्रात *अमृत* (जीवनदायी शक्तिस्रोत) असतं. उदरातील *जठराग्नीत* (जैव-ऊर्जा) आणि लहान आतड्यात ते *अमृत* थेंब थेंब टपकत असल्यामुळे, त्याचं हळूहळू सेवन केलं जातं. जेव्हा ते संपतं, तेव्हा जीवन टिकून रहाण्यासाठी कोणतंही इंधन उरत नाही. त्यामुळे मृत्यू होतो. जीवनशक्तीचं जतन करण्यासाठी योगी हे *जालंधर बंधासारखी* (ओठ घट्ट आवळून धरण्याची मुद्रा) अनेक तंत्रं वापरतात. हा सराव नाड्यांचं शुध्दिकरण करत, मणक्यांची आणि चक्रांची सरळ रेषेत मांडणी करतो. असं म्हणतात की अनेक प्रगत योग्यांनी योगाच्या या प्रकाराद्वारा आठ *सिध्दी* प्राप्त केल्या आहेत.

---

आणखी एक विस्मयजनक घटना कुलबीर सेठी हे गुरुदेवांचे शिष्य ज्या स्थानाची व्यवस्था बघायचे, त्या स्थानात घडली. तिथं कॅप्टन शर्मा हे *सेवादार* होते. एका गुरुवारी, सेवेच्या दरम्यान, त्या स्थानात उपस्थित असलेल्यांनी खिडकीतून एक ज्योत फडफडत आत आलेली पाहिली नि कॅप्टन शर्मांच्या डाव्या हातात विलीन होताना बघितली. अतिशय चित्तथरारक दृश्य होतं ते!

एक तरुण अध्यात्मवादी या नात्यानं, माझं आध्यात्मिक ज्ञान विकसित करण्यासाठी मी एक उत्साही वाचक बनलो. लवकरच, मी अर्थपूर्ण माहितीची खरी डाटाबँक झालो होतो. माझ्या *गुरुभाईंनी* सांगितलेल्या आयुर्वेदिक उपचारांची नोंद करण्यासाठी मी एक डायरी सुध्दा ठेवली. जेव्हा स्थानात आलेल्या एका पाहुण्यानं विशिष्ट आजाराबद्दल तक्रार केली, तेव्हा, मी माझी डायरी घेण्यासाठी माझ्या कारकडे धाव घेतली आणि त्याला बरं व्हायला मदत व्हावी यासाठी उपयुक्त आयुर्वेदिक मिश्रणं दिली. जेव्हा गुरुदेवांना हे कळलं, तेव्हा त्यांनी मला त्यांच्या खोलीत बोलावलं. ते म्हणाले, *''तू डॉक्टर क्यूं बन रहा है? मैंने तुझे गुरु बनाया है. तू कागज भी मथ्थे से लगाकर उसको दे देगा, तो वह ठीक हो जाएगा.''* (मी तुला गुरू बनवलंय, डॉक्टर नाही. जरी तू एखादा कागदाचा तुकडा तुझ्या डोक्याला लावून, त्याला दिलास, तरी तो बरा होईल). गुरुदेवांच्या शब्दांनी मला कळून चुकलं की गुरूंची इच्छाशक्ती ही उपचार म्हणून प्रकट होते. बाकी सर्व कमी महत्त्वाचं असतं.

गुरुदेवांच्या इच्छाशक्तीच्या प्रभावामुळे अभूतपूर्व चमत्कारांना आणि असामान्य अनुभवांना चालना दिली. यांच्यापैकी काहींना समजून घेणं कठीण आहे आणि स्पष्ट करणं तर त्याहूनही कठीण आहे. तरीही, ते महागुरूंच्या विस्तृत सामर्थ्याचे अनुभवात्मक उदाहरणं आहेत.


अनेकांनी गुरुदेवांच्या पंच महाभूतांवरील नियंत्रणाचा अनुभव घेतलाय. एकदा परवानू इथं सेवेच्या दिवशी, पर्जन्यदेव उग्र मन:स्थितीत होता. जसा

मुसळधार पावसाचा जोर वाढला आणि सेवेत व्यत्यय आला, तसं गुरुदेवांनी आकाशाकडे पाहिलं, आणि एक-दोन सेकंदांतच पाऊस कमी झाला आणि नंतर थांबला. त्यानंतर मग, सेवा अखंडितपणे सुरू राहिली. त्या दिवसापासून, सेवेसाठी निश्चित केलेल्या दिवशी, त्या स्थानाच्या आजूबाजूच्या परिसरात कधीच पाऊस पडला नाही.

एकदा, गुरुदेवांनी मला मध्य प्रदेशात मुंगौली इथल्या शिबिरासाठी बोलावलं. एका सकाळी, मी त्यांच्यासमवेत बसलो असताना, पाऊस सुरू झाला. गुरुदेव मुद्दामच तंबूच्या बाहेर पडले. त्यांची नजर आकाशावर रोखलेली होती. जेव्हा ते त्यांच्या जागेवर परतले, तेव्हा पाऊस जास्त जोरात आला. मला त्यांच्या चेहऱ्यावर क्षुब्ध आविर्भाव दिसला आणि जरी ते माझ्याशी बोलत होते, तरी त्यांचं मन दुसरीकडे आहे, हे मला कळलं होतं. काही क्षणांनंतर, ते त्यांच्या जागेवरून उठले, त्यांनी तंबूची झडप उघडली आणि आकाशाकडे पहाताना कठोर शब्द उच्चारले. तत्क्षणी पाऊस थांबला, आणि काळे ढग पांगायला लागले.

(निसर्गावर सत्ता गाजवण्याच्या शक्तिव्यतिरिक्त, गुरुदेव हे निष्णात सूक्ष्म प्रवासी होते.) ते इच्छेनुसार, शरीराबाहेर सूक्ष्म शरीरानं प्रवास करू शकत आणि त्यांचे काही शिष्य गुरुदेवांच्या वैश्विक प्रवासांत त्यांच्याबरोबर असायचे. तरीही, प्रत्येक शिष्याला महागुरूंच्या सूक्ष्म रूपाचा साधा परिचय असायचाच असं नाही.

१९७० च्या दशकात कधीतरी, सीताराम टाकीजी हे गुरुदेवांसमवेत हरिद्वारला गेले होते. एके रात्री महागुरूंनी सीतारामजींना आपले पाय दाबायला सांगितले. गुरुदेव नंतर सीतारामजींना म्हणाले, ''तुम्ही मला घट्ट पकडून ठेवायचंय आणि जेव्हा मी शरीर सोडीन, तेव्हा शरीराबाहेर सूक्ष्म शरीरानं प्रवासाला तुम्ही बरोबर यायचंय.'' लगेचच, गुरुदेवांनी आपल्या शरीराभोवती एक पांघरायची चादर लपेटून घेतली आणि आपला *पाथ* सुरू केला. पुढे जे



*गुरुदेव हे सूक्ष्म प्रवासासाठी*
*आपलं भौतिक शरीर सोडतात*

झालं, सीतारामजींच्या मनात देवाबद्दल भीती निर्माण झाली. त्यांनी पाहिलं की चादरीत गुंडाळले गेलेले गुरुदेव स्वतःच्या शरीरातून बाहेर पडले. तर, चादरीत गुंडाळलेलं एक समान भौतिक रूप सुध्दा मागे झुकणाऱ्या खुर्चीत विराजमान झालं होतं.

सीतारामजी एवढे घाबरले होते की त्यांनी जे पाहिलं, त्यामुळे त्यांची पँट ओली झाली! जे शाश्वततेसारखं भासलं, त्यामुळे भीतीनं स्तब्ध झालेल्या सीतारामजींना जाणवलं की गुरुदेवांचं सूक्ष्म रूप हे खोलीत परत आलं आणि खुर्चीत बसलेल्या भौतिक रूपात मिसळून गेलं.

काही वर्षांनंतर, सीतारामजींनी हरयाणा इथं गुरुदेवांच्या घरात आणखी एक अस्वस्थ करणारा शरीराबाहेरचा सूक्ष्म शरीराचा अनुभव पाहिला. एका रात्री,

महागुरू आणि त्यांचे काही शिष्य सरसों का *साग* आणि *देसी घी* बरोबर *मक्की की रोटी* खात असताना, गुरुदेवांचं डोकं एकाएकी धक्का बसून पाठीमागे कलंडलं. जेव्हा शिष्यांना नाडी किंवा श्वास जाणवला नाही, तेव्हा आपल्या गुरूंचा मृत्यू झाला, असं त्यांनी गृहीत धरलं. घाबरून जाऊन, शिष्यांनी गुरूंना पुन्हा जिवंत करण्यासाठी, पुरेशी उष्णता निर्माण करण्याच्या आशेनं *देसी घी* असलेली चिनी मातीची बरणी गुरूंच्या निश्चेतन शरीरावर रिकामी केली. पण त्यांच्या शरीरावर जिवंत असण्याची कोणतीच चिन्हं दिसली नाहीत.

शिष्य गुरुदेवांच्या परिवाराला काय झालं ते कळवणार होते, त्याच वेळी, सीतारामजींना आठवलं की गुरूंनी सांगितलं होतं की ते भल्या पहाटे बुड्ढे बाबांबरोबर सूक्ष्म सभांना जायचे, परंतु नेहमी ३.३० च्या सुमारास परत यायचे. म्हणून, त्यांनी आपल्या *गुरुभाईंना* तोपर्यंत थांबायला सांगितलं. पहाटे ३.३० नंतर काही मिनिटांनी, गुरुदेवांचं शरीर पुनरुज्जीवित झालं आणि तणावग्रस्त झालेल्या शिष्यांनी सामूहिकपणे सुटकेचा नि:श्वास टाकला. महागुरू उभे राहिले, त्यांनी आपल्या स्लिपर्स घातल्या आणि काहीच घडलं नसल्यासारखे ते टॉयलेटला गेले. एखाद मिनिटानंतर परतल्यावर त्यांनी विचारलं. ''तुम्ही लोकांनी माझं काय केलंय? मला सर्वत्र अडखळायला होतंय. कारण माझ्या संपूर्ण शरीरावर *देसी घी* आहे '' एका शिष्यानं काय घडलं, ते ओशाळपणे स्पष्ट केलं. महागुरूंनी हास्याचा गडगडाट केला आणि त्यांनी आपल्या काही लहान, काही गोड आणि काही रंगतदार आवडत्या पंजाबी शब्दांचा भडिमार केला.

जे आमच्यासाठी अतुलनीय, अपरिमेय, अप्राप्य आणि अशक्य वाटत होतं, ते त्यांच्यासाठी शिट्टी वाजवण्याइतकं सोपं होतं. **Whistling the Impossible ne** podcast ऐका www.gurudevonline.com वर

# आध्यत्मिक होकायंत्र

*कधीही स्वत: प्रकाशझोतात न येता,*
*त्यांनी पसंत केलं दुसऱ्यांवर प्रकाश टाकणं.*
*मिळाली असंख्य लोकांना उच्च साद*
*चालताना रस्त्यावर, ज्यावर चालले होते ते एकदा.*

भारताच्या ग्रामीण भागात जीवन व्यतीत करून देखील, गुरुदेव हे अर्थपूर्ण जीवन जगणाऱ्या समकालीन पुरुषांपैकी एक होते. त्यांनी व्यावहारिक आणि आध्यात्मिक मूल्यांचा अद्वितीय संयोग असणाऱ्या जीवनपध्दतीचा सराव केला.

## आदर

गुरुदेवांनी हुंडा घेण्याच्या प्रथेबाबत तिरस्कार व्यक्त केला. त्यांनी भव्यदिव्य लग्नसोहळ्यांवर पैश्याची उधळपट्टी न करण्याचा सल्ला दिला. कारण, त्यांना वधूच्या कुटुंबावर भार पडावा असं वाटायचं नाही. काही शिष्य नि भक्तांकरता, ते अनेकदा, स्थानात साधे विवाह समारंभ आयोजित करत. तिथं लंगरनं आठ कोर्सच्या मेजवानीची जागा घेतली. त्यांनी एकदा बिट्टुजींना सांगितलं, ''*पुत्त,* आपण समाजात उदाहरण घालून द्यायचंय जेणेकरून कुणीही मुलीला ओझं समजणार नाही.'' ते *कन्यादान* विधीला अति उच्च कोटीची कृती समजायचे.

---

*कन्यादान* म्हणजे ज्यांनी आपल्या मुलीच्या संगोपनासाठी गुंतवणूक केलेली असते, अशा वधूच्या पालकांनी वराला दिलेलं फार मोठं कर्ज समजलं जातं.

---

एक भाऊ म्हणून, गुरुदेवांनी स्वत:च्या बहिणींना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याकरता उत्तेजन दिलं. त्यांनी बहिणींना सांगितलं की की जेव्हा त्यांची इच्छा होईल, तेव्हाच ते त्यांचा विवाह करून देतील. रेणुजींना आपल्या पित्याचे शब्द आठवले, ''जर एखाद्या संभाव्य पतीनं, तू चांगली पत्नी बनू शकशील का नाही, याविषयी मत बनवायचा प्रयत्न केला, तर ते लग्न होणार नाही.'' गुरुदेवांना काय म्हणायचं होतं, हे त्यांना अगोदर कळलं नाही. परंतु, विचार केल्यानंतर, त्यांच्या लक्षात आलं की आपल्या पित्यानं लग्नाबद्दल असलेल्या आपल्या मतांचाच पुनरुच्चार केलाय. लग्न म्हणजे केवळ दिसण्यावरून नि पात्रतेवरून एखाद्याविषयी मत बनवणं नव्हे. तर, हे शिव आणि शक्तीच्या मीलनाचं प्रतिनिधित्व करणारं खूप गहन बंधन आहे.

गुरुदेवांच्या विश्वात स्त्रिया या शक्तीचं प्रकटीकरण होत्या आणि आदराला पात्र होत्या. गुरुदेवांनी आपल्या शिष्यांना आपापल्या पत्नींच्या पायांना मनोमन स्पर्श करण्याचा आणि दर वर्षी एका विशिष्ट वेळेत, त्यांना ज्येष्ठतेचं स्थान देण्याचा आदेश दिला होता.

**नम्रता**

गुरुदेवांनी आपली आध्यात्मिक महानतेचं पदक गळ्यात मिरवण्यास नकार दिला आणि चार माणसांत उठून दिसण्याऐवजी, सर्वांमध्ये मिसळून जाणं पसंत केलं.

राजीजींना आठवतंय की एकदा कथोगमध्ये महागुरू सेवेवर देखरेख करत, एका झाडाखाली उभे होते. त्यावेळी, बायकांचा एक घोळका त्यांच्याकडे


आला आणि त्यांनी विचारलं, *''गुरुजी कहाँ हैं?''* (गुरुजी कुठे आहेत?) गुरुदेवांनी सेवा करणाऱ्या एका शिष्याकडे निर्देश केला आणि म्हणाले, ''ते तिथं आहेत.''

गुरुदेवांनी प्रसिध्दी टाळली आणि शक्यतो, लोकांचं लक्ष वेधलं जाणार नाही अशा पध्दतीनं सेवा केली. एका गुरुपूर्णिमेला, काही शिष्यांनी गुरगाव स्थानाजवळ गुरुदेवांचा फोटो असलेला फलक उभारला. जेव्हा गुरुदेवांना कळलं, तेव्हा ते तो फलक टांगलेल्या रस्त्यावर गेले आणि तोंडातल्या तोंडातच काहीतरी पुटपुटले. नंतर, त्यांनी आपल्या शिष्यांना फटकारलं आणि भविष्यात अशा प्रकारच्या जाहिरातींमध्ये सहभागी होऊ नये अशी ताकीद दिली.

ज्या लोकांनी गुरुदेवांच्या परवानगीशिवाय गुरुदेवांचे फोटो काढले, त्यांना प्रक्रिया केलेलं रीळ रिक्त असल्याचं आढळलं. काहींच्या बाबतींत, गुरुदेवांचा फोटो काढताना कॅमेरे खराब झाले आणि गुरुदेव नजरेआड होताच, ते काम करायला लागले. जेव्हा गुरुगावमध्ये गुरुदेवांची मुलाखत घ्यायला पत्रकार आले, तेव्हा गुरुदेवांनी आपल्या शिष्यांना सूचना केली की त्यांना चहा द्यावा आणि जाण्याची विनंती करावी. त्यांनी जीवनात अनामिकत्व पसंत केलं.

एफ. सी. शर्मांना आठवतंय की डॉ. शंकरनारायण यांनी गुरुदेवांना एका अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी त्यांच्यासमवेत येण्यास सांगितलं होतं. जरी गुरुदेवांनी डॉ. शंकरनारायणांची विनंती मान्य केली, तरी ते अनुपस्थित रहात असल्यामुळे, ती योजना वारंवार बारगळायची.

एका सकाळी डॉ. शंकरनारायण गुरगावमध्ये आले आणि त्यांनी गुरुदेवांना पुन्हा एकदा कळकळीची विनंती केली. महागुरूंनी त्यांना कॅमेरा आणायला नि आपला फोटो काढायला सांगितला. त्यांनी डॉ. शंकरनारायणजींना कोणत्याही महत्त्वाच्या कामात सहभागी होताना, आपल्या शर्टाच्या खिशात तो फोटो


''माझा कॅमेरा का काम करत नाहीये!''




*जेव्हा फोटोग्राफर गुरुदेवांच्या संमतीशिवाय फोटो काढायचा प्रयत्न करतो, तेव्हा कॅमेरा खराब होतो*

ठेवायची सूचना केली. या घटनेमुळे, हे सुस्पष्ट होतं की महागुरू बनल्यानंतर, त्यांनी पहिल्यांदाच आपला फोटो काढायची परवानगी दिली होती.

एक शिष्य सुरेश प्रभू यांनी पुष्टी दिली, ''गुरुदेवांनी कधीच लक्ष वेधून घेतलं नाही. ते अन्य तथाकथित आध्यात्मिक गुरूंसारखे वागले नाहीत. ते खूप अनौपचारिक, अतिशय शांत स्वभावाचे होते आणि कधीही नजरेत भरण्याचा प्रयत्न करत नसत.

---

फोटो हे दुवा स्थापित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्यक्तीचं 2D प्रतिरूप आहे. शंकरनारायणजींना आपला फोटो बरोबर ठेवण्याची सूचना करून, गुरुदेवांनी हा दुवा वाढवला. जेव्हां गुरुदेव आध्यात्मिक दृष्ट्या गुंतागुंतीच्या बाबींमध्ये सहभागी व्हायचे, तेव्हां मी त्यांना स्वत:चा फोटो सफारी सूटच्या खिशात ठेवताना पाहिलंय. यामुळे, त्यांचा स्वत:च्या गुरु*रूपाशी* संपर्क वाढला, जे गुरुरूप त्यांच्या फोटोमध्ये टिपलं गेलं होतं.

---

***गुरुदेवांचा असा विश्वास होता की अध्यात्मवाद हा आत्मोन्नतीसाठी नाही, तर स्वत:ला मीपणापासून विसर्जित करण्यासाठी - दूर आणि एकात्मतेकडे जाण्यासाठी असतो. ते एक से अनेक, अनेक से एक या वचनानुसार जगले.***

## अनुकंपा

सेवा ही निस्वार्थ असावी याबद्दल गुरुदेव अत्यंत दक्ष होते. जरी त्यांच्या आध्यात्मिक शक्तींनी असंख्य जीवांना मदत केली नि बरं केलं, तरी, त्यांनी त्याच शक्तींचा वापर करून आपल्या जैविक परिवाराचा फायदा करून घेण्याचं टाळलं. जेव्हा त्यांची मुलं आजारी पडायची, तेव्हा स्थानिक डाक्टर उपाय सांगायचे. जेव्हा त्यांच्या आईनं स्थानातून मदत मागितली,

तेव्हा त्यांनी आईला इतरांप्रमाणे रांगेत उभं रहायला सांगितलं. तथापि, कधी कधी, गुरुदेवांचा परिवार गुरुदेवांच्या सेवेचं साधन बनले. एका तरुण भक्ताला बरं करण्यासाठी, गुरुदेवांनी त्याच्या आजाराचं आपल्या स्वतःच्या मुलीकडे स्थानांतर केलं.

एका दुपारी, गुरुदेवांनी बिट्टुजींना एका व्हॅनच्या सामान ठेवण्याच्या कप्प्यात लंगर भरायला आणि दुपारच्या जेवणानंतर खांडसा शेताकडे निघण्याची तयारी करायला सांगितलं. सर्व काही तयार आहे, हे सांगण्याकरता, जेव्हा बिट्टुजी गुरुदेवांच्या खोलीत पोहोचले, तेव्हा बिट्टुजींना गुरुदेव बिछान्यावर बसलेले दिसले; त्यांचे डोळे मिटले होते खोल एकाग्रतेत. बिट्टुजींनी दरवाजा बंद केला नि ते धीरानं शेजारच्या खोलीत थांबले. अंदाजे ३० मिनिटांनंतर, गुरुदेव बाहेर आले आणि त्यांनी बिट्टुजींना शांतपणे सांगितलं की ते निघायला तयार आहेत.

गुरुदेव साधारणपणे, पुढच्या प्रवासी सीटवर बसायचे, पण काही अगम्य कारणास्तव, व्हॅनच्या मागच्या सीटवर बसले. थोड्या अंतरावर, उन्हाळ्याच्या कडक उन्हात, रस्त्याच्या कडेनं चालणाऱ्या एका वृध्द जोडप्याला व्हॅनमध्ये बसवून घेऊन जावं असं त्यांनी बिट्टुजींना सुचवलं. बिट्टुजींनी खिडकीची काच खाली केली आणि त्या दोघांना त्यांच्या गंतव्य स्थानी घेऊन जाण्याची तयारी दर्शवली. सुरवातीला ते जोडपं थोडसं सतर्क झालं. तरी, बिट्टुजींनी वारंवार विनवणी केल्यानंतर, ते व्हॅनमध्ये बसलं. ते दोघे इतके दुःखी नि उदास दिसले, की त्यांना आपल्या शेजारच्या सीटवर महागुरू बसलेत हे लक्षात आलं नाही. गुरुदेवांना भेटणं हे आपलं गुरगावला भेट द्यायचं कारण आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. मोठ्या आशेनं ते स्थानात पोहोचले होते. तरी देखील, एक *सेवादार* त्यांच्याशी उध्दटपणे बोलल्यामुळे, ते निराश होऊन स्थानातून निघून गेले होते. जेव्हा ते आपली कहाणी सांगत होते, तेव्हा त्यांचे डोळे अश्रूंनी चमकत होते. त्यांची दयनीय अवस्था बघणं बिट्टुजींना अशक्य झालं. ते म्हणाले, ''तुमच्या डावीकडे बघा. गुरुदेव तुमच्या बाजूलाच बसलेत.''

जेव्हा त्या दोघांनी गुरुदेवांच्या चरणी लोटांगण घातलं, तेव्हा गुरुदेवांनी त्यांना आशीर्वाद दिला आणि त्यांना आपल्या सीटवर बसायला सांगितलं. ते म्हणाले, ''तुमचं काम झालंय.'' ते जोडपं कृतज्ञतेनं रडलं. ती दोघं काही दिवस जेवली नव्हती. म्हणून, गुरुदेवांनी बिट्टुजींना, ''व्हॅन सावलीत बाजूला घे आणि त्यांना *लंगर* दे'', असा आदेश दिला. जेवण झाल्यावर, महागुरूंनी त्यांना काही पैसे दिले आणि रेशनचा साठा करायला सांगितलं.

बिट्टुजींना त्यांना बसस्टापवर सोडल्यानंतर, गुरुदेव त्यांना म्हणाले, ''*पुत्त*, त्या जोडप्याला त्यांच्या मुलानं घरातून हाकलून दिलंय. ते स्थानात मदतीकरता आले होते. कारण, त्यांच्याकडे खाण्याकरता पुरेसे पैसे नव्हते. जेव्हा *सेवादार* त्यांच्याशी कठोर वागला, तेव्हा ते हताश झाले नि त्यांनी आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. जेव्हा आपण त्यांना व्हॅनमध्ये घेतलं, त्यावेळी ते रेल्वे स्टेशनकडेच चालत निघाले होते, रुळावर जीव द्यायला.'' हे ऐकल्यावर, बिट्टुजींना कळलं की जेव्हा गुरुदेव आपल्या खोलीत एकाग्र होऊन बसले होते, तेव्हा, काही खोल्या दूर असलेल्या आपल्या शिष्याबरोबर त्या वृध्द जोडप्याचा चाललेला संवाद ते फक्त ऐकत नव्हते, तर, त्यांच्या प्रार्थनेला उत्तर देऊन, आपल्यावरील त्यांच्या विश्वासाचं प्रतिफळही देत होते. महागुरूंनी नेहमी प्रार्थनेमागील भावाची कदर केली आणि आपल्या *कृपेनं* त्याचं प्रतिफळ दिलं.

गुरुदेवांनी स्वत:पलीकडे विचार करण्याच्या आणि स्वत:च्या अनुकंपेच्या वर्तुळाचा विस्तार करण्याच्या महत्त्वावर भर दिला. ते म्हणाले, ''प्रार्थना नि विधींना मर्यादांचं बंधन असतं. परंतु, नि:स्वार्थी सेवेला मर्यादा नसतात. तुम्ही जितकी जास्त सेवा कराल, तितके तुम्ही परम चैतन्याबरोबर जास्त एकरूप व्हाल. जर तुम्ही दुसऱ्यांना मदत केली, तर तुम्ही परमचैतन्याची आतून आणि बाहेरून सेवा करता.

गुरुदेवांचं सेवेवर इतकं लक्ष केंद्रित झालं होतं की ते जेमतेम झोपायचे.

ऑफीसला जाण्याआधी, रुग्णांना भेटण्याकरता म्हणून, ते त्यांचा दिवस लवकर सुरू करायचे. ज्यांना त्यांच्या मदतीची गरज असे, त्यांच्यासाठी, काम झाल्यानंतर, गुरुदेव संध्याकाळचा वेळ सुध्दा घालवत. आमच्यापैकी काहीजण अधिक वेळ त्यांच्या सहवासात घालवता यावा, याकरता पुस्तकातील प्रत्येक क्लृप्ती अजमावून बघायचे. आम्ही त्यांना अनेक प्रश्न विचारायचो आणि त्यांना आमच्या आध्यात्मिक गैरसमजांचं निराकारण करायची विनंती करायचो. आमच्या डोक्यातील जाळं साफ केल्यानंतरच, ते रात्रीचं जेवण घ्यायचे.

जे काही अन्न शिजवलेलं असायचं, त्याचं गुरुदेव सेवन करायचे. कारण, त्यांनी इंद्रियांवर ताबा मिळवला होता. अन्न फुकट घालवणं ते टाळायचे, आणि जरी त्यांच्याकरता ताजं अन्न तयार केलं गेलं, तरी ते बऱ्याचदा, एका दिवसापूर्वीचं उरलेलं अन्न खायचे. महिन्यातून चार ते पाच वेळा, ते अन्नाचा एक घास पण खायला नकार द्यायचे. एकदा, जेव्हा सलग दुसऱ्या रात्री त्यांनी जेवायला नकार दिला, तेव्हा बिट्टुजींनी त्यांच्यावर स्वत:च्या तब्येतीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. गुरुदेवांनी बिट्टुजींना खाली बसवलं आणि म्हणाले, ''*पुत्त,* तुम्ही दररोज मला तुम्ही दिलेलं अन्न मी का खात नाही त्याचं कारण विचारता. भले, मी इथं गुरगावात शरीरानं उपस्थित असेन. पण, माझ्या आध्यात्मिक परिवारातील कुणीही सभासद जगात कुठंही जर उपाशीपोटी झोपला, तर मी त्या रात्री जेवत नाही!''

## साधेपणा

कुणीतरी एकदा म्हटलंय, ''महान माणूस नेहमीच लहान व्हायला तयार असतो'', हे वचन गुरुदेवांना तंतोतंत लागू होतं. आध्यात्मिकदृष्ट्या महाविशाल असूनही, गुरुदेवांचा साधेपणा आणि नम्रता पहाण्यासारखी होती. असामान्य गुरू असूनही, ते एखाद्या सामान्य माणसासारखे वागायचे. बहुतेक वेळा, त्यांच्या साधेपणामुळे, लोक त्यांच्या अभूतपूर्व वास्तवाबद्दल अजाण असायचे.

गुरुदेव विवाहयोग्य वयाचे झाले, आणि माताजी त्यांच्या आयुष्यात आल्या नव्हत्या, त्याअगोदर, एका सफाई कामगारानं गुरुदेवांसाठी योग्य वधू शोधून, गुरुदेवांनी केलेल्या असंख्य दयाळू कृत्यांची परतफेड करण्याची तयारी दर्शवली होती. त्याचा असा विश्वास होता की की एकट्यानं वधू शोधण्याच्या मोहीमेचा श्रीगणेशा करण्यासाठी गुरुदेव खूपच साधे होते! त्याचप्रमाणे, गुरुदेवांचे मित्रही गुरुदेवांसारखा एक साधा माणूस अनेकांचे आध्यात्मिक गुरू बनू शकतो ही कल्पना स्वीकारण्यासाठी शक्कल लढवू शकले नाहीत.

प्रोफेसर गुरुदेवांच्या अकादमीत माझ्या शिष्य बनण्याच्या अभ्यासक्रमात मला काही वर्षांनी जाणवलं की त्यांच्या अस्सल साधेपणानं अवांछित लक्ष प्रभावीपणे विचलित केलं. जेव्हा लखनौमध्ये ते आणि मी चित्रपटगृहाजवळ टॅक्सीची वाट बघत होतो, तेव्हा एक माणूस त्यांच्याजवळ चालत आला आणि म्हणाला, ''भाईसाब, नेमके किती वाजलेत?'' माझ्या लक्षात आलं की त्या माणसानं तांब्याचा *कडा* घातला होता, जसा स्थानांना भेट देणारे सर्व शिष्य आणि भक्त घालतात. मी अचंबित झालो की त्या माणसानं गुरुदेवांना ओळखलं नव्हतं. तो कुणाच्या सान्निध्यात आहे, याची त्याला जाणीव करून देण्यासाठी जेव्हा मी माझे विचार बोलू लागलो, तेव्हा महागुरूंनी माझ्या हाताला स्पर्श केला नि शांतपणे अन्य शब्द बोलायला मना केलं. आपल्या घड्याळाची वेळ जुळवून घेतल्यानंतर, त्या माणसानं गुरुदेवांना धन्यवाद दिले आणि तो त्याच्या मार्गानं निघून गेला.

आपल्या शक्ती वापरून, गुरुदेव स्वत:साठी समृध्द आयुष्य जगू शकले असते, तरीही त्यांनी साधेपणा आणि किमानवाद पसंत केला, आणि अशा परिस्थिती निवडण्यास प्राधान्य दिलं ज्यांच्याशी आपल्यापैकी बहुतेकांना तडजोड करणं कठीण गेलं असतं. १९८० च्या मध्यापर्यंत, त्यांनी त्यांचं टॉयलेट -कम-बाथरूम आमच्यासारख्या डझनभर लोकांना वापरू दिलं. त्यांचा फाजील खर्च म्हणजे फक्त एक फियाट कार आणि २५० स्क्वेअर यार्डचं घर यांसारख्या गरजा होत्या.

१९८० च्या मध्यापर्यंत, गुरुदेवांचे शिष्य, भक्त आणि अनुयायी वेगानं वाढले होते. जेव्हा एकदा ऑफीसच्या कामानिमित्त गुरुदेव मुंबईत विमानानं उतरले, तेव्हा आलिशान गाड्यांचा ताफा त्यांना विमानतळावरून घेऊन जाण्यासाठी थांबला होता. टर्मिनलमधून बाहेर पडल्यानंतर, आपल्या स्वागतासाठी आलेल्यांचं गुरुदेवांनी मनापासून स्वागत केलं, परंतु, ते वातानुकूलित कारनं आरामात गेले नाहीत. उलट, त्यांनी त्यांचा एक भक्त आणि एक धडाकेबाज पोलीस अधिकारी असलेल्या उध्दव कीर्तीकरच्या मोटारसायकलवरून जाणं पसंत केलं. दुसऱ्या वेळी, जेव्हा एका श्रीमंत भक्तानं त्यांना BMW कार भेट म्हणून देण्याचा आग्रह धरला, तेव्हा त्यांनी ती स्वीकारली, परंतु, काही मिनिटांनीच, ती त्या भक्ताला परत केली!

गुरुदेव हे खरोखर, चाकांवर चालणारा माणूस होते. कामावर जाण्यासाठी ते दोन चाकी सायकल चालवत. त्यांच्या वाहतुकीच्या साधनाचं, कालांतरानं, दोन मोटरयुक्त चाकांसह असलेल्या स्कूटरमध्ये रूपांतर झालं. जेव्हा त्यांना परवडलं, तेव्हा, त्यांनी चार चाकी फियाट खरेदी केली.

## समानता

गुरुदेवांनी भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीचा आदर केला. मदत आणि मार्गदर्शनासाठी स्थानाला भेट देणाऱ्या लोकांच्या बाबतीत ते विनम्र, सहनशील आणि कनवाळू होते. ते इतके दयाळू नि प्रेमळ होते की प्रत्येकाला वाटायचं की ते इतरांपेक्षा आपल्यावर अधिक प्रेम करतात आणि आपली जास्त काळजी घेतात.

महागुरू हे स्थानाला भेट देणाऱ्या लोकांच्या धार्मिक श्रध्दांबाबतीत नेहमीच जागरूक असत. भेटलेल्या प्रत्येकावर महागुरूंनी आपल्या सहिष्णुता, अनुकंपा आणि नम्रतेची अमिट छाप सोडली. त्यांनी एकदा एका शिष्याला म्हटलं, ''स्थानात येणाऱ्या प्रत्येकाची सेवा करणं माझं काम आहे; त्यांना माझ्याबद्दल काय वाटतं किंवा ते माझ्याशी कसं वागतात, हे महत्त्वाचं नाही.'' निक्कुजींना



*गुरुदेव हे उध्दव कीर्तिकरसोबत*
*मुंबई विमानतळावरून बाहेर पडतात*



आठवतंय, ''गुरुदेव क्षमाशील होते आणि कधीही भेदभाव करायचे नाहीत. जर नकारात्मक भावना असलेला कुणी त्यांना भेटायला आला, तर ते त्या माणसाकडे प्रेमानं नि काळजीनं लक्ष द्यायचे आणि त्याच्या समस्या सोडवायचे, आणि मला वाटतं की हे सर्वात कठीण काम आहे. जर कुणी आपल्याला शिवीगाळ करत असेल, तर आपण लगेच त्याच्याशी लढायला तयार असतो. परंतु, गुरुदेव तसे नव्हते. प्रत्येकजण त्यांच्यासाठी समान होता.''

गुरुदेवांच्या अनुयायांसाठी आणि भक्तांसाठी गुरुदेवांचं एक महान उदाहरण असावं; नुसतं आमच्या डोक्यात जाण्यापेक्षा, आस्थापूर्वक, आमच्या मनात ते खोलवर रुजलेलं असावं!

## वैराग्य आणि भूमिका निभावणं

गुरुदेवांनी फक्त आत्म्याच्या समानतेवरच विश्वास ठेवला नाही, तर, त्यांनी जी सेवा केली, ती सुध्दा *वैराग्य* पूर्वक केली. त्यांच्या काही आवडत्या पंक्ती अशा होत्या,

***मैं सबका का हूँ और सब मेरे हैं.***
***लेकिन मैं किसी का नही हूँ और मेरा कोई नही.***
***(मी सर्वांचा आहे आणि सर्व माझे आहेत.***
***तरीही मी कुणाचा नाही, आणि कुणी माझं नाही.)***

गुरुदेवांनी पूर्णत्वासाठी आपुलकीची भूमिका बजावली. गुरुदेव हे इतरांपेक्षा आपल्यावर जास्त प्रेम करतात यावर विश्वास ठेवण्यासाठी त्यांनी आम्हाला कुशलतेनं हाताळलं. हे खरं आहे की त्यांनी सर्वांवर समान प्रेम केलं, परंतु भावनेचा लवलेश न ठेवता. गुरुदेवांचं निरीक्षण केल्यामुळे, मी माझ्या सर्व नातेसंबंधांना कर्तव्याच्या दृष्टिकोनातून पहायला शिकलो आणि केवढा महान धडा होता तो! कर्माच्या फलितापासून अलिप्त रहायचा सराव केल्यामुळे, सेवा ही सवय बनायला मदत झाली. याचा अर्थ असा होता की सेवा करण्यात


आनंद मिळण्यासारखा नव्हता आणि ती करताना दु:ख नव्हतं. ती एक कर्तव्य होतं की जे भावनेशिवाय, परंतु, अत्यंत नम्रतेनं पार पाडणं आवश्यक होतं.

गुरुदेव एक अद्वितीय गुरू असल्यामुळे, त्यांनी आम्हाला उलट मार्गानं न जाता, म्हणजेच, मदतीसाठी स्थानांवर आलेल्या लोकांच्या गर्दीनं आमच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी, आम्हाला त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा सल्ला दिला. गुरुदेवांच्या मते, या असंख्य स्त्री-पुरुषांनी आम्हाला सेवा करण्याची संधी दिल्यामुळे, आमचं आध्यात्मिक परिवर्तन सुलभ झालं.

महागुरू म्हणून, त्यांनी आमच्या अनेक चुका आणि आम्हाला जखडून ठेवणाऱ्या भूतकाळातील माकडचेष्टा स्वीकारल्या. काही वेळा त्यांनी आपली नाराजी बोलून दाखवली आणि शांतपणे आमच्या कृती सुधारल्या. दररोज स्वीकृती आली. प्रत्येक रात्री क्षमा आली. तथापि, या नियमाला अपवाद होते. आम्हाला सरळ करण्याकरता ते कधी कधी आमचे कान ओढत. जरी ही उदाहरणं फारच दुर्मिळ असली, तरी, ज्यांना ते स्वत:चे समजत, त्यांच्यासाठी शिक्षा राखीव होत्या. मल्होत्राजी, राजपालजी, संतलालजी, गिरीजी आणि खरोखर तुमचाच असलेला मी असे सर्वजण त्यांच्या विशेषाधिकारप्राप्त क्लबचे सदस्य होतो. कदाचित, इतर अनेकांनी अजून मला त्यांचे अनुभव सांगितलेले नाहीत. तेव्हा, लाज वाटणाऱ्यांना लाज वाटू दे!

गुरुदेव हे साधी रहाणी आणि उच्च विचारसरणीचे पथदर्शक होते. स्वत: उपदेश केल्याप्रमाणे ते जगले. जे लोक आंतरिक मंदिराच्या शोधात आहेत, त्यांच्यासाठी गुरुदेवांचे शब्द आणि कृती आध्यात्मिक होकायंत्र म्हणून काम करत आहेत.

गुरुदेव हे खऱ्या उत्तरेकडे मार्गदर्शन करणारे
आध्यात्मिक होकायंत्र होते आणि रहातील.
**Spiritual Compass** (आध्यात्मिक
होकायंत्र )याच नावानं podcast ऐका
www.gurudevonline.com वर



# महागुरूंचं स्वस्थानी प्रस्थान

*जीवितकार्य सफल करून ते परतले उच्च लोकात,*
*जिथून ते आले होते. त्यांच्या आध्यात्मिक वारशाची*
*भरभराट पुढे सुरू आहे कारण, अजूनही असंख्य*
*लोकांची सेवा केली जाते त्यांच्या नावानं.*

मृत्यूनंतरच्या जीवनात आपली आध्यात्मिक कार्यं सुरू ठेवण्यासाठी, गुरुदेवांनी १९९१ साली, वयाच्या ५३व्या वर्षी आपला देह सोडण्याचा निर्णय घेतला. या पार्थिव जगातून निघून जाण्यासाठी त्यांनी २८ जुलै ही तारीख निवडली. नजफगड येथील नीलकंठ धाम या त्यांच्या समाधीच्या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

महागुरूंनी आपल्या अंतिम विश्राम-स्थळाच्या बांधकामाची देखरेख केली आणि भाकीत केलं की जे या धामाला भेट देतील, त्यांना त्यांच्या दु:खातून मुक्त केलं जाईल. गुरुदेवांचे शब्द खरे ठरले. नीलकंठ धाम हे आध्यात्मिकदृष्ट्या जागृत झालेलं ठिकाण आहे. तिथं लोकांना सदैव मदत केली जाते आणि बरं केलं जातं. अनेक लोक असा दावा करतात की गुरुदेवांनी आपला देह सोडल्यानंतर, अनेक दशकांनी, त्यांना तिथं गुरुदेवांचं दर्शन झालंय.

१९९१ च्या ऑगस्ट महिन्यात, नरिंदरजी, विरेंदरजी आणि सरोजजी या गुरुदेवांच्या तीन भक्तांनी सहारनपूर येथील भृगू संहितेच्या संरक्षकांना गुरुदेवांवरील वाचनासाठी भेट दिली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, भृगू ऋषींनी या वाचन-कार्यासाठी त्या भक्तांचं आगमन होईल अशी भविष्यवाणी हजारो वर्षांपूर्वी केली होती!

भृगू संहितेनुसार, 'कैलास पर्वताच्या बर्फाच्छादित उंचीवर, शिव - लोक नावाच्या आध्यात्मिक लोकात शेकडो अत्यंत विकसित जीव रहातात, जे शिवाचे *गण्ण* (गण) आहेत. गुप्त मोहिमा पार पाडण्यासाठी हे गण पृथ्वीवर अवतरतात. त्यांची पृथ्वीवरील मोहीम पूर्ण झाल्यावर, ते त्यांच्या आध्यात्मिक निवासस्थानी परत जातात.'

भृगू ऋषी गुरुदेवांचं वर्णन एक दिव्य आत्मा असं करतात, जे आध्यात्मिक मोहीम पूर्ण करण्याकरता पृथ्वीवर अवतरले. गुरुदेव एक सामान्य जीवन जगले, कुणाला, कधीच आपली खरी ओळख आणि आपला हेतू प्रकट न करत. या अवतारात त्यांना अनेक पूजनीय नावांनी संबोधलं गेलं, परंतु कुणीच त्यांना - शिव *स्वरूप* (शिवाचं प्रकटीकरण) असं म्हटलं नाही, जे ते वस्तुतः होते.

संहितेतील उतारे पुढे निश्चित प्रतिपादन करतात, 'अश्विन कुमारांनी (देवतांचे वैद्य) गुरुदेवांना विशेष उपचारांमध्ये साहाय्य केलं. जेव्हा गुरुदेव शिव लोकात परतले, तेव्हा त्यांनी आपला वारसा पुढे चालवण्यासाठी ११ शिष्यांची आणि ५ *गण्णांची* नियुक्ती केली. तथापि, गुरुदेव हे आपल्या आधिभौतिक रूपात, दररोज सेवा करण्यासाठी हस्तिनापुराच्या उत्तरेकडील बाहेरच्या भागात असलेल्या आपल्या धामात परततात.'

विशेष म्हणजे, भृगू ऋषींनी उल्लेख केलेल्या हस्तिनापूरच्या विशाल सीमेमध्ये आधुनिक काळातील नजफगडचा समावेश होतो.

गुरुदेव हे एक गूढ व्यक्ती असल्यामुळे, त्यांनी कधीही, स्वतः निवडलेल्या ११ शिष्यांची आणि ५ *गण्णांची* ओळख उघड केली नाही. ते इतके आतल्या गाठीचे होते की भृगू ऋषींना सुध्दा त्या सर्वांची खरी ओळख नव्हती!

महागुरूंनी आपलं शरीर सोडण्यापूर्वी, सुमारे शंभर आध्यात्मिक शिलेदार शोधण्याची पूर्वनिर्धारित कामगिरी पूर्ण केली. त्यांनी आमच्या व्यक्तिमत्त्वांना, गुणांना आणि आकांक्षांना नव्यानं आकार दिला आणि आम्हाला भौतिकतेपासून आध्यात्मिकतेच्या प्रवासाकडे उद्युक्त केलं. आपल्या कृत्यांमधून आणि तत्त्वज्ञानातून त्यांनी असंख्य इतरा जनांना आध्यात्मिक परिवर्तनाच्या मार्गावर प्रेरित केलं.

जगभरातल्या शहरांमध्ये गुरुदेवांनी आणि त्यांच्या शिष्यांनी स्थापन केलेल्या पुष्कळ स्थानांवर गुरुदेवांची सेवा सुरू आहे. आताही सुमारे ३० ते ४० स्थानं कार्य करत आहेत, जशी ती गुरुदेव देहधारी असताना करायची. गुरुदेवांनी प्रशिक्षित केलेल्या शिष्यांना अनेक दशकांचा अनुभव मिळालाय आणि ते तरुण पिढीला भावी आध्यात्मिक शिलेदार होण्याकरता प्रशिक्षण देत आहेत.

चीज हे चेड्डारमध्ये बदलावं, तसं त्यांचं कार्य दिवसेदिवस परिपक्व झालंय!

गुरुदेव हे आजही लोकांना त्यांच्या स्वप्नांमध्ये आणि दृष्टांतांमध्ये दिसतात, त्यांना त्यांच्या आजारांपासून बरं करतात, परिवर्तनाकरता प्रेरित करतात आणि त्यांच्या अंतरातील परमात्म्याशी त्यांचा पुन्हा संबंध जोडणं सुलभ बनवतात.



# निरंतरतेत

ज्युल्स व्हर्न जर गुरुदेवांना भेटले असते, तर त्यांनी आपल्या पुस्तकाचं नाव बदलून आठ मिनिटांमध्ये जगभरात असं नाव ठेवलं असतं. याचा अर्थ, गुरुदेवांना पृथ्वीचं सूक्ष्म परिभ्रमण करायला तेवढाच वेळ लागला.

इथं हा एक माणूस असा होता की जो विविध लोकांत प्रयाण करण्यासाठी जवळच्या छोट्या रस्त्यांबाबत पारंगत होता. त्यानं आम्हाला या लोकांमध्ये नेलं आणि प्रवासाच्या या नवीन माध्यमाचा आम्ही प्रयोग करत असताना त्यानं आमचा हात धरला. कालांतरानं, माझ्या काही *गुरुभाईंनी* आणि मी सूक्ष्म प्रवासाचा अनुभव घेतला नि अनेक रहस्यं शिकलो. या गोष्टींमुळे, आम्हाला जीवन आणि मृत्यूबद्दलची आमची वृत्ती नि धोरणं तयार करण्यात मदत झाली.

माझ्या शरीराबाहेरच्या सूक्ष्म शरीरातील अनुभवांपैकी एकात, मी गुरुदेवांसोबत फ्रान्सला प्रवास केला. तिथं, सीन नदी आलांडून एका जुन्या, जवळजवळ जीर्ण झालेल्या पुलावर गेलो. दुसऱ्या एका प्रसंगी, मी त्यांच्याबरोबर दुसऱ्या नदीवरून तराफ्यावर गेलो होतो. तिथं त्यांनी माझी अशा व्यक्तीशी ओळख करून दिली, जिचा ते आदर करायचे. एकदा, गुरुदेवांनी माझे *गुरुभाई* राजीव शर्मा यांना शरीराबाहेर सूक्ष्म शरीरातील प्रवासाला नेलं, जिथं गुरुदेवांना - ब्रह्मा, विष्णू आणि महेश- या ऊर्जांच्या त्रिकुटाचा साक्षात्कार झाला.

एका छोट्याशा गावातील साध्या माणसानं सूक्ष्म इंधन कसं मिळवलं, ज्यामुळे त्याला कॉन्कॉर्डपेक्षा अधिक वेगानं प्रवास करता आला ?

गुरुदेवांनी काही Ivy League College मधून अध्यात्मशास्त्राची पदवी घेतली नव्हती. ते अभ्यासात कच्चे होते आणि चांगले गुण मिळवण्याकरता त्यांना धडपड करावी लागली होती. त्यांच्या पत्नीनं त्यांना गुप्तहेर कथांशिवाय काहीही वाचताना पाहिलं नव्हतं. असं असूनही, ते वैश्विक ज्ञानाच्या आंतरिक ज्योतीत प्रवेश करू शकले आणि आत्मसाक्षात्काराचा मार्ग सोप्या शब्दांत स्पष्ट करू शकले. त्यांच्यापेक्षा कुणालाच हा विषय अधिक चांगला माहीत नव्हता. त्यांचं ज्ञान हे शास्त्रं वाचण्यावर नाही, तर ती अंतर्ज्ञानानं समजून घेण्यावर आधारित होतं.

गुरुदेवांचं प्रशिक्षण हे व्यावहारिक आणि क्रियाशील होतं. त्यांनी अध्यात्मवादाची काही रहस्यं आमच्यासमोर उघड केली; तर काही स्वत:जवळ गुप्त ठेवली. शेवटी, ते एक रहस्यपूर्ण व्यक्ती होते. त्यांनी आम्हाला कधीही काही आयतं मिळवून दिलं नाही. परंतु, नेहमीच मार्गदर्शन केलं. स्वाध्याय आणि वैयक्तिक अनुभवातून त्यांनी आमचा आध्यात्मिक प्रवास सुरू केला. धडे शिकवण्याकरता ते जी छोटी वाक्यं किंवा एक वाक्यं वापरत, ती दशकांनंतर, रहस्यांचे आविष्कार बनली. त्यांना खात्री होती की पुढची पिढी या रहस्यांचा उलगडा करेल.

गुरुदेवांनी ऐष-आरामाचा अभाव असलेलं खडतर जीवन निवडलं. कारण, त्यांना थोडंसं रहस्य माहीत होतं, जे मी आज तुम्हाला सांगत आहे - ऐष हा अध्यात्मवादात एक खर्च आहे. गुरुदेवांनी हेतुपुरस्सर आपली ऊर्जा वाचवणं निवडलं, जेणेकरून ते तिचा वापर करून इतर प्राण्यांचं जीवन सुधारू शकले नि समृध्द करू शकले. आम्ही देखील गुरुदेवांच्या बचतीचे लाभार्थी झालो आणि आम्हाला गुरुदेवांच्या सन्मानार्थ हजारोंची सेवा करण्याची अनुमती मिळाली. गुरुदेवांच्या आध्यात्मिक सिध्दींमुळे, ते जगातील सर्व श्रीमंत माणसांमध्येही उजवे ठरले.

एवढ्या कमी वेळात एका साध्या माणसानं इतकं कसं काय साधलं ?

आम्ही असा युक्तिवाद करू शकतो की गुरुदेवांना आपला स्वतःचा अत्यंत यशस्वी आणि लोकप्रिय आध्यात्मिक चित्रपट तयार करण्यासाठी एका उत्कृष्ट पटकथाकारानं मदत केली. नियतीनंच त्यांना आपलं जीवितकार्य पूर्ण करण्यासाठी ही योजना केली. तथापि, या प्रश्नाचं अधिक अचूक उत्तर आहे, ते असं - गुरुदेवांनी अंतरमनात पाहिलं. गुरुदेवांनी एकदा एका शिष्याला सांगितलं होतं की जेव्हां एखादी व्यक्ती आपल्या इच्छेच्या पूर्ततेसाठी विनवणी करायला मंदिरात जाते, तेव्हा मंदिराची ऊर्जा काही त्याकरता उपाय प्रदान करत नाही. ती इच्छा प्रत्येक जीवात वास करणारी परमतत्त्वाची ठिणगी असणारा *जीवात्मा* पूर्ण करतो.

माझा नेहमीच विश्वास होता की गुरुदेवांच्या नजरेखाली होणारे उपचार आणि चमत्कार प्रासंगिक होते. आम्ही खरोखर कोण आहोत याची आठवण करून देणं हा त्यांचा खरा उद्देश होता. यासाठी, आम्ही दैवी आहोत याची जाणीव होईपर्यंत त्यांनी आमच्या देवत्वाच्या ज्वाला प्रज्वलित करत ठेवल्या. आम्हाला अशी सूचना दिली गेली होती, 'कोणत्याही देवतेसमोर कधीही नतमस्तक होऊ नका. त्यांच्या प्रति आदर दाखवू शकता. पण, स्वतःला त्यांच्यापेक्षा कमी लेखू नका.' कालांतरानं, आम्ही जे आरशात पाहिलं, ते यथावकाश अपूर्ण प्रतिबिंबातून दिव्य प्रतिबिंबात बदललं.

गुरुदेवांनी आम्हा सर्वांमधील गुरु तत्त्व जागृत केलं. त्यानंतर, त्यांनी ते तत्त्व कित्येकांमध्ये जागृत करण्याकरता आमचा माध्यम म्हणून उपयोग केला.

## ०३

# असामान्य उद्योजक





*आले ते पृथ्वीवर मदतीसाठी आणि उपचार करण्यासाठी आणि त्यांनी बदलली पिढ्यांनी जतन केलेली मूल्यं. बनवलं त्यांनी सामान्य माणसांना पराक्रमी संत; आध्यात्मिक परिवर्तनांचे अग्रदूत.*

एका प्रसिध्द परोपकारी व्यक्तीनं एकदा म्हटलं होतं की तेच लोक यशस्वी होतात, जे एक ठराविक मार्ग निवडतात आणि त्यालाच चिकटून रहातात. अध्यात्म हा गुरुदेवांनी निवडलेला मार्ग होता आणि कितीही संकटं आली, तरी तो त्यांनी शेवटापर्यंत सफलतेनं तडीस नेला. या कठीण मार्गावर सेवा ही काश्मिरी लोकरीचं कापड बनली. त्याद्वारे त्यांनी आपली ध्येयं विणली.

गुरुदेवांनी आम्हाला सांगितलं की आपल्या शिष्यांना एकत्रित करण्याकरता त्यांना सुमारे ५०० वर्षं लागली, जेणेकरून, ते एकाच वेळी प्रगती करू शकतील आणि इतरांच्या उन्नतीसाठीं मदत करू शकतील. अत्यंत कष्टप्रद कठोर परिश्रम नि तीव्र परिस्थितीजन्य अडचणींच्या पार्श्वभूमीवर उभारलेल्या सामूहिक उत्क्रांतीच्या आदर्शानं, गुरुदेवांची, जगाची स्थिती सुधारण्यासाठी आणि जनमानसात अध्यात्माचा परिचय करून देण्यासाठी पृथ्वीवर अवतरलेल्या महान प्रेषितांच्या त्या संघात आध्यात्मिक लक्ष्यभेदी म्हणून निवड करण्यात आली होती.

१९७० सालच्या सुरवातीला, एकदा गुरुदेवांसोबत त्यांची मोठी मुलगी बाजारात गेली होती. तिनं मिठाईच्या दुकानात दोन ग्लास दूध मागितलं. तिनं ते एवढ्या आनंदानं प्यायलं की, गुरुदेवांनी आपल्या पत्नीला विचारलं,''आपल्या घरी दुधाचा तुटवडा आहे का ?'' ''मुलांच्या आहाराच्या गरजा भागवण्यासाठी पुरेसे पैसे कधीच नसतात'', या माताजींच्या उत्तरानं गुरुदेव थक्क झाले. त्या रात्री ते जवळजवळ झोपलेच नाहीत, अस्वस्थपणे कूस बदलत होते, विचाराचं मंथन करत- आपल्या कुटुंबाच्या भौतिक सुखाच्या मोबदल्यात आपण अध्यात्माचा पाठपुरावा करण्याचा जो निर्णय घेतलाय, तो योग्य आहे का ? तथापि, दुसऱ्या दिवशी, ते पूर्वीपेक्षा अधिक दृढनिश्चयी झाले आणि स्वत:च्या आधी सेवा ही त्यांच्या आध्यात्मिक उपक्रमाचा कणा बनली.

## आर्थिक व्यवस्थापन

गुरुदेवांना नोकरीत फारच कमी मोबदला मिळायचा आणि ते साधारणपणे आपल्या पगाराच्या दिवशीच, आपल्या कमाईचा मोठा भाग सार्वजनिक सेवेत खर्च करायचे! त्यांच्या उदार मार्गांची जाणीव असल्यामुळे, त्यांचे मूळचे सहकारी असलेले आणि मागाहून त्यांचे भक्त बनलेले नागपालजी यांनी गुरुदेवांच्या पगारातील काही भाग माताजींच्या घरखर्चासाठी वाचवायला सुरवात केली. त्यात गुरुदेवांच्या मुलांचं संगोपन, आणि आठवडे किंवा महिने त्यांच्या घरी मुक्काम करणाऱ्या शिष्यांच्या वाढत्या संघाचा समावेश होता. आपली मिळकत तुटपुंजी असूनही, महागुरूंनी कुणाकडून काहीही स्वीकारलं नाही. बाजूला ठेवलेला अतिरिक्त निधी तर सोडाच; पुरेशा निधीचाही तुटवडा असायचा! बरेचदा, महिन्याचा शेवट आणि बँकेत त्यांची कमाई यांचा क्वचितच मेळ घातला जायचा!

शिष्यांच्या घरी स्थानं उघडून, गुरुदेव सेवेसाठी एकापेक्षा अधिक स्रोत मिळवण्यात यशस्वी झाले. आर्थिक कमतरतेची अडचण असतानाही, सेवा सुरू राहील, याची त्यांनी खातरजमा केली. त्याच वेळी, सेवेचा विस्तार भारताच्या अनेक भागांत नि परदेशातही झाला. स्थान *संचालक* (प्रमुख) बनलेल्या शिष्यांनी स्वतःच्या घरातील एक खोली स्थान म्हणून अर्पण केली होती आणि स्वतःच्या कमाईतून त्यांनी सेवेकरता निधी उपलब्ध करून दिला. केशर, लवंगा, वेलची, मिरी, मोहरी आणि सुपाऱ्या खरेदी करण्याकरता पैसे लागायचे. गुरुदेवांच्या उपचार-शक्तींच्या वाहक असणाऱ्या या गोष्टी अभ्यागतांना दिल्या जायच्या, जे बड्या गुरुवारी गुरुदेवांकडे उपचार घ्यायला यायचे. ज्या *संचालकांना* या गोष्टी परवडायच्या नाहीत, ते अभ्यागतांना या गोष्टी इतरत्र खरेदी करायला लावून, मात्र, स्थानात त्या गोष्टींसाठी आशीर्वाद मिळवायला सांगत.

जर स्थान *संचालकाची* आर्थिक परिस्थिती सर्वसाधारणपणे चांगली असली, तर तो बड्या गुरुवारी अभ्यागतांना चहा आणि *खिचडी* देऊ शकायचा. जर तो फक्त चहाच देऊ शकत असेल, तर तेवढाच दिला जायचा. जर एखादा स्थान संचालक गृह-स्थानासाठी पात्र असला, मात्र, जर त्याची आर्थिक परिस्थिती खराब असली, तर गुरुदेवांनी दोन किंवा तीन शिष्यांचा गट तयार केला होता, जेणेकरून त्या संचालकाला ते स्थान एकत्रितपणे चालवायला मदत व्हावी. स्थानं उघडून, गुरुदेवांनी अनेक शिष्यांना आपल्या शक्तींचं वाटप केलं, आपल्या सेवेची अनेक पटींनी वाढ केली, आणि लोकांकडून सेवा घेण्याऐवजी, लोकांना सेवा दिली. या उत्कृष्ट आदर्शासह, कमी आर्थिक गुंतवणुकींवर उच्च आध्यात्मिक लाभ मिळवला. लोकांच्या सदिच्छा आणि आशीर्वादांच्या रूपात मिळालेला गुंतवणुकीवरील लाभ हा कुणाही बँकरची भंबेरी उडवू शकला असता!

तुटपुंज्या मासिक पगारावर, महागुरूंनी गुरगाव स्थानावर आपल्या सेवेचं व्यवस्थापन केलं. त्यांनी आपल्या शिष्यांना पाहुण्यांच्या भोजन व्यवस्थेत हातभार लावण्याची परवानगी दिली आणि अशा प्रकारे, त्यांना सेवा करण्याची आणि तिचा फायदा मिळवण्याची एक संधी दिली. तथापि, आपण कर्जमुक्त आणि दायित्वमुक्त राहू याची खातरजमा करत, त्यांनी वैयक्तिक खर्चाच्या टक्केवारीचं योगदान देण्याची खबरदारी घेतली.

## वेळेचं व्यवस्थापन

कर्झन रोडवरील आपल्या कार्यालयात काम करताना गुरुदेवांची वेळेची संकल्पना विभागली गेली होती. दुपारच्या जेवणाची वेळ बहुतेक, ऑफीसपासून काही अंतरावर त्यांच्या बहिणीच्या घरी जवळच्या भागातील पाहुण्यांना भेटण्यासाठी राखीव होती. नियमित कामाच्या वेळेत, ते गुप्ताजींच्या चहा आणि ज्यूस स्टॉलवर त्यांची वाट बघत असलेल्या शिष्यांच्या संघाला

*गुरुदेव लोकांच्या नजरा चुकवत आपल्या*
*बजाज चेतक स्कूटरवरून वेगात जातात*



भेटण्याकरता छोटे विराम घ्यायचे. परंतु, कार्यालयीन वेळेनंतर, ते पळ काढायचे. कर्झन रोडवरील त्यांच्या ऑफीसच्या अनेक प्रवेशद्वारांजवळ जमा झालेल्या अनुयायांच्या मोठ्या गर्दीतून सुटून, आपल्या बजाज चेतक स्कूटरवरून सार्वजनिक प्रसिध्दीच्या प्रकाशझोतातून वेगानं बाहेर पडायचे.

महागुरू हे अशा लपाछपीत पारंगत होते. एवेंच नाही तर, कामाचा ताण हलका असताना, ते आपल्या सहकाऱ्यांबरोबर पत्ते आणि बुध्दिबळही खेळायचे. इतर बाबतींतही, ते वेळेची फार जाणीव ठेवायचे. कोणतंही नवीन कार्य ते तासाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या भागात सुरू करण्यास प्राधान्य द्यायचे, कधीही चौथ्या भागात नाही. त्यांनी वेळेच्या विशिष्टतेची संकल्पना मंत्रपठणापर्यंत विस्तारित केली. त्यांनी काही शिष्यांना त्यांचे मंत्र विशिष्ट वेळी पठण करायला लावले. उच्च आध्यात्मिक सामर्थ्याची आवश्यकता असलेली कार्यं हाती घेण्यासाठी त्यांनी *गुरु-पहेर* (गुरु-प्रहर) किंवा पहाटे १.१५ ते ३.३० या दरम्यानच्या वेळेचा उपयोग करण्याची शिफारस केली.

गुरुदेव पहाटे १.३० च्या आसपास झोपायला जायचे, एक-दोन तास पार करायचे आणि नंतर अगदी थोडा वेळ झोप घ्यायचे. ते पहाटे ५ ते ६ या वेळेत उठायचे आणि आपल्या दिवसाची सुरवात एक कप चहानं करायचे. काही दिवशी, ते तास न् तास पायी जायचे. पाथच्या दरम्यान, ते सूक्ष्म देहानं प्रवास करायचे. एकदा माताजी मला म्हणाल्या, ''मला वाटलं की त्यांनी झोपेवर प्रभुत्व मिळवलं होतं. कारण, ते क्वचितच झोपायचे. ते झोपायचे, त्यांची इच्छा व्हायची म्हणून; झोपेनं त्यांच्यावर मात केली होती म्हणून नाही. ते मला सांगत की जग झोपलं असताना ते त्यांचं काम करत.'' त्यांचे शब्द होते, ''मी कुठं जातो, हे कुणालाच कळणार नाही. पण, मी लोकांवर लक्ष ठेवतो आणि त्यांना मार्गदर्शन करतो.''

*'' विधि के विधान को कोई बदल नही सकता, पर मैं समय का पाबंद नही, समय मेरा पाबंद है”*, असं गुरुदेव नेहमी म्हणत असल्याचं ऐकलंय. याचा अनुवाद

असा होतो, ''जे नशीबाप्रमाणे घडणार आहे, ते टाळता येत नाही. परंतु, मी समयाचा बांधील नाही, समय माझा बांधील आहे''. बहुधा त्यांच्या म्हणण्याचा आशय असा होता की ते भूतकाळात आणि भविष्यात प्रवास करू शकत. ते भविष्यातील फळ वर्तमानात देखील देऊ शकत. काही बाबतींत, ते एखाद्या व्यक्तीच्या पुढच्या जन्मातली काही वर्षं वर्तमान जन्मात हस्तांतरित करू शकत. जेव्हां चंद्रमणी वसिष्ठजींना कळलं की त्यांचा मृत्यू जवळ आलाय, तेव्हा त्यांनी गुरुदेवांना त्यांच्या मनगटावरील घड्याळ देण्याबद्दल विनंती केली. जेव्हा महागुरूंनी त्यांची विनंती मान्य केली आणि त्यांचं घड्याळ भेट म्हणून पाठवलं, तेव्हां वसिष्ठजींना कळलं की आपलं आयुष्य वाढलंय.

गुरुदेवांमधील उद्योजकाला वेळेच्या संधीची किंमत समजली. त्यांच्यासाठी, त्यांचं गुरगावमधील घर, दिल्लीतील कार्यालय, भारतातील दुर्गम भागांमधील शिबिरं आणि सूक्ष्म गंतव्यस्थानं म्हणजे केवळ वैराग्यपूर्ण दयाळू कृत्यांसाठी कार्यक्षम क्षेत्रं होती, आणि काही अधिक भाग्यवान लोकांसाठी, अशा जागा होत्या जिथं गुरुदेवांनी त्यांना मार्गदर्शन केलं.

## भरती

वेग हे गुरुदेवांचं वैशिष्ट्य होतं, मग तो त्यांचा वेगवान चालण्याचा वेग असो किंवा असा वेग ज्यायोगे त्यांनी आपली शक्ती भरती केलेल्यांमध्ये सामायिक केली. एकदा, कथोग येथील एका शाळेत सेवा सुरू होती. तिथं मोठ्या रांगा पाहून, महागुरूंनी शाळेतील तीन शिक्षकांना आपण उष्टावलेलं पाणी प्यायला देऊन सक्षम केलं. त्या शिक्षकांच्या गुरुदेवांबरोबरच्या सुरवातीच्या काही भेटी होत्या. त्यामुळे, त्यांना गुरुदेवांविषयी फार कमी माहिती होती. तर मग, त्यांच्या सेवेबद्दल त्यांना काय माहीत असणार? त्या तिघांपैकी, बॉडीबिल्डर आणि पी. टी. इंस्ट्रक्टर असलेले संतोषजी आश्चर्यचकित झाले. कारण, *जल* प्यायल्यामुळे, चमत्कारिकरीत्या त्यांचं रूपांतर उपचार करणाऱ्या व्यक्तीमध्ये

झालं, आणि ते लोकांच्या शरीराच्या बाधित भागाला स्पर्श करून त्यांना पूर्णपणे बरं करू शकले. आध्यात्मिक ऊर्जास्रोतानं क्षणार्धात अनेक लोकांची भरती केली.

गुरुदेवांनी काही संभाव्य उमेदवारांना भेटण्यापूर्वी, त्यांना अनेक दिवस रांगांमध्ये उभे रहायला लावलं नि त्यांच्या संयम आणि निष्ठा यांच्या जोरावर गुण मिळवायला लावले, तर, इतर अनेक भावी शिष्यांचं *''आ गया पुत्त''*, अशी प्रसिध्द ओळ म्हणत स्वागत केलं. हे स्वागतपर शब्द आमच्यापैकी अनेकांना विचित्र वाटले. कारण त्यांनी सातत्याच्या भूमिकेतून आम्हाला संबोधित केलं होतं. मात्र, आम्ही स्वत:ला प्रथमच येणारे पाहुणे म्हणून पहात होतो. आम्हाला कसं काय माहीत असणार होतं की त्यांनी आम्हाला आमच्या मागील जन्मांपासून ओळखलंय?

आमचा वैविध्यपूर्ण कौशल्यं, क्षमता आणि वेगवेगळ्या आर्थिक स्तरांतून आलेल्या विविध क्षेत्रांतील मुलांचा असा एक गट होता - काही इतर मुलांपेक्षा गर्विष्ठ, तर काही बहुतेकांपेक्षा नम्र. आम्ही आमच्या स्वाभिमानात बुडून गेलो होतो, तरी महागुरूंनी आम्हाला घालवून दिलं नाही. त्याऐवजी, त्यांनी आम्हाला, दृढ प्रयत्नानं, छिन्नीनं तासून झुंजार वृत्तीचे अध्यात्मवादी म्हणून घडवलं, आणि आमची वनस्पती, प्राणी, मानव किंवा आत्मा अशा इतर जीवसृष्टीची सेवा करण्यासाठी नियुक्ती केली.

सेवेला प्रारंभ केल्यामुळे आणि मल्होत्राजी, जैन साहेब, एफ. सी. शर्माजी आणि इतरांसारख्या पूर्वीच्या जन्मांतील शिष्यांच्या आगमनामुळें, आध्यात्मिक चळवळ वाढली. इतर अनेक शिष्य सुध्दा कोणत्या ना कोणत्या बहाण्यानं आले आणि त्यांचं प्रशिक्षण सुरू झालं. प्रगत अध्यात्मवाद्यांना मार्गदर्शन करून, गुरुदेव हे मार्गदर्शकांचे मार्गदर्शक, गुरूंचे गुरू म्हणून ओळखले जाऊ लागले.

## लोकांचं व्यवस्थापन

आध्यात्मिक अधिकारी असलेले गुरुदेव हे भूमिका निभावण्यात कल्पक होते. जेव्हा त्यांना कठोर वागावं लागलं, तेव्हा ते वडिलांप्रमाणे वागले. जेव्हा त्यांनी आमचं पालनपोषण केलं, तेव्हा त्यांनी आईप्रमाणेच काळजी घेतली. मोठा भाऊ म्हणून त्यांनी द्वैताच्या अभ्यासक्रमाचा समावेश केला, आम्ही कृती करावी म्हणून ते आम्हाला टोचून बोलत, आम्ही प्रतिक्रिया द्यावी म्हणून आमची खुशामत करत. गुरू म्हणून ते कडक होते, पण मृदू होते. ते आम्हा प्रत्येकाशी असे वागले की जणू आम्हीच त्यांचे आवडते होतो. त्यांना खूश करण्याच्या आमच्या उत्सुकतेमुळे, आम्ही विसरलो की हा आध्यात्मिक प्रतिभावान *जिन्नच्या* (अरबी भाषेतील राक्षसाच्या) भूमिकेत होता.

गुरुदेवांच्या अनेक एक वाक्यांपैकी एक असं होतं, ''*मैं सबका हूँ और सब मेरे हैं. लेकिन मैं किसी का नही हूँ और मेरा कोई नही.*'' याचा अनुवाद होतो, ''मी सर्वांचा आहे आणि सर्व माझे आहेत. तरीही, मी कुणाचाही नाही आणि कुणीही माझा नाही.''

***त्यांच्या अनेक बोधकथा होत्या***
***विरोधाभासांचे मुखवटे.***

मी एक प्रसिध्द वक्ता जरी असलो, तरी, माझ्या सुरवातीच्या वर्षांमध्ये, मी महागुरूंच्या उपस्थितीत सहसा मुखदुर्बळ होत असे. या उलट, उध्दवजी संभाषणाच्या मोर्चाच्या तुकडीचं नेतृत्व करायचे आणि गुरुदेवांना आपल्या अधिक शक्तींचा आविष्कार करण्याकरता सतत आग्रह करत. आपल्या स्वतःच्या खास सूक्ष्म पध्दतीनं, महागुरू हसत, आमच्या निरर्थक प्रश्नांपासून आमचं लक्ष विचलित करण्याकरता आपल्या मर्लिन अर्थात एक प्रकारचा बाज असलेल्या तलवारीच्या रूपात विनोद चालवायचे आणि त्यांना काय सांगायचंय त्याबद्दल आम्हाला प्रेरित करायचे. त्यांच्या शक्ती या आविष्कारासाठी नव्हत्या; त्या खऱ्या सेवेसाठी राखून ठेवल्या होत्या.

जेव्हा गुरुदेवांचे शिष्य मल्होत्राजी यांनी आपल्या सोयीकरता ट्रेनला विलंबानं यायला लावलं, तेव्हा महागुरूंनी त्यांना त्यांचे अधिकार काढून घेण्याची धमकी दिली. मल्होत्राजी नंतर महागुरूंच्या सर्वात कुशल शिष्यांपैकी एक बनण्याइतपत प्रगत झाले. गुरूंनी कडक जागरुकता नि उदात्त वृत्ती ठेवली होती.

गुरुदेवांच्या मूल्यमापन करणाऱ्या नजरेत शिक्षा आणि बक्षिसं यांना समान महत्त्व होतं. जेव्हा त्यांना कळलं की प्रत्येक बड्या गुरुवारी गुरगावला विमानानं जाऊनही, माझ्या आधीच्या लोकांच्या निरंतर विनंतीमुळे, मला क्वचितच सेवा करण्याची संधी मिळायची, तेव्हा त्यांनी माझा महामृत्युंजय मंत्र पूर्ण केला आणि त्याची *सिध्दी* देऊ केली. हा यॉर्कर होता (ही *सिध्दी* अद्वितीय लाभच होता)! या मंत्राचं एकही अक्षर मला माहीत नसताना, त्यांनी मला आपल्या शक्तींनी संपन्न केलं होतं.

गुरुदेवांच्या भेटवस्तू या त्यांच्या कठेरपणाइतक्याच विपुल होत्या. माझ्या पत्नीनं माझ्या *गुरुभाईंसोबत* रात्री उशीरापर्यंत चालणाऱ्या आध्यात्मिक गप्पागोष्टींबद्दल तक्रार केली, तेव्हां त्यांनी या गोष्टीची हमी घेतली की त्या दिवसापासून तीन वर्षं जरी मी गुरगावला *बडा* गुरुवार आणि इतर गुरुवारी आलो, तरी पण सेवा करण्याऐवजी मी माझ्या पत्नीला आणि मुलांना डोश्यांचा नाश्ता करण्यासाठी घेऊन जाईन. स्थानातील सेवेऐवजी पत्नीची सेवा! एका गुगलीनं गुरुदेवांनी मला शून्यावर बाद करून टाकलं.

गुरुदेवांनी आमची चाचणी घेतल्यावर, दिलेले निकाल विविध प्रकारचे असायचे - ते आमची सेवा तात्पुरती स्थगित करण्यापासून ते तिला कायमस्वरूपी विराम देण्यापर्यंत; कधी कधी आमच्या चुकांकडे पूर्णपणे दुर्लक्ष पण केलं जायचं. अनिश्चिततेचा मार्ग खूपच अरुंद होता आणि आम्ही शॉट खेळायचा प्रयत्न करायचा का चेंडू तसाच मोकळा सोडायचा याची आम्हाला

काही खात्री नसायची! थोड्या शरमेनंच का असेना, पण, आपलं अपयश खिळाडूपणे स्वीकारण्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. गुरुदेवांच्या चाचण्यांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी विश्वास आणि मानसिक चपळता यांपेक्षा कितीतरी जास्त आवश्यक होतं. जसजशा आमच्या कौशल्याच्या कक्षा रुंदावल्या, तसे, गुरुदेवांनी आपले मूल्यमापनाचे मापदंड पण उंचावले. असं नाही की आम्ही अयशस्वी व्हावं असं त्यांना वाटायचं. त्यांची फक्त अशी इच्छा होती की आम्ही त्यांच्या उत्कृष्टतेला मागे टाकावं. आपल्या शिष्यांबद्दल बोलताना, ते अनेकदा आपल्या पत्नीला सांगत, ''मी त्यांना माझ्या खांद्यावर घेऊन जातो, जेणेकरून ते माझ्यापेक्षा खूप पुढे पाहू शकतील.'' या साध्या वाक्यात त्यांनी गुरूंची भूमिका परिभाषित केली आणि आपल्या शिष्यांना त्यांचा कित्ता गिरवायला प्रेरित केलं.

गुरुदेव फक्त, अनेक मैल दूरवरून आमचे विचार वाचू शकत होते असं नाही. परंतु, ते अनेकदा वेषांतर करून आमची परीक्षा घ्यायचे. जेव्हा, उध्दवजींनी पिवळ्या डोळ्यांचे दोन काळे त्रिकोण आपल्या खोलीत तरंगत येताना पाहिले, तेव्हा त्यांनी त्यांच्यावर मारण्याकरता आपलं नन्चकू (एक जपानी अस्त्र) हातात पकडलं. गुरुदेवांनी मागाहून, उध्दवजींना सांगितलं, ''मला माझ्यासोबत असलेल्या त्रिकोणी देवतेला शांत करायचंय, जेणेकरून तुला नन्चकूच्या आक्रमकतेची किंमत तुझ्या जीवाच्या मोबदल्यात चुकवावी लागू नये.'' जेव्हा बग्गा साहेब आपल्या दुकानात फाटक्या कपड्यातल्या माणसाकडे दुर्लक्ष करत, एका आकर्षक स्त्रीला काय हवं नको ते पहात होते, तेव्हा त्यांना कल्पनाही नव्हती की तो खूप वृध्द माणूस कदाचित त्या दुकानाचा मालक होता किंवा वेषांतर केलेला त्याचा सेवक अघोरी होता. गुरुदेवांनी आमच्या आकस्मिकपणे घेतलेल्या परीक्षांमध्ये आम्ही अनेकदा अयशस्वी झालो. कारण, आम्ही पुरेसे दक्ष नव्हतो.

महागुरूंच्या अखंड सावध नजरेनं अनेकांना नियंत्रित केलं. जरी त्यांनी वर्ग चालवले नाहीत, तरी त्यांनी वैयक्तिक आवडीला अनुसरून शिकवण्या दिल्या.

स्वत:चे प्रशंसक, अनुयायी आणि भक्त यांना त्यांचं मार्गदर्शन वैयक्तिक स्वरूपाचं होतं आणि कोणत्याही विशिष्ट आचारावर आधारित नव्हतं. गुरुदेव सर्व तत्त्वज्ञानांमध्ये अतिशय रमून जायचे आणि ते व्यावहारिकतेमध्ये खूप कठोर नव्हते. त्यांच्यात विचारांची लवचिकता होती.

***त्यांच्या अध्यात्माच्या पुस्तकात नव्हती एक संकल्पना***<br>***सर्वांसाठी किंवा नव्हत्या एकासाठी सर्व संकल्पना,***<br>***पण होत्या वेगवेगळ्या संकल्पना वेगवेगळ्या लोकांसाठी.***<br>***त्यांनी आग्रह धरला आम्ही आमची उत्तरं शोधावीत***<br>***आमच्या स्वत:च्या अंतरातून.***

गुरूंनी आमच्यामध्ये सर्व धर्मांचा आदर करण्याचं महत्त्व बिंबवलं. त्यांनी मला सांगितलं, *''बेटा, यह सब हमारा ही तो है''*. यातून त्यांनी असं ध्वनित केलं की त्यांनी सर्व धर्म आपले धर्म म्हणून स्वीकारले. मूर्तिपूजेबाबत त्यांनी कोणत्याही छद्म-बौध्दिक विचारांना थारा दिला नाही. जरी आपण मूर्तींना केवळ दगडी शिल्पं मानत असलो, तरी त्यांना हे माहीत होतं की जेव्हा त्या मूर्तींची पूजास्थळी प्राणप्रतिष्ठापना केली जाते, तेव्हा त्या मूर्ती तिथं जमा झालेल्या शक्तींचा चेहरा आणि विधी बनतात. गुरुदेवांनी मंदिरं आणि दैवत-स्मारकांना भेट देणं टाळलं. कारण, त्यांना दैवतांच्या ऊर्जा समीकरणात हस्तक्षेप करायची इच्छा नसायची. तथापि, त्यांनी आपल्या शिष्यांना सूक्ष्म प्रवासादरम्यान दैवतांप्रति आदर अर्पण करण्याकरता *सिध्द* स्थानांवर काही सेकंद थांबण्याचा सल्ला दिला. या मूर्ती चमकणारे दिवे म्हणून सूक्ष्मपणे ओळखल्या जाऊ शकतात.

मुंबईपर्यंतच्या सूक्ष्म प्रवासांदरम्यान, गुरुदेव हे साईबाबांबरोबरच्या विशेष जवळिकीमुळे, शिरडी इथं काही सेकंद थांबायचे. मी काही प्रसंगी साई गुरुदेवांच्या शिष्यांच्या मदतीला आल्याचं ऐकलंय. खूप वर्षांपूर्वी, मी गुरुदेवांकडे, त्यांनी एका महिलेला साईंचं दर्शन द्यावं, अशी विनंती केली होती आणि त्यांनी तिला आनंदानं उपकृत केलं.

*माती-सर्वेक्षण शिबिरात गुरुदेव*



## कार्यक्षेत्रापेक्षा अन्य ठिकाणं

गुरुदेवांनी माती सर्वेक्षण आणि संशोधनासाठी दरवर्षी किमान दोन छावण्या उभारल्या. महागुरू म्हणून त्यांची पहिली सेवा १९७३ साली कुरवई इथं सुरू झाली. १९७६ साली कथोग छावणीत हजारो लोक मदतीसाठी आणि उपचारासाठी रांगेत उभे होते. १९८० साली रेणुका येथील छावणी ही त्यांची सर्वात मोठी सार्वजनिक सेवा किंवा सामूहिक उपचारांसाठी मेळावा म्हणून ओळखली जाते.

मुंगोली येथील खुल्या कारागृहाजवळ, अशोकनगरमधील स्मशानभूमी किंवा जंगलाच्या मध्यभागीही त्यांनी छावण्या उभारण्यास मागेपुढे पाहिलं नाही. त्यांनी नेहमी अशी ठिकाणं निवडण्याचा प्रयत्न केला जिथं ते मानव आणि आत्मे या दोघांचीही सेवा करू शकायचे. खालच्या लोकांमध्ये अडकलेल्या आत्म्यांना मुक्त करण्यापासून त्यांना मानवी रूपात जन्म देण्यापर्यंत, महागुरूंनी आपली मदत मागणाऱ्या सर्वांची मदत केली.

गुरुदेवांच्या छावण्यांच्या जागा सुध्दा प्रशिक्षण स्थळं म्हणून दुप्पट झाल्या. मुंगोलीमध्ये त्यांनी मला माझे दात वाजवायला लावले आणि माझ्या मणक्यापर्यंत थंडी वाजून थरथर कापायला लावलं. कारण, मी त्यांच्या आगमनाच्या वेळी स्वेटर घातला होता. इतर सर्वजण आपापल्या लोकरीच्या विणलेल्या जाकिटांमध्ये मजेत असताना, मी मात्र थंडी नसल्याबद्दल बढाई मारतोय, असं गुरुदेवांना वाटावं अशी माझी इच्छा नव्हती. माझ्या ढोंगाचं वास्तवात रूपांतर करून, गुरुदेवांनी फक्त माझ्या मनावर आणि शरीरावरच नव्हे, तर निसर्गावरही आपलं नियंत्रण असल्याचं दाखवून दिलं. मला लवकरच समजलं की महागुरूंना शरण जाण्यामध्ये खोटा अहंकार, सामाजिक अनुग्रह नि खोट्या मान्यता यांचा त्याग करणं जरूरीचं आहे.

या छावण्यांमधील जीवन म्हणजे काही उद्यानात फेरफटका मारण्याएवढं सोपं नव्हतं. जेव्हा गुरुदेवांच्या संघाला योग्य जागा सापडणं शक्य व्हायचं नाही, तेव्हा त्यांनी अनेकदा मोकळ्या मैदानात तंबू ठोकले. १२० चौरस फुटांची आपली ब्रह्मचाऱ्याची खोली असो, जीर्ण झालेलं जिल्हा अतिथि गृह असो किंवा त्यांच्या छावणीच्या मुक्कामामधले तात्पुरते तंबू असोत, महागुरू त्यांच्या रहाणीमानाबद्दल बेफिकीर होते.

मला अखेरीस समजलं की जीवनातल्या भौतिक पैलूंनी ना महागुरूंना कधीही अस्वस्थ केलं, ना विचलित केलं. शिवाय, आपल्या कुटुंबापासून दीर्घ काळासाठी दूर राहिल्यामुळे, ते *गृहस्थ* असूनही, संन्याश्याचं जीवन जगले. ''*गृहस्थ में भी वैराग्य है*'', हे त्यांचे शब्द या भावनेला योग्यता प्राप्त करून देतात.

## कार्यकारी प्रशिक्षण

गुरुदेवांनी आपल्या साधेपणानं आणि नम्रतेनं आम्हाला दिवसेदिवस भारावून टाकलं. आम्ही अनेकदा त्यांच्याशी केवळ भौतिक पातळीवर वागण्याची चूक केली. उध्दवजींना हे कळलं नाही की त्या माणसानं स्वत:चं महत्त्व दाखवलं नाही याचा अर्थ ते महत्त्वाचे नव्हते असा नव्हता. जैन साहेबांना हे समजलं नाही की गुरू त्यांना स्वत:शी मित्र असल्यासारखे बोलू देत याचा अर्थ असा नव्हता की गुरू त्यांचे मित्र होते. व्ही. पी. शर्माजींना हे समजलं नाही की गुरूंनी त्यांना सहज वागण्याची परवानगी दिली याचा अर्थ ते न्याय्य होते असा होत नव्हता. गुरुदेवांच्या वागण्या-बोलण्याच्या पध्दतींमुळे, गुरुदेव खरे कोण होते, याविषयी लोकांचा चुकीचा समज झाला. आपल्या कर्णधाराच्या वेगळेपणाविषयीचं मर्यादित आकलन असल्यामुळे, ते फलंदाजीच्या क्रमवारीत मागे टाकले गेले. परंतु, गुरुदेवांनी सर्वांकडे ते आहेत, तसंच बघितलं; ते स्वत:ला काय समजतात याकडे लक्ष दिलं नाही. भविष्यात आम्ही बदलू, हे जाणून, त्यांनी आमच्या आध्यात्मिक सामर्थ्याच्या बदल्यात आमच्या शारीरिक कमतरतांकडे

दुर्लक्ष केलं आणि आमचे प्रशिक्षक म्हणून, आमचं गोलंदाजाच्या बाजूला उभे असणाऱ्या फलंदाजांपासून ते आध्यात्मिक फलंदाजांमध्ये परिवर्तन करण्यासाठी त्यांनी प्रत्येक युक्ती वापरली.

गुरुदेवांनी आपल्या आध्यात्मिक गुरूंकडून मिळालेल्या सूचनांच्या बाबतीत कोणतीही धरसोड केली नाही. जेव्हा त्यांना *गृहस्थ* जीवनात परत यायला सांगितलं गेलं, तेव्हा त्यांनी तसं केलं. जेव्हा त्यांना *सिध्दींचा* त्याग करायला सांगितलं गेलं, तेव्हा त्यांनी तसं केलं. बुड्डे बाबांना निःसंदिग्ध शरण गेल्यामुळे, गुरुदेवांचा आध्यात्मिक मार्ग बदलला आणि त्यांचं परिवर्तन जलद गतीनं होऊ शकलं. ॐ, त्रिशूल, ज्योत, शिवलिंग, गिलेरी, नंदी, गणपती आणि शिव परिवारातील इतर पैलू गुरुदेवांमध्ये विलीन झाले आणि त्यांच्या हातांवर आणि शरीराच्या इतर भागांवर प्रतीकं म्हणून प्रकट झाले. या शक्तींनी त्यांना अनेक वैश्विक ऊर्जांवर नियंत्रण मिळवून दिलं. ते स्वतःची शक्ति-चिन्हं आणि ऊर्जा वितरित करण्यात उदार होते. परवाणू येथील गुप्ताजींबरोबरच्या दुसऱ्या भेटीतच गुरुदेवांनी ॐ ला गुप्ताजींच्या कुटुंबातील सदस्यांकडे सुपूर्द केलं आणि त्यांच्या घरी एक स्थान उघडलं.

एक गुरू म्हणून ते प्रस्थापित आचार-विचारांशी जुळवून घेणारे नव्हते. त्यांच्या शिकवण्याच्या पध्दती सहज आणि साध्या होत्या. विचार करण्याकरता कोणताही सिध्दांत नव्हता किंवा वाचण्याकरता कोणतीही शास्त्रं नव्हती. आपल्या १२० स्क्वेअर फूटच्या छोट्या बेडरूममध्ये बसलेल्या लोकांना त्यांनी धडे म्हणून स्वतःचे अनुभव सांगितले.

गुरुदेवांनी आम्हाला आमच्या ऊर्जांचा समतोल राखायला आणि त्यांची वृध्दी करायला शिकवलं. त्यांनी *मंत्र, विद्या, तपस्या* आणि *पाथ* निर्दिष्ट केले आणि आम्ही हे सराव पूर्णत्वाला नेण्यासाठी वेळ घालवावा यासाठी आग्रह धरला. आमच्या आध्यात्मिक प्रवासातील विशिष्ट टप्प्यांवर त्यांनी आमच्या मनाच्या शक्तीचा वापर करून, आम्हाला दूरवर्ती उपचार करण्याची दीक्षा

दिली. त्यांनी आमची स्वप्नं आणि आमचे दृष्टांत यांद्वारा आमच्याशी संवाद साधला, आम्हाला प्रशिक्षण दिलं, संदेश सामायिक केले, आम्हाला आगामी घटनांबद्दल पूर्वसूचना दिली आणि गूढ क्षेत्रं जाणण्यात आमची मदत केली. त्यांनी आमच्यापैकी काहींना आमच्या गत जीवनांची झलक बघण्याची अनुमती दिली.

महागुरूंनी आम्हाला शिकवलं की मृत्यूनंतरचं जीवन हे वेगळ्या कंपनांसह निरंतर आहे, ते एक अधिक सूक्ष्म रूप आहे. त्यांनी आम्हाला शरीराबाहेर सूक्ष्म शरीरानं प्रवास करण्याचं आणि पृथ्वीवरून निर्गमन करताना, ध्वनि-अवरोध तोडण्यासाठी आवश्यक गती प्राप्त करण्याचं प्रशिक्षण दिलं. त्यांनी स्पष्ट केलं की मृत्यूनंतर, विकसित आत्मे हे उत्तर ताऱ्यातून अधिक उच्च लोकांपर्यंत प्रवास करतात. मानवी शरीर हे आत्म्यासाठी कामाचा घोडा आहे या महत्त्वपूर्ण जाणीवेनं आमच्या जीवनाचा उद्देश स्पष्ट केला. आत्म्याला आपले गुण बदलण्यासाठी, अनुभूती गोळा करण्यासाठी आणि शक्तीचा संचय करण्यासाठी मानवी शरीर आवश्यक असतं.

***पालन करून महागुरूंच्या कार्यप्रणालींचं आणि<br>सल्ल्यांचं, कुणीही सुधारू शकतो गुणवत्ता त्याच्या<br>अस्तित्वाची या जन्मातील आणि यापुढील जन्मांतील.***

## संस्था व्यवस्थापन

काटेकोर योजना ही गुरुदेवांच्या संघटनात्मक कौशल्याला पूरक ठरली. बडा गुरुवार हा पहाटे सुमारे ५.३० वाजता सुरू व्हायचा. त्यामुळे सर्व व्यवस्था आदल्या रात्रीच कराव्या लागायच्या. मल्होत्राजींच्या धोरणात्मक देखरेखीखाली आणि निक्कुजी, पप्पुजी, बिट्टुजी आणि गग्गुजी या चार एकमेकांशी घनिष्ठ संबंध असलेल्या *सेवादारांच्या* पर्यवेक्षणाखाली सुमारे वीस ते तीस *सेवादार* हे रांगांची व्याप्ती आणि दिवसाच्या भोजनाची सूची तयार करत, ज्यात अभ्यागतांसाठी प्रसाद आणि *सेवादारांसाठी* जेवणाचा

समावेश असे. शिष्यांना कर्तव्यं नेमून दिली जायची आणि चपला-स्टँड सेवा, *जल* सेवा, आणि *गद्दी* सेवा यांकरता निर्धारित वेळा निश्चित केल्या जायच्या. महागुरू स्वत: पर्यवेक्षकांची देखरेख करत. समोरून फलंदाजी करणं ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छटा होती.


गणेश चौथ (गणेश चतुर्थी), महाशिवरात्री आणि गुरुपूर्णिमा यांच्या आयोजनातही असं बारीकसारीक नियोजन असायचं. फक्त यावेळी, कायक्रर्माच्या आधी काही आठवडे तयारी सुरू व्हायची. १९८४ साली, गुरुदेवांनी हिमगिरी चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली आणि मल्होत्राजींची मुख्य विश्वस्त म्हणून नियुक्ती केली. अजूनही, हा ट्रस्ट लोककल्याणाकरता काम करत आलाय.

थोड्या पण समर्थ शेतमजुरांच्या संघानं खांडसा येथील त्यांच्या शेताची देखभाल केली. माजी कुस्तीपटू पहेलवानजी यांनी या संघाचं नेतृत्व केलं, तर शेतमजुरांनी शेतीची काळजी घेण्यावर आणि उत्पादन वाढवण्यावर लक्ष केंद्रित केलं. जेव्हा केव्हा गुरुदेव दूर शिबिरात नसायचे, तेव्हा ते त्या सगळ्यांना सामील व्हायचे. महागुरू गायींचं दूध काढायचे, आपल्या ट्रक्टरनं जमीन नांगरायचे, बिया पेरायचे, भाजीपाल्याचं व्यवस्थापन करायचे, आणि काय करत नसत! आपल्या शेतावर अंगमेहनत करणं आणि तिथल्या वास्तविक रहिवाश्यांचं पालनपोषण करणं हा त्यांचा निसर्गाचं असणारं कर्ज फेडण्याचा मार्ग होता. शेतातील उत्पादनं ही गुरगाव स्थानाच्या गरजा पूर्ण करत. एकदा, महाशिवरात्रीच्या दरम्यान, शेतातील काही बटाट्यांमध्ये ॐ कोरलेले आढळले. दुसऱ्या वेळी, ॐ ऐवजी, बटाट्याच्या उत्पादनात त्रिशूल होते. हे एकतर आध्यात्मिक बटाटे होते किंवा भाज्यांमध्ये आपल्या शक्ती खोलवर रुजवण्याची आपली क्षमता प्रदर्शित करण्याचा महागुरूंचा हा मार्ग होता!

गुरुदेवांनी जिथं जिथं स्थान उघडायचं ठरवलं, तिथं तिथं, त्यांनी त्या भागातील प्रमुख देवतेला प्रसन्न ठेवणं पसंत केलं. आपल्या सध्याच्या जन्मात एक



## खांडसा शेतावर गुरुदेव



आध्यात्मिक प्रभावशाली व्यक्ती असल्यामुळे, गुरुदेव त्यांच्या संघटनांमध्ये सहज प्रवेश करू शकले. कारण, त्यांनी या युती मागील जन्मांमध्ये केल्या होत्या. साई बाबा, गुरू नानक देव, गुरू गोबिंद सिंग, परशुरामजी, भगवान कृष्ण, गणपती, हनुमान, रेणुका, लक्ष्मी, सरस्वती, महाकाली यांसारख्या देवी आणि इतर अनेक महापुरुष त्यांच्या सहयोग्यांमध्ये होते. जागतिक घडामोडींवर चर्चा करण्यासाठी गुरुदेवांनी त्यांच्यापैकी काहीजणांबरोबर सूक्ष्म सभा घेतल्या असतील. यातून काय समजायचं ते मला कळत नाही. पण, त्यांच्या शेवटच्या काही दिवसांमध्ये त्यांनी आपल्या मेहुणीला सांगितलं होतं की गुरू शंकराचार्य आणि गुरू बृहस्पती पृथ्वीवर सेवा करत असल्यामुळे, सर्व दुष्ट शक्तींपासून जगाचं रक्षण करण्याची त्यांची पाळी होती. या प्रकारची माहिती महागुरूंना मार्वल स्टुडिओचा (अमेरिकन मिडिया फ्रँचाइजी) बदला घेणाऱ्यांपैकी एक असल्यासारखे बनवते!

हे जग सोडून जाण्यापूर्वी, महागुरूंनी आपली विश्रांतीची जागा तयार केली होती. त्यांनी दिल्लीतील नजफगड हे आपलं अंतिम धाम म्हणून निवडलं. आपल्या मृत्यूच्या काही महिन्यांपूर्वी, त्यांनी तिथं पायाभरणी केली आणि बलजीतजींना आपली समाधी बांधायला सांगितलं. महागुरू गेल्यावर, त्यांचे अंत्यसंस्कारही तिथंच केले गेले.

शिवलोकातील कैलास पर्वतावर रहाणारा, परंतु दररोज दुपारी नजफगड येथील आपल्या समाधीकडे परतणारा सर्वव्यापी *दिव्य आत्मा* अशी भृगू संहितेनं गुरुदेवांच्या स्थितीची पुष्टी दिली. त्यांची असीमता अजूनही त्यांच्या समाधीवर आणि गुरगाव नि जगाच्या इतर भागांतील त्यांच्या स्थानांवर जाणवते.

## अडथळ्यांच्या मार्गाचं संचालन

गुरुदेव हे जेव्हा सर्वोच्च पातळीवर होते, तेव्हा त्यांचा दर महिन्याला सुमारे एक लाख लोकांशी संबंध यायचा. तरीही ते सर्वांना हसतमुखानं भेटत

आणि त्यांनी कुणालाही घाई केली नाही. बहुतेक हॉटेल्स, हॉस्पिटल्स,आणि इतर संस्था लोकांची संख्या प्रति चौरस फूट मोजतात. त्या मापदंडाप्रमाणे, महागुरूंना काही दिवसांत ६०० स्क्वेअर फूटांमध्ये जवळपास ५०,००० लोकांना पहावं लागलं! ते गणित सोडवलं तर, दररोज प्रत्येक स्क्वेअर फूटात सुमारे ८० ते ९० लोक व्हायचे!


जे गुरुदेवांना भेटायला येत किंवा त्यांच्या फोटोला प्रार्थना करत, त्यांना मदत करण्याच्या व्यासंगात, गुरुदेवांना आत्मे, काळ्या जादूचे हल्ले, चिडलेले गुरू यांसारख्या नकारात्मक शक्तींचा सामना करावा लागला. आपला खटला नि दावा जिंकण्याकरता, गुरुदेवांनी रोगग्रस्तांचा जीवात्मा, ग्रह आणि त्यांचे किरण यांचा बचाव वकील म्हणून काम केलं. त्यांनी लोकांना वारंवार रांगेत थांबायला लावलं आणि उपचारासाठी अनेक वेळा स्थानात परतायला लावलं. त्यांनी या कृतींना *तपस्या* म्हणून गणलं आणि त्यांच्या नशिबाचं समायोजन त्यांच्या योग्य गुणवत्तेप्रमाणे केलं.


शब्द सहज लिहिले जातात, मात्र, कृती इतक्या लवकर केल्या गेल्या नव्हत्या! परंतु, ज्यांनी महागुरूंना मानलं, तेच त्यांच्या मालकीचे झाले आणि त्यांनी आपल्या आयुष्याच्या छोट्या-मोठ्या पैलूंमध्ये चमत्कार पाहिले. महागुरू त्यांच्या हृदयाच्या ठोक्याचा अंत:स्थ भाग बनले आणि त्यांच्या **DNA** ला दिव्यत्वाची संहिता लागू झाली.

Podcast **Angle of Difficulty of Being Him** हा लक्ष केंद्रित करतो अडचणींवर ज्यांचा सामना करावा लागला महागुरूंना आपल्या आध्यात्मिक कामगिरीदरम्यान. तो ऐका www. gurudevonline.com वर

# ०४

# तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष कृती





*काही शब्दांत, सामायिक केलं गेलं असीम शहाणपण*
*आम्हाला वर्षं लागली त्याचं सामान्य भाषेत रूपांतर करायला.*
*कोणतंही अनावश्यक अवडंबर नसलेल्या त्यांच्या उत्तुंग*
*तत्त्वज्ञानानं बनवलं आम्हाला आध्यात्मिक मार्गावर विजेते केले.*

# एक से अनेक, अनेक से एक

*एक से अनेक, अनेक से एक* (अद्वैतातून द्वैत, द्वैतातून अद्वैत) या आवडत्या अवतरणाचा महागुरूंनी उदारपणे उपयोग केला.

सामान्यत: पंजाबीमध्ये संभाषण करणाऱ्या गुरूंनी खुमासदार हिंदीत उच्चारलेलं, हे उलट-सुलट कसंही वाचलं तरी सारखंच रहाणारं विधान केवळ एका ओळीत चैतन्याचा सारांश सांगतं!

चैतन्याच्या क्षेत्रातील अनुभवजन्य धाडींमध्ये मज्जासंस्थेसंबंधी दिलेल्या गोष्टी, मानसशास्त्रीय नमुने, तत्त्वज्ञानपर विश्लेषण यांचा समावेश होतो. परंतु, विज्ञान हे चैतन्याच्या वैयक्तिक आकलनांचं अन्वेषण करण्याचं साधन आहे, तर अध्यात्म ही त्यात प्रवेश करण्याची पध्दत आहे. लोकप्रिय विश्वासाच्याच्या विरुध्द, उत्क्रांती हे अध्यात्माचं ध्येय हे नाहीये. तर, **स्वार्थाची नि:स्वार्थाकडे** सोपवण्याची कृती आहे आणि जग हे वास्तविक नसून केवळ स्रोताचं एक प्रक्षेपण आहे याची जाणीव आहे.

## स्रोत = परमश्रेष्ठ चैतन्य

सर्वोच्च चैतन्य ही एकमेव मूळ वैश्विक ओळख आहे. इतर सर्व ओळखींचा संबंध-विच्छेद होतो. स्रोत हा त्याला पाहिजे तेवढ्या अणू आणि उपअणू



अंशांमध्ये विभक्त होऊ शकतो. प्रत्येक अंश हा स्रोत आहे, परंतु, कमी केलेल्या शक्तीत आणि बदललेल्या ओळखीमध्ये.

जरी एकाच स्रोतापासून विभक्त झाला असला तरी, प्रत्येक तुटलेला अंश एक वेगळं अस्तित्व म्हणून वावरतो, जवळजवळ वैश्विक स्मृतिभ्रंशासारखा, स्वत:च्या उत्पत्ती आणि शक्तीबद्दल अनभिज्ञ. वेगळा असताना, प्रत्येक अंश हा नकळतपणे, आपल्या जन्मजात मन:शक्तीचा वापर करून आपलं जग निर्माण करतो - भोगासक्त, संवेदनात्मक आणि संस्कारयुक्त, अहंकार, बुध्दी आणि मन यांनी आच्छादित झालेलं.

## खंडित अंश = जीवात्मा

एकदा का जीवात्मा स्वत:ला त्याच्या उत्पत्तीपासून वेगळा समजायला लागला की, तो द्वैताचा बळी बनतो, त्याच्या अंगभूत महान शक्तिबद्दल अनभिज्ञ होतो. हळूहळू, स्वत:च्या पलीकडे पहाण्यास तो असमर्थ होतो नि मायेच्या, स्वत:च्या निर्मितीच्या जाळ्यात अडकतो. कालांतरानं, जीवात्मा हा काल्पनिक जगात खोलवर बुडतो, आपण खरोखर कोण आहोत, हे विसरतो. ना तो स्वत:ला काच, धातू वगैरेंचा फुटका, टोकदार तुकडा म्हणून ओळखतो, किंवा ना इतर खंडित तुकड्यांना त्याचा वैश्विक कंपू म्हणून ओळखतो. ओळखण्याच्या प्रक्रियेला जन्म नि मृत्यू यांची अनेक चक्रं लागू शकतात. अखेरीस, जेव्हा जीवात्मा आपण खरोखर कोण आहोत याविषयी जागृत होतो, तेव्हा तो परम चैतन्य किंवा परम-आत्म्यात विलीन होण्याचा आणि पुन्हा पूर्ण बनण्याचा प्रयत्न करतो.

आपल्या खऱ्या स्वरूपाची जाणीव, आपली संपूर्णता जीवात्म्याला आपल्या अहंकार तत्त्वाच्या सत्यावर आणि अस्तित्वावर प्रश्न निर्माण करायला लावते. सत्याचं ज्ञान आत्म-पुष्टीची (अहंकाराची) ओळख करून देतं! मातीचं भांडं हे आपण चिखलातून मंथन होऊन भांडं कसं बनलो ते बघतं

आणि मंथन न होणं आणि अहंकाराच्या सदोष तर्कानं समर्थन केलेली स्वत:ची तात्पुरती खोटी ओळख त्यागून, उगमस्थानाकडे परत जाणं याची गरज ओळखतं. अहंकारापासून विभक्त होणं हे काही अचानक वेगवान हालचाली बंद करण्यासाठीचं बटन नाहीये, तर वरच्या पायऱ्या गाठणाऱ्या स्तरांवर चालण्याचा मार्ग आहे. सामान्य समजुती खोडून काढणं, चुकीच्या किंवा अप्रचलित गोष्टी स्मृतीतून काढून टाकणं आणि सदोष आत्म-प्रतिबिंबापासून अलिप्त होणं हे सर्व प्रक्रियेचे भाग आहेत. यात अनेक जन्मांमध्ये जमा झालेले संस्कारांचे छाप आणि स्मृतिसंस्कारांचं भांडं स्वच्छ करण्यासाठी, संग्रहित संस्कार  हाताळण्याचा पण समावेश होतो.

*एक से अनेक, अनेक से एक* हे अवतरण जीवात्म्याचं परम-आत्म्यापासून त्याच्या अनेक आत्म्यांमध्ये परिवर्तन आणि नंतर शेवटी परम-आत्म्याकडे परत जाण्याची प्रक्रिया सूचित करतं.

थोडक्यात, ही कहाणी आहे द्वैत, माया, जीवात्मा, परम-आत्मा आणि मोक्षाच्या *तांत्रिकतांची.* स्पष्टीकरण जरी साधं सोपं  असलं, तरी, संकल्पनेची वास्तविक अनुभूती ही सर्व मोजता येण्याजोग्या शंकांच्या पलीकडे आहे, कोणत्याही सजीवाची ही सर्वात आव्हानात्मक कामगिरी आहे, मुख्यत्वे, या कारणामुळे की शाश्वत महिमा असलेली ही एकमेव कामगिरी आहे.

पारंपारिकपणे, *सिध्द* गुरू हे अंधार दूर करणारे असतात. अंधार हे अज्ञानाचं रूपक आहे - एकतेच्या वैश्विक वास्तवाचं अज्ञान आणि निर्मितीचा भ्रम. गुरूंची कृपा ही जीवात्मा आणि परम-आत्मा यांच्यातील एक सेतू म्हणून कार्य करते, नि त्यायोगे, स्वत:पासून दिव्यत्वाचं वेगळेपण कमी करते.

महागुरू या अवस्थेत, जीवात्मा हा परम-आत्म्यामध्ये विलीन होण्यास पात्र असतो. तरीही, तो स्वेच्छापूर्वक, मायेबरोबर भागीदारी करून, जीवात्म्याची

त्रिमितीय प्रतिमा टिकवून ठेवणं पसंत करू शकतो. असे जीवात्मे स्वेच्छेनं, जगाची स्थिती सुधारण्यासाठी मानवी रूपात प्रकट होण्याचा पर्याय निवडू शकतात.

गुरुदेवांच्या शिकवणुकी आणि त्यांच्या प्रत्यक्ष कृती या त्यांच्या तत्त्वज्ञानात निश्चितपणे प्रतिपादित केल्या आहेत. त्यांचा आध्यात्मिक होकायंत्र म्हणून वापर करा. जर तुमचे प्रयत्न प्रामाणिक असतील, तर गुरुदेवांची कृपा सुध्दा होईल.

महागुरूंसाठी प्रेम होते प्रकाशाचे किरण,
भावना नाही. कसे ते शोधा.
ऐका podcast **Oneness**
www.gurudevonline. com वर

*द्वैत बाजूला करते एकतेला*
*माया व्यापून टाकते अवकाश.*
*वास्तव मिटतं अंधारात*
*फक्त मागमूस सोडून .*

*तयार केलं जातं एक नवीन*
*जग रहातात जिथं मी आणि*
*माझे आश्रय घेतो आत्मा*
*संघर्षाच्या दैन्यात.*

*‘मी’ बनतो एक प्रतिबिंब*
*कथेचं, जे आरसा सांगतो.*
*‘‘ मी तो आहे ’’ हे आहे पालुपद*
*फक्त वाजवलेलं दिव्यत्वाच्या घंटांनी.*

*गुरू फैलावतात आपले बाहू*
*कवेत आपल्या आधार देण्यासाठी.*
*बाहेर पडतो आपण*
*त्यांच्या ओतीव साच्यात.*

*आकलन होतं अंतिम सत्याचं*
*विस्तार असते भाकडकथा.*
*‘एक’ रहातो अविभाज्य*
*अखंड आहे परमसत्य.*

Hingori

# टप्पे अध्यात्मिक परिवर्तनाचे

*आदमी* (सामान्य माणूस) ते *आत्मा* हे परिवर्तन *सिध्द* आध्यात्मिक गुरू सुकर करतात. गुरूंच्या दोन प्राथमिक जबाबदाऱ्या असतात. पहिली म्हणजे, मार्गदर्शक म्हणून प्रभाव पाडण्यासाठी ते आपला प्रत्यक्ष अनुभव आणि शहाणपण घेऊन येतात. दुसरी म्हणजे, ते जीवात्म्याचं बाह्य प्रतिनिधित्व बनतात, ज्याचा प्रत्येक विद्यार्थ्यानं नंतर परम-आत्म्याला जाणण्यासाठी स्वत:मध्ये स्वीकार केलाच पाहिजे.

भारतीय तत्त्वज्ञानाचे काही संप्रदाय आध्यात्मिक विकासाच्या पाच टप्प्यांचा उल्लेख करतात, तर महागुरूंच्या शिकवणुकी आध्यात्मिक परिवर्तनाच्या सहा टप्प्यांमध्ये जाणून घेता येतात.

१. **श्रध्दा-** आध्यात्मिक अस्तित्वावर विश्वास, स्वत:पेक्षा काहीतरी अधिक महान
२. **विश्वास-** जीवात्म्याच्या अस्तित्वावर निष्ठा
३. **सेवा-** इतर जीवात्म्यांच्या उन्नतीसाठी जीवात्म्याचे प्रयत्न
४. **ग्यान-** जीवात्मा हा परम-आत्म्याचा अंश आहे ही जाणीव.
५. **भक्ती-** स्वत:मधील आणि इतरांमधील परम-तत्त्वाची पूजा करण्याची क्षमता. परम-आत्म्यात विलीन होण्याचा आणि स्वत:ची ओळख गमावण्याची तीव्र इच्छा

६. **दिव्य ग्यान-** आत्मज्ञान; परम-आत्म्याचा साक्षात्कार. गुरुदेवांच्या अध्यात्माच्या शाळेत ग्यान हे गगनाला भिडण्याचा पासपोर्ट आणि अंतिम अवतरणासाठी धावपट्टी असं दोन्हीही असतं भक्ती ही *ग्यान* (जाणीव) आणि *दिव्य ग्यान* (आत्मज्ञान) यांच्यातील अंतर कमी करते. आपल्या जीवात्म्याची पूजा करताना, आपल्यामधील परम- आत्म्याच्या प्रतिबिंबाची पूजा करणं.

जर तुम्ही या सहा टप्प्यांकडे लक्ष दिलंत, तर, तुम्ही तुमच्या परिवर्तनाच्या प्रवासाचा अर्थ लावू शकता.

**श्रध्दा**

जेव्हा गुरुदेव शिबिरांमध्ये असायचे, तेव्हा लोक त्यांना भेटण्याकरता लांबवरून प्रवास करून यायचे. त्यांनी एका स्त्री भक्त सुशीलाजींना सांगितलं, ''मी स्वत:ची प्रसिध्दी केली नसली, तरी शिबिरांच्या ठिकाणांपासून खूप दूरवरच्या भागांमधून लोक आपल्या वेदना कमी करण्यासाठी माझी मदत घ्यायला येतात. त्यांची श्रध्दा (भक्ती) त्यांना माझ्याकडे घेऊन येते. कारण, ज्या गुरूंना ते भेटायला येतात, ते त्यांची मदत करतील, अशी त्यांना खात्री असते.'' गुरुदेवांना माहीत होते की गरीबी असूनही, दैनंदिन मजूरी गमावून, आवश्यक अंतर आणि प्रवास सहन करून, लोक धीरानं रांगेत त्यांच्या पाळीची वाट पहायचे, शारीरिक अस्वस्थता असूनही. त्यांच्या परिस्थितीच्या जाणीवेमुळे, महागुरू त्या लोकांना पहिल्यांदाच भेटून, त्यांना त्यांच्या तीव्र वेदनांपासून मुक्त करण्यास प्रवृत्त व्हायचे. श्रध्देचं बक्षिस देताना महागुरू हे श्रध्देसाठी परिस्थिती निर्माण करायचे.

'' शिबिरांमध्ये आलेल्यांना त्वरित आराम मिळाला, परंतु, दिल्लीत आपल्याला भेटायला आलेल्या अनेकांना मात्र का मिळाला नाही?'' या सुशीलाजींच्या प्रश्नाला उत्तर देताना गुरुदेव म्हणाले, ''जे लोक मला दिल्लीत भेटायला

येतात, त्यांपैकी बरेच जण माझ्या शक्ती तपासण्यावर अधिक लक्ष केंद्रित करतात.''

## विश्वास

विश्वास ही संज्ञा स्पष्ट करण्यासाठी अनेक रूपकं आहेत. विश्वास ही व्यक्ती करू शकणारी सर्वात महत्त्वाची गुंतवणूक आहे. कारण, श्रध्देमुळे ती सर्वाधिक परतफेड होते.

अत्यंत दयाळू मार्गानं, गुरूंवरील विश्वास हा गुरूंना आध्यात्मिक जबाबदारीच्या जाळ्यात बांधतो आणि गुरू नि विश्वासाचे गुंतवणूकदार यांच्यात प्रभावाचं क्षेत्र निर्माण करतो. गुरू, जे चैतन्याच्या अधिक उच्च पातळीवर असतात, ते आपले गुण, आपले अनुभव आणि आपलं ज्ञान गुंतवणुकीदाराबरोबर सामायिक करतात- मग तो त्यांचा अनुयायी असो, भक्त असो किंवा शिष्य असो. या देवाणघेवाणीचा परिणाम म्हणून, गुंतवणूकदार गुरूंच्या प्रभावाला आणि ऊर्जेला ग्रहण करण्यास अधिक सक्षम बनतो. गुंतवणुकदाराच्या अशा ग्रहणक्षमतेमुळे गुरूंना कमी प्रयत्न करावे लागतात. परंतु, परिणामांची वृध्दी होते. गुरू आणि गुंतवणुकदार यांच्यातील संपर्क हळूहळू वाढतो. अशा प्रकारे, गुंतवणुकदाराला आपल्या स्वत:चं देवत्व जाणवायला सुरवात होते.

विश्वासाचं स्पष्टीकरण देताना गुरुदेवांनी एकदा भाष्य केलं, ''डॉक्टर औषध लिहून देऊ शकतात. परंतु, जोपर्यंत रुग्णाचा डॉक्टरांवर विश्वास नसतो, तोपर्यंत औषधं तेवढी परिणामकारक होणार नाहीत.'' एक महागुरू म्हणून आपल्या सुरवातीच्या काळात, ते लोकांना औषधं घेणं थांबवायचा आणि त्याऐवजी पूर्ण बरं होण्यासाठी केवळ आध्यात्मिक उपचारांवर अवलंबून रहायचा सल्ला देत. ज्यांनी तसं केलं, त्यांचा खूप फायदा झाला. कानपूरच्या गुड्डनजींनी, औषधांशिवाय बरं करणाऱ्या गुरगावमधील एका गुरूंच्या उपचार शक्तींबद्दल जाणून घेतल्यानंतर, आपण चौदा वर्षांपासून घेत असलेली

गुरुदेव प्रज्ञाला आशीर्वाद देतात आणि तिच्या बरं होण्याच्या प्रक्रियेला चालना देतात



सर्व जीवनरक्षक औषधं सोडून घेण्याचा निर्णय घेतला. अशा कृत्यामुळे, आपली जगण्याची शक्यता कमी होईल, यानं भयभीत न होता, त्यांनी या अज्ञात गुरूंवरील आपला विश्वास वाढवला आणि त्यांना भेटण्याकरता त्या गुरगावला गेल्या. त्या निव्वळ बऱ्या झाल्या नाहीत, तर १९७६ सालापासून, त्यांनी कानपूर इथं गुरुदेवांनी त्यांच्या घरी उघडलेलं स्थान चालवायला भावाला मदत केली. योगायोगानं, कानपूर हे गुरगावच्या बाहेरचं पहिलं शहर होतं की जिथं महागुरूंनी स्थान उघडलं.

***गुरूंवर वृध्दिंगत झालेला विश्वास निर्माण करायला लावतो स्वत:वरील अधिक खोल श्रध्दा.***

मला गुरुदेवांवर विश्वास निर्माण व्हायला थोडा वेळ लागला. १९७७ साली जेव्हा मी त्यांना पहिल्यांदा पाहिलं, तेव्हा त्यांनी मला संधिवातापासून अंशत: बरं केलं आणि प्रत्येक गुरुवारी काही नियमांचं पालन करायला सांगितलं. मी ते नियम झुगारून दिले. कारण, मला प्रथा आणि वेदनांपासून आराम यांच्यात असलेला दुवा दिसत नव्हता. एका वर्षानंतर, संधिवात परत इतक्या तीव्रतेनं उपटला की मला दिवसातून दोनदा ॲक्युपंक्चरचा आधार घ्यावा लागला. पाच वर्षांनंतर, मी पुन्हा गुरुदेवांची मदत मागितली आणि यावेळी त्यांनी मला गुरगाव स्थानावर सेवा करायचा आदेश दिला. (ते स्थान, जे काही महिने आणि त्यानंतर काही वर्षं कधी चालू कधी बंद असायचं, ते माझं घर बनलं).

जेव्हा माझ्या मनात विश्वास निर्माण झाला, तेव्हा, मी माझ्या पत्नीला गुरुदेवांना भेटायला घेऊन गेलो,. मी त्यांच्यासमोर बसलो, तेव्हा माझ्या गालांवरून अश्रू ओघळत होते. त्यांनी माझ्याकडे पाहिलं, माझे अश्रू पुसण्यासाठी आपला रुमाल माझ्या हातात दिला आणि आश्वासन देत म्हणाले, '' जेव्हा तुम्ही तुमच्या आईला खूप दिवसांनी भेटता, तेव्हा असं होणं स्वाभाविक आहे.''त्या पालनपोषणाच्या कृतीत गुरुदेवांनी स्वत:ला आईच्या भूमिकेत साकारलं होतं. अनेक वर्षांनंतर, त्यांच्या शेतात त्यांच्या आवडत्या चारपाईवर आराम करत असताना त्यांनी

माझ्याशी केलेल्या अनौपचारिक संभाषणातून मला जाणवलं की मी जरी १९७७ साली त्यांना पहिल्यांदा भेटलो असलो, तरी १९८२ मध्ये माझा अध्यात्मात प्रवेश झाला. मला इतका वेळ का लागला, या वस्तुस्थितीबद्दलच्या त्यांच्या वक्तृत्वानं मला अवाक् केलं.

गणित सरळ होतं. मी आध्यात्मिक विकासाची पाच वर्षं वाया घालवली होती. कारण, कदाचित स्थानाला दिलेल्या पहिल्या भेटीत, माझ्या आत्म्यानं विकसित केलेली विश्वासाची जाणीवपूर्वक अभिव्यक्ती माझ्या बुध्दीनं रोखली होती. आमच्या पहिल्या भेटीत, महागुरूंनी मला आशीर्वाद दिला आणि म्हणाले, ''तू कल्पना करू शकणार नाहीस, त्यापेक्षा तुला खूप जास्त मिळेल.'' आणि मी खात्री देऊ शकतो की माझ्या गुरूंनी उच्चारलेला प्रत्येक शब्द खरा ठरलाय! अशी गोष्ट केवळ माझ्यासाठीच घडली असं नाही. माझ्या बहुतेक *गुरुभाईंकडे* गुरुदेवांवरील विश्वास आणि त्यांच्या परोपकाराबद्दल सांगण्यासाठीच्या अनेक कथा आणि उदाहरणं आहेत.

भाग्यवान ते आहेत, जे विश्वासाला त्वरित जन्म देतात. ते श्रध्देच्या टप्प्याला मागे टाकून, त्यांच्या आध्यात्मिक परिवर्तनाचा वेगवान मागोवा घेतात. विश्वास हा अखेरीस, प्रगतीला परिवर्तनाच्या पुढील टप्प्यावर चालना देतो आणि अन्य टप्प्यांना आधार देणारी अंतर्निहित शक्ती म्हणून कार्य करतो.

## सेवा

अध्यात्माच्या शब्दकोशात, *सेवा* हा बहुधा सर्वात लहान शब्दांपैकी एक, पण सर्वात महत्त्वपूर्ण शब्द आहे. आत्म्याच्या प्रवासात श्रध्दा सर्वात महत्त्वाची आहे. कारण, इतरांच्या सेवेतच तुम्ही खरोखर तुमच्या सर्वोत्तम हिताची सेवा करता.

महागुरूंनी लोकांना भेटण्यात, त्यांना बरं करण्यात आणि त्यांना शिकवण्यात तासन्तास घालवले. ते ही *सेवा* करण्यात आपल्या शिष्यांची मदत घेत, त्यांना

शक्तिशाली मंत्र शिकवत आणि आध्यात्मिक तसेच मानसिक रीत्या बदलायला साहाय्य करत. जेव्हा गुरुदेवांना शिष्य पुरेसे विकसित झालेले आढळत, तेव्हा ते काहीजणांमध्ये लोकांवर उपचार करण्याच्या आणि असंख्य लहान-मोठ्या मार्गांनी *सेवा* करण्याच्या शक्तीला कळकळीनं आवाहन करत. त्यांनी जगातील विविध भागांमध्ये, शंभरहून अधिकजणांना आध्यात्मिक उपचार करण्याचं प्रशिक्षण दिलं. गुरुदेवांच्या मृत्यू झाल्यावर, अनेक दशकांनंतरही, हजारो लोक त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गुरुदेवांच्या समाधीला भेट देतात. याच कारणासाठी, देशभरातून हजारो लोक त्यांच्या शिष्यांच्या घरी सुद्धा भेट देतात. मदत करायला आणि उपचार करायला सदैव तयार असणारे गुरुदेवांचे शिष्य, त्यांनी केलेल्या सेवेच्या बदल्यात पैसे आकारत नाहीत किंवा उपकार घेत नाहीत.

दुसऱ्याची *सेवा* करण्यासाठी माणसाला फार मोठा त्याग करावा लागतो. कारण, *सेवा* करणाऱ्याला स्वत:च्या आधी इतरांच्या गरजांना प्राधान्य द्यावं लागतं. जेव्हा प्रदीपजींची मुलगी प्रज्ञा जिन्यावरून पडली, तेव्हा तिच्या डोक्याला दुखापत झाली आणि ती अर्धचेतन अवस्थेत गेली. डॉक्टरांनी परिस्थिती गंभीर असल्याचं सूचित केलं. त्यामुळे, प्रदीपजींनी तिला गुरुदेवांची मदत मिळावी म्हणून, गुरगावला नेण्याचा निर्णय घेतला. परंतु, प्रदीपजींनी प्रथम, एका कर्करोगाच्या रुग्णासोबत वेळ घालवला. त्या रुग्णाच्या वडिलांना पडलेल्या स्वप्नात त्यांनी प्रदीपजींना आपल्या मुलाला बरं करताना पाहिलं होतं. अखेरीस, काही तासांनंतर, जेव्हा प्रदीपजी आणि त्यांचं कुटुंब आपल्या गुरूंना भेटलं, तेव्हा गुरुदेव हसले आणि त्यांनी प्रज्ञाला आशीर्वाद दिला. गुरुदेवांचा उपचार करणारा स्पर्श तिच्या बरं होण्याला कारणीभूत ठरला.

**इतरांची सेवा करताना तुम्ही स्वत:ची सेवा करता** हे एक साधं सूत्र आहे. ते अनेक स्तरांवर कार्य करतं. तुम्ही ज्यांची *सेवा* करता, त्यांच्या शुभेच्छा किंवा आशीर्वाद हे तुमची आभा वाढवण्याचं कार्य करतात. त्यामुळे, तुमच्या ऊर्जाबँकेत भर पडते. शिवाय, कर्माचे नियम हे कोणत्याही सेवेच्या अनुषंगानं

तुमचा विचार, तुमची वेळ आणि तुमचे श्रम यांचा जो त्याग झालेला असतो, त्याची भरपाई करतात. त्यामुळे, *सेवेच्या* दरम्यान, तुम्ही तुमचं जे गमावता, ते तुम्ही तुमच्या चांगल्या कर्मानं कितीतरी पटीत मिळवता!

*सेवा* तुम्हाला छान वाटायला लागते आणि ती तुमचं आत्मचिंतन वाढवते. अधिक चांगल्या आत्मचिंतनामुळे, मृत्यूनंतर आत्म-निवाडा अधिक फायद्याचा बनतो. कारण, तुमचा आत्मा हा परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्वत:ला उच्च स्तरावर पहातो. अनेक शक्तिशाली आत्मे आपल्या मानवी स्वरूपांतून बाहेर पडल्यानंतर, बराच काळ लोकांना मदत करतात नि त्यांच्यावर उपचार करत रहातात. गुरुदेव अनेकदा म्हणायचे की ते कुत्र्याला सुध्दा लोकांची सेवा करण्यासाठी उपचार करण्याची क्षमता देऊ शकले. कालू नावाचा गुरगावात रहाणारा एकनिष्ठ कुत्रा लोकांच्या जखमा चाटून, त्यांना बरं करू शकायचा. औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींचा विविध प्रकारच्या औषधी पाककृतींमध्ये वापर केला जातो. *सेवा* ही एक प्रकारचं व्यावहारिक अध्यात्म आहे, जी सर्व प्रकारच्या सजीवांद्वारा केली जाते.

***जेव्हा तुम्ही सेवा करता दुसऱ्या जीवात्म्याची, तेव्हा तुम्ही सेवा करता जीवात्म्याची तुमच्या स्वत:मधील. म्हणून, ज्याची तुम्ही निवड करता परिवर्तनासाठी, ते करतं तुमचं परिवर्तन.***

## ग्यान (ज्ञान)

*ग्यान* हे आध्यात्मिक परिवर्तनाचा चौथा टप्पा सूचित करतं. ते विविध बाह्य नि अंतर्गत स्रोतांमधून प्रकट होतं. ते आत्मसात करण्यात इंद्रियं महत्त्वाची भूमिका बजावतात. कारण, पाहिलेल्या, वाचलेल्या, ऐकलेल्या, बोललेल्या, चव घेतलेल्या, स्पर्श केलेल्या गोष्टी आत्मनिरीक्षण करायला प्रेरित करतात. आकस्मिकपणे, तुमच्या मनात प्रतिबिंब उमटतं, कधी कधी कोणत्याही गोष्टीवरून आणि काही वेळा कुठूनही. पालक, शिक्षक आणि गुरू यांच्याबरोबरची

संभाषणं देखील अंतर्ज्ञानाला प्रेरित करू शकतात. काहीवेळा, स्वप्नं आणि दृष्टांत हे जागृत अवस्थेपेक्षा आधिक सत्य भासू शकतात. ते असे पैलू प्रकट करतात की ज्यांचं जागरूक मनाला सामान्यपणे पूर्णत: आकलन होऊ शकत नाही. यामुळे, अंतर्ज्ञान वाढतं आणि तुम्ही जे बोलता, ते बरेचदा खरं ठरतं. हे सर्व आणि बरंच काही तुम्हाला ग्वाही देतं की तुमच्या अंतरात देवत्व आहे. जरी रंगछटा सौम्य असल्या, तरी, तुमच्या अलौकिकतेनं आपले रंग (आपलं खरं स्वरूप) दाखवायला सुरवात केलेली असते.

बहुतेक लोक या टप्प्यात असताना, स्वत:वर अत्यंत प्रभावित असतात. त्यांना हे माहीत नसतं की त्यांना जे दिसतं किंवा जाणवतं, ते निव्वळ *दिव्य ग्यानाची* झलक असते. *ग्यान* हाताळणं िततकंच महत्त्वाचं आहे, जितका *ग्यानाचा* शोध घेणं. अहंकार, अभिमान, कर्तेपणाची भावना आणि फुशारकी हे आत्मज्ञानाच्या मार्गावर प्रचंड गतिप्रतिबंध होऊन, अडथळे निर्माण करू शकतात.

याचा अर्थ, *ग्यान* हे साधी जाणीव असण्यापेक्षा अनुभूतींच्या मालिका आहे. *ग्यान* तुम्हाला कट्टरतावादी बनण्यापासून मुक्त करतं, विशेष म्हणजे आत्मपरिवर्तनाच्या निकडीची प्रकर्षानं जाणीव करून देतं आणि मनात भक्ती जागृत करतं.

## भक्ती

शास्त्रीय हिंदू धर्मग्रंथांमध्ये भक्तीचा उल्लेख देवाच्या वैयक्तिक रूपावर तीव्र प्रेम आणि भक्ती असा केला जातो. भक्त हा मित्र, मूल, किंवा देवाचा सेवक अशी भूमिका गृहीत धरून देवाप्रति आपली भक्ती व्यक्त करू शकतो. त्या देवाचं मित्र, पालक, शिक्षक किंवा गुरू अशा रूपांत मानवीकरण होऊ शकतं. या प्रकारची भक्ती ही चटकन भावनावश होणारी आणि भावनिकरीत्या जागृत केलेली असते.

गुरुदेवांनी आमच्यात भक्तीचा पर्यायी दृष्टिकोन निर्माण केला. त्यांनी भक्तीची व्याख्या भावनाविरहित आत्म-पूजा अशी केली. त्यांच्यासाठी फक्त एकच नातं होतं, ते म्हणजे आंतरिक 'मी' आणि बाह्य 'मी'चं. जोपर्यंत हे दोन 'मी' एकत्र येत नाहीत, तोपर्यंत आध्यात्मिक परिवर्तन अपूर्ण असतं. म्हणून, भक्ती ही द्वैतावर विजय मिळवण्याची आणि अद्वैताची जाणीव करून घेण्याची प्रक्रिया आहे.

''सुखावर विजय मिळवण्याकरता, दु:खावर विजय मिळवलाच पाहिजे,'' या गुरुदेवांच्या सल्ल्यामुळे, भक्तीसंबंधी माझा जो चार वर्षांपूर्वीचा संकेत होता, तो लोप पावला. द्वैतावर विजय मिळवण्याच्या माझ्या ध्येयामुळे, माझं व्यक्तिमत्त्व लवकरच उद्ध्वस्त केलं. मी एक जी भपकेबाज, गर्विष्ठ, लाघवी बोलण्याची कला असलेला लोकप्रिय माणूस होतो, तो आता मितभाषी आणि गंभीर माणूस बनलोय. मी क्वचितच मला स्वत:ला मौजमजा करायची परवानगी दिली आणि दिखाऊगिरी करणाऱ्या माणसापेक्षा समाजापासून दूर रहाणाऱ्या माणसासमान वागलोय! जशी मी माझी ओळख गमवायला सुरवात केली, तसं, स्वत:बद्दल कौतुक वाटण्यापेक्षा, स्वत:बद्दलचा खोटा आत्मविश्वास कमी झाला. मी दररोज सहा तास मंत्रपठण करायचो आणि काही मंत्रांमध्ये मी सिध्द झालो. शिव-परिवाराच्या शक्ती माझ्या हातांवर प्रतीकं म्हणून प्रकट झाल्या. महागुरूंनी दिलेल्या या सिध्दींच्या देणगीमुळे, ती चार वर्षं पूर्ततेची वर्षं म्हणून कृतार्थ ठरली.

माझ्या परिवर्तनाला मदत झाली ती मनावर नियंत्रण मिळवणं आणि दोष-निर्मूलन करणं यांसाठी केलेल्या अविश्रांत प्रयत्नांमुळे. या कालावधीच्या शेवटी, गुरुदेवांनी मला मुंबईत एक स्थान उघडण्याची आणि ते चालवण्याची जबाबदारी दिली. ते म्हणाले, ''आता तू *ग्यान* सामायिक करायला आणि *सेवा* करण्यासाठी इतर लोकांना तयार करायला सज्ज झाला आहेस.''

*जसं भक्ताचं मन ज्ञानेंद्रियांच्या वस्तुनिष्ठ स्थितीत,*
*भावनेनं प्रभावित न होण्याच्या अवस्थेत प्रवेश करतं आणि मुक्त*
*करतं स्वतःला बौध्दिक चौकशीपासून, तेव्हा प्रकट करू*
*लागतं आत्मज्ञान स्वतःला.*

## दिव्य ग्यान

उत्कट भक्तीमुळे, ज्याला तिसरा डोळा देखील म्हणतात, असं आज्ञाचक्र उघडलं जाऊ शकतं. जेव्हा तिसरा डोळा उघडतो, तेव्हा बऱ्याच गोष्टी शक्य होतात. जेव्हा मी गुरुदेवांकडे माझा तिसरा डोळा उघडल्याचा उल्लेख केला, तेव्हा त्यांनी माझ्या डोक्यावर दोन्ही हात ठेवले आणि ते माझ्या पाठीच्या खालच्या बाजूपर्यंत फिरवले. मला स्वाभाविकपणे कळलं की माझा तिसरा डोळा बंद करण्यासाठी गुरुदेव माझी कुंडलिनी खाली करत होते. ''यामुळे मिळणारा आनंद तू उपभोगायला लागशील आणि या स्तरावर अडकून पडशील, ओलांडून पुढे जायला असमर्थ बनशील'', त्यांनी स्पष्ट केलं. बऱ्याच वर्षांनंतर, ध्यानात बसलेलो असताना, मी अतिशय उत्कर्षपूर्ण अशीही अवस्था अनुभवली. माझ्या नाकाच्या पाकळीवर, माझ्या डोक्याच्या मागच्या बाजूला पातळ कागदासारखं काहीतरी फाटलं आणि माझ्या पाठीच्या मागे काय आहे ते मला अचानक दिसलं. मी असं मानतो की प्रतिकात्मकदृष्ट्या, याला चौथा डोळा उघडणं असं म्हणता येईल. काही मिनिटांसाठी, चौथा डोळा उघडा राहिला. तो कसा उघडला आणि कसा बंद झाला हे मला जाणीवपूर्वक आठवत नाही. मला उच्च चैतन्याचं पूर्वावलोकन देण्याचा हा बहुधा गुरुदेवांचा मार्ग होता!

जरी महागुरूंनी चौथा डोळा अविरतपणे चालू ठेवण्याची परवानगी दिली नसली, तरी, ज्यांना अजून अनुभव घ्यायचाय, त्यांना कथन करण्याकरता हा एकमेव अनुभव माझ्यासाठी पुरेसा आहे. *दिव्य ग्यानाच्या* अवस्थेत, मुक्त

केल्या गेलेल्या शक्तींवर विसंबून, व्यक्ती सतत जागरूक राहू शकते, स्पष्ट संवेदना जागृत करू शकते, स्वत:ची ऊर्जा-पिंडं तयार करू शकते, एकाच वेळी दोन ठिकाणी अस्तित्वात राहू शकते आणि असं बरंच काही करू शकते. महागुरू ज्या महाप्रभावांना आपल्या इच्छेनुसार बोलावू शकत होते, त्यांची यादी खूप मोठी होती!

*दिव्य ग्यानाच्या* अवस्थेत, माणसाचं चैतन्य मनसोक्तपणे हेलकावे खातं. जेव्हा महागुरूंचं चैतन्य शिव रूपाकडे वळलं, तेव्हा त्यांच्या डोळ्यांचा रंग हलका झाला आणि चेहऱ्यावरील हावभाव खेळकर ते गंभीर असे बदलले. त्यांचा आवाज जड झाला, जणू तो त्यांच्या खोल आतून येत होता. आम्हाला ताबडतोब एका बलाढ्य शक्तीची उपस्थिती जाणवली आणि एक विचित्र धास्ती नि भीती वाटली.

गुरुदेवांचे शब्द सामान्यत: सरळ असत, जेव्हा ते स्वत:मधील परमात्म्याचा संकेत करत. त्यांच्या बांधिलकीच्या ताकदीमुळे, त्यांचे हे शब्द, ''मी त्याची काळजी घेईन,'' आणि ''मी इथं असताना काळजी का करायची ? '' अत्यंत आश्वासक होते. सुरेश कोहलीजींची माती सर्वेक्षकाशी (गुरुदेवांशी) पहिली भेट झाल्यानंतर (नंतर ते सुरेशजींचे गुरू बनणार होते), गुरुदेवांची एक त्रिमितीय प्रतिमा दररोज रात्री अशा एका कपाटावर दिसू लागली, जे काही अंशी घरगुती मंदिरात रूपांतरित केलं होतं. जेव्हा सुरेशजी ध्यानात बसायचे, तेव्हा ती त्रिमितीय प्रतिमा प्रकट व्हायची आणि जेव्हा ते ध्यानातून बाहेर यायचे, तेव्हा ती अदृश्य व्हायची. हे असं सलग सात रात्री घडलं. मात्र, आठव्या दिवशी नाही. जेव्हा सुरेशजींनी गुरुदेवांना विचारलं की त्यानी प्रकट होणं का थांबवलं, तेव्हा, ''जेव्हा जेव्हा तुम्ही माझी प्रतिमा पहाल, तेव्हा स्वत:ला आठवण करून द्या की तुम्हाला देव सापडलाय,'' महागुरूंचं हे उत्तर ना दिखाऊ होतं, ना अहंकारी होतं, परंतु, ते त्यांच्या चैतन्याच्या पातळीचं वास्तविक प्रतिबिंब होतं.

महागुरू क्वचितच मंदिरांमध्ये जात. कारण, त्यांना देवतांच्या ऊर्जांच्या संतुलनात ढवळाढवळ करणं नापसंत होतं. तरीही, ते आपल्या शिष्यांना आपण शिफारस केलेल्या पवित्र स्थळांना भेट द्यायला सांगायचे. बद्रिनाथ मंदिराच्या बाहेर उभे राहून, महागुरूंनी मला आत जायला आणि पीठासीन देवतेच्या पुतळ्याला 'मोठा भाऊ' अशी हाक मारून मिठी मारायला सांगितलं. मी तसं केलं, हे सांगण्यासाठी जेव्हा मी बाहेर आलो, तेव्हा गुरुदेव मला म्हणाले, ''तुला परत जायची गरज आहे, कारण, तू चुकीच्या देवतेला मिठी मारलीस!'' माझी मती गुंग झाली आणि मी गर्दीशी धैर्यानं सामना करायला नि पुतळ्याला मिठी मारण्यासाठी परत आत जायला नाखूष होतो! म्हणून, आवेगानं, बालिश पण उत्स्फूर्त कृतीत मी त्यांचा हात पकडला आणि त्यांना आत खेचलं. आम्ही चालत असताना, दोन्ही बाजूंच्या लांब रांगा विभागायला लागल्या नि आमच्यासाठी एक सरळ रस्ता मोकळा झाला. काही मिनिटांतच आम्ही मंदिराच्या पीठासीन देवतेसमोर असल्याचं आम्हाला जाणवलं. महागुरूंनी माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाले, ''आता तुला काय करायचंय, ते कर.''

ग्यानासंबंधी बिट्टुजींच्या प्रश्नाला उत्तर देताना, महागुरू म्हणाले, ''माझ्या सर्व शिष्यांच्या अंतरात *ग्यान* आहे, जरी त्यांना जाणीवपूर्वक माहीत नसलं तरीही. जेव्हा केव्हा गरज पडेल, तेव्हा *ग्यान* स्वतःच उदयाला येईल.'' माझा वैयक्तिक अनुभव गुरुदेवांच्या शब्दांना पुष्टी देतो. मी मुंबईमध्ये एक स्थान उघडल्यानंतर, काही काळातच, एका रात्री, एका *जिन्ननं* (एका मानव किंवा पशूच्या रूपातला अदृश्य आत्मा) माझ्यावर हल्ला केला. तो माझा गळा घोटत असल्याचं जेव्हा मला दिसलं, तेव्हा मी अंथरुणातून बाहेर पडलो. ते पहाताच, तो अधिक आक्रमक झाला. महागायत्री मंत्रानं त्याचा हल्ला कसा परतावून लावायचा हे मला उपजत प्रेरणेनं माहीत होतं!

जीवात्म्याची ओळख - अहं किंवा 'मी'पणा पूर्णपणे पुसून टाकणं ही एक पायरीपायरीनं कायापालट करणारी प्रक्रिया आहे. आणि याला काही वर्षंच नाही, तर अनेक जन्मंही लागू शकतात! आध्यात्मिक परिवर्तनात एका लोकातून दुसऱ्या लोकात जाणं आवश्यक आहे. जरी सर्वोच्च लोकांमध्ये नाही, तरी निदान, एकदा का उच्च लोकात तो पोहोचला की काहीही फरक पडत नाही. अहंकार सौम्य होतो, आणि त्याला 'मी कुणी नाही', याची जाणीव होते. हे परम *ग्यानाचे* संचय आहेत.

(जीवात्मा अशी) तुमची ओळख परम-आत्म्याच्या विमोचनात विरघळणं ही या शेवटच्या टप्प्याची अंतिम अवस्था आहे. ही खोडून टाकण्याची प्रक्रिया मोक्ष मिळवण्याचा आधार आहे. एक जवळजवळ अशक्य विक्रम, परंतु तांत्रिकदृष्ट्या साध्य करता येण्याजोगा!

जेव्हा तुम्ही तुमच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेमधून रमत-गमत फिरता, तेव्हा लक्षात ठेवा की विकासाच्या दृष्टीनं असणाऱ्या सहा अवस्था या ना एकरेषीय असतात किंवा समांतर असतात. त्या एकमेकींशी युती करून कार्य करतात. श्रध्दा आणि विश्वास या पहिल्या दोन अवस्था परिवर्तनाच्या प्रक्रियेचा पाया आणि केंद्रबिंदू म्हणून काम करतात. *सेवा, ग्यान* नि *भक्ती* या अवस्था एकत्र मिसळतात आणि एकमेकांवर आधारित असतात. भक्ती ही शक्तीच्या ऊर्जा आत्मसात करते. सेवा ही वृध्दी करायला नि उत्कट बनवायला मदत करते. ऊर्जा वृध्दी ही कुंडलिनीच्या आरोहणाचं साधन बनते. जेव्हा हे आरोहण आज्ञा चक्रापर्यंत पोहोचतं, तेव्हा *ग्यान* एक वास्तव बनतं. जेव्हा उरलेल्या अवस्था परिपूर्तीत पूर्णपणे परिपक्व होतात, तेव्हा *दिव्य ग्यानाचा* अंतिम टप्पा उदयाला येतो.

# आध्यात्मिक परिवर्तनाची साधनं

आध्यात्मिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अनेक अवस्थांच्या मालिकांचा समावेश होतो आणि ही प्रक्रिया काही साधनांमुळे सक्षम केली जाते. ही साधनं प्लंबिंगसारखं कार्य करतात आणि परमचैतन्य म्हणून स्वत:ची जाणीव आणि अभिव्यक्ती कमी करणारे असे सर्व स्तर दूर करतात.

गुरुदेवांच्या आध्यात्मिक निर्देशपत्रात तीन साधनं सूचित केली आहेत:

- ऊर्जा स्थिर करण्यासाठी गुण
- ऊर्जा सक्रिय करण्यासाठी मंत्र
- ऊर्जा संवर्धनासाठी सेवा

जर तुम्हाला प्लंबिंगचा उपयोग चातुर्यानं कसा करायचा हे माहीत नसेल, तर तुम्ही परिवर्तनाच्या प्रक्रियेत बुडू शकता. योग्य साधनं तेवढीच उपयुक्त असतात, जितकं त्यांचा उपयोग करण्याविषयीचं ज्ञान उपयुक्त असतं. गुरुदेवांचा आमच्याशी असलेला संबंध अत्यंत सूक्ष्म होता. जेव्हा त्यांनी आम्हाला उडायला शिकवलं, तेव्हा त्यांनी आमच्या हातांमध्ये अल्टिमीटर आणि मॅचमीटरची नियंत्रणं ठेवली. तथापि, हवाई-वाहतूक नियंत्रकाच्या आपल्या भूमिकेत असताना, त्यांनी आमच्या उड्डाणांच्या कौशल्यपूर्ण हालचालींना उडण्यापासून ते जमिनीवर उतरण्यापर्यंत मार्गदर्शन केलं.

## गुण

निसर्ग हा परम चैतन्याचं भौतिक प्रकटीकरण आहे. कोणतीही सजीव अथवा निर्जीव सृजनशील निर्मिती ही सत्त्व, रजस् आणि तमस् या तीन प्रकारच्या सूक्ष्म शक्ती किंवा गुणांनी बनलेली असते. प्रत्येक गुणामध्ये खास वैशिष्ट्यं असतात. ती व्यक्तीला तिच्या अहंकाराशी बांधून ठेवतात आणि परम-आत्म्याशी तिची ओळख मर्यादित ठेवतात. प्रत्येकात, हे गुण एकमेकांशी सतत संवाद साधतात आणि कोणत्याही वेळी, तिघांपैकी एक गुण दुसऱ्या दोघांवर सर्चस्व गाजवतो. गुणमिश्रणाचा परस्परसंवाद हा जीवात्म्यात स्थूल नि सूक्ष्म अशा दोन्ही पातळ्यांवर जीवात्म्याचा स्वभाव आणि व्यक्तिमत्त्व ठरवतो. ज्याप्रमाणे, एखादा कसलेला कलाकार हा लाल, पिवळा नि निळा या तीन प्राथमिक रंगांची दशलक्ष मिश्रणं तयार करू शकतो, त्याचप्रमाणे, गुण मिश्रणामध्ये सुध्दा बहुविध संमिश्रणं असू शकतात.

| गुण | विशेष | परिणत होणे | फलित / निष्पत्ति |
|---|---|---|---|
| तमस | जडत्व<br>मंदपणा<br>शंका | नकारात्मक भावना<br>सुस्ता<br>नैराश्य<br>वेड<br>निद्रा<br>निष्क्रियता | स्वत:बद्दल नि दुसऱ्यांबद्दल भावशून्यता<br>उदासीनता |
| रजस् | महत्त्वाकांक्षा<br>इच्छा<br>भावना<br>कृता | वैयक्तिक कामगिरींवर लक्ष केंद्रित करणं<br>राग, हाव,<br>आसक्ती, वासना, उर्मटपणा<br>अतिक्रियाशीलता | स्वत:बद्दल सहानुभूती नि दुसऱ्यांबद्दल भावशून्यता<br>वेदना |
| सत्त्व | शांतता<br>साधी रहाणा<br>खूप उच्च विचारसरणा<br>किमान चौकटीत रहाण्याची जीवनशैली | इंद्रियांवर ताबा<br>काटकसर<br>कृतज्ञता<br>शांत / चिंतामुक्त वृत्ता | स्वत:बद्दल नि<br>इतरांबद्दल सहानुभूती<br>आनंद |

तुमच्या शरीर-मन-आत्मा अशा गुंतागुतीच्या मिश्रणात, गुणांचा समतोल साधणं हा जीवनाचा हेतू असला पाहिजे जेणेकरून, सत्त्वाचं वर्चस्व राहील आणि रजस् नि तमस् हे कमीत कमी होतील. तमस् चं सत्त्वात रूपांतर होण्यापूर्वी, त्याचं रजस् मध्ये रूपांतर झालं पाहिजे. कारण, रजस् ची गतिमान क्रिया तमस् चं जडत्व तोडण्यासाठी आवश्यक ऊर्जा प्रदान करते. इंद्रिय नियंत्रण आणि भावनिक अलिप्ततेद्वारा रजस् चं सत्त्वात रूपांतर केलं जाऊ शकतं. उपरोधानं म्हणायचं तर, जेव्हा अलिप्तता ही सत्त्वगुण वाढवते, तेव्हा अलिप्त होण्याचा आनंद स्वत:च एक बंधन बनतो.

दीर्घ कालवधीसाठी सात्त्विक अवस्थेत असलेले लोक हे मोठ्या प्रमाणात सेवा करतात तथापि, आपली सेवा आपल्या जीवात्म्याला किंवा गुरूंना अर्पण करण्याऐवजी, ते अपल्या कृत्यांचं श्रेय घेतात आणि स्वत:ला कर्तेपणाच्या भावनेशी जोडतात. परिणामी, सेवा करणारा ‘मी’ हा परम-आत्म्याच्या ‘मी’ पेक्षा वेगळा असतो. केवळ सत्त्वाच्या पलीकडे जाऊन, या अनुभवजन्य द्वैताचं निराकरण होऊ शकतं.

मल्होत्राजींना आपला पहिला शिष्य म्हणून स्वीकारण्यापूर्वी, गुरुदेवांनी आपल्या *सिध्दींचा* त्याग केला होता. हरिद्वारमधील हर की पौरी इथं गंगेत डुबकी मारून, गुरुदेवांनी त्या सोडून दिल्या. आपल्या *सिध्दींचं* विसर्जन करून, त्यांनी आपल्या आसक्तीचे शेवटचे अवशेष धुऊन टाकले. ही अंतिम सोडचिठ्ठी हा एका सामान्य साधकाकडून एका असामान्य गुरूमध्ये परिवर्तन होण्याचा प्रारंभ होता.

माझा प्रयत्न फक्त तुम्हाला महागुरूंच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून देण्याचा आहे, माझं मत लादायचा नाही. सत्त्वाच्या पलीकडील वास्तविक अनुभवातीत अवस्थेचं विवेचन करण्याकरता मला कर्माचा एक पैलू स्पष्ट करणं आवश्यक आहे. तो पैलू म्हणजे स्वीकृती- नकारात्मक कर्मं टाळण्याची

किंवा सकारात्मक कर्मांशी चिकटून न रहाण्याची अढळ क्षमता; प्रत्येक कृती केवळ आपलं कर्तव्य म्हणून करणं आणि यापेक्षा उत्तम आणखी काही नाही. असं जर झालं, तर ना तमस् ची अनास्था राहील, ना रजस् चं दु:ख, ना सत्त्वाचं सुख. जोपर्यंत तुम्ही सत्त्वाच्या पलीकडे जात नाही, तोपर्यंत तुम्ही *ग्यान* आणि भक्तीच्या पायऱ्यांपर्यंत उन्नत होऊ शकत नाही. *दिव्य ग्यानाच्या* अवस्थेत चढण्याकरता, गुण हे स्थिर व्हायला पाहिजेत आणि इच्छेनुसार उपयोगात आणता आले पाहिजेत.

ही संकल्पना समजण्यासाठी एक साधं उदाहरण पाहू. जागं रहाण्याकरता तुम्ही चहा किंवा कॉफी पिऊ शकता. तथापि, जर तुम्ही तुमच्या गुणांचं जाणीवपूर्वक व्यवस्थापन करायला शिकलात, तर तुम्हाला यापुढे, बाह्य उत्तेजकांची गरज भासणार नाही आणि जेव्हा तुम्हाला झोपायचं असेल, तेव्हा तमस् ला अथवा जेव्हा तुम्हाला जागं रहायचं असेल, तेव्हा तुम्ही रजस् ला हाक मारू शकता.

महागुरूंकडून शिकण्यात ज्यांनी अनेक वर्षं घालवली, अशा एका उत्कट भक्ताचा विरेंद्रजींचा शब्दश: वृत्तांत महान गुरूंच्या गुणांवर प्रकाश टाकतो. ''गुरुदेवांमध्ये मी सर्वोत्कृष्ट आत्मसंयम पाहिला. ते पैसा, स्त्रिया किंवा स्तुतीनं आकर्षित झाले नाहीत. त्यांना कोणतीही गोष्ट प्रभावित करू शकली नाही. तुम्ही कल्पना करू शकता का की लोकांच्या रांगा एक किलोमीटरपर्यंत जात असत नि ते दिवसातून १८ ते २० तास उभे रहात, थकव्याचा किंवा अस्वस्थतेचा मागमूसही न दाखवता, ते खोलीत यायचे, एक ग्लास पाणी प्यायचे, ५ मिनिटं बसायचे आणि लोकांना आशीर्वाद देण्यासाठी पुन्हा बाहेर यायचे, आणि चमत्कार घडायचे! ''

तुमच्या मृत्यूच्या वेळी असणारं तुमच्या गुणांचं मिश्रण हे तुमच्या पुढच्या जन्माची वैयक्तिक पात्रता बनतं. त्या आधारावर, तुम्हाला अनेक लोकांपैकी एका लोकात निवास किंवा स्थायी निवासासाठी अनुमती दिली जाते.

## मंत्र

गूढ असलेल्या बुड्ढे बाबांनी गुरुदेवांना त्यांच्या पहिल्याच भेटीत ते पठण करत असलेल्या मंत्रातील हरवलेले शब्द दिले. त्या आठ शब्दांची भर पडल्यामुळे, गायत्री मंत्राचं महागायत्रीत रूपांतर केलं. विस्तारित मंत्रानं गुरुदेवांच्या आध्यात्मिक प्रगतीची गती वाढवली आणि आणि तो मंत्र त्यांच्या अनेक *सिध्दींची* नांदी बनला.

गुरुदेवांचे मंत्र गुप्त होते आणि ते फक्त त्यांच्या शिष्यांना नि भक्तांनाच माहीत होते. अधिकृत केल्याशिवाय, ते सामायिक केले जात नसत. कारण, एखाद्याला मंत्र देताना, ती व्यक्ती तिच्या ऊर्जेचा काही भाग देखील देत असते. शिवाय, देणारा हा आध्यात्मिकरीत्या ग्रहणकर्त्यामध्ये गुंतून पडतो आणि त्याच्या आध्यात्मिक संगोपनाची जबाबदारी घेतो.

तांत्रिकदृष्ट्या, मंत्र हे ध्वनी ऊर्जेशिवाय दुसरं काहीही नाहीत. ध्वनी ही ब्रह्मांडाची मूलभूत ऊर्जा आहे आणि म्हणूनच, प्रत्येक गोष्टीच्या पुनरावृत्तीचा वेग असतो, ज्याला अनुसरून, ती नैसर्गिकरीत्या कंपन पावते. म्हणून, प्रत्येक शब्दरूपाचं एक अद्वितीय कंपन असतं आणि प्रत्येक कंपनाचं एक अद्वितीय शब्दरूप असतं. तुमच्यातील सूक्ष्म ऊर्जा सक्रिय करण्याकरता मंत्र सराव कारणीभूत ठरतो. त्यामुळे, तुमची नैसर्गिक कंपनं ही मंत्रानं सादर केलेल्या शक्तीच्या कंपनाशी जुळवून घेऊ शकतात.

मंत्र हा बहुधा एकच शब्द असतो किंवा एकत्र गुंफलेल्या शब्दांचं एकत्रीकरण असतं आणि इच्छित हेतूसहित त्याचं वारंवार पठण केलं जातं. प्रत्येक शब्द हा अद्वितीय वारंवारता असलेला ध्वनी लहरी असतो. त्यामुळे, जेव्हा मंत्रातील सर्व शब्द एकत्रितपणे उच्चारले जातात, तेव्हा, संपूर्ण मंत्रामध्ये एक शक्तिशाली कंपन होतं. या कारणास्तव, मंत्राचा योग्य उच्चार त्याच्या शक्तीला चालना देण्यासाठी कारणीभूत ठरतो.

वारंवार मंत्र पठण केल्यामुळे, अशी एक वेळ येते की जेव्हा तुम्ही मंत्राच्या आवृत्तीनुसार कंपन पावू लागता आणि त्या मंत्रात *सिध्द* म्हणून पात्र होऊ शकता. त्या टप्प्यावर, मंत्राची शक्ती आणि मंत्राचं रूप तुमच्यामध्ये जागृत होतं आणि आत्म-संरक्षण, उपचार आणि इतरांना मदत करणं अशा विविध उद्देशांसाठी तो मंत्र एक साधन म्हणून सहजतेनं उपलब्ध होऊ शकतो.

गुरुदेवांनी सुमारे आठ मंत्रांसह कार्य केलं. त्यांपैकी काही मंत्र हे दोन किंवा तीन मंत्रांचं मिश्रण होते. नकारात्मक ऊर्जा टाळण्यापासून ते मृत्यू थांबवण्यापर्यंत आणि आयुष्य वाढवण्यापासून ते चैतन्याच्या उच्च प्रकारांमध्ये अलगद प्रवेश करण्यापर्यंत, महागुरूंचे मंत्र हे सर्वात शक्तिशाली ऊर्जांना आवाहन करतात.

गुरुदेवांनी कोणत्याही मंत्राचा मोठ्यानं पठण न करण्याचा सल्ला दिला. तोंड बंद ठेवून, मंत्रांचं मनातल्या मनात पठण करायचं असे आणि ध्वनी हे बाहेरच्या दिशेनं न जाता आतमध्ये वळवले जात. त्यांचा असा आदेश होता की आपल्या दैनंदिन दिनचर्येतील एकसुरीपणात शांत, आंतरिक पठण *(अजपा जप)* चालू ठेवावं. दिवसभरात शक्य तितक्या वेळा मंत्रांचं पठण करावं लागे, मग ते उभे राहून, बसलेले असताना, पहुडलेले असताना, स्वयंपाकघरात किंवा कार्यालयात काम करत असताना किंवा वाहन चालवत असताना असो. तथापि, त्यांचा असा सल्ला होता की जर आम्ही झोपण्यापूर्वी एखादा मंत्र म्हटला, तर तो मंत्र आमच्या सुप्त मनामध्ये, आम्ही जोपर्यंत जागे होत नाही, तोपर्यंत चालू राहील. (मंत्राची पुनरावृत्ती वाढवण्याची ही त्यांची गुप्त सूचना होती.)

## मंत्राचा सराव

महागुरूंनी मंत्राचा नियमित सराव करताना तीन स्थिरांकांचा आग्रह धरला. पहिला म्हणजे *आसन* (आसन / सरावाची जागा), दुसरा म्हणजे सरावाची वेळ आणि तिसरा म्हणजे बिछान्याच्या बाजूला पाण्याचा वापर. अशा *तांत्रिक*

गोष्टींचं प्राथमिक उद्दिष्ट याची खात्री करून घेणं असत की मंत्राची स्पंदनं ही मानवी शरीराद्वारा अधिकाधिक सर्वोत्कृष्ट प्रकारे आत्मसात केली जातील आणि वातावरणात फारच कमी प्रमाणात विखुरतील.

## आसन (आसन / जागा)

मंत्राच्या आधारे ध्यान करताना, विशिष्ट *आसनावर* बसून मंत्रांचं पठण केलं पाहिजे. उदाहरणार्थ, कुश गवताच्या चटईवर बसलेला असताना, महामृत्युंजय मंत्राचं उत्तम पठण केलं जातं. महागायत्री ही जलसंचयात उत्तम प्रकारे केली जाते. चामुंडा मंत्राचं पठण जंगलात किंवा मृगाच्या कातड्याच्या चटईवर बसून केलं जातं. मंत्राच्या प्रकारानुसार, *आसनांच्या* अशा अनेक मांडण्या नि जुळवण्या सुचवल्या आहेत. आधुनिक काळात, गवत किंवा मृगाच्या कातड्याच्या चटया शोधणं कठीण आहे. त्यामुळे, एखाद्यानं कापसाच्या गाद्या, चादरी, ब्लँकेट इत्यादी उपलब्ध असणाऱ्या आणि परवडणाऱ्या पर्यायांचा वापर केला पाहिजे.

प्रत्येक *आसनाचे* आपले स्वत:चे असे फायदे आहेत. उदाहरणार्थ, कुश गवताची चटई ही तेजाची कमी हानी करते, नि मंत्राच्या सरावाच्या दरम्यान, त्या आभाला एक आदर्श सहयोगी बनवते. तुम्ही कोणतं *आसन* वापरता याची पर्वा न करता, तुमच्या रोजच्या ध्यानासाठी नियमितपणे तेच *आसन* वापरता, याची खातरजमा करून घ्या. आपल्या मंत्रांचं पठण करताना, गुरुदेव स्वत:ला त्याच चादरीत किंवा ब्लँकेटमध्ये गुंडाळत असत, जेणेकरून, त्यांचे कपडे त्यांचं तेज टिकवून ठेवत आणि ते वातावरणात फारच कमी विखुरलं जायचं.

मंत्रावर आधारित ध्यान करण्यासाठी, त्याचप्रमाणे झोपण्यासाठी, महागुरूंनी गोल उशी वापरण्याचा सल्ला दिला. भौतिकशास्त्रानुसार, गोलाकार वस्तूवर क्रिया करणारी कोणतीही ऊर्जा ही त्या वस्तूच्या केंद्रस्थानी गोळा होते.

गुरुदेव संतोसकर तलावापाशी ध्यान करतात



जेव्हा तुम्ही गोल उशी वापरता, तेव्हा तुमची विखुरलेली, तेजाशी संबंधित असलेली ऊर्जा उशीच्या मध्यभागी गोळा होते, आणि, जेव्हा तुमचं डोकं (सहस्रार चक्राच्या बिंदूवर) उशीशी संपर्क साधतं, तेव्हा तुम्हाला संचित ऊर्जा वापरायची संधी प्राप्त होते. ही ऊर्जा त्यावेळी तुमच्या अंतरात निर्माण होणाऱ्या ऊर्जेत भर घालते.

## निश्चित वेळ

गुरुदेवांनी ध्यानासाठी एक निश्चित वेळ राखून ठेवण्याचा सल्ला दिला, जेणेकरून, शरीराचं घड्याळ सुप्तपणे त्याकरता तयार केलं जातं. विज्ञान याला दुजोरा देतं की मोठ्या मेंदूच्या तळाशी असलेल्या मज्जापेशींच्या पुंजक्यांमध्ये नियमित सवयी तयार होतात. या मेंदूचा संबंध भावना नि स्मरणशक्तीशी सुध्दा असतो. वारंवार केलेल्या वर्तनाचे नमुने मेंदूमध्ये उत्तेजित केले जातात. कारण, तो सवयींशी सरळ जुळणारे, मज्जातंतूंशी संबंधित नवीन दुवे तयार करतो. म्हणून, मंत्राचा सराव एका निश्चित वेळेत केल्यामुळे, मेंदूच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवली जाते आणि ध्यानासाठी तो आवश्यक स्थितीत ठेवला जातो.

## पाणी (*जल*)

आपल्या आसनाच्या  एका किंवा दोन्ही बाजूंना, एका झाकण लावलेल्या भांड्यात पाण्यानं भरलेला पेला ठेवणं हा मंत्रावर आधारित ध्यानासाठी तिसरा स्थिरांक आहे.

शरीराच्या पेशींच्या पातळ थराच्या क्षमतेमुळे, मंत्र-पठणाच्या दरम्यान, ध्वनी लहरींचं विद्युत् चुंबकीय लहरींमध्ये रूपांतर होतं. आभा अथवा सूक्ष्म ऊर्जा ढाल हे शरीराभोवती तयार होणारं विद्युत् चुंबकीय क्षेत्र आहे. त्वचापेशी या सच्छिद्र असल्यामुळे, तुमच्या शरीराच्या आभाच्या थरातून काही विद्युत् चुंबकीय लहरी या अनवधानानं वातावरणात निसटून जाऊ शकतात. तुमच्या

आसनाशेजारी ठेवलेलं पाणी या विद्युत् लहरींचं चुंबकीकरण करण्याचं उद्दिष्ट साधतं, जेणेकरून, आभामधून गमावलेली ऊर्जा पाण्याद्वारा अंशत: खेचून घेतली जाते नि त्यायोगे कमीत कमी नुकसान होतं. तुमच्या आभाची क्षमता वाढवण्याकरता उभी हयात जावी लागते. म्हणून, तिचं संरक्षण आणि संवर्धन हा आध्यात्मिक स्वच्छतेचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

जेव्हा विशिष्ट मंत्रांचं पठण केलं जातं, तेव्हा शरीरात उष्णता निर्माण होते. पाण्याचा शीतलता हा गुणधर्म असल्यामुळे, उष्णता कमी करण्यासाठी, पाणी पिण्याची शिफारस केली जाते. पाणी हे तुमच्या आभामधील नकारात्मक ऊर्जा पण धुऊन टाकू शकतं. म्हणून, सेवेच्या दिवशी, शिष्य हे, सेवा संपल्यानंतर, सचैल स्नान करणं पसंत करतात. गुरुदेवांनी निर्मूलन करणं (शुध्दी) आणि दुरुस्ती (उपचार) यांचं माध्यम म्हणून पाण्याचा वापर केला.

ध्वनी हा हवेच्या तुलनेत पाण्यातून पाचपटीनं चांगला प्रवास करतो. पाणी केवळ ऐकू शकत नाही, तर आवाजांना प्रतिसादही देऊ शकतं. ते सातत्यानं त्याच्या वातावरणातील ध्वनी शोधून काढतं, विशेषत:, बोललेले किंवा त्याच्याकडे निर्देशित केलेले. गोठवलेल्या पाण्याचे अर्धे कापलेले भाग हे गुंतागुंतीच्या, चकाकणाऱ्या, हिमवर्षावासमान असणाऱ्या स्फटिकांपासून ते अस्ताव्यस्त चिखलांच्या डागांपर्यंतचे नमुने प्रकट करतात, जे पाण्याच्या अधीन असलेला आवाज किंवा विचार थेट प्रतिबिंबित करतात. दुसऱ्या शब्दांत, पाणी हे आपली रासायनिक रचना न बदलता, आपली आण्विक रचना बदलू शकतं. यातून ते सूचित करतं की त्याला आपलं स्वत:चं चैतन्य आहे.

गुरुदेवांनी भाकीत केलं होतं की अशी एक वेळ येईल की जेव्हा लोक नीलकंठ धामाला भेट देतील आणि समाधीवर पाण्याचा पेला ठेवतील. त्यांनी समाधीला प्रदक्षिणा घातली की पाणी ऊर्जायुक्त होईल. हे पाणी प्राशन केल्यामुळे आराम मिळेल.

## महाशिवरात्री *जल*

महाशिवरात्रीनंतरच्या दिवशी, सर्व स्थानांतील लोकांना एका विशेष *जलाचं* वाटप केलं जातं. सर्वसाधारणपणे, हे आध्यात्मिक मिश्रण महाशिवरात्री *जल* म्हणून ओळखलं जातं. हे इतकं प्रभावी असतं की उपचार करणारे त्याचा वापर चमत्कारिक परिणाम मिळवण्याकरता करू शकतात. विविध घटक हे जल अत्यंत शक्तिशाली बनवतात. ते तयार करण्याकरता पाच नद्यांचं पाणी गोळा केलं जातं आणि एकत्रितपणे ओतलं जातं. लवंगा, काळी मिरी, हिरवी वेलची आणि इतर घटक मिसळून या मिश्रित *जलाची* अंगभूत ऊर्जा वाढवली जाते. या मसाल्यांचा त्यांच्या औषधी किंवा शुध्द करण्याच्या गुणधर्मांमुळे समावेश केला जातो. आध्यात्मिक दृष्ट्या अनेक प्रगत शिष्य हे मंत्रांचं पठण करताना जलात हात बुडवून, या मिश्रित *जलाला* आणि मसाल्यांना त्यांच्या आभांसह ऊर्जा देतात.

महाशिवरात्रीचं *जल* हे वर्षानुवर्षं, दुर्गंध न येता, साठवून ठेवलं जाऊ शकतं. सुरवातीला ते जेवढं दाट असतं, त्याच्या तिप्पट ते पातळ केलं, तरीही, त्याची क्षमता तशीच टिकून राहू शकते. गुरुदेवांच्या काळात, या *जलाची* बाटली घेऊन जाण्यासाठी लोक तासनतास रांगेत उभे रहायचे.

## पाणी- एक उपचारक

शरीरातील प्रत्येक अवयव नि पेशी एका विशिष्ट वारंवारतेच्या वेगानं कंपन करतात, जरी ते कंपन ऐकू येईल अशा रीतीनं जाणवत नसलं तरी. कंपन वेगातील कोणताही बदल रोगाची सुरवात किंवा रोगाचा शिरकाव सूचित करतो.

सर्व मंत्रांना हेतूमुळे सामर्थ्य मिळालेलं असतं आणि काही मंत्र हे बरं होण्याकरता निमित्त ठरतात. उपचार मंत्रांचा उपयोग रोगांवर उपचार करण्यासाठी आणि

शरीराला दुरुस्त करण्याकरता केला जातो. आमचा विश्वास आहे की जेव्हा *अजपा* (शांत) पध्दतीनं उपचार मंत्राचा उच्चार केला जातो, तेव्हा त्याचा ध्वनी हा *प्राण* (श्वास) द्वारा शरीराच्या रोगग्रस्त भागात वाहून नेला जातो. जेव्हा दोन कंपनं परस्परांवर क्रिया करतात, तेव्हा पहिलं कंपन हे दुसऱ्या कंपनाप्रमाणे समान कंपनसंख्येनं घुमणारा आवाज काढतं. या प्रक्रियेचं वर्णन करण्याकरता आत प्रवेश करणं  ही संज्ञा वापरली जाते.

नियमितपणे म्हटलेला उपचारमंत्र हा शरीरातील दूषित झालेल्या भागात प्रवेश करतो आणि उपचाराला प्रभावित करतो. नकारात्मक ऊर्जांच्या प्रभावाखाली असणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या बिछान्याजवळ ठेवलेलं पाणी त्या ऊर्जेत प्रवेश करू शकतं आणि दर्पयुक्त वास बाहेर टाकू शकतं. असं पाणी मानवी वापरासाठी अयोग्य असतं. जरी ही सामान्यपणे घडून येणारी गोष्ट नसली, तरी आमच्यापैकी काहीजणांनी ती अनुभवली आहे.

## मंत्रांचे शारीरिक प्रभाव

शारीरिक दृष्ट्या, मंत्र हे रक्तदाब, त्याचप्रमाणे हृदयाची नि श्वासाची गती कमी करण्याकरता ओळखले जातात. मंत्रपठण हे मेंदूप्रति ऑक्सिजनचा प्रवाह वाढवतं, त्याचवेळी ऑक्सिजनचा उपयोग कमी करतं. परिणामी, मेंदूलहरींचे क्रियाकलाप मंदगतीनं होतात आणि आरामशीर वाटायला लागतं. वारंवार पठण केल्यामुळे, कालांतरानं, एकाग्रता सुधारते आणि मेंदूचे डावे नि उजवे गोलार्ध एकाच वेळी, एकाच गतीनं चालवणं शक्य होतं. दोन गोलार्धांचं पालनपोषण झाल्यामुळे स्मरणशक्ती नि आकलनविषयक कार्य सुधारतं. विचार हे अधिक सकारात्मक आणि बोधपूर्ण होतात नि मनात जाणीवपूर्वक प्रवेश करण्याची क्षमता वाढवली जाते.

***जितका अधिक मेंदू-मनाचा समन्वय***
***तितकी अधिक उंच पातळी जाणीवपूर्वक जागरूकतेची***

## सेवा

सेवेद्वारा, एक जीवात्मा दुसऱ्या जीवात्म्याशी जोडला जातो. कारण, प्रत्येक जीव हा एकाच परमात्म्याचं प्रतिबिंब आहे, याची त्याला जाणीव होते. अन्न, वस्त्र आणि निवारा देण्यापासून ते शिक्षण, तसंच वैद्यकीय आणि विकासात्मक काळजी घेण्यापर्यंत सेवेची व्याप्ती असू शकते. लोकांची प्रशंसा करणं, त्यांना हसवणं, त्यांची मन:स्थिती बदलणं, त्यांचं समुपदेशन करणं आणि त्यांच्या समस्या सोडवणं इतकी ती सोपी असू शकते. मोकळ्या जागा हिरव्यागार करणं आणि नैसर्गिक साधनसंपत्ती धोक्यात न आणणं अशा रीतीनं पर्यावरणविषयक पैलूंवर लक्ष केंद्रित करणं या गोष्टींचाही सेवेत समावेश होतो. जेव्हा तुम्ही मुलं, वृध्द, अपंग यांसारख्या स्वत:ची काळजी न घेऊ शकणाऱ्या लोकांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित करता, तेव्हा जीवनाच्या पालनपोषणाला एक वेगळं परिमाण लाभतं. तुम्ही ज्यांची सेवा करता, त्यांच्या अस्तित्वाची गुणवत्ता सुधारणं हा सुध्दा सेवेचा उद्देश असतो. त्यामुळे, त्यांच्या भौतिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच, त्यांच्या मानसिक नि आध्यात्मिक वाढीवर लक्ष केंद्रित करणं महत्त्वाचं ठरतं. मार्गदर्शन करणं आणि आध्यात्मिक ज्ञान वाटणं हे सेवेचं सर्वोच्च स्वरूप आहे. कारण, तुम्ही दुसऱ्याच्या आध्यात्मिक परिवर्तनासाठी प्रायोजक बनता.

एक अनुकरणीय मार्गदर्शक असे महागुरू आपल्या काही शिष्यांना म्हणाले, ‘‘मी तुम्हाला माझ्या खांद्यावर घेऊन जातो, जेणेकरून, तुम्ही माझ्यापेक्षा कितीतरी दूर पाहू शकाल.’’ निरोगी शरीर आणि समाधानी मन ही आध्यात्मिक व्यासंगाची पूर्वतयारी आहे, हे लक्षात ठेवून, गुरुदेवांनी लोकांना बरं केलं आणि त्यांच्या इच्छा पूर्ण केल्या. काटकसर, साधेपणा आणि जवळजवळ शून्य दायित्व असलेल्या त्यांच्या जीवनानं उच्च दर्जा प्रस्थापित केला आणि आध्यात्मिक इच्छुकांना प्रचंड प्रमाणात आत्मविश्वास दिला. त्यामुळे, त्यांना महागुरूंच्या कृपेला शरण जाणं आणि त्यांचं मार्गदर्शन प्राप्त करणं सोपं झालं.

गुरुदेवांसाठी सेवा हा निव्वळ तात्त्विक दृष्टिकोन कृतीत आणण्याचा एक मार्ग नव्हता; तर ते त्यांच्या अस्तित्वाचं संयुक्तिक कारणही होतं. जीवांना मदत करणं, त्यांना बरं करणं आणि त्यांचा उध्दार करणं हे गुरुदेवांचं जीवितकार्य होतं. त्यामुळे, जीवांना ते प्रतिनिधित्व करत असलेल्या दिव्यत्वाची जाणीव झाली. गुरुदेवांनी वनस्पती, प्राणी आणि मानव यांच्या भौतिक रूपांची सेवा करून, त्यांच्या आत्म्यांची सेवा केली. गुरुदेवांच्या सेवेचा भौतिक क्षेत्राच्या पलीकडे आध्यात्मिक क्षेत्रात प्रवेश करण्यापर्यंत विस्तार झाला होता. त्यामुळे, त्यांनी दिलेल्या मानसिक आधाराची शाश्वतता सुनिश्चित झाली.

## सेवेचे स्तर

सेवेचे चार स्तर आहेत. विशिष्ट मानसिकता आणि हेतू प्रत्येक स्तर पुढे नेतात.

| स्तर | मानसिकता | हेत |
|---|---|---|
| सेवा जेव्हा तुम्हाला सोयीची असेल | छान वाटतं | लोककल्याण |
| तुमच्यासाठी सेवा | कर्तेपणाची भावना | कर्माचं ऋण फेडणं |
| सेवेसाठी सेवा | कर्तेपणाची भावना नसणं | कर्तव्यं पार पाडणं |
| प्रत्येक श्वास ही सेवा आहे | निरीक्षक | सेवेसाठी जगणं |

अनेक लोक आपला वेळ, आपले श्रम किंवा आपला पैसा दुसऱ्यांच्या सेवेसाठी स्वेच्छेनं देऊ करतात. कुटुंबातील सदस्यांचे आणि प्रिय व्यक्तींचे वाढदिवस आणि वर्धापनदिन अशा विशिष्ट प्रसंगी केलेली सेवा ही सामान्यपणे लोककल्याण समजली जाते.

सेवेचा दुसरा स्तर म्हणजे जेव्हा तुम्ही बदल घडवण्याच्या इच्छेनं प्रेरित होऊन, लोकांना मदत करण्याची प्रात्यक्षिकं करून दाखवता. अशा प्रकारची सेवा म्हणजे तुमचं कर्ज चुकतं करण्याचा अधिक सातत्यपूर्ण प्रयत्न होय.

विशेषाधिकार म्हणून नाही, तर कर्तव्य म्हणून सेवा देणं ही सेवेच्या तिसऱ्या स्तराची व्याख्या आहे. या मानसिकतेला सामान्यपणे एखाद्या साक्षात्कारी व्यक्तीच्या किंवा *सिध्द* गुरूंच्या मार्गदर्शनामुळे चालना दिली जाते, जे तुम्हाला दुसऱ्यांना मदत करण्यात सक्षम होण्यामध्ये तुमचं भाग्य आहे, हे ओळखायला साहाय्य करतात. संधी मिळाल्याबद्दल तुम्ही कृतज्ञ रहाता आणि शक्य तितक्या उत्तम प्रकारे आपलं कर्तव्य पार पाडण्यासाठी तुम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करता. तुम्हाला या गोष्टीची जाणीव होते की तुम्ही केवळ सेवेची सुविधा पुरवणारे आहात, कर्ता नाही.

गुरुदेव प्रायः म्हणत, *''सेवा में ही मेवा है''*- ''सेवा हे स्वतःच फळ आहे'' गुरुदेवांनी सेवा ही सेवा करणाऱ्याच्या आणि सेवा घेणाऱ्याच्या नियतीचा खेळ मानला. सेवा हे दोन लोकांचं भाग्य आहे, हे जाणून, गुरुदेवांनी स्वतःकडे कर्ता किंवा सेवेची सुविधा पुरवणारा म्हणून बघितलं नाही, तर केवळ एक निरीक्षक म्हणून पाहिलं.

महागुरूंनी सेवेसाठी जरी प्रत्येक श्वास समर्पित केलेला असला, तरी एक गुरू, एक कौटुंबिक माणूस आणि कार्यालयात जाणारी व्यक्ती म्हणून त्यांनी आपली कर्तव्यं पार पाडली. उपजीविकेसाठी कमावणं आणि सेवेसाठी काहीही स्वीकारण्यास नकार देणं या गोष्टींनी त्यांना कर्तव्यमुक्त अस्तित्वाची हमी दिली.

अनेक मंत्रांची रहस्यं आणि त्यांचे उपयोग
यांविषयीचा खुलासा
www.gurudevonline.com वरील
**Mantra Vidya** या podcast मध्ये केलाय

# इंद्रियांच्या पलीकडे

गुरुदेवांनी सुचवलं होतं की आपण आपल्या इंद्रियांचं व्यवस्थापन केलं पाहिजे, जेणेकरून, आपली आत्म्याची भावना परम आत्म्यापेक्षा पूर्णपणे भिन्न न रहाता, त्याच्याशी अधिक संरेखित होते.

आत्मा जसा आहे तसा समजून घेण्यासाठी, तुम्ही अगोदर जे खरं नाही, ते समजून घेतलं पाहिजे; आणि जे खरं आहे असं भासतं, पण तसं नसतं, ते वास्तविक (माया) समजलं जातं.

बोध म्हणजे ज्ञानेंद्रियांद्वारा एखादी गोष्ट पहाण्याची, ऐकण्याची, अनुभवण्याची किंवा तिची जाणीव होण्याची क्षमता - मनाच्या नैसर्गिक शक्ती ज्यांच्याद्वारा शरीराला बाह्य प्रेरणा जाणवतात. मानवांमध्ये पहाणं, ऐकणं, स्पर्श करणं, चव घेणं आणि वास घेणं या नैसर्गिक शक्ती (ज्ञानेंद्रियं) आहेत. या नैसर्गिक शक्ती स्वतंत्रपणे कार्य करतात असं वाटतं; पण, त्यांचा एकमेकांशी जवळचा संबंध असतो. कारण, त्या मेंदूला आपल्या सभोवतालच्या जगाची जाणीव करून देण्यास सक्षम बनवतात.

प्रत्येक जीवात मेंदू हा कवटीत शांतपणे बसलेला असतो आणि त्याचा बाह्य जगाशी थेट संबंध नसतो. एखाद्या संगणकीय उपकरणाप्रमाणे, तो फक्त डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचेद्वारे आणलेल्या माहितीचा अर्थ लावतो. मेंदूच्या जवळजवळ १०० अब्ज मज्जातंतूंचं घनदाट जाळं या अवयवांना जे काही जाणवतं, त्याचं विद्युत् रासायनिक संकेतांमध्ये भाषांतर करतं.

प्रत्येक मज्जातंतू हा दर सेकंदाला दहा किंवा शेकडो विद्युत् स्पंदनं इतर मज्जातंतूंना पाठवतो. मेंदू हा विद्युत् रासायनिक नमुन्यांचा अर्थ लावतो, जे मज्जातंतूंच्या संकेतांद्वारा जगाविषयीच्या आपल्या आकलनामध्ये उद्भवतात. अशा प्रकारे, मेंदू हा एकाच वेळी, विद्युत् रासायनिक नमुने म्हणून विविध ज्ञानेंद्रियांमधून आलेल्या संकेतांवर प्रक्रिया करतं, ज्यायोगे, आपल्याला आपल्या विश्वावलोकनाची - आपल्या वास्तविकतेची परिभाषा करता येते.

वस्तुस्थिती अशी असते की मेंदूला आपल्याला मिळणारी माहिती कुठून मिळते हे माहीत नसतं किंवा तो त्याची फिकिर करत नाही. तो प्राप्त झालेल्या माहितीचा अर्थ लावतो. म्हणून, आपण जे पहातो, ते आपल्या वैयक्तिक जगाची आंतरिक प्रतिकृती असते, बाहेर काय आहे, त्याची नाही!

मानवांप्रमाणेच, प्राण्यांमध्ये ज्ञानेंद्रियं असतात, जी त्यांना त्यांच्या सभोवतालची जाणीव करून देतात. या ज्ञानेंद्रियांच्या क्षमता प्रजातींनुसार कमीअधिक असतात. काही प्राण्यांमध्ये पारंपारिक पाच इंद्रियांपैकी एक किंवा एकापेक्षा जास्त इंद्रियांचा अभाव असू शकतो, तर काही प्राणी जगाला अशा प्रकारांनी जाणू शकतात, ज्या प्रकारांनी माणसांना जाणता येत नाही. काही प्रजाती या विद्युत् आणि चुंबकीय क्षेत्रं जाणू शकतात आणि पाण्याचा दाब नि प्रवाह शोधू शकतात. उदाहरणार्थ, चतुर या कीटकाला दुर्बिणीसारखी दृष्टी असते, मधमाश्या या अतिनील प्रकाश पाहू शकतात, आणि सापांना रात्री औष्णिक किरण दिसू शकतात. परिणामी, प्रत्येकाचा जगाबद्दलचा दृष्टिकोन वेगळा नि अद्वितीय असेल. निसर्गातील तत्सम उदाहरणं दर्शवतात की आपल्या ज्ञानेंद्रियांनी पुरवलेली माहिती ही जीवशास्त्रामुळे दडपलेली किंवा मर्यादित असते.

म्हणून, तुम्ही समजून घेतलेली वास्तविकता ही वास्तविकतेचा वैयक्तिक दृष्टिकोन आहे, वैश्विक वास्तव नाही. वैश्विक दृष्टिकोनाशी सुसंगत

होण्याकरता, तुम्हाला वैयक्तिक जागतिक दृश्याच्या मर्यादांवर मात करणं आवश्यक आहे.

## इंद्रियांचं व्यवस्थापन

इतिहास हा अनेक शक्तिशाली अध्यात्मवाद्यांच्या क्रोधाचा साक्षीदार आहे. त्यांचा रागीट स्वभाव हा कदाचित त्यांची तपस्या वृध्दिंगत होऊन, त्यांच्या शरीरात उद्दीपित झालेल्या अग्नितत्त्वामुळे संभवतो.

रागाला चिथावणी देऊन, गुरुदेव प्रतिक्रियात्मक शब्द आणि स्वभाव यांच्यावर नियंत्रण ठेवायला शिकले. IARI मध्ये नोकरीला असताना सुरवातीच्या काळात, गुरुदेव हे त्यांच्या ऑफीसच्या व्हरांड्यात बसून रस्त्यानं जाणाऱ्यांबद्दल अपशब्द उच्चारायचे, त्यांच्या प्रतिक्रियेची वाट बघायचे आणि जेव्हा ते प्रतिक्रिया दाखवायचे, तेव्हा गुरुदेव उलट हसायचे. ही त्यांची, स्वत:चा लवचिकपणा तपासण्यासाठी गैरवर्तनाला उद्युक्त करण्याची पध्दत होती. (ता.क. मी हा दृष्टिकोन शिफारस म्हणून नाही, तर जास्त करून एक निरीक्षण म्हणून सांगतोय).

महागुरूंनी स्वत:च्या रागावर नियंत्रण ठेवून, आपल्या मनातील तीव्र भावना पुसून टाकल्या. जितका भावनांचा उद्रेक कमी, तितकी मनाची स्थिरता जास्त. फिल्म स्टार बनू इच्छिणाऱ्या तरुणापासून ते प्रसिध्दीपासून दूर राहिलेल्या व्यक्तिपर्यंत, गुरुदेवांचा, इंद्रियांपासून मुक्त होण्याच्या सरावाचा दीर्घ इतिहास होता.

**दृष्टीच्या इंद्रियाचा** उपभोग आकर्षणाकडे नेतो, तर वासना ही स्पर्शाच्या इंद्रियाचा एक उपभोग आहे. विरुध्द लिंगाशी व्यवहार करण्याचं महागुरूंचं सूत्र सोपं होतं. त्यांनी आम्हाला सुचवलं होतं की आम्ही प्रत्येक आकर्षक स्त्रीकडे

किती आकर्षित होतो, याचं अचूक मूल्यांकन करण्यासाठी आम्ही तिची तिच्या *गुडिया* (लहान मुलगी) आणि *बुढिया* (वृध्द स्त्री) रूपांत कल्पना करायची. मी पुढे, मला भेटलेल्या प्रत्येक स्त्रीचं सांगाड्याच्या रूपात कल्पनाचित्र रेखाटायचं धाडस केलं. या सरावानं, कोणत्याही अप्रिय इच्छेविरुध्द संरक्षणाची हमी दिली आणि मला जाणवलं की सौंदर्य हे अक्षरश: पहाणाऱ्याच्या मनात असतं!

महागुरूंनी एकदा असं विधान केलं होतं की जेव्हा उत्क्रांत अध्यात्मवादी मरण पावतात, तेव्हा, त्यांचे आत्मे एका चौकात येतात, जिथून एक मार्ग सुंदर दिसणाऱ्या खालच्या लोकांकडे जातो आणि दुसरा मार्ग साध्या दिसणाऱ्या उच्च लोकांकडे जातो. सौंदर्याचा पाठलाग हा आत्म्याला निम्न क्षेत्राकडे आणू शकतो, हे लक्षात घेता, सौंदर्याच्या सापळ्याला बळी पडण्यापासून टाळणं शहाणपणाचं असतं!

गंधाची जाणीव करून देणाऱ्या **घ्राणेंद्रियावर** मात करण्याकरता, गुरुदेवांनी अघोर विद्येतून एक पान काढलं आणि ''जर सुगंधाबद्दल उदासीनता जोपासायची असेल, तर दुर्गंधीबद्दल उदासीनता विकसित करा'', अशी आम्हाला सूचना दिली. मला असं वाटलं की अजमेर इथं शिकत असताना, ही युक्ती मी पूर्वी शिकलो असतो तर. कारण, माझ्या शाळेतील स्वच्छतागृहं ही या तंत्राचा सराव करण्याकरता योग्य ठिकाणं होती. अखेरीस, नावडते वास आणि दुर्गंधाबद्दल सहनशीलता आणि उदासीनता यांचा सराव करत असताना, मी कोलोन नि परफ्यूम्स सुध्दा वर्ज्य केले.


ज्ञानेंद्रियांचं व्यवस्थापन केल्यावर अगदी खात्रीनं आपल्या मनातल्या द्वैताच्या चांगलं, वाईट, बरोबर, चूक अशा कल्पना नाहीशा होतात.

एकदा गुरुदेव काही शिष्यांसह एका सहकाऱ्याच्या घरी गेले. सहकारी आणि त्याची पत्नी घरी नसल्यामुळे, त्यांच्या आठ वर्षांच्या मुलीनं त्यांच्यासाठी चहा करायची तयारी दर्शवली. तिच्या भावनेची जाण ठेवून, गुरुदेवांनी संमती दिली.

ती चहा देत असताना, गुरुदेवांनी तिला आशीर्वाद दिला आणि चहाचे कप आपल्या शिष्यांना दिले. जेव्हा गुरूंनी चहाचा घोट घेतला आणि ते त्या मुलीशी संवाद साधत होते, तेव्हा सोबत असलेल्या शिष्यांनी फक्त काही घोट प्यायले आणि बाकीचा चहा ठेवून दिला. मुलीनं चहा स्टोव्हवर बनवलेला असल्यामुळे चहाला रॉकेलचा वास येत होता आणि, चहा आस्वादहीन होता. सहकाऱ्याच्या घरातून बाहेर पडल्यावर, आक्षेपार्ह भाषा वापरत, महागुरू आपल्या शिष्यांवर ओरडले! कल्पना करा की ते शिष्य किती निष्काळजी असतील की केवळ रॉकेलचा वास आल्यामुळे, गुरूंनी आशीर्वाद दिलेला चहा त्यांनी फेटाळला! हे शक्य आहे का की थोडंही सहन न करू शकल्यामुळे, त्यांनी खूप काही गमावलं?


गुरुदेवांच्या जीवन प्रवासाचा मागोवा घेतल्यामुळे, गुरुदेवांच्या सुरवातीच्या काळापासून ते गुरू आणि नंतर महागुरू बनण्यापर्यंत त्यांच्या सवयी आणि मनोवृत्ती कशा बदलल्या, हे माझ्या लक्षात आलं. त्यांच्या अन्नाबाबतच्या विचारांवर चर्चा करून, मला **चवीच्या इंद्रियाचा** अंतिम उपभोग या मुद्यावर विस्तारानं बोलू दे. गुरुदेव कित्येक रात्री दिवसाचं शेवटचं जेवण न करताच झोपले. त्याबद्दल विचारलं असता, त्यांनी सहज कबूल केलं की जर त्यांच्या भक्तांपैकी कुणी रात्री न जेवता झोपला असेल, तर, ते पण त्यांचं जेवण सोडून द्यायचे. कदाचित, आपल्या हेतूची ताकद वापरून, आपलं जेवण त्या भक्तासाठी आहे असं ते मनानं इच्छा करायचे. व्यापारातल्या साठेबाजीप्रमाणे, शरीरात साठवून ठेवलेल्या अन्नाचं पचन व्हायला मदत करण्यासाठी शरीरातील विषकारक पदार्थ शरीराबाहेर टाकले जाऊन, शरीरात स्राव निर्माण व्हावेत याकरता, त्यांनी आठवड्यातून एकदा उपवास करण्याची शिफारस सुध्दा केली.

एकेकाळी तरुणपणी जो माणूस खवय्या होता, त्याचं रूपांतर *दाल, रोटी,* दही, अधूनमधून *पकोरे* खाणाऱ्या नव्यानं नियुक्त झालेल्या भू-सर्वेक्षकामध्ये झालं. त्यातून मित्रांसाठी, सहकाऱ्यांसाठी आणि शिष्यांसाठी जेवण तयार करणारे,





*तरुण भक्तानं दिलेल्या चहाचा*
*गुरुदेव घोट घेतात*



*गुरुदेव बिट्टुजींना रिकामी कॅसेट वाजवायला सांगतात*

नंतर सर्वांच्या शेवटी जेवणारे, अन्नाचं फुकट *लंगर* घालणारे असं रूपांतर होत गेलं. गुरुदेवांनी अन्नाला अत्यंत आदरानं वागवलं.

गुरुदेवांनी आपल्या चवीच्या जाणीवेवर इतक्या टोकापर्यंत ताबा मिळवला होता की त्यांनी नंतर कधीही सुग्रास अन्नाची अभिलाषा बाळगली नाही का अतिभोजन केलं नाही. ते पूर्णपणे शाकाहारी नि सात्त्विक होते. त्यामुळे, ते द्रवपदार्थांवर सहज जगू शकले. काही दिवशी दुपारी, जेवणाकरता त्यांनी फक्त एक पेला *लस्सी* (ताक) बनवली. बहुतेक दिवशी सकाळी, *निंबू पानी* (लिंबू पाणी) हा त्यांचा नाश्ता होता. महाशिवरात्रीसारख्या विशेष प्रसंगी, रांगेतील शेवटच्या व्यक्तीला भेटेपर्यंत पूर्ण दिवस लागला तरी ते तोपर्यंत जेवत नसत. गुरुदेवांच्या मुलीला गुरुदेवांनी तिला सांगितल्याचं आठवतंय की जो स्वत:ला जेवू घालण्यापूर्वी, इतरांना खाऊ घालायला शिकतो, तो अन्नाच्या इच्छेवर मात करतो. महागुरूंनी अन्नदान ही अमूल्य सेवा मानली.

**ऐकण्याचं इंद्रिय** आपल्याला इतरांशी जोडतं, आपल्याला त्यांच्याशी अशा प्रकारे संवाद साधण्याची परवानगी देतं, जी इतर कोणतंही इंद्रिय देऊ शकत नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात असलेल्या एक अंध आणि बधिर स्त्री-शिक्षणतज्ज्ञ श्रवणाच्या महत्त्वाविषयी समारोप करताना असं म्हणाल्या, ''अंधत्व आपल्याला गोष्टींपासून दूर करतं, परंतु, बहिरेपणा आपल्याला लोकांपासून दूर करतो.'' आपण जे ऐकतो, त्यावर आपला प्रतिसाद हा जवळजवळ नेहमीच बोलण्याद्वारा कळवला जातो हे लक्षात घेऊन, श्रवणेंद्रियावर नियंत्रण ठेवण्याचा सराव करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे विवेकशक्ती विकसित करणं; न बोललेलं अंतर्ज्ञानानं ऐका आणि जे ऐकलेलं आहे, त्याला प्रतिसाद देण्याकरता निवडक बना. गुरुदेव नेहमी सांगायचे की आम्ही स्वत: न पाहिलेल्या किंवा न ऐकलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवू नये. या आदेशानुसार, त्यांनी आम्हाला बाष्कळ बोलण्यापासून नि चकाट्या पिटण्यापासून परावृत्त केलं.

गुरुदेवांच्या विवेकशक्तीबद्दल एक हृदयंगम किस्सा आहे. गुरुदेवांच्या एका शिष्यानं (बिट्टुजींनी) गुरुदेवांच्या उपस्थितीत स्वत:ची टिमकी वाजवायला सुरवात केली आणि गुरूंनी त्याच्या बद्दल ज्या 'चुकीच्या कल्पना' बाळगल्या होत्या, त्या त्यांला सुधारायच्या होत्या. म्हणून, त्यानं महागुरूंचा सल्ला धुडकावून लावला. तेव्हा त्याला झटका बसला! अत्यंत कमी बोलणाऱ्या आणि क्वचितच आपल्या शक्तीचं प्रदर्शन करणाऱ्या गुरूंनी एक संख्या काढली, जिनं खोलीतील इतरांना थक्क केलं. त्यांनी त्याला स्वत:च्या बिछान्याच्या शेजारी असलेल्या कॅबिनेटच्या चाव्या आणण्याचं, ते उघडण्याचं आणि त्याच्या अंगभूत तिजोरीतून चार रिकाम्या ऑडिओ कॅसेटचा सीलबंद संच काढायचं काम दिलं. त्यांनतर, त्यांनी बिट्टुजींना त्या संचातून तिसरी रिकामी कॅसेट वाजवायला सांगितली. बिट्टुजींनी तसं केल्यावर, खोलीत बसलेल्यांनी प्रश्नार्थी शिष्याचं प्रथम-पुरुषी संभाषण शब्दश: ऐकलं. त्याच 'चुकीबद्दल' फुशारकी मारत, त्यानं बिट्टुजींनी ती आपल्या गुरूंसमोर ठामपणे नाकारली होती! सर्वजण भारावून गेले!

गुरुदेवांच्या काळात, संगीतप्रेमींसाठी कॅसेट-प्लेअर्स  आणि रेडिओ हे आनंद देणारी साधनं होती. महा गुरूंना पण संगीत ऐकायला आवडायचं, खास करून मोहम्मद रफी. त्यांना कारमध्ये रेडिओ ऐकायला आवडायचा, पण त्यांची संगीतातील आवड कालांतरानं इतक्या टोकापर्यंत कमी झाली की ते संगीताचं कौतुक करू शकत, परंतु, त्याच्याकडे आकर्षित होऊ शकले नाहीत किंवा त्याच्या स्वरमाधुर्यात बुडू शकले नाहीत.

***एकत्रितपणे काम करणारी अनेक इंद्रियं उदयाला आणतात भावनांच्या शृंखलांना, ज्या कारणीभूत ठरतात क्रियांच्या मालिकांना***

गुरुदेव आपल्या इंद्रियांना दाबून नाही, तर ती जेव्हा खेळायची, तेव्हा स्वतःच्या ज्या प्रतिक्रिया व्हायच्या, त्यांचं निरीक्षण करून इंद्रियांचं व्यवस्थापन करायला शिकले. अशा रीतीनं, इंद्रियांच्यात गुंतून पडणारा नट न बनता, ते इंद्रियांच्या क्रीडेचा निरीक्षक बनले. निरीक्षक बनल्यामुळे, महागुरूंनी ताबडतोब, आपल्या इच्छेनुसार, आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवण्याकरता नि त्यांना कुशलतेनं हाताळण्याकरता एक साचा तयार केला, एक असा सराव ज्यानं त्यांना स्वतःचं आयुष्य जगताना, भावनांचा अनुभव घेण्याऐवजी, भावनांची भूमिका बजावत, एक महान स्थान मिळवून दिलं.


## मेंदूची लवचिकता

मेंदूच्या संशोधनानं असं दाखवून दिलंय की आपण त्याची शारीरिक रचना बदलू शकतो आणि त्याची कार्यक्षमता सुधारू शकतो. या क्षमतेला न्यूरोप्लास्टिसिटी म्हणतात. या क्षमतेचा परिणाम म्हणून, जेव्हा मेंदूची शक्तिसामग्री एका इंद्रियाच्या पध्दतीत नाकारली जाते, तेव्हा तो इतर इंद्रियांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचं संवर्धन करण्यासाठी स्वतःला पुन्हा जोडू शकतो. एका इंद्रियाची कमतरता किंवा नुकसान भरून काढण्याकरता, मेंदूचं पुन्हा जोडलं जाण्यामुळे किंवा त्याची पुनर्रचना होण्यामुळे या गोष्टीची हमी मिळते की गमावलेल्या ज्ञानेंद्रियावर प्रक्रिया करण्यासाठी समर्पित मेंदूच्या

क्षेत्राचा उपयोग संपून जात नाही. परंतु, त्याऐवजी, त्याचा इतर इंद्रियांवर प्रक्रिया करण्यासाठी पुनर्विनियोग केला जातो. विद्यमान मज्जातंतूंच्या मार्गांचे पुन्हा मार्ग बदलणं याव्यतिरिक्त, अशा प्रकारच्या पुनर्विनियोगात काहीवेळा नवीन मज्जातंतूंच्या निर्मितीचा समावेश असू शकतो. परिणामी, एक इंद्रिय गमावल्यानं, दुसऱ्या इंद्रियाची क्षमता वाढू शकते.

एकदा, देहराडूनमधून प्रवास करत असता, गुरुदेवांनी मला त्या शहरात, एके दिवशी, बधिरांसाठी शाळा उघडण्याची सूचना केली. जवळजवळ, एका दशकानंतर, मी शाळा उघडली. बधिरांबरोबर काम केल्यामुळे मला त्यांची जीवनपध्दती शिकता आली आणि त्यांनी मला त्यांच्या जगात सामील करून घेतलं. स्वत:च्या हातांनी करायच्या कामात नि इतर शारीरिक कारागिरीत ते किती कुशल असतात, हे माझ्या लक्षात आलंय. त्यांच्या एकाग्रतेची पातळी खूप वरची असते. कारण, ते क्वचितच, आवाजानं विचलित होतात. श्रवणशक्ती कमी झाल्यामुळे, त्यांची स्पर्शाची जाणीव लक्षणीय रीत्या वाढलेली असते.

महागुरूंनी आम्हाला असं सुचवलं की जोपर्यंत आम्ही इतर दोषांवर नियंत्रण ठेवू शकत नाही किंवा ते दूर करू शकत नाही, तोपर्यंत आम्ही एक दोष राहू द्यावा. सरतेशेवटी, आम्हाला शिल्लक राहिलेले दोष सुध्दा सोडायलाच पाहिजेत. महागुरूंच्या साध्या सूचनेमध्ये न्यूरोप्लास्टिसिटीची रहस्यं दडलेली होती. मी माझं उदाहरण सांगू इच्छितो. इंद्रियांवर नियंत्रण करण्याचा सराव करत असताना, जो कमकुवत दुवा शेवटी सोडण्याचा माझा मानस आहे, ती केवळ एक सवय नाही, तर, खरं तर चवीची जाणीव आहे. आतिथ्य-व्यवसायात (**hospitality trade**) माझी नोकरी असूनही, गेल्या काही वर्षांमध्ये ही भावना, हळूहळू कमी होत चालल्ये. परंतु, अजून कधीही, चॉकलेट्स आणि चीज माझा पराभव करतात! ज्या गुरुदेवांकरता, स्वत:च्या इंद्रियांचं व्यवस्थापन करणं ही कल्पना करता येण्याजोगी सर्वांत सोपी गोष्ट होती, मात्र, त्यांच्या विपरीत, माझं त्याच्यावर अजूनही काम चालू आहे.



इंद्रियांचं व्यवस्थापन करण्यासाठी महागुरूंची
उपचारयोजना उदाहरणांद्वारा सांगितली आहे.
Podcast: **Beyond the Senses**
www.gurudevonline. com वर ऐका

मेंदूची अद्वितीय परिवर्तनशील क्षमता ही केवळ बाह्य उत्तेजकांच्या शक्तिसामग्रीमुळे नाही, तर आंतरिक उत्तेजकांमुळेही असते. उदाहरणार्थ, दीर्घकाळ मंत्र-पठण तुमच्या हेतूची शक्ती वाढवतं आणि तुमच्या मेंदूला शारीरिक दृष्ट्या बदलवतं.

## मन

मेंदू हा बहुसंवेदी अवयव आहे, जो सतत विविध संवेदनांमधून माहितीचं मिश्रण करतो. तथापि, काही लोकांचे मेंदू त्यांना अशी माहिती पुरवतात की जी इंद्रियांनी प्रकट केल्यापेक्षा वरचढ असते. जर मेंदू त्या इंद्रियांकडून मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करत असेल, शक्तिसामग्रीवर नाही, तर ही अतिरिक्त माहिती कुठून येते? ही गोष्ट आपल्याला **सहाव्या इंद्रियाचं** किंवा **अतींद्रिय आकलनशक्तीचं** परीक्षण करण्यास भाग पाडतं.

या रहस्याचं उत्तर मनात दडलेलं आहे. मेंदू हा भौतिक शरीराचा **यथार्थ दुभाषी** आहे, तर मन हा भौतिक शरीराचा आत्मा आणि कारण शरीर यांचा सहकारी आहे. मन हे मेंदूला अतींद्रिय माहिती पुरवतं, ज्यामुळे अंतर्ज्ञान, परचित्तज्ञान, दूरस्थ संवेदना, दृष्टिआड असणाऱ्या गोष्टी पहाण्याची दृष्टी, अतींद्रियश्रवण इत्यादी मानसिक क्षमतांना प्रवेश मिळतो.

नोबेल पारितोषिक विजेत्या विद्युत्-चुंबकीय भौतिक शास्त्रज्ञांनी मानवी शरीराचा खूप खोल अभ्यास केलाय. त्यांचे निष्कर्ष असं सूचित करतात की मानवी शरीर हे सात ऑक्टिलियन अणूंनी बनलेलं आहे. हे अणू ऊर्जेच्या भोवऱ्यांपासून तयार होतात. ते सतत फिरत असतात आणि प्रत्येक अणू हा वेगळ्या ऊर्जा -ठशासह कंप पावत असतो. म्हणून, भौतिक शरीर हे घन पदार्थ नाही आणि विश्व हे ऊर्जेच्या स्पंदनशील तारांशिवाय दुसरं काहीही नाही. ज्ञानयोगावर निरूपण करणाऱ्या भारतीय धार्मिक ग्रंथांमध्ये देखील या गोष्टीशी सहमत होणारे संदर्भ आहेत.

ऊर्जेच्या संवर्धनाच्या नियमानुसार, अस्तित्वात असलेली एकूण ऊर्जा नेहमी सारखीच असते. तथापि, ऊर्जेची रूपं सतत बदलत असतात. जेव्हा मृत्यूच्या वेळी भौतिक शरीर स्वत:चा नाश करतं, तेव्हा मुक्त झालेली ऊर्जा त्या देहाच्या आत्म्यासह प्रवास करते. त्यानंतर, आत्म्याचं मन हे ऊर्जेचे संस्कार निर्माण करतं आणि एक नवीन अस्तित्व प्रकट करतं.

त्यामुळे, तुम्ही तुमच्या चैतन्याची स्थिती बदलण्यासाठी, तुमच्या मनाची पातळी बदलायला पाहिजे. जितकी तुमच्या मनाची पातळी उच्च, तेवढी मनाची हालचाल कमी आणि तुमची जाणीव अधिक असते. जितकं मन अधिक स्थिर असतं, तितकं ते परम-आत्म्याला, एरवीपेक्षा, जास्त प्रमाणात प्रतिबिंबित करतं.

**थोडक्यात**

पहाण्यात रूप असतं.
श्रवणात आवाज असतो.
स्पर्शात भावना असते.
चाखण्यात चव असते.
वास घेण्याच्या प्रक्रियेत सुगंध असतो.

पहाणं, ऐकणं, स्पर्श करणं, चाखणं, वास घेणं हे अनुभव जर माणूस कमी करू शकला, तर अनुभवण्यासारखं फारसं काही रहात नाही. या टप्प्यावर, अनुभव घेणारा हा स्वत:चा अनुभव घेऊ लागतो. स्वत:च्या त्या अनुभवात, त्याला त्याच्या अमर्यादतेचं आकलन होतं नि त्याला जाणवतं की तो जसा आहे, तसा अनुभव आहे.

# निरंतर जागृतावस्था

गुरुदेव सतत जागरूकतेचं जीवन जगले. ही वस्तुस्थिती त्यांच्या देहबोलीतून स्पष्ट व्हायची; ज्या प्रकारे ते चालायचे, ज्या प्रकारे ते बसायचे, ज्या प्रकारे ते कुणाकडे पहायचे इत्यादींद्वारा. ते म्हणजे जणू त्यांचा अंतर्गत रडार कार्यरत होता आणि आम्ही त्यांच्याबद्दलचं जे निरीक्षण सुचवायचो, त्यापेक्षा, त्यांची निरीक्षण करायची पध्दत अधिक होती. ते त्यांची प्रत्येक हालचाल पहाणाऱ्यांची उत्सुकता सहजगत्या उडवून लावायचे, असं म्हणत की- ''जमेल तसा प्रयत्न करा, तुम्हाला वाटत असलं की तुम्ही मला ओळखता, तरी तुम्ही मला कधीच ओळखणार नाही.''

संभाषणाच्या दरम्यान, महागुरू हे बरेचदा चिंतनशील शांततेत गुरफटत असत, परंतु, काही सेकंदांमध्ये किंवा मिनिटांमध्ये त्या क्षणाकडे परत यायचे, जणू काही झालंच नसायचं. बऱ्याच अनुभवांनी या गोष्टीची पुष्टी केली की ते नेहमीच सभोवतालच्या परिस्थितीबद्दल चाणाक्षपणे जागरूक असायचे.

दिल्लीहून हैदराबादला जाणाऱ्या विमानात गुरुदेवांच्या शेजारी बसलो असताना, ते स्वत:ची छाप असलेल्या गाढ तंद्रीत जात असल्याचं मी पाहिलं. माझ्या प्रश्नार्थक नजरेकडे पाहून ते हसले आणि म्हणाले, ''इंदू ही गुरगावातील स्थानात कपडे बाहेर सुकवायला ठेवत आहे.'' जेव्हा आम्ही आकस्मिकपणे ढगांना पहात होतो, तेव्हा महागुरू आपल्या भक्तांच्या नि शिष्यांच्या जीवनातील काळाचा खेळ पहात होते.

अनेक लहान-मोठ्या प्रसंगांनी महागुरूंच्या जागृत तिसऱ्या डोळ्याचं अस्तित्व सिध्द केलं.

गुरुदेवांनी एका वृध्द जोडप्याला आत्महत्येपासून वाचवणं, अशा विशिष्ट अनुभवांमुळे माझी खात्री झाल्ये की गुरुदेव हे आपल्या स्थानांमध्ये येणाऱ्या प्रत्येकाकडे लक्ष द्यायचे; मग ते कुठूनही आलेले असले आणि जरी नवखे असले तरीही. सेवेच्या कोणत्याही दिवशी, गुरुदेवांच्या शिष्यांना माहीत असायचं की आपल्याला पहिल्या आणि शेवटच्या अभ्यागताचं नाव आणि त्याचा चेहरा लक्षात ठेवायचाय. जेव्हा *सेवादार* त्या दिवशी भेटायला आलेल्या प्रत्येक अभ्यागतासाठी स्थानाकडून आवश्यक असलेल्या मदतीविषयी चिंतन करायला बसत, तेव्हा पहिल्या नि शेवटच्या अभ्यागतामधली साखळीची कडी आपोआप जोडली जायची. महागुरू म्हणाले होते की स्थानांवर बोललेला कोणताही शब्द किंवा न बोललेला विचार त्यांच्यापर्यंत पोहचायचा, तसंच मदत मागण्यासाठी आलेल्या असंख्य लोकांच्या इच्छा देखील पोहोचायच्या. त्यामुळे, कोणत्याही *बड्या* गुरुवारी किंवा इतर सेवेच्या दिवशी, हजारोंच्या संख्येनं लागलेल्या लांबलचक रांगा पहाता, गुरुदेव प्रत्यक्ष उपस्थित नसले, तरीही, अभ्यागतांना स्थळावर प्रार्थना करायची विनंती केली जायची.

***महागुरू आणि त्यांची स्थानं ही होती सुरांप्रमाणे त्याच आध्यात्मिक स्वरसंगमातील.***

स्थानातील माझ्या सुरवातीच्या काळात, माझ्या वडिलांना चंदीगडहून दिल्लीला कारनं आणताना मी गुरगाकडे वळसा घेतला. आम्हा दोघांसाठी हा सतत धक्के बसणारा प्रवास होता, फक्त रस्त्यांवर खड्डे असल्यामुळेच नाही, तर वाटेत आमचा प्रचंड वाद झाला होता त्यामुळेही. गुरुदेवांना भेटण्यासाठी मी स्थानाजवळ थांबलो असताना, माझे वडील आस्तिक नसल्यामुळे, गाडीतच थांबले. मी स्थानात प्रवेश करताच, माझ्या गुरूंनी माझ्याकडे पाहिलं, माझं

स्वागत केलं आणि नंतर, काही क्षणांकरता ते गाढ तंद्रीत गेले नि त्यांनी माझ्या वडिलांमध्ये नि माझ्यात झालेल्या संपूर्ण संभाषणाचं वर्णन केलं!

गुरुदेवांची सदैव सावध नजर आमच्या जीवनातील महत्त्वाच्या कृती आणि घटनांवर कब्जा करायची, जरी आम्हाला त्याची जाणीव नसली तरीही. बव्हंशी, त्यांची सतत जागरूकता एक सुरक्षाकवच म्हणून काम करायची. येऊ घातलेल्या धोक्याविषयी इशारा देण्यासाठी, ते वारंवार अप्रत्यक्ष सूचना देत किंवा शारीरिक रूपात  अथवा दृष्टांतांमध्ये प्रकट होत.

मला आठवतंय की गुरुदेवांना भविष्यांतील घडामोडींविषयी जाणीव असल्यामुळे, एका घटनेत, त्यांनी नियतीचे प्रभाव कमी केले. एक कुटुंब उपचारासाठी गुरगावमधील स्थानात रहात होतं. त्यांनी नवी दिल्लीतील नातेवाईकांबरोबर आपला शनिवार नि रविवार व्यतीत करायचं ठरवलं होत. त्यांनी तसं करावं, याबाबत गुरुदेव फारसे उत्सुक नव्हते, परंतु, शेवटी त्यांनी माघार घेतली. ते कुटुंब आपल्या वाहनानं नातेवाईकांच्या घरी जाण्यासाठी निघालं, तेव्हा मध्यरात्र झाली होती. त्यांनी स्थान सोडताच, महागुरूंनी बिट्टुजींना आपल्या गाडीची चावी दिली आणि त्यांच्या वाहनाचा पाठलाग करायला सांगितलं. काही मिनिटांनंतर, बिट्टुजींच्या लक्षात आलं की त्या कुटुंबाचं वाहन एका ट्रकला धडकलं नि खाली घसरलं! वाहनाचा क्रूरपणे चक्काचूर झाला, पण, बिट्टुजींना त्या कुटुंबातील सदस्यांना बाहेर काढण्यात यश आलं. सदस्यांना जरी दुखापत झाली असली, तरी त्यांचा मृत्यू टळला होता. कुटुंबाला काय होऊ शकतं याची जाणीव असल्यामुळे, महागुरूंनी त्याचा प्रभाव कमी केला होता. ते नंतर बिट्टुजींना म्हणाले, ''मी एक गुरू आहे आणि मी घटना घडण्याची शक्यता १०० टक्क्यांपेक्षा कमी करू शकतो. तरीही, जे घडून येणार असतं, ते घडणारच.''

गुरुदेवांना आमच्या केवळ या जन्माचाच नाही, तर पूर्वीच्या जन्मांचा देखील भूतकाळ माहीत होता. त्यांनी रविजींची त्यांच्या नि गुरुदेवांच्या भूतकाळातील

संबंधांबद्दलची उत्सुकता एक नव्हे, तर दोन पूर्वीच्या जन्मकाळांतील दृष्टांत दाखवून शमवली. जेव्हा गुरुदेवांनी मला सांगितलं की माझ्या पहिल्या जन्माचा वारसा अजूनही चालू आहे, तेव्हा मला हे स्वीकारणं कठीण गेलं की मी माझ्या पूर्वीच्या अवतारात एक संत होतो. संतलालजींना सांगण्यात आलं की या हयातीत त्यांच्या नियत वेळेच्या दोन वर्षं अगोदरच, त्यांच्या आईच्या भक्तिभावामुळेच, त्यांना महागुरूंच्या छत्राचा लाभ झाला. वसिष्ठजींनी महागुरूंची भेट होण्यापूर्वी, त्यांना जवळजवळ १० वर्षं आपल्या दृष्टांतांमध्ये पाहिलेलं असल्यामुळे, गुरुदेवांनी वसिष्ठजींना स्पष्ट केलं की १९७० साली रेणुकामध्ये वसिष्ठजींची भेट घ्यायची होती, परंतु, ती १९८० साली झाली. शिवाय, आमच्यापैकी काहींनी आमच्या गुरूंना, आपलं सामूहिक आध्यात्मिक ध्येय पूर्ण करण्यासाठी आपल्या शिष्यांना जवळजवळ सारख्याच वेळी एकत्र आणण्याकरता कशी ५०० वर्षं प्रतीक्षा करावी लागली याविषयी बोलताना ऐकलंय.

या घटनांमध्ये फार मोठ्या संख्येनं भर घातली जाऊ शकते, तरी काळाशी असलेला महागुरूंचा संबंध अजूनही मला बुचकळ्यात टाकतो. त्यांना असं म्हणायचं असावं, ''मला काळाचं बंधन नाही, काळ मला बांधील आहे.'' गुरुदेवांच्या शरीराच्या घड्याळाची, कमी झोप किंवा झोप न घेताही कार्य करता येईल, अशा प्रकारे योजना केली होती. ''जगाची समजूत आहे की मी झोपतो'', त्यांनी आपल्या पत्नीला समजावून सांगितलं, ''पण मी त्यांच्यावर लक्ष ठेवतो नि त्यांना मार्गदर्शन करतो, हे त्यांना कसं समजेल?''

गुरुदेवांची काळाची जाणीव आध्यात्मिक क्षेत्रापर्यंत विस्तारली होती. जेव्हा आमची बथरी राज्य विद्युत मंडळाच्या अतिथिगृहात रहायची व्यवस्था केली होती, तेव्हा त्यांनी मला सांगितलं की एका प्रगत योग्याच्या आत्म्यानं जवळपास एक शतक तिथं आश्रय घेतला होता, गुरुदेवांच्या येण्याची वाट बघत. गुरुदेवांनी आपल्याला मानवी जन्म द्यावा अशी आत्म्याची इच्छा होती.

महागुरूंनी त्या आत्म्याला आपल्या शिष्याच्या पत्नीचा शोभा तनेजाचा गर्भ निवडण्याची अनुमती दिली. गुरुदेवांबरोबरच्या दोन महिन्यांच्या दौऱ्यात, बथरी आणि इतर जिल्ह्यांमध्ये तळ ठोकून असताना, शोभाजी नि त्यांचे पती यांचे वासनारहित संबंध होते. त्यामुळे, त्यांचा मुलगा अभय तनेजा हा पवित्र गर्भधारणेचा परिपाक आहे.

एकदा मी स्थानात गुरुदेवांबरोबर एकटाच होतो. त्यावेळी, त्यांना एक आंतरदेशीय पत्र आलं. जेव्हा त्यांनी ते पत्र पाहिलं, तेव्हा, त्यांचे भाव कठोर झाले. त्यांनी ते पत्र बिछान्यावर ठेवलं नि मला त्यांची खोली सोडून बाहेर थांबायला सांगितलं. सुमारे पाच मिनिटांनंतर, जेव्हा त्यांनी मला आत यायला फर्मावलं, तेव्हा ते फाडलेलं पत्र बिछान्यावर पडलं होतं. जिगसॉ पझलमध्ये अशा प्रकारे ते गोळा केलं गेलं होतं की त्याद्वारा एक यंत्र स्पष्टपणे उघडकीला आणलं गेलं. त्या यंत्राचा हेतू गुरुदेवांचा जीव घेणं हा होता. गुरुदेवांना पत्रातील मजकुराची जाणीव होती, परंतु, त्यांनी ते उघडण्यापूर्वी मी ते बघावं अशी त्यांची इच्छा नव्हती. कारण, त्यांना खात्री होती की त्यामुळे मी धोक्यात आलो असतो. एका नकारात्मक तंत्राचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीनं आपल्या काळ्या जादुटोण्यानं महागुरूंना हानी पोहोचवायचा किंवा जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. पण, अपयशी होऊन, *तांत्रिकानं* आम्हाला शिकण्यासाठी एक उदाहरण देऊ केलं. गुरुदेवांच्या जागरूकतेनं प्राणघातक प्रयत्न हाणून पाडण्यात त्यांना मदत केली.
महागुरू हे नेहमी जागरूकतेत स्थिर असायचे. जेव्हा लोक त्यांना भेटायला येत, तेव्हा लोकांच्या मनात काय चाललंय, हे त्यांना अगोदरच माहीत असायचं आणि संभाषण हे दुसऱ्यांच्या फायद्यासाठी केवळ एक औपचारिकता असे. आम्ही भौगोलिकदृष्ट्या दूर असलो, तरी सुध्दा ते आमचं मन वाचू शकत. सरळ पोहोचण्यासाठी त्या मनाला त्यांच्या सूक्ष्मदर्शी क्षमतेशी जोडा आणि मग, तुमच्याकडे आध्यात्मिक सुपरमॅनची (प्रचंड ताकद, उडण्याची क्षमता आणि इतर विलक्षण शक्ती असलेली व्यक्ती) कमतरता नाही.

सात दिवसांचं धाडस करून, किशोरवयात पळून जाण्याला सुमारे पाच दशकं झाली होती, तरी, गग्गुजींना, आपले काका (शिवपुरीतील महागुरूंच्या घरापासून चाळीस किलोमीटर अंतरावरील) गजबजलेल्या शादिपूर बस डेपोमध्ये थेट आपल्यापर्यंत कसे पोहोचले आणि आपल्याला सुरक्षितपणे कसे घरी घेऊन गेले, याचा अजूनही उलगडा झालेला नाही! मुंबईहून घरी जाण्यासाठी गग्गुजींना ट्रेन्स आणि तीन बसेस बदलण्याची आवश्यकता होती. आपला स्वप्ननगरीतील मुक्काम अयशस्वी आणि रद्द झाल्यानंतर, गग्गुजींना परत जाण्याबद्दल खात्री नव्हती आणि त्यांनी फार फिकिरही केली नाही. त्यामुळे, दिल्लीत बसमधून उतरताना महागुरूंना पहाणं म्हणजे धक्का नि विस्मय असं मिश्रण होतं! गग्गुजी कुठं आहेत, हे त्यांच्या कुटुंबातील कुणालाही माहीत नसताना, महागुरूंनी त्यांना कसं काय शोधून काढलं? सेल्युलर फोन नकाशावर देखील नव्हते, जी.पी.एस. फक्त विमानात तयार केलं गेलं होतं आणि दूरध्वनी-संभाषण पण नव्हतं. असं असताना, सामान्य माणसाला हे सगळं कसं कळणार होतं?

गुरुदेव हे असामान्य शक्ती असलेले सामान्य मानव होते. बावीस वर्षं ज्यांच्याशी संपर्क तुटला होता, त्या आपल्या बालपणीच्या मित्राला सुभाषजींना स्वप्नात भेटताना महागुरू म्हणाले होते, ''मी एक सामान्य माणूस आहे, सामान्य गुरू नाही.'' त्यांच्या गुरु-चैतन्याला या जगाची आणि पलीकडची जाणीव होती.

## सचेत जागृतावस्था

जोपर्यंत आपण प्रत्यक्ष अनुभवत नाही, तोपर्यंत, जे भासतं, त्याला परस्परविरोधी, जागृत जाणीव म्हणजे विचारांनी जखडलं जाणं नाही. जागृत जाणीव म्हणजे मनानं, इच्छेनुसार, परचित्तज्ञानाच्या साहाय्यानं अनेक कंपनांशी मिळतंजुळतं घेणं आहे. मला ठाऊक आहे की गुरुदेवांव्यतिरिक्त, राजा जनक, गुरु वसिष्ठ, येशू, तसंच काही ज्ञात नि अज्ञात लोक जागृत जाणीवेत रहात होते.

जागृत जाणीव वाढवण्यासाठी मी दोन मार्ग सुचवू शकतो. पहिला - तुमच्या कपाळापासून एक फूट दूर असलेल्या कोणत्याही एका बिंदूवर लक्ष केंद्रित करा; दुसरा- तुम्ही पहाता त्या प्रत्येक गोष्टीत आणि प्रत्येक पृष्ठभागावर ॐ चं काल्पनिक चित्र उभं करा. तुम्ही दोन्ही मार्गांचा सराव करावा अशी मी शिफारस करतो. कारण, एक मार्ग लक्ष वेधून घ्यायला मदत करतो, तर दुसरा मार्ग काल्पनिक चित्राचं प्रकटीकरण करतो.

## एकल-बिंदू एकाग्रता

माझा असा विश्वास आहे की तुमच्या कपाळापासून एक फूट अंतरावर निवडलेल्या काल्पनिक बिंदूकडे सतत टक लावून पहाण्यामुळे, विचार नि सभोवतालच्या आवाजातला गोंधळ कमी होऊ शकतो. कालांतरानं, तुमच्या मेंदूच्या चौकस आणि आकलनविषयक क्षमतांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होते. या सरावामुळे, तुम्ही एकल-बिंदू एकाग्रता विकसित करता. प्रत्येक वेळी जेव्हा तुमचं मन भटकायला लागतं, तेव्हा तुम्ही त्याला काल्पनिक बिंदूवर लक्ष केंद्रित करण्यासाठी परत आणता. सतत सरावानं, तुम्ही इच्छेनुसार, लक्ष केंद्रित करणं आणि लक्ष काढून घेणं शिकू शकता.

## ॐ चं काल्पनिक चित्र

शिकागोमध्ये एक स्थान चालवणारे सुरिंदर कौशलजी यांना गुरुदेव एकदा म्हणाल्याचं आठवतंय, ''ॐ हा ध्वनी आहे ज्यामुळे विश्वातील प्रत्येक गोष्ट निर्माण झाली आहे. ॐ हा गुरू आहे. जेव्हा तुम्ही ॐ चा जप करता, तेव्हा तुम्ही माझ्या नावाचा जप करता आणि जेव्हा तुम्ही ॐ चा विचार करता, तेव्हा तुम्ही माझा विचार करता.''



*जागरूक जाणीव वाढवण्यासाठी गुरुदेव*
*ॐ ला मन:चक्षूंसमोर आणतात*

महागुरूंनी ॐ ला आरंभ, अंत आणि अखंड मानलं. दररोज, शक्य तितक्या वेळा ॐ चं काल्पनिक चित्र उभं करावं असा त्यांचा आदेश होता. मी तसं केलं. कारण, तो त्यांचा आदेश होता. परंतु, सराव आणि परिणाम यांच्यातील ठिपके मी काही वर्षांनंतरच जोडू शकलो, जेव्हा मला गुरु चरण प्राप्ती झाली. कुंडलिनी ते तिसऱ्या नेत्र चक्रापर्यंत स्थित्यंतर होणं हे सूचित करणारी एक महान कामगिरी.

गुरूंचं चैतन्य हे (ब्रह्मा, विष्णू आणि शिव) तीन चैतन्यांचं मिश्रण आहे आणि तरीही त्यांपलीकडे जातं. हे विधान हास्यास्पद भासू शकतं. कारण, ते अतार्किक वाटतं. वस्तुस्थिती अशी आहे की आपण केवळ इंद्रियगम्य माहिती गोळा करून वास्तविकतेचा अर्थ लावायचा प्रयत्न करत असतो. शास्त्रांची भाषा ही खरं तर तर्कापेक्षा अंतर्ज्ञानातून उदयाला आलेली आहे. तरीही त्यामुळेच, ती सुध्दा असंबंध्द वाटतात. अंतर्ज्ञानानं सांगायचं झालं तर, गुरूंच्या चैतन्यात (भौतिक, सूक्ष्म आणि कारण) या तीन अस्तित्वांतील समतलांचा समावेश होतो आणि ते चैतन्य त्यांच्या पलीकडे विस्तारतं. गुरूंचे चरण आज्ञाचक्रात (तिसरा डोळा) स्थित आहेत, तर त्यांचं मस्तक सहस्त्रार चक्रात आहे. जागृती ते आत्मज्ञान, *ग्यान* ते *दिव्य ग्यान* हा प्रवास सहाव्या ते सातव्या चक्रापर्यंत चालतो.

मला पुन्हा पुन्हा सांगावसं वाटतं की गुरुदेवांनी जरी आम्हाला कारण सांगितलं नाही, तरी पण, ॐ चं काल्पनिक चित्र उभं करण्याचा आदेश दिला. त्यांनी सल्ला दिला, *''बुद्दू बन जा',* याचा अर्थ असा की दृष्टिकोनांच्या काचेच्या लोलकातून माझ्या धारणेची छाननी करणं मी थांबवलं पाहिजे. तर्कशास्त्र जिथं संपतं, तिथं अंतर्ज्ञान सुरू होतं हे मी शिकलोय. तथापि, महागुरूंच्या शिकवणुकींचा तार्किक अर्थ लावण्याचा प्रयत्न करणारे या सरावासाठी लायक बनावेत, याकरता मी अतिरिक्त माहिती सांगतोय.

## ॐ आणि आज्ञा

*प्राण* किंवा श्वास मानवी शरीरात नाडी नावाच्या ऊर्जेच्या मार्गांनी वहात असतो. शरीरातील विशिष्ट बिंदूंवर नाड्या एक जाळं तयार करतात. हे बिंदू म्हणजे फिरणारे ऊर्जा भोवरे आहेत. ते चक्रं म्हणून ओळखले जातात. शरीरात अनेक चक्रं आहेत. परंतु, त्यांपैकी सात चक्रं ही सर्वात प्रभावी आहेत. यांतील प्रत्येक चक्र हे सूक्ष्म मार्गांसह वेगवेगळ्या बिंदूंवर स्थित आहे. ही चक्रं शरीराची ऊर्जा चुंबकीय ठेवतात आणि त्यांच्या नियुक्त केलेल्या भागांमध्ये ती कमी प्रमाणात वापरतात. चेतना वाढवण्यासाठी या झडपा उघडल्या पाहिजेत. जेणेकरून ऊर्जेला मूलाधार किंवा मणक्याच्या पायथ्यापासून सहस्रार किंवा डोक्याच्या मुकुटापर्यंत वहाणं शक्य होतं.

जेव्हा ऊर्जा ही कोणत्याही चक्रात अडकते, तेव्हा तिच्यामुळे शारीरिक किंवा मानसिक अस्वस्थता निर्माण होते. परिणामी, ती जीवात्म्याला स्वत:मध्ये पूर्ण प्रवेश करण्यास प्रतिबंध करते. प्रत्येक चक्र हे विशिष्ट कंपनसंख्येनं फिरत असल्यामुळे, त्याला स्वत:चं *कंपन* (ध्वनी), *रूप* ( रंग आणि चिन्हं), *गुणधर्म* (गुण) असतात आणि ते काही अवयव प्रणाली नियंत्रित करतात. मूलाधारात सर्वात कमी कंपन असतं, तर सहस्रारात सर्वात अधिक आणि सूक्ष्म कंपन असतं.

आज्ञा चक्र हे मेंदूचं नियंत्रण करतं आणि कपाळाच्या मध्यभागी दोन भुवयांच्या दरम्यान स्थित असतं. परिणामी, हे चक्र प्रत्यक्ष ज्ञानाचा अर्थ लावण्यासाठी आणि सहावं इंद्रिय (अंतर्ज्ञान) वृध्दिंगत करण्यासाठी जबाबदार असतं. आज्ञा चक्र कार्यशील झाल्यामुळे मनाला आपल्या स्वभावात येण्यास सक्षम बनवतं आणि शारीरिक ऊर्जेच्या प्रवाहावर हुकुमत गाजवतं. जिथं ऊर्जा वहाते, तिथं लक्ष जात असल्यामुळे, हे चक्र दक्ष जाणीवेसाठी वाहक बनतं, त्याचप्रमाणे, मनाचा मनाशी संवाद, आणि अतींद्रिय श्रवण आणि दृष्टिआड असणाऱ्या गोष्टी पहाण्याची दृष्टी इत्यादींनी युक्त तेजस्वी आकलन अशा अव्यक्त मानसिक क्षमतांमध्ये शिरण्याचा मार्ग बनतं.

जेव्हा माझा तिसरा डोळा उघडला, तेव्हा अनेक विचित्र गोष्टी घडल्या. याची सुरवात आवाज ऐकण्याच्या आणि उघड्या डोळयांना न दिसणाऱ्या गोष्टी पहाण्याच्या माझ्या क्षमतेपासून झाली. जो आवाज मी ऐकला, तो बाहेरून आलेला आवाज नव्हता, तर आतला आवाज बोलत होता. जरी मला अंतर्ज्ञानानं जाणवलं आणि मी लपलेल्याची आणि भविष्याची झलक बघितली, तरीही मी पाहिलेलं अथवा ऐकलेलं सर्व काही अर्थपूर्ण नव्हतं. कधी कधी, तो आवाज फक्त माझ्या डाव्या कानानं ते या रॉकबँडचं गीत ऐकण्यासमान क्षुल्लक होता. अगदी तसाच! मी तो उजव्या कानानं ऐकू शकत नव्हतो, माझी पत्नी ऐकू शकत नव्हती आणि माझ्या खोलीत तर म्युझिक सिस्टिम नव्हती. मग तो आवाज कुठून येत होता? जेव्हा मी गुरुदेवांशी या घडामोडींवर चर्चा केली, तेव्हा त्यांनी माझ्या डोक्यावर हात फिरवला. माझ्या मानेच्या मागच्या बाजूला खालपर्यंत हात फिरवत, त्यांनी माझी कुंडलिनी खाली आणली. मला कळत होतं की ते माझ्या अतींद्रिय क्षमता कमी करत होते. परंतु, मी माझी निराशा लपवली. सहस्त्रार चक्र आणि पलीकडे जाण्याच्या मार्गावर मी आज्ञा चक्रात अडकून पडू नये, अशी त्यांची इच्छा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

अनेक वर्षांनंतर, ध्यान करताना, मला सातव्या चक्राच्या पलीकडे जाण्याचा अनुभव आला. माझ्या डोक्याच्या मागच्या बाजूला, माझ्या नाकाच्या पाळीवर, एखादा कागदाचा तुकडा फाडल्यासारखा वाटला. अचानक, माझ्या मागे जे काही घडत होतं, ते मला दिसलं. मला असं वाटतं की प्रतिकात्मकपणे, याचा 'चौथा डोळा उघडणं' असा उल्लेख केला जाऊ शकतो. जागेपणी हे एकदाच घडलं आणि तेव्हापासून ते पुन्हा घडलं नाही. माझा चौथा डोळा आपोआप कसा उघडला आणि आपोआप कसा बंद झाला याची मला जागरूक जाणीव नाही.

जरी सेवेचा समावेश असलेल्या गंभीर परिस्थितीत, अंतर्ज्ञान हे सामान्य पातळ्यांपेक्षा वर जातं, तरीही, आजकाल, मी क्वचितच जागृत जाणीवेच्या अवस्थेत प्रवेश करू शकतो. सतत जागरूकता हे खूप मोठं ओझं आहे आणि अगदी अल्प प्रमाणात सुध्दा, ते वाटतं तितकं आकर्षक नाही. गुरुदेवांची

अखंड जागृत रहाण्याची क्षमता ही कदाचित त्यांच्या जीवनातील सर्वात तीव्र समस्या होती. महागुरू म्हणून त्यांची भूमिका लक्षात घेता, ते सदैव भौतिक नि आध्यात्मिक क्षेत्रांबद्दल जागरूक होते, कदाचित वैयक्तिक आवडीपेक्षा इतरांप्रति जबाबदारी म्हणून जास्त.

---

शरीरशास्त्रानुसार, डावा मेंदू हा शरीराच्या उजव्या बाजूवर नियंत्रण ठेवतो, तर उजवा मेंदू हा शरीराच्या डाव्या बाजूवर नियंत्रण ठेवतो. शरीराच्या उजव्या बाजूच्या ऊर्जा या पिंगला नाडीद्वारा प्रवाहित केल्या जातात, तर डाव्या बाजूच्या ऊर्जा या इडा नाडीद्वारा निर्देशित केल्या जातात. पिंगला ही सौर किरणांनी प्रभावित होते, तर इडा ही चंद्रकिरणांनी प्रभावित होते. परिणामवश, शरीराची उजवी बाजू ही उबदार नि तेजस्वी असते, तर डावी बाजू थंड असते. अशा प्रकारे, पुरुष-ऊर्जा ही शरीराच्या उजव्या बाजूला असते, तर स्त्री-ऊर्जा ही शरीराच्या डाव्या बाजूला असते. अशा रीतीनं, प्रत्येक माणूस हा अर्धा पुरुष (शिव) आणि अर्धा स्त्री (शक्ती) असतो.

---

सुषुम्ना नाडी ही मानवी यंत्रणेची सर्वात महत्त्वाची ऊर्जा वाहिनी आहे. पाठीचा कणा किंवा मस्तिष्क स्तंभ ही तिची शारीरिक प्रतिकृती आहे. आज्ञा हा शरीरातील एकमेव बिंदू आहे की जिथं इडा नि पिंगला या एकत्र येतात आणि ऊर्जा त्रिकोण (त्रिवेणी) तयार होतो. जेव्हा सुषुम्ना ही आज्ञा चक्रामध्ये बळकट केली जाते, तेव्हा मेंदूचे दोन्ही गोलार्ध एकाच वेळी क्रियाशील होतात. या संरोहणाचा परिणाम म्हणून, मेंदू-मनाचा समन्वय सुधारतो.

सहाव्या चक्राखाली असलेली पाच चक्रं ही निसर्गाच्या पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश या पाच (गण ) घटकांनी सक्रिय झाली आहेत. प्रत्येक घटक हा वास, चव, दृष्टी, स्पर्श आणि श्रवण या पाच इंद्रियांपैकी एकाशी संबंधित असतो. पाच चक्रं, पाच तत्त्वं, पाच इंद्रियं- अशा प्रकारे, पाच चक्रांच्या वर स्थित असलेल्या आज्ञा चक्राला गणांचा स्वामी मानलं जातं.

आज्ञा चक्राचा संप्रेरक ॐ हा घटकांच्या आणि इंद्रियांच्या पलीकडे असतो. या संप्रेरकाला मानसिक कल्पनाचित्र कसं सक्रिय करतं ते शोधू या!

## मानसिक कल्पनाचित्रांचं प्रकटीकरण

कल्पनाशक्ती ही मानसिक कल्पनाचित्र रेखाटण्याचा पक्का पाया आहे. कोणताही माणूस फक्त पूर्वी पाहिलेल्याच नाही, तर यापूर्वी कधीही न पाहिलेल्या असंख्य वस्तूंची कल्पना करू शकतो. प्रतिमा, संख्या, ध्वनी, रूपं, वास इत्यादींचा निश्चल नि चल चित्रांच्या स्वरूपांत कल्पनेद्वारा विशिष्ट प्रकारे अर्थ लावला जाऊ शकतो. अशा रीतीनं, कल्पनाशक्ती कधीही पूर्ण न झालेल्या आठवणी बांधू शकते. शास्त्रज्ञ पुष्टी देतात की कल्पनाचित्र रेखाटणं ही विशिष्ट हेतूनं प्रेरित झालेली जाणीवपूर्वक कल्पना आहे. मेंदूच्या संशोधनातून असं दिसून आलंय की विचार हा कृतीसारखाच समान प्रभाव निर्माण करतो. जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट करायचा विचार करता, तेव्हा मेंदूचे जे शारीरिक बदल होतात, तेच बदल, जेव्हा तुम्ही ती कृती करता, तेव्हाही असतात. दुसऱ्या शब्दांत, मेंदू हा विचार आणि त्या विचारानं प्रेरित झालेली कृती यात फरक करू शकत नाही.

नियमितपणे, ॐ चं काल्पनिक चित्र रेखाटून, तुम्ही तुमच्यातील ॐ सक्रिय करण्यासाठी विचारशक्ती आणि हेतू वापरता. त्याचप्रमाणे, जर तुम्ही त्रिशूलाची कल्पना केलीत, तर तुम्ही त्याची शक्ती तुमच्या आत निर्माण कराल, वगैरे, वगैरे. वारंवार कल्पनाचित्र तयार करणं हा तुमची क्षमता बंधमुक्त करण्याचा आणि प्रकट करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. बहुतेक ऑलिम्पिक खेळाडू हे त्यांचे खेळ सुरू होण्यापूर्वी आपल्या डावपेचांची आणि विजयाची कल्पना करतात. ज्यांनी आपले जागरूक विचार यशस्वीपणे प्रकट केलेत, अशांच्या उदाहरणांनी इतिहास भरलेला आहे.

गुरुदेवांचे शब्द होते, ''तुम्ही शारीरिक दृष्ट्या जे करू शकता, ते तुम्ही मानसिक दृष्ट्या करू शकता.'' तिबेटी भिक्षू हे आपल्या मनानं आपल्या शरीराचं तापमान वाढवू शकतात आणि शाओलीन भिक्षू हे आपल्या मनाला तीव्र शारीरिक वेदना जाणवू न देता, ती सहन करण्यासाठी, त्याला प्रशिक्षित करू शकतात. काही इतर भिक्षू हे मानसिकदृष्ट्या आपल्या शरीराला हवेत तरंगण्याची आज्ञा देऊ शकतात. हे उच्चतम प्रभाव आहेत की या केवळ कर्मप्रधान मानवी क्षमता आहेत ? जर तुम्ही स्वत:च सखोल विश्लेषण कराल, तर उत्तरं समोर येतील.

गुरुदेव हे चपळ, जागरूक आणि सावध होते
विविध स्तरांवर. अधिक माहिती करून घेण्यासाठी
www.gurudevonline.com वर
**Constant Awareness** हे
Podcast ऐका

# विशिष्ट दिवस

गुरुदेव वर्षातील काही ठराविक दिवस विशिष्ट प्रकारे पाळायचे.

## बडा गुरुवार

महिन्याचा एक गुरुवार *बडा* गुरुवार म्हणून नियुक्त केला आहे. साधारणपणे, तो चंद्र नसलेल्या रात्रीनंतरचा (अमावास्येनंतरचा) पहिला गुरुवार असतो.

या दिवशी, देशभरातील स्थानांवर सेवा केली जाते. अभ्यागतांना चहा आणि शक्य झाल्यास खिचडी दिली जाते. त्यांना त्या बदल्यात काहीही देण्याची परवानगी नाही. कारण, दिलेल्या सेवेच्या बदल्यात काहीही स्वीकारलं जात नाही. तथापि, गुरुगावमधील मुख्य स्थानाला भेट देणारे अभ्यागत हे साखरेत घोळवलेले बार्लीचे दाणे (*फुलिया*) आणि साखरेचे बत्तासे (*पत्तीसा)* देऊ शकतात. स्थानात शक्ती उत्पन्न झाल्यानंतर, हे साखरेचे नैवेद्य त्यांना परत केले जातात.

गुरुदेवांच्या काळात, बड्या गुरुवारी सुमारे ५०,००० लोक गुरुदेवांची मदत घ्यायला येत असत. गुरुदेव त्या सर्वांना काही सेकंद किंवा त्याहून काही जास्त वेळ भेटत. अनेकांकडे त्यांना आवश्यक असलेल्या मदतीबद्दल तपशीलवार माहिती देण्यासाठी वेळ नसायचा. परंतु, कसंही करून, त्यांना मदत मिळायची किंवा हवा असलेला उपचार लाभायचा.

*गणेश चौथच्या दिवशी माताजी*
*भक्तांना लड्डू वाटतात*





## सोमवारचे उपवास

गुरुदेव आठवड्यातून एकदा सोमवारी उपवास करायचे. या दिवशी, ते रात्रीपर्यंत फक्त द्रवपदार्थांवर रहायचे.

महागुरू म्हणून, सुरवातीच्या वर्षांमध्ये, ते पाणी, दही आणि गूळ खाऊन उपवास सोडत असत. त्यांनतर, ते बटाट्याची *सब्जी* (भाजी) आणि *रोटी* खाऊन उपवास सोडायला लागले.

पाणी-दही-गूळ संमिश्रणातला आपला वाटा खाण्यापूर्वी गुरुदेव तो गाय, कावळा, कुत्रा नि घरातील पाहुण्यांमध्ये वाटायचे. अखेरीस, त्यांनी ही पध्दत सोडून दिली. अलीकडे, सोमवारचा उपवास हा सूर्यास्ताच्या वेळीच, बटाट्याची *सब्जी* (भाजी) आणि भात किंवा *रोटी* या जेवणासह सोडला जातो. भक्त आणि शिष्य, त्यांच्या इच्छेनुसार, दिवसभर फळं खाऊ शकतात.

गुरुदेवांनी तपस्येचा  एक प्रकार म्हणून उपवास करण्याची शिफारस केली. प्रारब्धानं तुम्हाला देऊ केलेल्या जेवणाचा त्याग करून, ते जेवण तुम्ही स्वेच्छेनं, दुसऱ्या जीवासाठी सोडून देता. शिवाय, आठवड्यातून एकदा उपवास केल्यामुळे, पचनसंस्थेला आराम मिळतो, विषारी पदार्थ बाहेर पडतात, शरीरातील पेशींची दुरुस्ती होते चयापचय गतिमान होतं आणि मेंदूचं आरोग्य सुधारतं. शिवाय, मीठ नि तृणधान्यं खात नसल्यामुळे, शरीरातील स्राव कमी होतात आणि मन हे क्रियाकलाप नि तणावापासून मुक्त होतं.

सोमवार हे असे दिवस आहेत की जेव्हा चंद्राची किरणं प्रभावी असतात. चंद्राची किरणं ही पाणी नि मन या दोघांवरही परिणाम करतात. आपल्या शरीरांमध्ये जवळजवळ ७० टक्के पाणी असतं. त्यामुळे, या किरणांचा शरीर-मन-मिश्रणावर प्रभाव पडतो. म्हणून, सोमवारचे उपवास करणं हे शारीरिक आणि मानसिक आरोग्याकरता लाभदायक असतं.

रविजींना गुरुदेवांचे शब्द आठवतात, ''सोमवार हे तुमच्या इष्टाला समर्पित आहेत. त्यामुळे, या दिवशी, जितके शक्य असतील तितके पाथ करावेत.'' ज्या इष्टाचा संदर्भ दिला जातोय, तो म्हणजे अव्यक्त अवस्थेतील शिव आहे.

## विशिष्ट उपवास

गुरुदेवांनी गणेश *चौथ* (चतुर्थी) आणि महाशिवरात्रीला सुध्दा उपवास करण्याची शिफारस केली.

रविजींना गुरुजींना असं स्पष्टीकरण दिल्याचं स्मरतं की उपवास हा आत्मसंयमनाचा सराव आहे. त्याचा उद्देश अन्न सेवन, वाणी आणि इंद्रियांवर नियंत्रण ठेवणं आहे. उपवासामुळे माणसांमध्ये चुंबकीय गुणांची क्षमता वाढते. परिणामी, एखादी व्यक्ती पृथ्वी किंवा वातावरणातून अधिक ऊर्जा शोषू शकते. ज्यांची धारणक्षमता जास्त आहे, अशांसाठी, उपवास हा ऊर्जा पुन्हा भरून काढण्याचा एक प्रभावी मार्ग आहे.

## गणेश चौथ (चतुर्थी)

गणेश चौथ ही साधारणपणे जानेवारीत साजरी केली जाते, जेव्हा हवामान थंड आणि हिवाळी असतं. भक्त आणि शिष्य हे त्या दिवशी सूर्योदयापासून ते चंद्रोदयापर्यंत अन्न किंवा पाणी न घेता उपवास करतात. उपवास सोडण्यासाठी गूळ-तिळाचे *लड्डू* (लाडू) आणि गुळाचा चहा दिला जातो. हे स्थानातील अभ्यागतांना दिले जातात किंवा घरी बनवले जातात.

दिवाळी ते महाशिवरात्री या कालावधीला शक्तिकाल असं म्हणतात. या काळात, एखाद्या व्यक्तीचं मर्दानी ऊर्जा तत्त्व निष्क्रिय होतं, तर स्त्री-ऊर्जा तत्त्व वरचढ बनतं. ज्यांना या *तांत्रिकतेची* जाणीव असते, असे सराव करणारे

अध्यात्मवादी पुरुष या काळात इतरांचं लक्ष वेधणार नाही अशा प्रकारचं वर्तन करणं पसंत करतात, आपला स्त्रियांशी सामाजिक संपर्क जितका आवश्यक असतो, तितकाच मर्यादित ठेवतात.

गणेश चौथला एक तृतीयांश मर्दानी तत्त्व पुन्हा जागृत होतं. त्यामुळे, माणसाला त्याच्या अस्तित्वाला वृध्दिंगत करणाऱ्या शक्तिशाली ठिणगीचा एक भाग पुन्हा प्राप्त करता येतो. अखेरीस, महाशिवरात्रीला, पुरुषाच्या ऊर्जेचं मर्दानी तत्त्व पूर्णपणे जागृत होतं आणि आपलं वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करतं.

## महाशिवरात्री

हा दिवस दर वर्षी, गणेश चौथनंतर एकेचाळीस दिवसांनी येतो, साधारणपणे, फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये.

जे उपवास करतात, ते सूर्यादयापूर्वी जेवतात आणि मध्यरात्रीपर्यंत अन्न किंवा पाणी घेत नाहीत. ते स्थानात किंवा घरी खारट तळलेले बटाटे नि लिंबू-मिरपूड युक्त काळ्या चहानं उपवास सोडतात. गणेश चौथपेक्षा हे व्रत अधिक कडक आहे. कारण, ते काही तास जास्त काळ सुरू असतं.

गुरुदेवांच्या काळात, भक्तांच्या रांगा अनेक किलोमीटरपर्यंत पसरलेल्या असायच्या. सर्व भक्तांनी महागुरूंना भेटून, त्यांचे आशीर्वाद घेण्याकरता निश्चितपणे तीन ते चार दिवस लागायचे.

सर्व स्थानांमध्ये महाशिवरात्री साजरी केली जाते, परंतु, जगभरातील अनेक भक्त या आध्यात्मिक उत्सवादरम्यान गुरगाव स्थानात एकत्र जमतात. पाहुण्यांच्या भोजनाची नि निवासाची जबाबदारी *सेवादारांवर* सोपवलेली असते. मोठ्या प्रमाणात अन्न तयार केलं जातं आणि महाशिवरात्रीच्या दोन दिवस अगोदर नि दोन दिवस नंतर, सर्व पाहुण्यांना लंगर  दिलं जातं.

गुरुदेवांच्या जीवनाचं अधिक जवळून निरीक्षण केल्यावर मला असं आढळलं की त्यांच्यासाठी जवळजवळ प्रत्येक प्रसंग हा असंख्य लोकांना भोजन देण्याची एक संधीच होता.

## गुरू पूर्णिमा

दरवर्षी, साधारणपणे जुलैमध्ये, एक दिवस गुरूंकरता विधिपूर्वक समर्पित केला जातो. हा दिवस गुरू पूर्णिमा म्हणून ओळखला जातो. तुमच्या जीवनात तुमच्या गुरूंच्या उपस्थितीबद्दल आणि तुमच्या आध्यात्मिक वृध्दीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे.

गुरुदेवांच्या दृष्टीनं, हा दिवस प्रथेचा उत्सव म्हणून ओळखला गेला. गुरुदेवांचे भक्त गुरुदेवांना पिवळ्या रुमालात गुंडाळलेला नारळ अर्पण करायचे. त्या नारळाला गुरुदेव आशीर्वाद द्यायचे नि तो परत करायचे. नारळाचा साधारणपणे मानवी डोक्याशी संबंध जोडला जातो आणि तो तुमच्या गुरूंना अर्पण करणं म्हणजे गुरूंच्या कृपेला शरण जाणं. महागुरू आपल्या शिष्यांना *नौ वस्त्रं* (नऊ कपडे) किंवा नऊ उपकरणं भेट म्हणून द्यायची परवानगी देत. याला विकल्प म्हणून, जर आपण एखाद्या पिवळ्या रुमालावर *नौ वस्त्रं* (नऊ कपडे) असं लिहून, तो देऊ केला, तरी प्रथा पूर्ण होईल, असं ते मानत. गुरुदेव काही शिष्यांना आपले पाय धुवायची आणि ते पाणी पिण्याची परवानगी द्यायचे, ज्यात त्यांची ऊर्जा होती आणि जे अत्यंत शक्तिशाली होतं. अनेक शिष्यांना ऊर्जायुक्त पाणी अमृत वाटायचं. कारण, त्या पाण्यामुळे, त्यांची चेतना वृध्दिंगत व्हायची.

आपल्या नारळांना आशीर्वाद मिळण्यासाठी हजारो भक्त घोळक्यानं एकत्र जमत आणि काहीजण गुरुदेवांप्रति आदरांजली वाहून होईपर्यंत, फळं खाऊन उपवास करत. त्यांना स्थानात गोड केशर भात आणि आंबे दिले जायचे.

गुरुपूर्णिमेला गुरुदेव एका भक्ताच्या
नारळाला आशीर्वाद देतात



## दशेहरा (दसरा), धनतेरस (धनत्रयोदशी) आणि दिवाली (दिवाळी )

चांद्र कालचक्रानुसार, दशेहरा ते दिवाळी हे वीस दिवस वर्षातील सर्वात अंधारे दिवस असतात. गुरू म्हणून स्वत:चा आध्यात्मिक विकास होत असताना, गुरुदेव या काळात खूप *पाथ* करायचे, जमिनीवर झोपायचे, कपडे न बदलता, तेच कपडे घालायचे आणि जर जेवलेच, तर हलकं जेवण जेवायचे. मागाहून, त्यांनी स्वत: हा सराव थांबवला, पण, काही शिष्यांना तो सराव करण्याबद्दल सुचवलं.

### धनतेरस (धनत्रयोदशी)

दिवाळीच्या एक-दोन दिवस अगोदर धनतेरस येते. लक्ष्मीदेवी या संपत्तीच्या देवतेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि *बरकत* / भरभराट (तुमचा पैसा जास्त काळ टिकेल असं भाग्य) संबंधी विनवणी करण्याचा हा दिवस आहे.

या दिवशी, महागुरूंचे भक्त नि शिष्य हे लक्ष्मी देवीचं चांदीचं नाणं खरेदी करत आणि त्याला गुरुदेवांचा आशीर्वाद घेत.

दिवाळीपासून एकेचाळीस रात्री त्या नाण्यावर कुंकू किंवा सिंदूर *तिलक* लावला जातो आणि देवतेची शक्ती शांत करण्याकरता आणि आपल्या प्रत्येकात अव्यक्त असलेली *बरकतची* शक्ती जागृत करण्याकरता एका विशिष्ट मंत्राचा जप केला जातो.

### दिवाली (दिवाळी)

दिवाली ही वर्षातील सर्वात अंधारी रात्र असते. या रात्री, आम्ही विशेष करून जलकुंभ, तुळशीचं रोप, पिंपळाचं झाड, रस्ते एकमेकांना छेदतात तो चौक,

मंदिर, स्मशानभूमी आणि आमची घरं अशा सात विशेष ठिकाणी *दिया* किंवा तेलाचे दिवे लावावेत असं महागुरूंनी सुचवलं. विशेष ऊर्जा शांत करण्यासाठी साधारणपणे *दिया* (दिवे) लावले जातात.

गुरुदेवांनी आम्हाला या रात्री *पाथ* करत जागत रहाण्याचा सल्लाही दिलाय. जरी मंत्रावर आधारित ध्यान हे सर्व दिवसांसाठी आवश्यक असलं, तरी त्याचं सामर्थ्य हे विशिष्ट दिवशी लक्षणीयरीत्या वाढतं.

## इतर महत्त्वाचे दिवस

**ग्रहणाच्या** दरम्यान, महागुरूंनी पाणी आणि अन्न वर्ज्य करायचा सल्ला दिला आणि त्याऐवजी, *पाथावर* लक्ष केंद्रित करण्यासंबंधी सुचवलं.

**श्राध्दाच्या** दिवसांमध्ये, गुरुदेवांनी, आम्हाला आमच्या पूवर्जांच्या वतीने, लोकांना नि प्राण्यांना खाऊ घालावं असं सुचवलं. त्याव्यतिरिक्त, इतर धर्मादाय कृत्यं पूर्वजांच्या नावानं केली जाऊ शकतात आणि केलीच पाहिजेत.

जीवात्मा जन्मत नाही किंवा मरत नाही, असा गुरुदेवांचा विश्वास असल्यामुळे, महागुरूंनी वाढदिवसाची संकल्पना कधीही स्वीकारली नाही. तथापि, महागुरूंच्या मृत्यूनंतर, त्यांच्या भक्तांनी **बसंत पंचमी** हा दिवस त्यांचा वाढदिवस म्हणून पाळण्यास सुरवात केली. या दिवशी गोड केशर भात वाटण्याची परंपरा गुरुदेवांच्या काळातली असली, तरी, गुरुदेवांनी तो दिवस फक्त बुध्दीची देवता सरस्वती देवीला समर्पित दिवस म्हणून पाळला.


# ०५

# स्वच्छता

*त्यांच्या पध्दतींनी, आध्यात्मिक गुंतवणुकीच्या योजनांप्रमाणे*
*प्रदान केली गुंतवणुकीवर न ऐकलेली परतफेड.*
*जेव्हा आम्ही त्यांच्या सवयी स्वीकारल्या आमच्या सवयी म्हणून,*
*त्यांनी साहाय्य केलं आमच्या आध्यात्मिक उत्कर्षाला.*

तुमच्या अस्तित्वाच्या गुणवत्तेनं तुमच्या भौतिक जीवनावर मात केली पाहिजे. हा सत्यवाद महागुरूंच्या विचारप्रणालीचा प्रतिध्वनी आहे. तुमची *कर्मं* (कृती आणि विचार) या जगातील (भू-लोक) तुमच्या अस्तित्वाच्या गुणवत्तेवर प्रभाव पाडतात आणि तुम्हाला इतर लोकांसाठी पात्र बनवतात. म्हणूनच, महागुरूंनी सुचवलं की आपली उद्दिष्टं आणि आकांक्षा आपल्या सध्याच्या मानवी अभिव्यक्तीच्या पलीकडे अनेक जीवनांपर्यंत वाढवल्या पाहिजेत आणि यांचा, प्रत्येक जीवनात उच्च लोकांपर्यंत पोहोचणं, दीर्घकाळ आनंदी रहाणं, *मुक्ती* (जन्म-मृत्यूच्या चक्रातून तात्पुरतं निलंबन) प्राप्त करणं आणि सरतेशेवटी, परम-आत्म्याशी पुन्हा संयोग पावणं हे ध्येय गाठण्यासाठी, भरपूर प्रमाणात संचय केला पाहिजे.

पुन्हा संयोग पावणं हे ध्येय गाठण्यासाठी, भरपूर प्रमाणात संचय केला पाहिजे. सांघिक जगताचं (corporate world) सादृश्य वापरणं हा महागुरूंचा सत्यवाद समजून घेण्याचा सर्वात सोपा उपाय आहे. समजा, तुमचं तुमच्या



सध्याच्या नोकरीत चांगलं चाललंय आणि शिफारशी, प्रशस्तिपत्रं आणि उत्कृष्ट नावलौकिक यांचा तुम्हाला पाठिंबा आहे. तसं असेल तर, तुम्हाला उच्च हुद्दा नि लक्षणीय लाभांसह अधिक चांगली नोकरी मिळण्याची एक चांगली संधी असते. त्याचप्रमाणे, आध्यात्मिक क्षेत्रातही, तुमचा जीवात्मा प्रत्येक जीवनकाळाच्या शेवटी, बदललेल्या चित्तवृत्ती, मिळवलेले गुण आणि गाठलेली उंची यांवर आधारित वस्तुनिष्ठपणे मूल्यमापन करतो. ही **परिवर्तन मूल्यांकन गुणसंख्या** तुमच्या पुढील जीवनाची गुणवत्ता निर्धारित करते. परिणामी, प्रत्येक जीवनकाळ हा एखाद्याची गुणसंख्या सुधारण्याची आणि गंतव्य स्थानाच्या अधिक जवळ जाण्याची संधी बनतो.

जेव्हा महागुरूंनी मला मृत्यूला झुलवायला शिकवलं, तेव्हाच मी भविष्यासाठी जगण्याचा विचार करायला लागलो. मला जाणवलं की, मरणोत्तर, एक मनुष्य म्हणून पुढील नेमून दिलेल्या कामगिरीपूर्वी, मला कदाचित विश्रामकाल दिला जाऊ शकतो, परंतु, हा माझा सध्याचा जन्म आहे, जो मला पुढील जीवनात झोपडी किंवा राजवाड्यासाठी पात्र ठरवेल. जर मला माझ्या अस्तित्वाच्या गुणवत्तेबद्दल पर्वा असती, तर मी हे जीवन शेवटच्या किंवा त्याच्या पूर्वीच्या जीवनापेक्षा चांगलं बनवायचा प्रयत्न केला असता. मृत्यूमुळे, सर्वोत्तम योजनांना सुध्दा अंमलात येण्यापासून अटकाव येऊ शकतो, हे जाणून, त्यासाठी तयारी करणं शहाणपणाचं आहे असा मी तर्क केला. आत्म-परिवर्तनाच्या कामगिरीपासून माझं लक्ष विचलित करू शकणाऱ्या कोणत्याही गोष्टीबद्दल जागरूक रहाणं आणि माझ्या भौतिक आणि आध्यात्मिक सभोवतालच्या परिस्थितीची सतत जाणीव ठेवून तयार असणं मला अपरिहार्य ठरलं.

कोणत्याही जीवनकाळात, अस्तित्वाची गुणवत्ता सुधारण्याचे प्रयत्न हे वेळ आणि हेतूच्या चौकटीत कृती करायला भाग पाडतात. तुमच्या प्रयत्नांची शक्ती वाढवणाऱ्या सरावांचा स्वच्छता म्हणून विचार केला गेला पाहिजे आणि ते सराव सवयी बनेपर्यंत, नियमितपणे केले गेले पाहिजेत.

गुरुदेवांच्या सवयींचा अभ्यास करताना, त्या सवयी आणि गुरुदेवांचं तत्त्वज्ञान यांचा एकमेकांशी असलेल्या परस्परसंबंधावर बोलताना मी अडखळलो आणि पुन्हा शिकलो की वैयक्तिक स्वच्छता ही केवळ वैयक्तिक कल्याणासाठीच नाही, तर तितकीच इतरांच्या कल्याणासाठी सुध्दा असते.

# सामाजिक स्वच्छता

## कृतज्ञता आणि परोपकार

गुरुदेवांनी, पुढे मार्गक्रमण करण्याच्या काही महिने अगोदर, आपल्या मोठ्या मुलीला रेणूला सांगितलं, ''मी तुला आणि माझ्या इतर मुलांना स्थानासंबंधीच्या सर्व जबाबदाऱ्यांपासून मुक्त करत आहे. परंतु आपल्या शेतातील गायींची काळजी घेण्यासंबंधी तुम्हाला जबाबदार धरीन.'' गुरुदेवांनी गायींना हिंदू स्त्री देवतांची नावं दिली होती आणि ते गायींशी सक्रिय संवाद साधत. गायींच्या प्रतिसादात्मक खास ढंगात हंबरण्यामुळे, त्यांची बडबड निश्चितपणे परस्परसंवादी रहायची.

पहेलवानजींना, ज्यांनी गुरुदेवांबरोबर शेतात दररोज पुष्कळ तास व्यतीत केले होते, आठवतं की जेव्हा नियमितपणे शेताच्या आसपास उड्या मारणाऱ्या माकडिणीनं आपलं बाळ गमावल्याचं गुरुदेवांनी ऐकलं, तेव्हा गुरुदेव कसे *पाथात* गेले होते. महागुरूंनी मृत अर्भकाला त्याच्या पुढच्या जन्मात माणसाचा जन्म मिळावा अशी तरतूद केली. कारण, त्याच्या मातेनं तिच्या माकडचेष्टांनी गुरुदेवांचं अविश्रांत मनोरंजन केलं होतं. असंच एकदा, गुरुदेवांनी, एका सापाची *तांत्रिकाच्या* तावडीतून मुक्त होण्याची विनंती मान्य केली. मांत्रिकानं त्या सापाला आपलं गुलाम बनवलं होतं. सापाला मानव जन्म घेण्याची परवानगी दिल्यानंतर, महागुरूंनी त्या सापाला मारलं आणि त्याचं विधिपूर्वक दफन केलं. जेव्हा, रेणुका या गावी 'मूल हवं' अशी विनवणी करण्यासाठी गुरुदेवांना भेटायला आलेलं एक दांपत्य, एका वर्षानंतर, आपल्या नवजात

बाळाला घेऊन परत आलं, तेव्हा महागुरूंनी बक्षी या शिष्याला त्या मुलाला पहाण्यासाठी बोलावलं. बक्षीजींनी बाळाला पूर्वजन्मीचा साप म्हणून ओळखलं. कारण, त्याच्या पाठीवर फण्याच्या खुणा होत्या. पूर्व स्मृतींना उजाळा देत, बक्षीजी सांगतात की त्यांनी पाहिलेलं ते सर्वात सुंदर बाळ होतं! ज्यांनी गुरुदेवांची सेवा केली अथवा त्यांची मदत मागितली, ते जरी प्राणी असले, तरी, त्यांच्यावर महागुरूंनी केलेला उपकार हा अतुलनीय आहे.

कृतज्ञता हा गुरुदेवांच्या सामाजिक स्वच्छतेचा अविभाज्य घटक होता आणि त्याची बीजं ही त्यांच्या बालपणापासूनच अंकुरल्यासारखी दिसतात. लहान असताना, गुरुदेव आणि त्यांचे मित्र सुभाषजी ज्या फकिराच्या *दर्ग्यावरून* बोरं उचलायचे, त्या *फकिराबद्दलच्या* त्यांच्या कृतज्ञतेपोटी, बहुधा त्यांना गूढवादाबद्दल कौतुक वाटलं. गुरुदेवांनी आपल्या गुरूंचा जरी क्वचितच उल्लेख केला असला तरी, ते नेहमी त्यांच्या अस्तित्वाविषयी दक्ष असत. खरं तर, महाशिवरात्री आणि गुरुपूर्णिमा यांसारख्या महत्त्वाच्या दिवशी, ते आपल्या गळ्यात अनेक हार घालण्यास नकार देत. त्याऐवजी, ज्याला गुरुदेवांनी आपल्या गुरूंचं निवासस्थान म्हणून संबोधलं, त्या स्थानावर हार अर्पण करायला ते प्राधान्य देत. आपल्या गुरूंपेक्षा आपल्या गळ्यात अधिक हार घातलेले दिसणं ही गोष्ट त्यांच्या विचारसरणीशी जुळणारी नव्हती.


***परोपकार हा त्यांचा मार्ग होता सेवा घेण्याचं दायित्व पूर्ण करण्याचा. आपल्या शिष्य आणि इतर सहकाऱ्यांसह ते होते सेवेकरी, सेवा घेणारे नव्हते.***

आपल्या गुरूंनी रेणुकामधील थंडीत पहाटे तीन वाजता स्वत: तयार केलेला ताजा *चायचा* (चहाचा) कप देऊन, मारलेली सौम्य कोपरखळी बिट्टुजींना स्नेहपूर्वक आठवते. आपल्या मोटारीच्या ट्रंकमधून कापडानं भरलेल्या बारीक गोण्या उतरवताना महान गुरूंनी आपल्याला कशी मदत केली हे आठवताना राजीजींचे डोळे पाणावतात. प्रतापसिंगजी आपलं आयुष्य आपण कुणी

विशेष आहोत, या भावनेनं जगले. कारण, शिबिरांमध्ये महागुरू व्यक्तिश: त्यांच्यासाठी नाश्ता बनवायचे. ज्या रुद्रजींनी गुरुदेवांना आपला मेहुणा म्हणून यथायोग्यतेनं पाहिलं, ते असं मानतात की या जगात, त्यांच्या बहिणीचा नवरा हा त्यांना सर्वात जास्त मान देणारी व्यक्ती होती! संतालालजींना आपल्या मुलींची चौकशी करण्यासाठी सोनिपत येथील स्थानाला भेट देणारे महागुरू आठवतात, ज्या त्यांना झालेल्या अपघातानंतर, तिथं उपचार घेत होत्या. आपल्या कुटुंबाबरोबर वेळ घालवण्यापेक्षा, गुरुदेवांनी आपल्या शेताच्या राखणदाराच्या गरीब आणि वृध्द आई-वडिलांना भेटणं पसंत केलं. काही महिन्यांपूर्वी, त्या राखणदारानं महागुरूंना त्यांच्या सोनिपतच्या पुढच्या दौऱ्यात आपल्या आई-वडिलांना भेटण्याची विनंती केली होती. हलक्या आवाजात केलेल्या विनंतीचा अत्यंत जोरात सन्मान करण्यात आला!

ज्या लोकांनी आम्हाला त्यांची सेवा करू दिली, त्यांचे आभार मानण्याची महागुरू आम्हाला नेहमी आठवण करून द्यायचे. या संकल्पनेनं सेवेबद्दलच्या माझ्या कल्पनांची पूर्णपणे पुन्हा परिभाषा केली. दुसऱ्यानं सक्षम केल्यामुळेच, मी सेवा करू शकलो, या कल्पनेनं ''माझ्या'' आणि ''तुमच्या'' मधील मानसिक दुरावा दूर केला आणि एकतेची भावना निर्माण केली.

गुरुदेवांचा इतर लोकांशी असलेलं नातं विविध प्रकारे प्रकट झालं. कारण, आपल्या विचारसरणीशी जुळवून घेण्यासाठी त्यांनी विविध भूमिका निभावल्या. परिणामी, मुलांशी ते खट्याळ प्रेमानं वागायचे, तर मोठ्यांशी ते अत्यंत आदरानं वर्तन करायचे. कित्येक वेळा संध्याकाळी, *लुंगी* नेसून, ते शेजारच्या मुलांबरोबर गल्ली क्रिकेट खेळायचे, खेळात फसवणूक करायचे, पण मुलांनी तक्रार करू नये म्हणून, ते अगोदरच मिठाईचं एक पाकिट खरेदी केलंय ना याची खात्री करून घ्यायचे! डॉ. शंकर नारायण यांना १९९० मध्ये बिलगा येथील आपल्या सासु-सासऱ्यांच्या घरी महागुरूंसोबत गेल्याचा प्रसंग जेव्हा आठवला, तेव्हा त्याविषयी काय बोलावं, हे त्यांना सुचत नव्हतं. जेव्हा महान गुरूंनी डॉ. शंकर यांच्या सासुबाईंना पाहिलं, तेव्हा त्यांनी आदर



*शीख भक्ताला भेटताना गुरुदेव आपली सिगारेट लपवतात*

दाखवण्यासाठी, सासुबाईंच्या पायांना स्पर्श करण्याची हिंदू प्रथा पाळली. ज्या महागुरूंच्या चरणांना स्पर्श करण्याकरता लाखो लोक प्रतीक्षा करायचे, तेच महागुरू एका सामान्य स्त्रीच्या चरणांना स्पर्श करत होते! गुरुदेवांच्या विचार-विश्वात, मध्यवर्ती स्थान मिळवण्यासाठी नम्रतेनं मानवतेशी हातमिळवणी केली होती.

## समाज-केंद्रित श्रध्दा

समाज-केंद्रित श्रध्दांचा आदर करणं हा गुरुदेवांच्या सामाजिक स्वच्छतेचा आणखी एक पैलू होता. त्यांना आपल्यापैकी अनेकजणांपेक्षा चांगलं माहीत होतं की लोक हे आपल्या संगोपन आणि संस्कारांनुसार जगाचं आकलन करत असतात.

शिखांचा धार्मिक दृष्ट्या धूम्रपानाला विरोध आहे, हे माहीत असल्यामुळे, त्यांच्यापैकी कुणीही गुरुदेवांकडे येताना दिसल्यास, गुरुदेव आपली सिगारेट चटकन विझवायचे. जरी त्यांनी शाकाहारी आहाराचा नियम घालून दिला,

तरी त्यांनी पश्चिम बंगालमधील लोकांना अधूनमधून मासे खाण्याची परवानगी दिली. कारण, ते त्यांचं मुख्य अन्न आहे. दारू ही सुस्त करते. त्यामुळे, जरी गुरुदेवांनी दारू वर्ज्य करण्याचा सल्ला दिला, तरी अनेक प्रामाणिक प्रयत्न करूनही, दारू सोडण्यात अयशस्वी झालेल्या बिट्टुजींसारख्या भक्तांना त्यांनी अंतर दिलं नाही. तथापि, त्यांनी आपल्या भक्तांना किंवा शिष्यांना मद्यधुंद अवस्थेत स्थानात प्रवेश करायची अनुमती दिली नाही. ज्यांनी जाणून बुजून धाडस केलं, त्यांना *गुरु अवेलनाच्या* रोषाचा सामना करावा लागला.


***जरी महागुरू जुळवून घेणारे होते आपल्या***
***पध्दतींमध्ये ते तत्त्वनिष्ठ होते आपल्या विचारात.***

सामाजिक परंपरेच्या मर्यादेत गुरुदेव हे परंपरेला सोडून विचार करणारे होते. त्यांनी हुंडा देण्यास विरोध केला. कारण, ते विवाहात किंवा *कन्यादानात* मुलगी देणं हे सेवेच्या अधिक उच्च प्रकारांपैकी एक मानत. बऱ्याचदा, वधूच्या वडिलांची आयुष्यभराची कमाई वाचावी म्हणून, ते एकटे आणि कधी कधी आपल्या शिष्यांसह, वधूचा पोशाख इत्यादींमध्ये योगदान देत असत.

ज्या काळात भारतीय स्त्रिया या केवळ मुली, पत्नी आणि माता म्हणून ओळखल्या जात होत्या, त्या काळात, गुरुदेवांनी त्यांना आत्मनिर्भर, तुल्यबळ म्हणून पाहिलं. गुरुदेवांची पत्नी एक प्रशिक्षित शालेय शिक्षिका होती आणि तिनं कुटुंबासाठी समान योगदान दिलं. जरी *गृहस्थ* हा गुरुदेवांचा निर्धारित मार्ग होता, तरी स्त्रियांनी अगदी नवतारुण्यात विवाह करावा, असा आग्रह गुरुदेवांनी धरला नाही.

खरी महानता कशी करते स्वत:चं प्रदर्शन ?
www.gurudevonline.com वर
**Simple Living, High thinking**
हे Podcast ऐका

*तरुण गुरुदेव जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरता टॉफी आणि पेन्स विकतात*



# आर्थिक स्वच्छता

कर्जमुक्त जीवन जगण्याकडे महागुरूंचा विशेष कल होता. न परवडणारी कोणतीही गोष्ट त्यांनी स्वीकारली नाही. दुसऱ्यानं दिलेलं मीठ किंवा तृणधान्य घेणं किंवा सेवन करणं याबाबतही ते सावध होते. तरीही, काही निवडक घटनांनी मला जाणीव करून दिली की त्यांनी कर्तव्यापेक्षा हेतूला महत्त्व दिलं.

बिट्टुजी हे एकदा गुरुदेव आणि काही इतर लोकांबरोबर हिमाचल प्रदेशातील भू-सर्वेक्षण शिबिरातून कर्नाल मार्गे गुरगावपर्यंत प्रवास करत होते. त्यांनी त्यांच्या प्रवासातील एक आठवण सांगितली. महागुरूंचा ड्रायव्हर कस्तुरी याला रात्रीच्या वेळी गाडी चालवताना थोडी धाकधूक वाटायची. ''आपण आपल्या इष्ट स्थानाकडे जाताना गॅस स्टेशनवर थांबू शकतो का ? '' असं त्यानं विचारलं. कारण, कस्तुरीचा भाऊ गॅस स्टेशन चालवायचा आणि कस्तुरीला माहीत होतं की गुरुदेवांना तिथं सुविधा वाटली असती.

रात्री ११ वाजता तिथं पोहोचल्यावर, गुरुदेवांनी सर्वांना सांगितलं की ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता निघतील. नियोजित प्रस्थान वेळेच्या एक तास आधी, गॅस स्टेशन मालकाचं कुटुंब गरमागरम पुरी, *सब्जी* आणि *चाय* असा ताजा नाश्ता घेऊन तिथं हजर झालं. प्रलोभन वाटलं असलं, तरी महागुरूंच्या शिष्यांनी नकार दिला. कारण, त्यांना दुसऱ्यांचे उपकार नको होते. दुसरीकडे, गुरुदेवांनी, मोठ्या मनानं नाश्त्याचा आस्वाद घेतला, मालकाला आपलं कौतुक केलं जातंय, अशी भावना निर्माण करत. गुरुदेव जाणत होते की एवढ्या

मोठ्या गटासाठी एवढा भव्य पसारा तयार करण्याकरता ते कुटुंब पहाटे ३ वाजता उठलं असेल, ४ वाजेपर्यंत त्यांनी काम केलं असेल आणि मग, वेळेवर पोहोचण्यासाठी तासभर गाडी चालवली असेल. गुरुदेवांनी नाश्त्याचे पैसे दिले नाहीत. पण, भक्तीचा आदर न केल्याबद्दल अथवा कर्तव्यापेक्षा हेतूला महत्त्व न दिल्याबद्दल आपल्या शिष्यांना मात्र जरूर फटकारलं.

अनेक दशकांपूर्वी, लांब वळणावळणाचा टॅक्सीचा प्रवास केल्यानंतर, मी मुंगोली शिबिरात पोहोचलो. तिथं फक्त गुरुदेव आणि काही सह-शिष्यांनी आपलं रात्रीचं जेवण संपत असताना माझं स्वागत केलं. रेल्वे स्टेशनवरून मी माझ्याबरोबर *पकोऱ्यांचं* (पकोड्यांचं) पुडकं आणलं होतं. मी तिथं पोहोचण्यापूर्वी रात्र झालेली असेल, असं टॅक्सीवाल्यानं खात्रीपूर्वक सांगितलं होतं. त्यामुळे, मी शांतपणे *पकोरे* बाजूला ठेवले. दुसऱ्या दिवशी, मी जेवणाच्या मंडपाकडे जात असताना पाहिलं की, गुरुदेव दोन *पकोरे* खाण्याआधी हातानं उडवत होते. मी धावतच त्यांच्याकडे गेलो. त्यांना अभिवादन केल्यावर, मी त्यांना सांगितलं, ''मी ते विकत घेतलेत. त्यामुळे, तुम्हाला मला पैसे द्यावे लागतील.'' ''असं आहे का?'' त्यांनी विचारलं आणि चालता चालता त्यांनी दुसरा *पकोरा* खाल्ला. एका महान गुरूचे सकाळचं असं मिश्किल वागणं तुम्हाला विचारांच्या चक्रीवादळात गुंतवून टाकू शकतं! 'मी नाही, तर माझे गुरू ते *पकोरे* विकत घेत आहेत', असा विचार करून मी ते *पकोरे* विकत घेतले होते. माझ्या लक्षात आलं की थंड *पकोरे* खाणं ही संपूर्ण आत्मसमर्पणाच्या भावनेची परतफेड करण्याची त्यांची पध्दत होती.

चोरींची परतफेड, अगदी मामुली असली तरी, फक्त एकाच मार्गानं आली - ताकीद! एकदा, गुरुदेव काही कामासाठी कपडे घालून तयार होत असताना, मी त्यांच्याशी गप्पा मारत होतो, तेव्हा त्यांनी आपल्या पैश्याच्या पाकिटाकडे पाहिलं आणि काही बिलं-नोंदी गायब झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. ते स्वत:शीच कुजबुजले आणि त्यांनी सहज त्या व्यक्तीचं नाव उच्चारलं,

जिनं कदाचित पैसे चोरले असतील. मी त्यांना विचारलं, ''तुम्ही त्या दोषी व्यक्तीला का बोलावत नाही?'' त्यांनी म्हटलं, ''त्याची गरज नाही. कारण, तो माणूस त्याच्या काही सेवेचा लाभ घालवणार आहे.'' चोरलेली रक्कम ही क्षुल्लक होती, पण, सेवेच्या काही वर्षांचं नसलं, तरी काही महिन्यांचं नुकसान मात्र लक्षणीय होतं!

मी 'गुरगावमध्ये हरवलेल्या, मुंबईत सापडलेल्या' अनुभवाचा बळी आहे. त्याचं असं झालं. मी गुरगाव स्थानात होतो. तेव्हा गुरुदेवांनी मला नि माझ्या पत्नीला त्यांच्या समवेत हैदराबादला लग्नासाठी विमानानं येण्याची सूचना केली. माझ्याकडे फक्त ६००० रुपये रोख होते. प्लॅस्टिक पैसे त्यावेळी असामान्य होते. हा प्रवास करण्यासाठी माझ्या ऐपतीपेक्षा कितीतरी जास्त खर्च झाला असता. म्हणून, मी गुरुदेवांना एक संदेश पाठवून विनंती केली की त्यांनी आम्हाला विमानाऐवजी ट्रेननं प्रवास करायची परवानगी द्यावी. संपूर्ण दिवसाभरात मला त्यांच्याकडून उत्तर मिळालं नाही, परंतु, माझ्या लक्षात आलं की माझं पैश्याचं पाकीट गायब झालंय! दिलगिरी व्यक्त करण्यासाठी आणि क्षमा मागण्यासाठी, मी गुरुदेवांकडे गेलो, तेव्हा मला त्यांच्या डोळ्यांमध्ये एक खोडकर चमक दिसली. त्यांनी मला सांगितलं, ''मी नेहमी सांगतो, तसं करावं आणि माझ्या सूचनांचं विश्लेषण करत बसू नये.'' काही दिवसांनंतर, मुंबईला माझ्या घरी, माझ्या ब्लेझरच्या खिशात मला ६००० रुपये सापडले. व्वा! महागुरू हे कोणत्याही परिस्थितीत इच्छेनुसार जिंकू शकत होते आणि कागदी चलन ओरिगामी म्हणून वापरू शकत होते!

गुरुदेव हे जेव्हा हरियाणाहून पहिल्यांदा दिल्लीला गेले, तेव्हा जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरता त्यांनी संघर्ष केला, टॉफी, पेन्स आणि बसची तिकिटं विकली, जेणेकरून, कधीकधी, दिवसाकाठी दोन केळी विकत घेता यायची. त्यांना कळून चुकलं होतं की प्रतिकूल परिस्थिती असली, तरी, पैसा मिळवायलाच हवा होता आणि त्याचा गैरवापर करून चालला नसता.

*गुरुदेव कार्यालयात आपल्या*
*पगाराचं वितरण करताना*



गुरुदेव हे वयाच्या विसाव्या वर्षी भू-सर्वेक्षक म्हणून नोकरीला लागले आणि ते उत्तर भारताच्या डोंगराळ भागातील छावण्यांमध्ये अनेक महिने घालवत. नागपालजींच्या म्हणण्यानुसार, ''मातीची पहाणी करण्यासाठी, ते जमिनीच्या प्रत्येक भागात जात. मार्गक्रमण करण्यास आव्हानात्मक असलेल्या भूप्रदेशांचा त्यांना कधी त्रास झाला नाही. मातीच्या नमुन्यांचं वैयक्तिक विश्लेषण केल्याशिवाय ते आपला अहवाल लिहायचे नाहीत.'' गुरुदेवानी आपल्या पगाराचं समर्थन केलं आणि प्रयत्नांच्या बाबतीत स्वत:ला कोणतीही सवलत दिली नाही. ज्या कुणाला, महान गुरूंना हे सगळं सोपं असतं असं वाटतं, त्यानं गुरुदेवांचं जीवन जरूर तपासलं पाहिजे!

गुरुदेव ढोर मेहनत करत असूनही, त्यांना दर महिन्याच्या शेवटी खूप कमी पगार मिळायचा. त्यांचा सुरवातीचा पगार १५० रुपये इतका कमी होता. तरीही, ते आपल्या पगाराच्या दिवशी आपल्या पगाराचा एक लक्षणीय भाग गरजूंना वाटायचे. अशा गरजू लोकांची निवड करण्याची कोणतीही प्रक्रिया नव्हती. परंतु, गरजूंच्या समस्यांनुसार, ज्या रक्कमेनं त्यांच्या गरजा पूर्ण होतील, असं गुरुदेवांना वाटायचं, तेवढी रक्कम ते वाटायचे. त्यांच्याव्यतिरिक्त मी अन्य कुणाहीबद्दल, महिनाभर अथक परिश्रम करूनही, पगाराच्या दिवशी कफल्लक झाल्याचं ऐकलेलं नाही! तथपि, महागुरूंचा परिवार जसजसा वाढत गेला, तसतसे, त्यांचे शिष्य महागुरूंचा कमीत कमी अर्धा पगार चोरून आणून, त्यांच्या पत्नीला द्यायला शिकले.

गुरुदेवांनी पैश्याला अध्यात्माचं साधन मानलं, भौतिकतेचं परिमाण नाही. त्यांनी क्वचितच स्वत:वर पैसा खर्च केला आणि आपल्या शिष्यांना पैश्याची किंमत कळावी अशी त्यांची इच्छा होती. आपल्या गुरूंना ज्यावर जेवण नेऊन देता येईल, असा एक महागडा ट्रे जेव्हा बिट्टुजींनी विकत घेतला, तेव्हा ते गुरुदेवांना फक्त संतप्त करण्यात यशस्वी झाले. महान गुरूंनी त्यांना ताकीद दिली. ते म्हणाले, ''दिखाऊपणा करणं आणि ऐषआरामात वहावत जाणं हे आपल्या स्वभावात नाही. आपण साधेपणाची कदर केली पाहिजे आणि

दिखाऊपणा करता कामा नये.'' अगदी ट्रेसारखी साधी वस्तू, की जी घरातील स्वयंपाकघरात नित्याची गरज मानली जाते, ती गुरूदेवांच्या मते एक उपभोगाचं प्रतीक होती. त्यांच्या शब्दकोशात **काटकसर** या शब्दानं संपूर्ण नवीन अर्थ धारण केला.

गुरुदेव आम्हाला नेहमी सांगायचे की योग्य मार्गानं कमावलेला पैसा हा चांगल्या वापरासाठी मार्ग शोधेल, तर अयोग्य मार्गानं कमावलेला पैसा हा या ना त्या रूपात गमावला जाईल. जेव्हा संतलालजींनी लॉटरीची दोन तिकिटं विकत घेतली, तेव्हा, लॉटरी जिंकण्यासाठी गुरूंचे आशीर्वाद मिळावेत आणि लॉटरीची सोडत ही स्थानांचं व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन केलेल्या हिमगिरी ट्रस्टमध्ये भरता यावी, या स्वार्थी हेतूनं, संतलालजींना ती तिकिटं आपल्या गुरूंना सादर केली. महागुरूंनी तिकिटांचे दोन तुकडे केले. ते म्हणाले, ''मी माझ्या शिष्यांना माझी लॉटरी समजतो. ट्रस्टच्या माध्यमातून जी काही सेवा घडते, ती शिष्यांच्या कष्टानं कमावलेल्या संपत्तीतून केली जाईल. कारण, मी त्यांना त्यांची सेवा मिळवायला सक्षम केलंय.''

जेव्हा केव्हा गुरुदेवांनी आम्हाला स्थानामध्ये जे काही पैसे खर्च करण्याची अनुमती दिली, ती नेहमी इतरांची सेवा करण्यासाठी. ज्या दिवशी लोक त्यांना भेटायला यायचे, तेव्हा खर्च व्हायचा आणि काही शिष्यांना हातभार लावण्याची परवानगी दिली जायची. गुरुदेवांनी स्थानामध्ये अनेक विवाह समारंभ आयोजित केले आणि हे अगदी साधे प्रसंग असायचे. त्यावेळी, गुरुदेवांनी आमच्यापैकी काहींना विवाहांच्या खर्चासाठी कमीत कमी हातभार लावण्याची परवानगी दिली. पुष्कळ श्रीमंत लोकांना सार्वजनिक लोककल्याणाकरता किंवा गुरुदेवांच्या उदरनिर्वाहासाठी सुध्दा भरीव रक्कम दान करण्यात आनंद झाला असता. पण, गुरुदेवांनी त्यांना खिजगणतीत घेतलं नाही. ते त्या श्रीमंत लोकांची बोळवण करायचे. स्थानांना भेट देणाऱ्या लोकांकडून ना पैसा, ना भेटवस्तू स्वीकारल्या जायच्या. तथापि, त्यांच्या शुभेच्छांचं मात्र स्वागत व्हायचं.

गुरुदेवांचे शिष्य आणि भक्त हे जीवनाच्या विविध क्षेत्रांमधून आले आणि त्यांनी एकमेकांपेक्षा वेगळ्या पध्दतीनं कमाई केली. तरीही, गुरुदेवांनी त्यांना आध्यात्मिक हेतूनं समान लेखलं आणि ज्या वर्तमान अस्तित्वाच्या बिंदूवर त्या शिष्यांनी नि भक्तांनी स्वत:चं मोजमाप केलं त्याच्याऐवजी, भविष्यातील निरंतरतेच्या ओळीवर गुरुदेवांनी त्यांची पातळी निर्धारित केली. स्थानामध्ये, बसचालक आणि व्यापारी उद्योजकांना समान वागणूक दिली जायची. जेव्हा महान गुरू गुरुगावधील सेक्टर-१० इथं स्थान बांधत होते, तेव्हा त्यांनी आपल्या शिष्यांना योगदान देण्याची परवानगी दिली. त्या शिष्यांपैकी आर्थिकदृष्ट्या कमी सक्षम असलेल्यांना प्रत्येकी १०० रुपये योगदान द्यायला सांगितलं, तर इतर बाकीच्यांना थोडं अधिक द्यायची अनुमती दिली. जरी योगदान हे ऐपतीनुसार असलं, तरी सेवेचा लाभ समान होता.

एकदा, एक शीख व्यक्ती आपल्या तीव्र डोकेदुखीपासून कायमचा आराम मिळवण्याच्या आशेनं गुरुदेवांना भेटायला आली. महागुरू म्हणाले, ''बेटा, मी तुला ताबडतोब बरा करीन. पण, तू यापुढे, मांसाहार आणि मद्य वर्ज्य करायला हवंस.'' दोन आठवड्यांनतर, ती शीख व्यक्ती एक लाख रुपये रोख रक्कम असलेली ब्रीफकेस घेऊन परतली. तिनं गुरूंना साष्टांग दंडवत घातलं, ब्रीफकेस त्यांच्या शेजारी ठेवली आणि आपल्या कृतज्ञतेचं प्रतीक स्वीकारण्याची विनवणी केली. गुरू मुळीच प्रभावित झाले नाहीत. त्यांनी ताच्या डोळ्यात पाहिलं आणि म्हणाले, ''मी ब्रीफकेसला हात लावताच, तुझी डोकेदुखी परत येईल. सेवा करणं हे माझं कर्तव्य आहे, माझा व्यवसाय नाही.'' लाजून चूर झालेल्या शीख व्यक्तीनं महागुरूंना धन्यवाद दिले आणि ते आपल्या न उघडलेल्या ब्रीफकेससह घरी परतली.

पैश्याची हाव, लोकांची त्यांच्या संपत्तीवरून फसवणूक करणं किंवा त्यांना व्यवसायाचं अथवा आर्थिक लाभाचं आश्वासन देऊन आकृष्ट करणं या सवयींचा महागुरू तिटकारा करायचे. एका ज्येष्ठ शिष्याला वारसाहक्कानं काही संपत्ती मिळाली होती. त्याला अधिकाची हाव होती आणि आजीकडून

(आईच्या आईकडून) अधिक मोठा वाटा मिळवण्यासाठी त्याला घरगुती राजकारणात सहभागी होण्याची इच्छा होती. त्याचा क्षुद्रपणा इतर किरकोळ मार्गांनीही स्पष्टपणे दिसत होता. चाणाक्ष महागुरूंना त्याच्यामधील या दोषाची जाणीव होती. खरं तर, त्यानं काही वर्षांनंतर, सर्वात निपुण शिष्यांपैकी एक होण्यासाठी, प्रशिक्षण पूर्ण केलं असतं. गुरुदेवांनी ओळखलं की शिष्याची सवय सुधारण्याची आवश्यकता आहे आणि म्हणून त्यांनी त्याला पैश्याची सार्थकता नि निरर्थकता यांमधील भेद सूक्ष्मपणे स्पष्ट केला. ''पैश्याची लालसा बाळगू नकोस. कारण, मी तुला एवढी आध्यात्मिक संपत्ती देईन की ती तुझी कधीच संपणार नाही.'' ते आपल्या शिष्याला म्हणाले.

संपत्तीचं प्रदर्शन करणं किंवा जुगार खेळणं हे त्यांच्या व्यावसायिक स्वच्छतेच्या यादीमध्ये वर्ज्य होतं. दिवाळीदरम्यान, जेव्हा बहुतेक लोक पैश्यावर पैज लावतात, तेव्हा त्यांनी आम्हाला पैश्याचा आदर करायला शिकवलं, असं सांगत की 'पैसा हा लक्ष्मी देवीकडून *बरकतची* भेट आहे. पैश्याचा अनादर करणं म्हणजे देवतेची अवहेलना करण्यासमान आहे.'

गुरुदेवांच्या मते, स्वत:वर पैसा खर्च केल्यामुळे अथवा इतरांना आपल्यावर खर्च करण्याची अनुमती दिल्यामुळे कर्ज तयार होतं; तर तो इतरांच्या सेवेत खर्च केल्यामुळे, आपल्याला त्या कृतीतून मिळालेल्या लाभाचं श्रेय प्राप्त होतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, पैसा पूरक असू शकतो, परंतु, आध्यात्मिक हेतूला पर्याय असू शकत नाही. महागुरूंच्या काही सल्ल्यांपैकी एक सल्ला म्हणजे आम्ही आमच्या मासिक कमाईच्या १० ते २० टक्के सेवेवर खर्च करणं.

# मानसिक स्वच्छता

मनाची स्वच्छता करणं आवश्यक आहे. कारण, मानसिक आरोग्य हे अस्तित्वाच्या गुणवत्तेसाठी निर्णायक गोष्ट असते.

विचार आणि भावना ही मानसिक गोंधळाची प्राथमिक उगमस्थानं आहेत.

मनाला कोठार समजा. नको असलेल्या गोष्टींपासून मुक्त होणं हा गोंधळ कमी करण्याचा एक भाग आहे. जेव्हा हा मानसिक गोंधळ नियमितपणे काढला जातो, तेव्हा मानसिक ऊर्जा जोपासली जाते आणि मानसिक विकृती टाळल्या जातात. अशा अनावश्यक कचऱ्यापासून मुक्त झालेलं मन हे स्व-निरीक्षण आणि स्व-प्रतिबिंबासाठी परवानगी देतं आणि सतत जागरूकतेसाठी वाट मोकळी करतं. इतर लोक तुम्हाला सुधारण्यासाठी प्रवृत्त करू शकतात. परंतु, जोपर्यंत तुम्ही स्वतःचं निरीक्षण करायला शिकत नाही आणि तुमच्या मनाला तुमच्या विचारांचं परीक्षण आणि चिंतन करू देत नाही, तोपर्यंत स्व-समुपदेशन थिटं ठरेल.

महागुरूंकडे आपल्या एक वाक्यांमध्ये अनेक विचार मांडायची असामान्य क्षमता होती. '*विचार विषय से आता है*' अशा प्रकारे, ते विचाराच्या उदयाचं स्पष्टीकरण द्यायचे. त्यांचं छोटं वाक्य उलगडण्याकरता, मला अनेक वाक्यांचा वापर करावा लागेल.

- आपल्या इंद्रियांच्या परस्परसंवादातून विचार निर्माण होऊ शकतात. जर तुम्ही ज्ञानेंद्रियांनी पुरवलेल्या माहितीवर आपल्या प्रतिक्रिया नियंत्रित करू शकलात, तर तुम्ही तुम्हाला आकर्षित करणाऱ्या विचारांचे प्रकार नियंत्रित करू शकता.
- तुम्ही कोणत्या प्रकारच्या विचारांकडे आकृष्ट होता, हे सुध्दा तुमचं गुण-मिश्रण ठरवतं. स्वेच्छेनं आपलं गुण-मिश्रण बदलून, तुम्ही आपल्या विचारांचं स्वरूप बदलू शकता.
- तुमचं मन विचारांना चुंबकीय करू शकतं. मनाचं चुंबकीय स्वरूप ही गोष्ट स्पष्ट करते की जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये एकाच वेळी समान शोध का घडतात. असं होतं, कारण अनेकांची मनं एकाच वेळी वातावरणातील एकाच विचाराकडे आकृष्ट होतात. लक्षात ठेवा की विचार हे वातावरणात प्रचलित असले तरी ते गतिमान असतात आणि काळाप्रमाणे सतत बदलत असतात.
- कारण शरीरात संग्रहित केलेले *संस्कार* हे बाहेर आल्यावर सुध्दा विचार उद्‌भवतात. मन हे साधारणपणे, स्वतःचा आरसा बनतं आणि विचारांद्वारा *संस्कार* समजून घेतं.

जेव्हा माझी *विचाराबरोबर* ज्ञानवर्धक भेट झाली, तेव्हाच गुरुदेवांच्या शब्दांचा संपूर्ण अर्थ मनात भिनला. अनेक दशकांपूर्वी, गाढ ध्यानाच्या दरम्यान, मी डोळे उघडले नि प्रकाशाचा एक किरण माझ्या खोलीच्या एका कोपऱ्यातून माझ्या कपाळाच्या अगदी मध्यभागी असलेल्या एका बिंदूपर्यंत प्रवास करताना मी पाहिला. हा किरण माझ्या डोक्यावर आदळताच विरून गेला- एक सुस्पष्ट विचार किंवा त्याऐवजी, त्याच्या पार्श्वभूमीवर एक निरीक्षण सोडून! या अनुभवापूर्वी, माझ्या मनात येणाऱ्या सकारात्मक विचारांचा मी आनंद लुटला आणि नकारात्मक विचारांचा त्रास भोगला. तथापि, विचार पाहिल्यावर, मला कळून चुकलं की विचार हे ना माझी निवड होती किंवा ना माझी पसंती होती. विचारांवर माझा हक्क नव्हता!

या जाणीवेचा अप्रत्यक्ष फायदा म्हणजे अपराधीपणा आणि आनंदापासून मुक्तता! जे माझं कृत्य नाही, ते मला त्याच्या तावडीत कैद करू शकत नाही. शिवाय, एकच विचार एकाच वेळी अनेकांवर आघात करू शकत असल्यामुळे, विचार हे ना कुणाच्या मालकीचे असतात, ना असामान्य असतात!

महागुरूंचे एक ज्येष्ठ शिष्य एफ.सी.शर्माजी, आपल्या मृदू आवाजात आपल्या गुरूंची विचारांबद्दलची मतं आठवून सांगतात, ''जेव्हा तुम्ही भौतिक स्वरूपात असता, तेव्हा, तुम्ही विचारांना तुमच्याकडे येण्यापासून थांबवू शकत नाही. म्हणून, तुम्ही त्यांना जेव्हा हवं, तेव्हा यायची मुभा द्यायला हवी आणि घाईघाईनं प्रतिक्रिया देऊ नका. त्याऐवजी, ज्या विचारांवर कृती करायची, त्यांची निवड करणं किंवा त्यांना फेटाळून लावणं असं तुम्ही विचारांचं वस्तुनिष्ठपणे मूल्यांकन केलं पाहिजे. ''

वस्तुनिष्ठता हा विचार-व्यवस्थापनाचा एक अविभाज्य भाग असला पाहिजे. कारण, ती तुम्हाला तुमच्या विचारांच्या स्वरूपावर नगण्य पूर्वग्रहासह चिंतन करायला अनुमती देते. तथापि, जेव्हा आश्रय घेतलेल्या विचारांचं संवेदनांमध्ये मंथन होऊन, मग भावनांमध्ये रूपांतर होतं, तेव्हा पूर्वग्रह तीव्र होतो. भावना या तुमच्या क्रिया आणि प्रतिक्रियांना आणखी प्रवृत्त करतात; परिणामी, गोंधळ होतो आणि तुमच्या मानसिक कार्यक्षमतेशी तडजोड केली जाते! तुम्ही तुमच्या मनाच्या पूर्ण क्षमतेच्या ऐवजी, तुमच्या मेंदूच्या मर्यादित क्षमतेनं काम करता.

एफ.सी.शर्माजींनी भावनांसंबंधी गुरुदेवांच्या अभिप्रायांचा पुनरुच्चार केला, असं म्हणत की, ''प्रत्येकाला भावना असतात आणि त्या टाळता येत नाहीत. पण, त्या जोपासू नका किंवा त्यांना तुमच्या वर्तनाचा आधार बनवू नका. त्या कुणाचाही लाभ करून देत नाहीत. उलट, त्या गोंधळात टाकतात नि अनेकदा चुकीचे निर्णय घ्यायला भाग पाडतात.''

सहवास आणि नातेसंबंधाद्वारा, भावना तुम्हाला तुमच्या भौतिक वास्तवाच्या वस्तूंशी बांधतात आणि अशा प्रकारे, आध्यात्मिक मार्गावर अडथळा बनतात. जरी तुमचं इतरांशी असलेलं नातं हे सामान्यपणे भावनिक असलं, तरी तुमचं स्वत:शी असलेलं नातं हे स्वाभाविकपणे भावनाशून्य असतं. म्हणून, आत्म-शोधाच्या शोधात असलेल्यांनी आपल्या भावनांचं मूल्य मोजलं पाहिजे.

जेव्हा लोक गुरुदेवांशी जीवनाबद्दल आणि घडामोडींवर चर्चा करायचे, तेव्हा गुरुदेव त्यांचं लक्षपूर्वक ऐकायचे ते लोकांना आपल्या भावनांचं ओझं कमी झाल्याचं वाटायला लावायचे. कधीकधी, ते लोकांच्या भावनिक अभिव्यक्तीबद्दल सहानुभूती दाखवत, त्यांच्या सहवासात सांत्वनात्मक भूमिका घेऊनही उभे रहायचे. तथापि, ''लोकांच्या भावनांमध्ये अडकून न पडता, दररोज इतक्या अत्यंत क्लेशकारक कथा कशा ऐकता?'', असं विचारलं असता, ते म्हणत, ''त्या क्षणापलीकडे, मी प्रत्येक गोष्ट *मल्लीकला* अर्पण करतो आणि त्याची अंतरात आठवण देखील ठेवत नाही.'' (*मल्लीक* ही गुरुदेवांची परम-आत्म्याला संबोधण्याची पध्दत होती.)

जेव्हा जेव्हा एखाद्या अनुभवाशी संबंधित भावना असते, तेव्हा ती एक स्मृती तयार करते. या स्मृती साठवल्या जातात नि भावी जन्मांमध्ये *संस्कार* म्हणून वाहून नेल्या जातात. या *संस्कारांचं* या जन्मात किंवा भावी जन्मांपैकी एखाद्या जन्मात विचार आणि परिस्थिती म्हणून पुनरुत्थान होईल. म्हणून, भावना, *संस्कार* नि विचार यांच्यातील संबंध हा चक्राप्रमाणे, तुमच्या सध्याच्या जन्मापलीकडे चालू राहील.

महागुरू हे सतत जागरूक राहिले आणि ज्या प्रत्येकाला त्यांनी पाहिलं, त्याची भेट घेतली किंवा त्याला समजून घेतलं. त्या प्रत्येकाचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ जाणून घेण्याचा प्रचंड भार त्यांच्यावर होता. त्या सर्वांच्या जीवनांचा इतिहास आणि रहस्य, त्याचप्रमाणे, त्यांच्या अस्तित्वातील दु:खं

जाणून घेतल्यामुळे, गुरुदेवांना आपल्या भावनांना वश करून, अलिप्त रहाणं आवश्यक बनलं. जर ते आपल्या भावनांपासून दूर गेले नसते, तर त्या भावनांनी त्यांच्या मनात काहूर माजवला असता. त्यामुळे, ते आपलं मन अगदी साफ ठेवू शकले आणि भावनिक नियंत्रणावर प्रभुत्व मिळवून, आपल्या वैश्विक अंतर्ज्ञानाचा सामना करू शकले.

सेवा करण्यात अकार्यक्षमता ही एकच गोष्ट गुरुदेवांच्याकरता भावनिक चिडचिड ठरली. त्यांनी सेवेला केवळ आपल्या अनेक कामगिरींच्या यादीत समाविष्ट केलं, एवढंच नाही, तर हे सुध्दा सुनिश्चित केलं की आपल्या शिष्यांनी आपलं हे स्वप्न आपल्याप्रमाणेच प्रत्यक्षात आणावं. जेव्हा लोक आपल्या सेवेत बेफिकिर व्हायचे किंवा जेव्हा त्यांचा अहंकार शिगेला पोहोचायचा, तेव्हा गुरुदेव त्यांना सार्वजनिक सेवेच्या उच्च दर्जाची पूर्तता करण्यासाठी फटकारून आणि चालना देऊन, आपल्या भावना व्यक्त करत. विरेंदरजी महागुरूंच्या शिकवणुकींमध्ये बुडून जातात, जेव्हा ते म्हणतात,''सेवा ही एखाद्याचा अहंकार नष्ट करण्याची गुरुकिल्ली आहे.''

थोडक्यात, मनाला क्षमतेनं कार्य करता यावं यासाठी, मनातला गोंधळ दूर करणं अत्यावश्यक आहे. आत्मचिंतन ही मनाची भूमिका असते आणि म्हणून, ते तुमचा आरसा म्हणून काम करतं. एक आरसा तुम्हाला तुमच्या मनाला वाटणाऱ्या शारीरिक स्वरूपाच्या वरवरच्या भपक्यामागे असलेले खरे *तुम्ही* पहाण्यास मदत करतो. तुमच्या मनातला गोंधळ दूर करणं म्हणजे आरशाचा अर्थ पुन्हा परिभाषित करणं.

***जेवढा आरसा अधिक स्वच्छ,***
***तेवढा अधिक स्पष्ट असतो तुमचा आत्म-साक्षात्कार***
***आणि अधिक महान असते तुमची आध्यात्मिक जाणीव.***



*जिथं सामान्य माणसाचं आभामंडल आपली किरणं बाहेरच्या बाजूला पसरवतं, गुरुदेवांचं आभामंडल त्यांच्या सभोवार व्यापक रूपात सक्रिय होतं*

# आध्यात्मिक स्वच्छता

ईथरपासून आत्मा तयार होतो आणि म्हणून त्याचं सूक्ष्म कंपन असतं. सूक्ष्म कंपनं चुंबकीय करण्यासाठी भौतिक शरीर हे आत्म्यापेक्षा कितीतरी जास्त प्रभावी असतं. परिणामी, ते त्याच्या आध्यात्मिक प्रतिस्पर्ध्याला त्याच्या ऊर्जेचं वेगानं संवर्धन करून आणि वाढवून मदत करू शकतं!

मानवी अस्तित्वाचा उद्देश मृत्यूनंतर, आत्म्याचा शारीरिक अवतार नसताना, त्याची ऊर्जा वाढवणं हा आहे.

आत्म्याची ऊर्जा ही विद्युत् चुंबकीय क्षेत्र किंवा भौतिक शरीराभोवतीची आभा म्हणून प्रकट होते. म्हणून, तुमची आभा जितकी मोठी असेल, तितका तुमचा आत्मा अधिक शक्तिशाली असतो.

---

महागुरूंच्या कार्यपध्दती स्पष्ट करताना, मला हे मान्य करावंच लागेल की जेव्हा त्यांनी आम्हाला काय करायचं याचा सल्ला दिला, तेव्हा त्यांनी कोणतंही कारण दिलं नाही. आमच्या आध्यात्मिक ऊर्जा समृध्द करण्याकरता आम्ही त्यांच्या सूचनांचा मार्गदर्शक तत्त्वं म्हणून स्वीकार केला.

---

आभा ही शरीराभोवती संरक्षक कवच म्हणून कार्य करते. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या संरक्षणाशी तडजोड केली जाते, तेव्हा अशी व्यक्ती रोग आणि नकारात्मक आत्म्यांनी आक्रमण केलं असता, ते सहन करण्यात दुबळ्या

ठरतात. आध्यात्मिक स्वच्छता ही विशिष्ट पध्दतींसंदर्भात आहे, ज्या तुमच्या आभाच्या देखभालीला आणि विस्ताराला प्रोत्साहन देतात.

## तांब्याचा *कडा* (तांब्याचं कडं)

गुरुदेवांचे जवळजवळ सर्वच भक्त तांब्याचा *कडा* परिधान करतात. *कडा* परिधान करण्यापूर्वी त्याला सामान्यपणे, गुरूंचा आशीर्वाद घेतला जातो. *कड्याला* आशीर्वाद देताना, गुरू हे स्वेच्छेनं आपली काही ऊर्जा त्या *कड्यामध्ये* संचारित करतात. तो *कडा* परिधान केल्यावर, गुरूंची आभा *कडा* परिधान करणाऱ्याच्या आभेत प्रसारित होते, आणि *कडा* परिधान करणाऱ्याला चेतनेच्या उच्च स्रोताशी जोडते. तांबं हे विजेचा चांगला वाहक असल्यामुळे, ते शरीरातून ऊर्जेची गळती कमी करतं आणि आभाचं संरक्षण करतं.

उत्तराखंडातील श्रीनगर इथं वास्तव्य करत असताना, गुरुदेवांनी मला त्यांचे वरिष्ठ असणारे प्रताप सिंगजी यांना डेहराडूनला गाडीनं घेऊन जायला सांगितलं. आम्हाला प्रताप सिंगजी यांच्या मेहुणीला भेटायचं होतं, जी गंभीर आजारी होती. तिला भेटल्यावर, मी तिला *कडा* घेऊन द्यायचं ठरवलं. पण, ते बनवण्यासाठी सोनार शोधता आला नाही. मग, मी त्या मेहुणीचा फोटो गुरुदेवांकडे घेऊन जायचं ठरवलं, ज्यामुळे, तिच्यावर उपचार करता आले असते. जेव्हा मी गुरगावला पोहोचलो, तेव्हा महागुरू श्रीनगरहून परतले होते, पण पाथात होते. जवळजवळ तीन दिवस, त्यांना भेटण्याचे माझे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. शेवटी, जास्त वाट बघणं अशक्य असल्यामुळे, मी त्या महिलेचा फोटो काढला नि त्यांच्या खोलीच्या दाराखालून आत सरकवला. तो पाहून, त्यांनी दर उघडलं आणि तो कुणाचा फोटो आहे याची चौकशी केली. मी त्याबद्दल सांगितल्यावर, ते म्हणाले, ''काल रात्री तिचा मृत्यू झाला.'' मी हादरलो. ते उघडपणे अस्वस्थ दिसत होते.त्यांनी मला सांगितलं, ''मी तुला तिची मदत करण्याच्या कामगिरीवर पाठवलं होतं.'' त्यांनी विचारलं, '' तिचं

जीवन वाचवण्यासाठी तू तुझा *कडा* द्यायचा विचार का नाही केलास?'' जर मी तिला माझा *कडा* घालायला लावला असता, तर मी तिला आपसुकच गुरूंच्या संरक्षणात्मक कृपेशी जोडलं असतं.

## अन्न, द्रवपदार्थ आणि कपडे

गुरुदेव इतरांनी शिजवलेलं अन्न सेवन करण्याबाबत काळजी घेत असत. अन्न तयार होत असताना, जेवणावर स्वयंपाक करणाऱ्याचे विचार, त्याचा मानसिक स्वभाव आणि डोळ्यांद्वारा प्रसारित होणारी आभा यांचा परिणाम होऊ शकतो. नकारात्मक आभा फक्त अन्नच बाधित करत नाही, तर ते सेवन करणाऱ्याला सुध्दा त्रास देते. पांढऱ्या रंगाचं अन्न हे लवकर खराब होऊ शकतं. म्हणून त्या रंगाच्या अन्नाचं सेवन करण्यापूर्वी त्याचा रंग बदलणं शहाणपणाचं असतं. उदाहरणार्थ, दुधाचा रंग हळदीनं बदलला जाऊ शकतो, दही हे दालचिनीनं स्वादयुक्त होऊ शकतं. स्थानांमध्ये, स्वयंपाकघराची व्यवस्था सहसा उच्च विचारसरणीच्या लोकांवर सोपवली जाते.

जेव्हा गुरुदेवांना आपली ऊर्जा इतरांबरोबर वाटायची इच्छा व्हायची, तेव्हा ते त्यांना आपलं उष्टावलेलं पाणी पिण्यासाठी द्यायचे किंवा त्यांना आपण वापरलेल्या ताटातून जेवायला सांगायचे. जेव्हा एखादी *साधू* व्यक्ती तुम्हाला हे स्वातंत्र्य देते, तेव्हा, ती तिची काही आभा तुमच्याकडे हस्तांतरित करते. लाळ ही आभावाहक आहे; एखाद्या व्यक्तीनं वापरलेल्या पेल्यातून पाणी प्यायलं किंवा ताटात जेवण जेवलं, तर, त्या व्यक्तीची आभा तुमच्यात उतरू शकते. एखाद्या शक्तिशाली व्यक्तीची आभा तुमची आभा वाढवू शकते. पण, नकारात्मक ऊर्जेच्या प्रभावाखाली असणाऱ्या एखाद्या व्यक्तीनं वापरलेल्या ताटात जर तुम्ही जेवलात, तर तुम्हाला त्या व्यक्तीच्या नकारात्मकतेचा संसर्ग होऊ शकतो.

गुरुदेवांचा आपली काही आभा हस्तांतरित करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे त्यांनी वापरलेले कपडे ते आम्हाला परिधान करण्यासाठी द्यायचे. आम्हाला ते कपडे किती दिवस परिधान करण्याची गरज आहे, हेही स्पष्ट करायचे.

ग्रहांच्या किरणांचा प्रभाव आपल्या आभावर जास्तीत जास्त वाढवण्याकरता, महागुरूंनी आठवड्यातील ठराविक दिवशी विशिष्ट रंगाचे कपडे घालायला प्राधान्य दिलं. ते बहुतेक, सोमवारी पांढरा, गुरुवारी पिवळा आणि शनिवारी काळा नि पांढरा रंग वापरायचे, तर मंगळवारी तपकिरी, बुधवारी निळा, शुक्रवारी हिरवा आणि रविवारी लाल रंग सुध्दा त्यांची शिफारस होती.

ते सामान्यत: अर्ध्या बाह्यांचा शर्ट आणि उघड्या सँडल्स घालणं पसंत करायचे. ते आपले हात नि पाय उघडे ठेवायचे. कारण, त्यामुळे, त्यांना आत्म्यांसह, तरल, दिव्य ऊर्जा समजायला मदत व्हायची.

## गुरुवारचे नियम

आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी, भक्त आणि शिष्यांकडून काही नियम (किंवा निर्बंध) पाळले जातात. आठवड्याच्या या दिवशी बृहस्पतीच्या ग्रहांची किरणं सर्वात जास्त प्रभावी असल्यामुळे, आभा विस्कळित अथवा दूषित करणाऱ्या कोणत्याही सरावात भाग न घेणं शहाणपणाचं असतं. यामध्ये डोक्याला मालीश करणं, केसांना शॅम्पू लावणं, केस कापणं, नखं कापणं, कपडे धुणं, दारू पिणं, मांसाहार करणं, लैंगिक भोग घेणं यांचा समावेश होतो.

जेव्हा आपण आपल्या शरीराचा कोणताही भाग कापतो किंवा टाकून देतो, तेव्हा काही प्रमाणात आभाचं नुकसान होतं. शारीरिक स्वच्छतेसाठी केस नि नखं छाटणं गरजेचं असतं, तर आध्यात्मिक स्वच्छतेमध्ये आभाचं परिणामी नुकसान समाविष्ट असतं. हे लक्षात घेऊन, कापलेले केस आणि नखं

जमिनीवरून झाडून कचऱ्याच्या डब्यात झाडून टाकण्याऐवजी, पाण्याच्या वाहत्या प्रवाहाला अर्पण केली पाहिजेत. परिणामी, त्यांची आभा पाण्याच्या ऊर्जेमध्ये योगदान देऊ शकते आणि ती निसर्गानं आपल्यावर केलेल्या ऋणाची परतफेड मानली जाऊ शकते.

जेव्हा आपण इतरांना शारीरिक किंवा मानसिकरीत्या आपल्या विश्वात प्रवेश करायची मुभा देतो, तेव्हा, त्यांच्या ऊर्जेच्या ठशांनी प्रभावित होण्यासाठी आपण स्वत:ला मोकळं करत असतो. त्या कारणास्तव, तुम्ही कुणाशी लैंगिक संबंध ठेवता, याची खातरजमा करा. त्याचप्रमाणे, शाकाहाराची निवड करा. कारण, आहारातून मांस काढून टाकल्यामुळे, तुमची आभा खालच्या श्रेणीतील प्राण्यांच्या ऊर्जेपासून मुक्त रहाते. शिवाय, मांसाहार ही एक तामस प्रथा आहे. ती बृहस्पतीच्या किरणांच्या सात्त्विक गुणांना विरोध करते.

अल्कोहोल हे सुस्त करणारं आहे. कारण, ते मेंदूच्या रसायनाशी अशा प्रकारे खेळतं की तुमच्या शारीरिक हालचाली कमी सुसंगत होतात आणि तुमच्या मानसिक क्रिया अधिक मंदावतात. रजस्च्या सुरवातीच्या उच्चांकानंतर, आळशीपणा, तंद्री आणि चिडचिडेपणा यांचे तामस परिणाम प्रभावी होतात आणि सत्त्व कमी होतं.

## तुमची आभा आणि तुम्ही

आभा ही आध्यात्मिक क्षेत्राचा मुकुटमणी आहे आणि तिला नेहमीच जास्त मागणी असते. तिचा आकार वाढवू शकतो, ती कमी करता येते, तिच्यात विस्कळितपणा येऊ शकतो, ती दूषित होऊ शकते आणि चोरीलाही जाऊ शकते. यामुळे, ती एक नाजूक खजिना बनते. तिचं जतन करणं आव्हानात्मक असतं आणि तिला वृध्दिंगत करणं अधिक कठीण असतं.

*सावधगिरीची सूचना:*

काळ्या जादूचे व्यावसायिक हे तुमच्या केस, नखं, कपडे, शूज, हस्तलिखित नोंदी इत्यादी चीजवस्तू घेऊन त्यांचा तुमच्यावर जादू करण्यासाठी वापर करू शकतात. त्यामुळे, आध्यात्मिक स्वच्छतेबद्दल सावधगिरी बाळगा आणि जाणूनबुजून किंवा अनवधानानं, तुमची आभा हाताळताना आणि वितरीत करताना काळजी घ्या.

---

महागुरू हे आपली ऊर्जा वळवू शकायचे नि आपल्याला पाहिजे तिथं ती रुजवू शकायचे. जेव्हा त्यांनी स्थानं उघडली, तेव्हा ते आपल्या काही शक्ती तिथं साठवून ठेवायचे. कालांतरानं, त्या ऊर्जा *सेवादारांच्या* आणि स्थानाच्या अभ्यागतांच्या सामूहिक ऊर्जांच्या ठेवींमुळे वृध्दिंगत व्हायच्या.

त्यामुळे, अनेकदा, गुरुदेव जेव्हा महत्त्वाच्या मोहिमांवर निघायचे, तेव्हा ते आपला फोटो आपल्या खिशात बाळगत. या कृतीचा अर्थ असा होता की महागुरू नेमलेली गंभीर कामगिरी पार पाडताना आपल्या निर्माण कायेला बरोबर घेऊन जायचे.

गुरुदेवांनी आम्हाला मर्यादेच्या आत रहायला शिकवलं. मान्यता न मिळवता, जे करायलाच हवं होतं, ते करायला सांगितलं. आम्ही सार्वजनिक ठिकाणी फिरू शकतो आणि तरी आम्हाला कुणी ओळखत नाही. कारण, ना आम्ही माध्यमांमध्ये प्रदर्शनास परवानगी देतो, ना आमचे फोटो प्रकाशित करू देतो. गुरुदेव आम्हाला त्यांचे फोटो काढायची परवानगी द्यायचे नाहीत. जर आम्ही त्यांच्या सूचनेचा अवमान केला आणि सावधपणे तसं केलं, तर, कॅमेऱ्याचा रोल विकसित झाल्यावर रिक्त व्हायचा. आमच्यापैकी अनेकांची सारखीच कहाणी आहे! ओळख टाळण्यासाठी, महागुरूंनी खूप कष्ट घेतले. त्यामुळे, त्यांना प्रसिध्दीचा भार सहन करावा लागला नाही.


## अंतिम स्थिती

*तांत्रिक* दृष्ट्या बोलायचं तर, तुमची आभा ही तुमचं वैश्विक चलन आहे. ती तुमच्या या जन्मातील अंतिम स्थितीचं परिमाण आहे आणि नंतरच्या जन्मातील तुमच्या अस्तित्वाच्या गुणवत्तेचा निर्धारक आहे.

आत्म्याला अस्तित्वासाठी, प्रवास करण्यासाठी आणि स्वत:चं संरक्षण करण्यासाठी आपल्या ऊर्जेची गरज असते. तो ही ऊर्जा स्वत:च्या नावावर, त्यानं स्वत: (भौतिक स्वरूपात) केलेल्या किंवा इतरांद्वारा केलेल्या कृतींमार्फत मिळवू शकतो. म्हणूनच, आपण जिवंत असताना सेवा करतो किंवा आपल्या पूर्वजांच्या नावानं दानधर्म करतो. गुरुदेवांनी सुचवलं होतं की आम्ही आमच्या पूर्वजांच्या आत्म्यांची सेवा करण्यासाठी श्राध्दाचा कालावधी पाळावा.

०६

# उपचार





*जो आजार बरा होऊ शकत नव्हता औषधानं तो बरा*
*झाला त्यांच्या स्पर्शाद्वारा किंवा टक लावून पहाण्यामुळे.*
*काढून टाकलं एका क्षणात आयुष्यभराचं दु:ख,*
*ते होते एक असामान्य उपचारक.*

पृथ्वीचा इतिहास हा अशा आध्यात्मिक दृष्ट्या प्रगत जीवांच्या अस्तित्वाची साक्ष देतो, जे चुंबकीय ऊर्जेनं आणि समृध्द आभांनी संपन्न होते. ते इतरांमध्ये प्रकट होणाऱ्या नकारात्मक शक्तींना चुंबकीय करू शकत आणि ते प्रगत आध्यात्मिक उपचारक होते. अशा या मोजक्या लोकांच्या यादीत येशू, शिर्डी साई आणि गुरू नानक यांची गणना केली जाऊ शकते. गुरुदेव हे या ग्रहावर फिरणाऱ्या सर्वात उल्लेखनीय उपचारकांपैकी एक होते.

## नकारात्मक ऊर्जांचं चुंबकीकरण

बहुधा, नकारात्मकता ही खालील कारणांमुळे प्रकट होते:

- तुमच्या जीवनात नियतीनं घडवलेले नकारात्मक संस्कार
- विशिष्ट ग्रहांच्या प्रभावामुळे होणारे शारीरिक नि मानसिक आजार
- वृध्दत्वामुळे शरीराचे अवयव विस्कळित होणं
- दुसऱ्या जीवाकडून तुमच्यावर केलेली काळी जादू
- आत्म्यांनी पछाडल्यामुळे पीडितांचं जे शारीरिक नुकसान होतं, त्यामुळे, त्या पीडितांना ओळखणं आणि हाताळणं अवघड होऊ शकतं
- पूर्वजांचे शाप *(पित्र पीडा)* अथवा इतर शक्तिशाली जीव तुमच्या चांगल्या नशिबाला मर्यादा आणू शकतात
- काही वेळा, तुम्ही इतरांकडून निघून गेलेल्या आणि फूटपाथ, रस्ता ओलांडण्याच्या ठिकाणी सोडून दिलेल्या व्याधींना अनवधानानं संक्रमित करता

त्यामुळे, कधी कधी तुम्ही नकारात्मकतेसह जन्म घेता, तर, कधी कधी, ती तुमच्यावर लादली जाऊ शकते आणि कधी कधी तुम्ही ती स्वत: उचलून घेता. नकारात्मकता कोणत्याही प्रकारची असो, महागुरूंनी ती काढून टाकण्याचा प्रयत्न केला. आध्यात्मिक उपचार हा त्यांच्या सेवेचा एक महत्त्वाचा भाग होता आणि त्यांनी तो अंमलात आणला, त्या बदल्यात एक कपर्दिकही न स्वीकारता.

मी एका नातेवाईकानं केलेल्या काळ्या जादूची शिकार झालो होतो. यामुळे, मला तीव्र संधिवात सुरू झाला आणि महागुरूंनी मला एका मिनिटात बरं करेपर्यंत, दहा वर्षं तो त्रास मला सहन करावा लागला! संधिवाताव्यतिरिक्त, महागुरू हे हाडांच्या रोगांच्या अन्य समस्या, शरीराच्या विविध भागांतील वेदना, ओटीपोटाच्या नि पचनसंस्थेच्या समस्या, मधुमेह, कावीळ, मूत्रपिंड नि पित्ताशयातील खडे, कॅन्सर, लैंगिक रोग, भाजणं, संसर्गदोष, विविध स्केरोसिस (हा एक चिवट रोग आहे, ज्यात मेदू, पाठीचा कणा आणि डोळ्यांच्या मज्जातंतूंवर परिणाम होतो), विविध व्यक्तिमत्त्व विकार आणि नैराश्य, मज्जातंतूंचे विकार, मनोविकृती इत्यादी मानसिक विकार अंशत: अथवा पूर्णपणे बरे करू शकत. गमावलेली दृष्टी परत मिळवण्याची अनेक उदाहरणं माहीत नाहीत, तरी घराला लागलेल्या आगीत काळा ठिक्कर होईपर्यंत जळल्यानंतर, गुरुदेवांनी परत दृष्टी मिळवून दिल्याचा बिट्टुजी हा पुरावा आहेत.

अनेक शिष्यांकरता महागुरूंना भेटण्यासाठी नकारात्मकता ही एक निमित्त ठरली. गिरीजी एका असाध्य रोगानं ग्रस्त होते आणि डॉक्टरांनी सर्व आशा सोडून दिल्यानंतरच, ते महागुरूंना भेटण्याकरता उत्सुक असलेल्या मित्रांच्या कंपूत सामील झाले. मूतखड्यांनी (किडनी स्टोन्स) ग्रासलेले संतोषजी महागुरूंची मदत घेणार होते कथोगमध्ये, पण, त्याऐवजी, त्यांना लोकांवर उपचार करण्यात यश आलं. ज्या कार्यालयात महागुरू काम करायचे, त्याच कार्यालयात डॉ. शंकर नारायण काम करायचे. त्यांनी आपल्या मुलीला आकडी येण्यापासून बरं करण्यासाठी महागुरूंची मदत मागितली. विरेंदरजींनी आपल्या पत्नीला बरं करण्यासाठी साहाय्य मागितलं, सुरेंदरजींनी त्यांच्या बहिणीसाठी मदत मागितली, तर हरीशजींनी आपल्या मद्यपी मेहुण्याकरता महागुरूंना मदत करण्याचं आवाहन केलं होतं. महागुरूंनी आम्हाला फक्त मदतच केली नाही, तर आम्हाला आपल्या टोळीत सामिल करून घेतलं आणि आपल्या अनेक उपचारपध्दती आमच्या हाती सोपवल्या.

## उपचारकेंद्रित दृष्टिकोन

आध्यात्मिक उपचार हे अलिप्तता आणि नातलगांच्या बाबतीत पक्षपात न करता केले गेले पाहिजेत. गुरुदेवांनी कधीही आपल्या उपचारशक्तीचा उपयोग आपल्या नातेवाईकांवर केला नाही. नातेवाईकांच्या आजारपणात, आध्यात्मिक मध्यस्थी नाही, तर औषधोपचार मदतीला आले. गुरुदेवांनी आपल्या आजारी धाकट्या भावाची केवळ त्याचा एक निष्ठावंत मोठा भाऊ म्हणून काळजी घेतली, (एक गुरू म्हणून नाही) आणि आपल्या आईचा खूप आदर करूनही, तिला बरं करण्यासाठी, ते तसूभरही हलले नाहीत. जेव्हा त्यांच्या स्वतःच्या मुलांनी वेदना नि यातनांबद्दल तक्रार केली, तेव्हा त्यांनी मुलांना साांगितलं, ''तुमचं तुम्हीच स्वतःला बरं करायला शिकलं पाहिजे.'' तथापि, काही प्रसंगी, गुरुदेवांचं कुटुंब त्यांच्या सेवेच्या कृतींचा विस्तार बनलं. हे सामान्यपणे सर्वांना माहीत आहे की गुरुदेवांनी एका तरुण मुलीचा हिवताप आपल्या मुलीला हस्तांतरित केला, जेणेकरून त्या तरुण मुलीची आजारापासून सुटका झाली असती.

संतोषजी हे प्रगत उपचारक असूनही, अजूनही मूतखडयांनी, रवीजी हे त्वचेच्या ॲलर्जीनं आणि पुरणजी हे हाडांच्या रोगांच्या समस्यांनी त्रस्त असतात. तरीही, ते हे सगळं सहजसुंदरतेनं सहन करत रहातात, क्वचितच तक्रार करतात. रविजींनी जेव्हा पहिल्यांदा आपल्या दीर्घकालीन त्वचेच्या ॲलर्जीवर गुरूंशी चर्चा केली, तेव्हा आपल्या गुरूंनी उद्‌गारलेले शब्द त्यांना आठवतात, ''तुम्ही इतक्या लोकांच्या वेदना दूर करता. कधी कधी त्या वेदनेचा एक अंश तुम्हालाही सहन करावा लागतो.'' जो उपचारक असतो, त्याला स्वतःच्या जबाबदाऱ्यांचा संच असतो.

अनेक वर्षांपूर्वी, लंडनच्या हिथ्रो विमानतळाच्या निर्गमन कोचमध्ये (departure lounge) असताना, राजपालजींनी गुरुदेवांना विचारलं,

''लोकांचं भाग्य बदलण्याच्या, पुसून टाकण्याच्या आणि पुन्हा लिहिण्याच्या आपल्यासारख्या महान गुरूंच्या क्षमतेमुळे *भगवान* नाराज आहे का?'' महागुरूंनी आपल्या शिष्याला समजावून सांगितलं, ''तुझा ताप बरा केल्यामुळे आणि तुझा आजार दूर केल्यामुळे *भगवान* माझ्यावर प्रसन्न झालाय.'' राजपालजींच्या चेहऱ्यावरील गोंधळलेले भाव पाहून, त्यांनी पुढे पुस्ती जोडली, ''*भगवान* प्रत्येक जीवात आहे. *भगवंतानं* मला गुरूंचा नावलौकिक आणि त्याबरोबर येणारा अधिकार दिलाय. मी हा अधिकार वापरतो, जेणेकरून, आजारी लोक बरे होऊ शकतात.''

गुरुदेव हे उपचारांच्या संदर्भात सर्वात अपारंपारिक गोष्टी सांगायचे. ते एकदा म्हणाले होते, ''मदतीसाठी येणाऱ्या कुणालाही मी बरं करत नाही. ते स्वतःच स्वतःला बरं करतात. मी कर्ता नाही.'' महागुरूंनी कर्तेपणाची भावना न स्वीकारण्याच्या तत्त्वज्ञानाची शिफारस केली नि तिचा सराव केला. याचा अर्थ असा की केवळ बरं व्हावं म्हणून लोक त्यांच्याकडे आले. त्यांच्या बरं होण्याचं श्रेय गुरुदेव घेऊ शकत नव्हते. कारण, ते फक्त सुविधा पुरवणारे होते. ते जे काही असेल ते असो; इतिहासात क्वचितच काहींनी असा पराक्रम साधला असेल.

एका ज्येष्ठ शिष्यानं आणखी एक लक्षवेधक माहिती सांगितली. ''कोणताही आजार अथवा रोग असो, जेव्हा गुरुदेव आजारी व्यक्तीवर हात ठेवायचे, तेव्हा वेदना कमी व्हायची आणि शेवटी नाहीशी व्हायची. बहुतेक साधकांना आराम लाभायचा.'' जेव्हा मी त्यांना विचारलं, ''तुम्ही प्रत्येकाला का बरा करत नाही?'' तेव्हा त्यांनी मला सांगितलं, ''काहीजण निव्वळ माझ्या शक्तींचा अंदाज बांधायला नि माझी परीक्षा घ्यायला येतात.'' त्यांनी पुढे म्हटलं, ''जर ते लोक माझ्याकडे मदतीची खरी गरज म्हणून आले असते, तर, मी त्यांनाही मदत केली असती.''

आध्यात्मिकरीत्या बऱ्या झालेल्या लोकांच्या जीवनात विश्वास हा एक सामान्य भाजक दिसत असला, तरी महागुरूंनी लोकांना विश्वासाशी बांधून ठेवण्यावर विश्वास ठेवला नाही. मदतीसाठी नि उपचारासाठी आलेल्यांची सेवा करायला स्थान बांधील होतं. लोकांनी आपल्या गरजा पूर्ण झाल्यानंतर स्थानात येणं बंद केलं तर ते पूर्णपणे मान्य होतं. (तार्किकदृष्ट्या बोलायचं तर, बरे झालेले सर्वजण जर नियमितपणे *बऱ्या* गुरुवारी उपस्थित राहिले असते, तर *बडा* वार हा *बडा* आठवडा बनला असता!)

तथापि, जे लोक कितीही कठीण वाटलं तरी उपचारांची परिपूर्ती होईपर्यंत येत राहिले आणि स्थानांमध्ये नियमित झाले, ते सुध्दा महागुरूंची दीर्घकालीन जबाबदारी बनले आणि महागुरूंनी त्यांच्या कल्याणाची नि आध्यात्मिक विकासाची जबाबदारी स्वीकारली.

## वेदनांपासून मुक्ती

अनेकदा आत्म्यांनी पछाडलेले लोक महागुरूंची मदत घेत. बळी ठरलेल्या लोकांना त्यांच्या पूर्वजांच्या आत्म्यांकडून किंवा काळ्या जादूनं आत सोडलेल्या अज्ञात आत्म्यांद्वारा त्रास दिलेला असायचा. बहुतेक वेळा, त्यांच्या कमकुवत आभांमुळे, आत्मे त्यांना पछाडण्याच्या बाबतीत सहज लक्ष्य बनवत.

गुरुदेवांनी सर्व जीवसृष्टीला स्वत:चा विस्तार मानला. आत्म्यांनी इतर शरीरांचा ताबा घेणं आणि आपले बळी ठरलेल्यांना त्रास देणं त्यांना मान्य नव्हतं, तरी, आत्म्यांनाही त्रास होऊ नये, असं त्यांना वाटायचं. ते आम्हाला सांगायचे की आत्मे आणि मानव हे त्यांची रचना नि क्षमता वगळता समान आहेत. आत्मे सुध्दा शिवपरिवाराचा भाग आहेत. त्यामुळे, त्यांची देखील सेवा करणं हे आपलं कर्तव्य आहे. आत्म्यांची सुटका करायला बहुतेक व्यावसायिक जरी सक्षम असले, तरी ते आत्म्यांवर सर्वसाधारणपणे हल्ला करतात, त्यांच्यावर

अत्याचार करतात किंवा अधिक बळाच्या जोरावर त्यांना चीत करतात, तर महागुरू आत्म्यांना स्वत:च्या बळींना मुक्त करण्याच्या बदल्यात एक बक्षीस देऊ करायचे. आत्म्यांची साधारणपणे अशी इच्छा असायची की महागुरूंनी त्यांना मानवी स्वरूपात जन्म द्यावा किंवा उच्च लोकांपर्यंत जाण्यास मदत करावी. कारण, पुरेशा ऊर्जेच्या कमतरतेमुळे, आत्म्यांना खालच्या लोकांमध्ये आणि पृथ्वीवर त्यांच्या स्वत:च्या घरांमध्ये किंवा रिकाम्या इमारतींमध्ये किंवा जिन्न आणि काळी जादू करणाऱ्यांचे बंदिवान म्हणून अडकवलेलं असायचं.

मी माझ्या गुरूंना पछाडलेल्या मानवांच्या बाबी अत्यंत सहजतेनं हाताळताना पाहिलंय. मला स्पष्टपणे आठवतंय की ते गुरुदेव ओम सिंग नावाच्या माणसाशी कसे वागले होते, जेव्हा तो त्यांच्या दारात १३ साखळ्यांनी बांधलेल्या अवस्थेत आला होता. त्यातली प्रत्येक साखळी एका प्रचंड अशा मोठ्या माणसानं धरली होती. ओम सिंग यांच्याकडे अविश्वसनीय शारीरिक सामर्थ्य होतं. कारण, त्यांना एका आत्म्यानं पछाडलं होतं. एकदा महान गुरूंनी त्याला आत्म्यापासून मुक्त केल्यावर, त्यांनी मला त्या माणसासाठी टीशर्ट्स आणि ट्राउजर्झ खरेदी करायला त्याला बाहेर घेऊन जायला सांगितलं आणि गावातील त्या मुलाकरता *‘शांतचित्त’* हे बिरूद जोडलं गेलं!

आत्म्यांना माहीत असतं की आत्मा या स्वरूपापेक्षा मानवी स्वरूपात आध्यात्मिक परिवर्तन अधिक त्वरित होतं. म्हणूनच, मानव म्हणून जन्म घेण्याची संधी ही बहुतेकांसाठी सर्वात मोठी देणगी आहे. महागुरूंनी विशिष्ट प्राण्यांच्या आत्म्यांना देखील मानव म्हणून जन्म घेण्याची अनुमती दिली.

ज्याप्रमाणे, महागुरूंकडे, आत्म्यांना इच्छेनुसार जन्म घेण्याची शक्ती होती, त्याचप्रमाणे, ते माणसाच्या पुढील जन्मातील काही वर्षं वजा करून आणि ती त्याच्या वर्तमान जन्मात जोडून, त्याचं जीवन वाढवू शकायचे, तसंच, दोन किंवा पाचाच्या पटीत वर्षं भेट म्हणून देऊ शकायचे. महागुरूंचा मुलगा

परवेशजी यांनी जेव्हा महागुरूंना आपल्या मित्राच्या कॅन्सरग्रस्त आईसंबंधी सांगितलं, तेव्हा, महागुरूंनी तिला वीस वर्षं बहाल केली होती त्यामुळेच ती ही गोष्ट सांगण्याकरता जगली.

काळ्या जादूनं किंवा नकारात्मक आत्म्यांनी पछाडलं जाणं हे भारतात आणि जगाच्या इतर भागांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण गैरसाहस आहे. लहान वयात गुड्डनजींची तब्येत बिघडत होती. म्हणून, त्यांनी आपल्या भावाला आपल्याला गुरगावला न्यायला सांगितलं. त्या कशाबशा उभं राहू शकत होत्या, चालू शकत होत्या आणि खाऊ शकत होत्या. गुरुदेवांनी गुड्डनजींवर उपचार केल्यावर, त्यांना उलटी झाली. त्या उलटीतून *बर्फीचा* चौकोनी तुकडा बाहेर पडला आणि त्या लवकरच, दीर्घकालीन आजारातून बऱ्या झाल्या. महागुरूंचे उपचार सुरू असताना, लोक अनेकदा, अमंगळ ऊर्जेचे वाहक ओकून टाकायचे. एकदा कमलेशनं रंगीबेरंगी काचेच्या बांगड्यांचे तुकडे ओकून टाकलेले मला अगदी स्पष्टपणे आठवतंय. जेव्हा ती स्थानात मदत मागण्यासाठी आली, तेव्हा गुरुदेवांनी मोहन चित्राजी यांच्यावर कमलेशच्या उलटीतून पडलेले काचेचे तुकडे गोळा करून, त्यांच्यापासून गोलाकार बांगडी तयार करण्याचं काम सोपवलं होतं. गुरुदेव म्हणाले होते, ''नऊ बांगड्या तयार होऊ शकतील, इतकं सर्व साहित्य तिनं ओकून टाकल्यावर, ती नकारात्मकतेपासून मुक्त होईल.'' गुरुदेवांनी तिच्या पाठीवर थोपटल्यावर, जेव्हा अंतिम फेरी झाली, तेव्हा तिनं एक *तावीझ* ओकून टाकला! हे जेव्हा घडलं, तेव्हा मी गुरुदेवांशेजारीच उभा होतो.

काळ्या जादूला ईर्ष्येमुळे चालना मिळते, तर शापांना क्रोधामुळे चालना मिळते. वडिलोपार्जित शापांमुळे होणाऱ्या दीर्घ-दु:खासाठी *पित्र पीडा* (पितृ पीडा) हा एक छोटा शब्द आहे. कौटुंबिक वंश किंवा कुलावरील असे शाप हे कोणत्याही एका विशिष्ट व्यक्तीला लक्ष्य करत नाहीत. तथापि, त्या शापाची झळ नि:संशयपणे, कुलातील काही व्यक्तींना सहन करावी लागते. *पित्र पीडेची* अनेक प्रकरणं गुरुदेवांकडे यायची. या यादीत मी एक होतो. म्हणून,

पाठीवर थोपटल्यावर, कमलेश तावीझ
ओकून टाकते



गुरूदेवांनी मला अनेक वर्षं शेती करायला लावली आणि त्यातून मिळणारी रक्कम धर्मादाय कारणांसाठी दान करायला लावली. त्यामुळे, माझ्या नि माझ्या कुलाची *पित्र पीडा* संपुष्टात आली.

महागुरू हे शक्तिशाली संत आणि मंदिरांचे शाप सुध्दा सौम्य करू शकत. मुकेरियन येथील स्थानातील विश्वामित्रजी यांनी एका जोडप्याची कहाणी सांगितली. ते जोडपं आपली नवजात बालकं ब्लड कॅन्सरमुळे गमावत असे. चार प्रसूती आणि चार संबंधित मृत्यूंनंतर, ते पती-पत्नी गुरुदेवांकडे मदतीकरता गेले. तथापि, त्यांच्या पाचव्या मुलाचाही ब्लड कॅन्सरनं मृत्यू झाला. तेव्हाच त्यांना महागुरूंनी सांगितलं की त्यांचं पुढचं मूल कॅन्सरमुक्त होईल आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे घडलं.

त्याव्यतिरिक्त, गुरुदेव हे लोकांमधील ऊर्जा-अवरोध बरे करू शकत. त्यांपैकी सर्वात सामान्य म्हणजे लक्ष्मी *बंध*. याचा अर्थ - ज्यांना कंजूषपणे रहाण्याचा शाप मिळाला होता, त्यांच्यातील *बरकतची* कमतरता (आर्थिक अक्षमता) दूर करणं. हा *बंध* (ऊर्जा कुलूप) अवरोधरहित केल्यामुळे, गरीब माणसाला खर्च केलेल्या कोणत्याही रकमेपेक्षा जास्त पैसे मिळण्याची हमी मिळते. अशा प्रकारे, महागुरूंनी *बरकत* पुन्हा मिळवून देणं ही गोष्ट कुशलतेनं हाताळली.

## उपचार-पध्दती

महागुरूंच्या उपचार क्षमता फक्त रुग्णांशी शारीरिक सुसंवादापर्यंतच मर्यादित राहिल्या नाहीत, तर हजारो मैल दूर असलेल्या लोकांपर्यंतही विस्तारल्या. महागुरू हे प्रभावीपणे, दूरवरच्या एखाद्या व्यक्तीला दूरध्वनीद्वारा किंवा मनानं बरं करू शकायचे. जिला ते कधीही भेटले नाहीत अथवा जिच्याशी कधीही बोलले नाहीत, अशा व्यक्तीला देखील ते बरं करू शकायचे.

सामान्यत:, गुरुदेवांनी विशिष्ट मसाल्यांचा उपयोग रोगनिवारक ऊर्जावाहक म्हणून केला. लवंग, वेलची, मिरी, पिवळी मोहरी, सुपारी आणि मंत्रांद्वारा ऊर्जायुक्त केलेलं पाणी या गोष्टी लोकांना ज्या समस्यांपासून आराम हवा असायचा, त्यानुसार वेगवेगळ्या परिमाणांमध्ये दिल्या जायच्या. गुरुदेवांनी, कालांतरानं बहुतेक आजारांवर लागू होणाऱ्या अशा १०० नैसर्गिक औषधयोजना एकत्र केल्या.

उपचारक म्हणून गुरुदेव अनाकलनीय होते. काही वेळा ते व्यक्तीला, कोणत्याही तार्किक मनाला जे करणं योग्य आहे असं वाटतं, त्याला बरोबर अचानक धक्का देऊन बरं करत. उदाहरणार्थ, दीर्घकाळ घश्याच्या खवखवेनं त्रासलेली एक स्त्री त्यांच्याकडे मदतीसाठी आली, तेव्हा त्यांनी तिला मसालेदार गोल-गप्पे खायला सांगितलं. ती जरा घाबरतच खात होती, तरी, गुरुदेवांच्या सल्ल्याचं पालन करण्याची निखळ कृती केल्यामुळे, तिचा आवाज त्याच्या मूळच्या पातळीवर परत आला आणि ती एक दाट श्रध्दाळू बनली. विस्मय या भावनेनं गुरुदेवांनी लाखो लोकांना प्रेरित केलं.

एखादा उपचार म्हणून महागुरूंनी जे काही द्यावसं वाटलं, ते त्यांनी दिलं. सेवेदरम्यान स्वत:चं गानकौशल्य दाखवणाऱ्या राजपालजींना धडा शिकवण्यासाठी, गुरुदेवांनी त्यांचा आवाज इतका कर्कश बनवला की त्यांना दुसऱ्याला समजेल असा एकही शब्द उच्चारणं शक्य होत नव्हतं. काही महिन्यांनंतर, जेव्हा राजपालजींनी आपल्या गुरूंकडे क्षमा मागितली, तेव्हा गुरुदेवांनी त्यांना त्यांचा स्वर पुन्हा पूर्वीसारखा होण्याकरता बर्फाचा गोळा खायला सांगितला. ज्या ठिकाणी राजपालजी उभे होते, त्या जमिनीवरून त्यांनी बर्फ उचलला आणि खाल्ला. या इलाजानं, ते जवळजवळ तात्काळ बरे झाले.


जेव्हा गिरीजींच्या बहिणीच्या हाताला बुरशीच्या वाढीचा संसर्ग झाला, तेव्हा गुरुदेवांनी तिला अकरा दिवस स्थानावर बनवलेल्या रोट्यांवर घी लावायला

सांगितलं. बाराव्या दिवसापर्यंत बुरशीजन्य संसर्ग कमी झाला होता. त्याच्या दुर्गंधीयुक्त पू चा सुध्दा कोणताही मागमूस राहिला नाही.

एकदा गुरुवारच्या सेवेदरम्यान, मी एका हर्नियाच्या रुग्णावर मूळव्याधीचा उपचार केला. कारण, मी दोन्ही उपचारांमधील फरक विसरलो होतो. तथापि, मागाहून, मला माझी चूक लक्षात आली. पुढील आठवड्याच्या गुरुवारी, मी पुन्हा रुग्णाला भेटलो. मला त्याच्यात लक्षणं वाढली असतील असं वाटलं होतं. परंतु, तसं झालं नाही. तो म्हणाला, ''मी पूर्वीपेक्षा खूप चांगला आहे.'' मला जाणवलं की आम्हाला ज्या शास्त्राची सवय होती, त्याचा पाठिंबा उपचाराला नव्हता आणि शिवाय फक्त वेलची, लवंगा, जल किंवा आम्हाला शिकवलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दलचं महत्त्व नव्हतं. तर, उपचाराच्या प्रक्रियेपेक्षा हेतूची जादू जास्त होती. या मुद्द्याचा पुरावा म्हणून, मला महान गुरूंचे शब्द आठवतात, ''स्थानावरील चिखल देखील इतर कोणत्याही आध्यात्मिक उपचाराइतकाच प्रभावीपणे कार्य करेल.''

गुरुदेवांनी आजार बरा करण्यासाठी नवीन पध्दती वापरल्या. वारंवार, स्वप्नं नि दृष्टांतांनी गुरुदेवांच्या उपचाराच्या किरणांकरता वाहक म्हणून काम केलं, केवळ गुरुदेव जिवंत असतानाच नाही, तर त्यांच्या पश्चातही. जेव्हा घरात लागलेल्या आगीत बिट्टुजी गंभीर भाजले, तेव्हा, महागुरू त्यांच्या स्वप्नात प्रकट झाले, त्यांच्याशी बोलले आणि त्यांना आपण उष्टावलेलं पाणी देऊ केलं. या स्वप्नानंतर आठवड्याभरातच, बिट्टुजींच्या जळलेल्या त्वचेचा थर निघून गेला नि ते चालण्यास समर्थ बनले.

राधा स्वामी सत्संग बियासचे प्रमुख म्हणून कार्य सांभाळत असताना, चरणसिंगजींच्या मुलीला कॅन्सर झाला. त्यांनी आपल्या पत्नीला नि मुलीला गुरुदेवांना भेटायला सांगितलं, असं सांगून की, ''ते शिव आहेत. मी त्यांना भावाप्रमाणे वागवतो.'' जेव्हा महागुरू चरणसिंगजींच्या मुलीला भेटले, तेव्हा



जगानं गुरुदेवांना आपल्या इच्छेनुसार बरे करू शकणारे
आश्चर्यकारक उपचारक म्हणून ओळखलं.
त्यांनी काही मिनिटांतच, लोकांचे असाध्य रोग बरे केले.
त्यांच्या असामान्य उपचार पराक्रमाच्या आणखी कथा ऐका
www. gurudevonline.com वर
Podcast **Healer Extraordinaire** मध्ये

त्यांनी तिला आपण स्वत: उष्टावलेलं पाणी प्यायला सांगितलं. तिला कॅन्सर आहे, हे अमान्य करत, दुप्पट खात्री होण्यासाठी म्हणून, तिची पुन्हा वैद्यकीय तपासणी करावी असं सुचवलं. ट्यूमरसारखी वाढ कमी झाल्याचं निकालांनी सूचित केलं.

---

गुरूंनी उष्टावलेलं पाणी असो किंवा मंत्रांद्वारा ऊर्जायुक्त केलेलं पाणी असो, *जल* हे आपला ताजेपणा टिकवून ठेवतं आणि वर्षानुवर्षं त्याला वास येत नाही. ते खरंच, जीवनाचं *अमृत* आहे.

---

महागुरूंच्या सूक्ष्म अवतारापासून मदत घेणाऱ्यांची संख्या वाढतच आहे.

गरजूंना बरं करणं हे महागुरूंच्या जीवनाचं ध्येय नव्हतं, जरी त्या ध्येयानं त्यांचा बराचसा वेळ व्यापला होता. वेळ वाया घालवणाऱ्या सामाजिक अस्तित्वाऐवजी आध्यात्मिक अस्तित्वाचा बाजारातील हिस्सा वाढवण्याच्या दिशेनं, ते हेतुपुरस्सर प्रेरित झाले होते. ज्यांना महागुरूंनी उपचारक्षमतांनी सशक्त बनवलं, त्यांच्यासाठी महागुरूंचा वारसा तिहेरी आहे:

१. सेवेच्या माध्यमातून त्यांचं आध्यात्मिक व्यक्तीत रूपांतर करणं
२. इतरांना दिलासा देणं
३. इतरांना त्यांच्या परिस्थितीनुसार चालण्यास प्रेरित करणं



# ०७

# अलौकिकता



*महागुरू मूर्तिमंत रूप होते अत्यंत नि:स्वार्थी प्रकारच्या शक्तीचं.*
*आमच्यासाठी होते ते एक मित्र, वडील आणि मार्गदर्शक.*
*त्यांनी साकारलेल्या सर्व भूमिकांमध्ये, आठवण करून दिली*
*आम्हाला आमच्या स्वत:च्या अलौकिकतेची.*

आतापर्यंतचे चरित्र वाचून, तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटत असेल की या आध्यात्मिकरीत्या अत्यंत बुध्दिमान आणि अतिमानवी सामर्थ्याच्या पुरुषानं स्वत:साठी सामान्य माणसाचं नशीब का स्वीकारलं? तुमच्यापैकी अनेकजण कदाचित ज्या प्रश्नाचं उत्तर मिळण्यासाठी उत्सुक असतील, तो प्रश्न असा आहे, 'स्वत: असामान्य असतानाही महागुरूंनी खरोखरीच सामान्य परिस्थितीचं जीवन जगणं का पसंत केलं? खरं तर, ते सामान्य नव्हते.'

कदाचित, भृगू संहितेच्या पानांमध्ये स्पष्टीकरण दिलेलं आहे. दिव्य दृष्टी लाभलेले भृगू हे गुरुदेवांचं वर्णन दिव्य आत्मा नि शिव-स्वरूप म्हणून करतात आणि पुढे असं सांगत, त्यांचं व्यक्तिचित्रण करतात, ''ध्यानात असताना, ते शिवासारखे आहेत आणि त्यांच्या भाषणात विष्णूसमान आहेत. सेवा नि संरक्षणात ते ब्रह्मासमान आहेत आणि लोकांना वेदनामुक्त करण्यात ते जगदंबेसारखे आहेत. त्यांची आभा सूर्यासमान आहे, बाहेरून ऊबदार, आतून सौम्य नि गुप्त ज्ञानानं भरलेली. या मानवी रूपामागील खरं अस्तित्व लोकांना कळू शकणार नाही.''

## अनेकविध व्यक्तिमत्त्वं

१९७४ साली, महाशिवरात्रीच्या आठवड्यात, महागुरूंनी अनिच्छेनं, शंभूजींना आपल्याला पंचमुखी रूपात पहाण्याची अनुमती दिली. जेव्हा शंभूजींनी चौकशी केली आणि मानवाला पाच मस्तकं असणं शक्य आहे का नाही हे जाणून घेण्याचा आग्रह धरला, तेव्हा ही घटना घडली. हा प्रश्न उपस्थित झाला. कारण, स्थानातील ज्या चित्राला महान गुरूंनी शिवाचा महामृत्युंजय रूप म्हणून उल्लेख केला होता, त्यात शंकराची एक नाही, तर पाच मस्तकं दाखवली असल्याचं शंभूजींनी पाहिलं होतं.

प्रश्न-प्रक्रियेच्या सुरवातीच्या टप्प्यात, गुरुदेवांनी सूचित केलं की पाच मस्तकं असणं ही गोष्ट एखाद्या व्यक्तीकडे असणाऱ्या ऊर्जांवर किंवा शक्तींवर

*जेव्हा शंभूजी महागुरूंना पाच मस्तकं असलेल्या रूपात बघतात, तेव्हा ते बेशुध्द पडतात*



अवलंबून असते. या उत्तरानं समाधान न झाल्यामुळे, अर्जुनाच्या आग्रहास्तव, कृष्णानं आपलं *विराट* रूप (दैवी रूप) प्रकट केलं, या महाभारतातील संदर्भाचा हवाला देऊन, शंभूजींनी आपल्या गुरूंना त्यांचं खरं रूप दाखवायला सांगितलं. त्या क्षणी, महागुरूंनी उत्तर दिलं, ''ना मी कृष्ण आहे, ना तू अर्जुन आहेस. तेव्हा तुला माझं रूप दाखवायचा प्रश्नच उद्‍भवत नाही.''

शंभूजी तितक्या सहजतेनं हार मानायला तयार नव्हते. म्हणून, त्यांनी पाठपुरावा केला. रामनाथजी नि राज कपूरजी या इतर दोन भक्तांनी त्याची री ओढली.

गुरुदेवांनी शंभूजींना परावृत्त करायचा खूप प्रयत्न केला. ते म्हणाले, ''मी तुझं आयुष्य पाच वर्षांनी वाढवलंय. परंतु, जर तू माझं रूप पाहिलंस, तर तू ती वर्षं गमावशील.'' शंभूजी आग्रही होते आणि गुरुदेवांच्या अलौकिक रूपाचं दर्शन होण्यासाठी आपल्या वाढीव आयुष्यावर पाणी सोडायला तयार होते.

गुरुदेवांशी शंभूजींचं संभाषण सुरू असतानाच, शंभूजी अचानक बेशुध्द पडले. गुरुदेवांनी त्यांच्यावर *जल* शिंपडल्यानंतरच, शंभूजींना मनाची स्थिरता प्राप्त झाली. गुरुदेव म्हणाले, ''मी कोण आहे, याचा एक छोटासा भाग मी तुला दाखवला आणि तुला तो हाताळता आला नाही. जर तुला माझं खरं रूप पहायचं असेल तर, अगोदर ते सहन करण्याची आंतरिक शक्ती तुला विकसित करावी लागेल.''

शंभूजींनी नंतर खोलीतील इतर दोघांना सांगितलं की बेशुध्द पडण्यापूर्वी, त्यांनी पाच मस्तकं धारण केलेल्या आपल्या गुरूंना स्वत:च्या शरीरासह चमकदार सोनेरी प्रकाशात न्हाऊन जाताना पाहिलं. गुरुदेवांना या अवतारात बघणाऱ्या फक्त तिघांपैकी ते एक होते. राज कपूरजींनी हा प्रसंग सांगितला, ''महागुरू फार उदार होते. त्यांनी आपलं रूप शंभूजींना दाखवलं. पण, त्यांनी शंभूजींना पूर्वी देऊ केलेली जास्तीची वर्षं मात्र काढून घेतली नाहीत.''

गुरुदेवांनी रूपं बदलल्याची अनेक उदाहरणं आहेत आणि त्यांच्या काही शिष्यांनी त्यांची झलक पाहिली. क्वात्राजींनी महान गुरूंच्या चरणी साष्टांग नमस्कार घातल्यावर, महान गुरूंचं रूप शुध्द प्रकाशात बदललेलं पाहिलं. राजपालजींनी आपल्या गुरूंना आकारानं दुप्पट झालेल्या डोक्यासह पाहिलं. परवाणूच्या गुप्ताजींनी महागुरूंचं बटू रूप बघितलं. शंभूजींचा मुलगा पप्पुजी महागुरूंच्या स्वच्छ मुंडन केलेल्या अशा रूपाच्या सान्निध्यात असताना, काही मिनिटांतच, त्यांनी महागुरूंचं लांब दाढी असलेलं रूप पाहून पाहिलं नि ते थक्क झाले!

जेव्हा उध्दवजींनी खिडकीतून खोलीत शिरलेल्या, पिवळे डोळे असलेल्या दोन काळ्या त्रिकोणांवर नंचकू (एक जपानी मार्शल आर्ट शस्त्र ज्यामध्ये साखळी, दोरी किंवा पट्ट्यानं जोडलेल्या, पारंपारिकपणे लाकडापासून बनलेल्या दोन काठ्या असतात) वापरायचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांचा हात गोठला आणि त्यांची शुध्द हरपल्यासारखी झाली. जेव्हा दुसऱ्या दिवशी ते सकाळी उठले, तेव्हा त्यांनी महागुरूंना कळवायचं ठरवलं. ''तू अगोदर मला तुला भेटण्यासाठी आमंत्रित करतोस आणि नंतर, जेव्हा मी येतो, तेव्हा, तू माझ्यावर हल्ला करतोस,'' त्यांच्या गुरूंनी टिप्पणी केली. महागुरूंनी ध्वनित केलं की ते त्या त्रिकोणांपैकी एक होते आणि उध्दवजींना पुढे सांगू लागले की नंचकूच्या आक्रमकतेला चांगला प्रतिसाद न मिळाल्यामुळे, त्यांना आपल्या भक्ताच्या आयुष्याकरता, बरोबर असलेल्या त्रिकोणी स्वरूपाशी तडजोड करावी लागली!

खरोखरंच, महागुरूंनी दर्शवलेल्या सर्वशक्तिमान ऊर्जेला एकच रूप किंवा एकच ओळख देणं सोपं नाही. महागुरूंनी आपल्या वास्तवात थोडं डोकावून बघण्याची अनुमती दिली, पण, पूर्ण चित्र कधीच पाहू दिलं नाही.

जेव्हा महागुरूंना जाणण्यातील माझ्या मर्यादा व्यक्त करण्याकरता मी शब्द शोधत असतो, तेव्हा कवी दाघ देलहवी यांचे गीतात्मक शब्द माझ्या मनात तरळतात.

*खूब परदा है के चिलमन से लगे बैठे हैं*
*साफ छुपते भी नहीं, सामने आते भी नहीं*
*(जेव्हा तुम्ही बुरख्यामध्ये झाकलेले असता, तेव्हा बरंच*
*काही दडलेलं असतं. ना तुम्ही पूर्णपणे लपलेले असता*
*ना तुम्ही स्पष्टपणे दिसता. )*

एक मानवी रूपातील प्रगत आध्यात्मिक आत्मा म्हणून त्यांच्या स्वरूपाला पहाण्यापेक्षा, एक प्रगत आत्म्यासहित असलेला मानव म्हणून पहाणं आम्हाला विशेष चांगलं वाटलं. ते नेहमी दावा करायचे,'' मी खरोखर कोण आहे, हे तुम्हाला कधीच कळणार नाही'', आणि हे त्यांनी सांगितलेल्या इतर सर्व गोष्टीइतकंच खरं आहे.

वास्तवाची अदृश्य रूपं माहीत असतात फार थोड्यांना. Podcast: **Form and Formlessness investigates** ऐका www.gurudrvonline.com वर

## शक्ति-प्रतीकं

गुरुदेवांच्या अनेक शक्ती त्यांच्या शरीरावर प्रतीकांच्या रूपांमध्ये प्रकट झाल्या. यातून असं सूचित होत होतं की प्रतीकांद्वारा दर्शवलेल्या क्षमतांनी त्यांची आभा बळकट बनली होती. प्रतीकांच्या अस्तित्वानं हे सुध्दा ध्वनित केलं की गुरुदेव त्यांचा उपयोग करण्यास पात्र होते.

सुरवातीला, गुरुदेवांच्या हातांवर संपूर्ण शिव-परिवार होता. त्यांच्या उजव्या हातावर ॐ, नंदी, गिलेरी (शक्तीचं स्त्री-तत्त्वाचं प्रतीक दर्शवणारा, स्त्रीयोनिशी साधर्म्य असणारा अंडाकृती पाया ज्यावर शिवलिंग, शक्तीच्या पुरुष-तत्त्वाचं प्रतीकात्मक प्रतिनिधित्व विसावतं), सभोवार सापानं वळसा घातलेलं शिवलिंग ही चिन्हं होती. त्यांच्या डाव्या हातावर ज्यामधून त्रिशूल जातोय असा ॐ, गणपती आणि ज्योत ही प्रतीकं होती. काही शिष्यांना गुरुदेवांच्या उजव्या हातावर तीन पिंडी दिसल्या आणि गुरुदेवांनी त्या वैष्णो देवीच्या मंदिरातून मिळवल्या होत्या असा शिष्यांचा विश्वास होता. संतलालजींनी महागुरूंच्या नखांवर त्रिशूल पाहिल्याची माहिती दिली आणि माताजींना गुरुदेवांच्या एका हातावर सुदर्शन चक्र दिसलं.

**ॐ** हे प्रतीक देवत्वाच्या दाखल्याचं प्रमाण आहे. ते तुम्हाला दैवी संघामध्ये स्थान देतं. हे प्रतीक सर्व सजीव स्वरूपांशी वर्धित संबंधाचं प्रतिनिधित्व करणारी चैतन्याची विशिष्ट पातळी दर्शवतं. हे पाताळ, पृथ्वी आणि उच्च लोक अशा तीन लोकांच्या समूहांशी असलेला संबंध आणि त्यांच्यावर असलेला प्रभाव ध्वनित करतं. गुरुदेवांच्या हातांवर, छातीवर, पाठीवर आणि कपाळावर ॐ होता. अधूनमधून, काही जणांनी गुरुदेवांच्या हातावर ॐ नं इतका प्रकाश टाकलेला पाहिला की तो प्रकाश जणू काही चांदीच्या अंगठीत जडावलेला दिसत होता.

**त्रिशूल** हे स्व-संरक्षण आणि स्वतःचा नि इतरांचा सांभाळ करण्याचं शस्त्र आहे. त्रिशूल हा *शक्ती* (सर्जनशील ऊर्जा) मधील वाढ आणि उपचारांसाठी वापरण्याची क्षमता दर्शवतो. त्रिशूल प्राप्त करण्यापूर्वी, गुरुदेव आणि त्यांचे शिष्य इतरांना बरं करताना नकारात्मकतेला स्वतःमध्ये सामावून घ्यायचे. जेव्हा गुरुदेवांनी त्रिशूल प्राप्त केला, तेव्हा त्यांनी त्याचं आपल्या शिष्यांमध्ये वितरण केलं आणि त्यांना सांगितलं, ''तुम्हाला रोग शोषण्याची गरज नाही. कारण, तुमच्याकडे आता त्याचा सामना करण्यासाठी शक्ती आहे.''

गिलेरी सहित **शिवलिंग** हे पुलिंगी आणि स्त्रीलिंगी ऊर्जा तत्त्वांचं प्रतिनिधित्व करतं. त्यांचं हातावरील रेखाचित्र हे केवळ जाणीव नि सुप्त मनाच्या स्तरांवरच नाही, तर निश्चेष्ट स्तरांवरील द्वैतावर देखील विजय दर्शवतं. सामान्य भाषेत, ते अर्धनारीश्वर रूपाची प्राप्ती सूचित करतं. शिवलिंगाभोवती वळसा घातलेला साप हा मदत, संरक्षण आणि बचाव करण्याकरता शक्तीचा वापर करण्याच्या क्षमतेला पूरक ठरतो.

**गणपती** ही सूक्ष्म शक्ती आहे, जी पुलिंगी आणि स्त्रीलिंगी ऊर्जा तत्त्वं विलीन झाल्यावर सक्रिय होते. ज्या भूलोकावर किंवा पृथ्वीवर आपण रहातो, त्याचं धाम असणाऱ्या मूलाधार चक्रावर गणपती हा राज्य करतो. त्याच्या कृपेमुळे, कुंडलिनी ही उच्च चक्रांपर्यंत वर चढण्यात जे अडथळे येतात, ते दूर व्हायला मदत होते. परिणामी, ती सूक्ष्म विश्व आणि स्थूल विश्व या दोन्ही स्तरांवर अज्ञान कमी करते. गुरुदेवांच्या नि आमच्यापैकी काही जणांच्या हातांवर एखाद्या शिल्पासारखं अध्यारोपित केलेलं एक चतुर्थांश इंची गणपतीचं रेखाचित्र अनेकांनी पाहिलं नसतं, तर यावर विश्वास बसणं अशक्य होतं. भूलोकावर गणपतीची विशेष ताकद असते.


**नंदी** हा बैल शिवाचं वाहन  मानला जातो. शिव हा कुणातही अथवा कशातही प्रकट होऊ शकतो आणि त्याला वाहतुकीची आवश्यकता नाही. पण, नंदी हे प्रतीक खालील वैशिष्ट्यांमुळे, शिवाच्या आरोहणाचं प्रतिनिधित्व करतं.

* हे प्रतीक संरक्षण किंवा विनाश करण्याच्या शक्तीचं प्रतिनिधित्व करतं. हे सतत जागरूकता आणि सतर्कता सुध्दा सूचित करतं, तसंच, शिवाच्या सामर्थ्याचा पहारेकरी म्हणून काम करतं.

* बहुतेक मंदिरांमध्ये, नंदी हा साधारणपणे शिवलिंगासमोर बसलेला असतो. त्या स्थितीत, तो संयम, निष्क्रियता आणि अढळ भक्तीचा दाखला देतो.



## *गुरुदेवांच्या हातावर शक्ती चिन्हे*



शक्ती प्रतीकांबद्दल अधिक ऐका
podcast **The Shiv in Him**
मध्ये
www.gurudevonline.com वर

शिवाय, नंदी हा आपली शक्ती, निष्ठा आणि शरणागतीमुळे, या महान गुणांचं प्राणी स्वरूप आहे. नंदीमधील आत्मा हा उपासनेची वस्तू बनल्यानंतर, केव्हाही स्वत:चं मानवीकरण करू शकतो.

**ज्योत** ही प्रकट नि अप्रकट झालेल्या अग्नीला सूचित करते. सूर्याप्रमाणे, प्रकट किंवा स्थूल अग्नी हा दृश्य प्रकाश असतो, तर सूक्ष्म अग्नी हे बहुतेक अदृश्य असतात. जीवात्मा हा सुध्दा एक प्रकाश आहे, ज्याला उघड्या डोळ्यांनी पहाणं शक्य नसतं. तरी काही वेळा त्याचे उत्सर्जित किरण पाहिले अथवा जाणवले जाऊ शकतात.

**ज्योत** ही डाव्या हातावर एक पारदर्शक, परंतु त्वचेचा कायमचा फोड म्हणून दिसते. असं मानलं जातं की गुरुदेवांना ही शक्ती ज्वालाजी या चैतन्यपूर्ण अग्नींच्या मंदिरापासून प्राप्त झाली होती. त्याबद्दल कोणताही ज्ञात स्रोत नाही. महागुरूंचे एक शिष्य व्ही.पी.शर्माजी यांना खार येथील स्थानात सेवेत असताना, ज्योत प्राप्त झाली. एक दृश्यमान ज्योत स्थानाच्या एका खिडकीतून आत शिरली. ती जिथं शर्माजी बसले होते, तिथपर्यंत गेली आणि सर्व लोकांच्या उपस्तितीतच, त्यांच्या डाव्या हातावर विराजमान झाली.

इतर बऱ्याचा जणांना ज्योत किंवा खरं सांगायचं तर, इतर प्रतीकं इतक्या नकळतपणे मिळाली, की त्यांच्या गुरूंनी ध्वनित करेपर्यंत किंवा अनौपचारिकपणे उल्लेख करेपर्यंत, ते त्या प्राप्तींबद्दल अनभिज्ञ राहिले. ही सर्व प्रतीकं ही लाभार्थींना पात्र बनवतात. पण, जाणीवेच्या पातळीवर नाही, आणि एक गुरुदेव वगळता, आमच्यापैकी अनेकांना जाणीवेच्या पातळीवर आमच्या लाभांचं मूल्यांकन कसं करायचं हे माहीत नव्हतं. गुरुदेवांनी अनेक मार्गांनी शक्ती- प्रतीकं हस्तांतरित केली, ज्यात लोकांच्या डोक्यांवर आपला हात ठेवणं, अथवा आपण उष्टावलेलं पाणी त्यानां प्यायला देणं यांचा समावेश होतो. महागुरूंनी कोणत्याही प्रमाणित प्रक्रियेशी संबंध जोडला नाही आणि


लाभार्थीपासून हजारो मैल दूर असतानाही, ते शक्तींचं हस्तांतरण करू शकत. बहुतेक प्रसंगी, ते फक्त तशी इच्छा व्यक्त करायचे.

## मूलभूत घटकांचे समन्वय

गुरुदेव हे मूलभूत घटकांशी जोडलेले असल्यामुळे, त्या घटकांवर प्रभाव टाकण्याचं कौशल्य त्यांना प्राप्त झालं होतं. मला आठवतंय की खांडसा शेतात पिण्याचं **पाणी** मिळेल अशी अचूक जागा त्यांनी शोधून काढली होती. आम्ही सुरवातीला शेताच्या पश्चिमेला कूपनलिका (borewell) खोदली होती. परंतु, आम्हाला पिण्यास अयोग्य असं कठीण पाणी (hard water) मिळालं. गुरुदेवांनी पूर्वेला एक जागा निवडली आणि त्या ठिकाणी खोदकाम हलवण्याची सूचना केली. नवीन जागी गोड नि पिण्यायोग्य पाणी मिळालं. रेणुका इथं, त्यांनी पाण्याचा प्रवाह वहाण्यासाठी मार्ग खोदून, रखरखीत जमिनीच्या एका तुकड्याचं हिरवाईत रूपांतर केलं.

गुरुदेव हे केवळ पाणी कुठे लागेल हे सांगणारे नव्हते, तर पाण्यासाठी दैवीही होते. मुंबईत जुहूच्या समुद्रकिनाऱ्यावर जे मी पाहिलं, त्यानं या मताला पुष्टी दिली. जेव्हा गुरुदेव आणि आमच्यापैकी काहीजण क्षितिजाकडे एकटक पहात उभे होतो, तेव्हा, एक लाट खूप मोठी होऊन, कमीत कमी, तीस फूट अंतरावरून, गुरुदेवांच्या पायांना लपेटून टाकण्यासाठी पुढे झेपावली. पायांना लपेटून, ती उथळ पाण्यात हरवून गेली. आमच्यापैकी काहीजण महागुरूंच्याच रांगेत उभे होते, परंतु, लाटेची निवडक पसंती त्यांना एकट्यालाच असल्याचं दिसत होतं! दुसऱ्या एका प्रसंगी, महाबलीपुरम्च्या किनाऱ्यावर उभे असताना, गिरिजींना बंगालच्या उपसागरातून एक लाट महागुरूंच्या पायांभोवती दिमाखात येताना दिसली.

ज्या दिवशी महागुरूंचा जन्म झाला, त्या दिवशी पाऊस पडला आणि त्यांचा पावसाशी एक विचित्र संबंध होता. महागुरू हे पावसाला हवा तेव्हा पडण्याची



*गुरुदेव हे आपली एकाच वेळी दोन ठिकाणी हजर असण्याची क्षमता दाखवतात*

आज्ञा देऊ शकत किंवा त्यांच्या मर्जीनुसार तो थांबवू शकत. पावसावर महागुरूंनी नियंत्रण ठेवल्याची पुष्कळ उदाहरणं आहेत. एका गुरुपूर्णिमेला, एका शिष्यानं महागुरूंना सांगितलं, ''आपल्याला भेटण्यासाठी आपली पाळी कधी येईल याची वाट पहाणारे लोक जुलैच्या कडक उन्हामुळे थकलेत.'' हे ऐकून, गुरुदेवांनी पाऊस पडावा अशी इच्छा प्रदर्शित केली आणि जवळजवळ लगेचच पाऊस पडायला सुरवात झाली. परंतु, जिथपर्यंत रांगा लांबल्या होत्या, तिथपर्यंतच पाऊस पडला.

गुरुदेवांनी एकदा मला सांगितलं होतं की महागायत्री मंत्राची *सिध्दी* ही **अग्नी** रोखण्याची क्षमता प्रदान करते. महागुरूंचा मृत्यू होईपर्यंत, महाशिवरात्रीच्या बहुतेक रात्री, महागुरू उकळत्या लिंबू-चहात काही सेकंद आपले हात बुडवून आशीर्वाद देत असत. अशा त्वरित हात बुडवण्यामुळे, ना त्यांना कळवळलं, ना दुखापत झाली, ना नंतर फोड आला!

केवळ महागुरूंनीच निसर्गावर नियंत्रण ठेवलं असं नाही, तर त्यांच्या शिष्यांनीही ठेवलं. ज्वालामुखी येथील तरुण पप्पुजी हे मत्सरी *तांत्रिकांनी* पप्पुजींच्या दिशेनं निर्देशित केलेले आगीचे गोळे असफल झाल्यामुळे, मरणापासून वाचले. पप्पुजींनी पाहिलं की त्यांच्या मृत वडिलांनी शंभूजींनी आगीचे गोळे पप्पुजींवर आदळण्यापूर्वीच थांबवले होते.

**अंतराळ** हे गुरुदेवांच्या इतर क्षेत्रांमधील अनेक गुप्त प्रवासांचा राखणदार आहे. महागुरूंच्या **द्विस्थानीय** (एकाच वेळी दोन ठिकाणी हजर रहाणं) क्षमतेचे दोन ध्वनिमुद्रित प्रसंग आहेत. गुरगाव स्थानात गुरुदेव हे बक्षीजींबरोबर बसले असताना, जवळजवळ, त्याच वेळी, ते सुनीलजींना त्यांच्या लंडनमधील दुकानात भेटले. दुसऱ्या एका प्रसंगी, ते आपल्या कार्यालयात लोकांबरोबर संभाषण करताना दिसले आणि जवळपास, त्याच वेळी, ते आपल्या शेतात होते! नागपूरमध्ये ते एका घट्ट कुलूप लावलेल्या खोलीत फोनवर बोलताना आढळले होते, जरी ते काही मिनिटांपूर्वीच, आपल्या शिष्यांबरोबर अन्यत्र बसले होते.

**गुरुदेव हे एकाच वेळी शारीरिकरीत्या उपस्थित नि अनुपस्थित राहू शकत.** जर हे कोड्यासारखं वाटलं, तर मला ते समजावून सांगू दे. माझ्या आणि त्याचप्रमाणे, इतरांच्या अनुभवांवरून असं दिसून आलंय की जर गुरुदेवांना आपले फोटो काढून द्यायचे नसतील, तर आम्ही कितीही हुशारीनं प्रयत्न केले, तरी शटर-रिलीज बटन गोठायचं किंवा विकसित झाल्यावर रीळ रिक्त व्हायचं! महाशिवरात्रीच्या दोन दिवस अगोदर, जेव्हा एका व्यावसायिक जर्मन छायाचित्रकाराला आपल्या लेन्समध्ये गुरुदेवांना टिपायचं होतं, तेव्हा महागुरूंनी त्याला सांगितलं, ''आतापासून दोन दिवसांनी माझा फोटो काढा. आज मी इथं उपस्थित नाही.'' आपल्या फोटोग्राफीच्या कौशल्याबद्दल खात्री असलेल्या जर्मन माणसाला, वारंवार प्रयत्न केल्यावर समजलं की महाशिवरात्रीला त्यानं काढलेले फोटोच तेवढे निघाले, बाकीची रिळं मात्र कोरी होती.

**अदृश्य होणं** या एका योगाच्या क्रियेत महागुरूंनी प्रभुत्व मिळवलं होतं. ते गर्दीतून फिरू शकत आणि त्यांची इच्छा नसल्यास, त्यांना ओळखता येणं शक्य नसे. एकदा, श्रीनगरमध्ये असताना, राजपालजी नि गुरुदेव त्यांच्या जीपचा तुटलेला भाग शोधण्यासाठी एका दुकानात गेले होते. ते दुकानात शिरले तर त्यांना दुकानाचा मालक महागुरूंच्या फोटोसमोर *धूप* पेटवताना, त्यांना आदरांजली वहाताना दिसला. हे पाहून, राजपालजी आपल्या गुरूंपाशी कुजबुजले, ''या दुकानातून खरेदी करणं कठीण आहे. कारण ते एका अनुयायाचं आहे. मालक उत्पादनांसाठी शुल्क घेण्यास नकार देईल आणि आपणही त्याच्याकडून काहीही फुकट घेणार नाही.'' गुरुदेवांनी राजपालजींकडे बघितलं आणि म्हटलं, ''जर त्यांनी आपल्याला ओळखलं, तरच तो पैसे घ्यायला नकार देईल.'' खरोखर, ज्या माणसानं गुरुदेवांची पूजा केली, त्यानं गुरुदेवांना ओळखलंच नाही. त्यामुळेच, महान गुरूंनी उत्पादनं खरेदी केली. तो एक बिनधास्त, गडबड नसलेला व्यवहार होता!

उध्दवजी हे महागुरूंना आपलं अलौकिकत्व दाखवण्याकरता सतत आग्रह करत असत. महागुरू त्यांना सल्ला देत, ''महाशक्तींच्या मोहात पडू नका.

कारण, जर त्यांचं नीट व्यवस्थापन केलं नाही, तर त्या परम-आत्मिक प्रवासात लाभ ठरण्याऐवजी, आध्यात्मिक परिवर्तनासाठी मर्यादा बनू शकतात.'' अलीकडच्या वर्षांमध्ये, भोगासक्तीनं चटपटीत होण्यापेक्षा, वेळेनुसार अधिक अनुभवी झालेले उध्दवजी म्हणतात, ''तुम्ही छायाचित्रात एखादा देखावा ठेवू शकत नाही अथवा समुद्राला बाटलीत बंद करू शकत नाही. महागुरू हे खूप विशाल आणि समजायला कठीण होते. त्यांच्या एकाही शिष्याला त्यांच्या वास्तविकतेची फक्त एक झुळूक मिळण्याव्यतिरिक्त जास्त काही मिळालेलं दिसलं नाही.''

## शरीर, मन आणि त्यांपलीकडले

महागुरूंच्या चरित्रात त्यांचं इंद्रियं, भावना नि विचारांवर नियंत्रण असण्याच्या अनेक संदर्भांचा समावेश आहे. त्यामुळे, मी या विभागात, त्यांच्याबद्दल विस्तारानं लिहिणार नाही.

गुरुदेवांच्या **शरीर-मनाचा समन्वय** खूप विकसित झाला होता. ते दिवसच्या दिवस अन्नावाचून राहू शकत. याचा पुरावा महाशिवरात्रीदरम्यान मिळाला होता. गुरुदेवांचे आशीर्वाद घेण्यासाठी अभ्यागतांच्या रांगा दोन-एक दिवस चालायच्या आणि त्या सर्वांना भेटल्याशिवाय ते जेवत नसत.

गुरुदेव हे **कडाक्याच्या तापमानाचा सामना** करू शकत आणि जेव्हा आम्ही लोकरीच्या थरांमध्ये थरथर कापायचो, तेव्हा ते हलक्या, लोकरीच्या विणलेल्या जाकीटमध्ये जाऊ शकायचे.

गुरुदेव हे **आपली झोप अशा प्रकारे हाताळायचे** की जेव्हा त्यांच्या शरीराची उजवी बाजू झोपलेली असे, तेव्हा त्यांची डावी बाजू जागी असायची आणि शरीराच्या संपूर्ण कार्याचा ताबा घ्यायची आणि त्याचप्रमाणे उलट पण होतं. पेहलवानजी सांगतात, ''अधूनमधून स्कूटरवर मागच्या सीटवर बसलो

असताना, मी त्यांना डोळे मिटून स्वार होताना पाहिलंय. त्यावेळी, ते पाथमध्ये असायचे.''

गुरुदेवांची जीभ नेहमीच गोड नव्हती, पण तिखटही नव्हती. ते मितभाषी होते आणि त्यांच्याकडे बोलण्यापेक्षा खूप जास्त संवाद साधण्याची विलक्षण क्षमता होती. त्यांची स्वैर विनोदबुध्दी ही आध्यात्मिक धार लावण्याच्या साधनाप्रमाणे होती. ते आपली विनोदबुध्दी आम्हाला शिकवण्यासाठी वापरायचे का आम्हाला फटकारण्यासाठी उपयोगात आणायचे यातील फरक आम्ही सांगू शकलो नाही. आपले शब्द सत्यात उतरवण्याची क्षमता त्यांच्याकडे होती आणि मी ती संपूर्णतः प्रमाणित करू शकतो. **बोलण्याच्या क्षमतेत**, कधीही 'नाही' न म्हणण्याच्या त्यांच्या सामर्थ्याची भर पडली. अशोक भल्लाजींना त्यांच्या गुरूंनी त्यांना सांगितल्याचं आठवतं, 'नाही' हा शब्द माझ्या शब्दकोशात अस्तित्वात नाही.'' कदाचित, या कारणास्तव, महागुरू हे समस्यांच्या बाबतीत निर्भय होते, त्या कितीही गुंतागुतीच्या असल्या तरी.

गुरुदेव हे भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्याविषयी संपूर्ण ज्ञान घेऊन **कायम जागरूकतेत** राहिले. त्यांनी चंदिगड येथील *सेवादार* दास साहेब यांच्याकडे उल्लेख केल्याप्रमाणे, ''जेव्हा लोक मला भेटायला येतात, तेव्हा त्यांचा भूतकाळ, वर्तमान काळ नि भविष्यकाळ माझ्या मनातल्या पडद्यावर अचानक चमकतो. ते श्रध्देनं आले आहेत का फक्त गंमत म्हणून आले आहेत, हे सुध्दा मी सांगू शकतो.'' गुरुदेवांनी नियतीवर आणि वेळेवर अवर्णनीय पकड दाखवली, ते लोकांची कर्मं संपुष्टात आणू शकत, त्यांचे संस्कार बदलू शकत, या आयुष्यातील बँकेत असलेल्या रकमेत भर घालण्यासाठी त्यांच्या भावी जन्मातील काही वर्षं काढून घेऊ शकत, इत्यादी इत्यादी.

जेव्हा त्यांनी गंगेत आपल्या *सिध्दींचा* त्याग केला, तेव्हा ते महागुरूंच्या दर्जाला पोहोचले आणि ज्या शक्तींचं त्यांनी प्रतिनिधित्व केलं, त्यांचं ते प्रकटीकरण बनले.

**आध्यात्मिक प्रभुत्व**

महागुरूंचं आध्यात्मिक क्षेत्राचं ज्ञान अतुलनीय होतं. ते सर्वोच्च लोकांमधील एक किंवा त्याहून पलीकडे असणाऱ्या लोकांमधील एक पारंगत अध्यात्मवादी असल्यामुळे, त्यांचं आत्म्यांच्या जगावर प्रभुत्व होतं आणि ते आत्म्यांना अनेक मार्गांनी मदत करू शकत. आत्म्यांना खालच्या क्षेत्रामधून बाहेर काढण्याची आणि वरच्या क्षेत्रांमध्ये नेण्याची शक्ती महागुरूंकडे होती. महागुरूंनी ठरवलं तर, ते आत्म्यांना पृथ्वीवर जन्म देऊ शकत, जेणेकरून, ते आत्मे आध्यात्मिक दृष्ट्या परिपक्व होण्यासाठी आपल्या मानवी स्वरूपाचा उपयोग करू शकत. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, महागुरूंनी आत्म्यांना त्यांच्या मानवी स्वरूपात त्यांच्या खऱ्या परम-आत्मिक स्वरूपाच्या जवळ गुरुत्वाकर्षणानं ओढलं जाण्यासाठी मदत केली.

गुरुदेव हे इच्छेनुसार, **शरीराबाहेर** सूक्ष्म शरीरानं **प्रवास** करू शकत. ते आठवड्यातून चार ते पाच दिवस, एका वेळी दोन ते सहा अथवा सात तासांच्या कालावधीसाठी अंतराळात प्रवास करू शकत. त्यांनी आम्हाला त्यांच्या काही अवकाशातील सूक्ष्म प्रवासांवर नेलं. अशा अनेक अनुभवांपैकी, मला स्पष्टपणे आठवतंय की त्यांनी मला पॅरीसमधील एका पुलावर नेलं आणि दुसऱ्या वेळी, मला त्यांच्या आणि जिचा ते आदर करायचे, अशा एका व्यक्तीच्या बाजूला तराफ्यावर बसवलं.

गुरुदेव **वेगवेगळ्या ग्रहांवर खूप दूरचा प्रवास** करू शकत. त्यामुळेच, त्यांच्या शरीराबाहेरील सूक्ष्म शरीरानं घेतलेल्या काही अनुभवांना तास लागायचे. एका रात्री, पाथावर जाण्यापूर्वी ते मला म्हणाले, ''मी तुला ब्रह्मांडाच्या प्रवासाला घेऊन जाईन.'' ब्रह्मांड म्हणजे काही चंद्रावर जाऊन परत येणं असा अर्थ नव्हता. ती होती आकाशगंगा. त्यांनी प्रस्ताव दिला. परंतु, मी गोंधळलो. त्या रात्री मी झोपलो असताना, पुरणजी मला सांगायला आले की गुरुदेव

मला बोलावतायत. माझ्याशी बोलत असलेल्या पुरणजींचं हे सूक्ष्म रूप आहे आणि मला त्यांच्याबरोबर सूक्ष्म रूपानं जायचंय, हे लक्षात येण्याऐवजी, मी भौतिक शरीरानं जागा झालो आणि गुरुदेवांच्या खोलीत गेलो नि मला एवढंच लक्षात आलं की, गुरुदेवांचा देह तिथंच पडून होता. परंतु, ते निघून गेले होते. पुरणजी, त्यांच्या भौतिक रूपात, गुरुदेवांच्या बिछान्याशेजारी बसून, गुरुदेवांचे पाय दाबत होते. ते जसं असेल, तसं असो, सुरिंदर कौशलजींना आपण एका सूक्ष्म मोहिमेवर गेल्याचं आठवतं, ज्यामध्ये महागुरूंनी त्यांना एक एक करून सर्व ग्रहांना स्पर्श करायला लावला.

गुरुदेवांनी आपल्याला, अमितचंदजींना आणि बक्षीजींना सूक्ष्म क्षेत्रांचं दिशादर्शन कसं शिकवलं होतं हे संतलालजींना आठवतं. गुरुदेवांनी त्यांना प्रवासाला नेलं आणि सांगितलं, ''तुम्ही आपापल्या घरी जा. परंतु, आपल्या कुटुंबियांशी बोलू नका आणि पहाट होण्यापूर्वी आपल्या देहांमध्ये परत जा.'' संतलालजी नि बक्षीजी तर परत आले, मात्र, अमितचंदजी आपला रस्ता चुकले. तेव्हा, त्यांना महागुरूंनी परत आणलं.

गुरुदेव हे त्यांच्या सूक्ष्म प्रवासात असताना, एखाद्या आपत्काली, गुरुदेवांच्या शारीरिक हस्तक्षेपाची जर गरज भासली, तर केवळ माताजीच गुरुदेवांना त्यांच्या भौतिक रूपात परत आणू शकत. त्यांनी तिला आपल्या दोन्ही पायांची बोटं एकत्र कशी ठेवायची आणि पाय कसे ओढायचे हे शिकवलं होतं. ते म्हणाले होते, ''मी कुठे प्रवास केलाय, त्यानुसार, मला परत यायला कमी-जास्त वेळ लागू शकतो.''

महागुरू हे आपलं **सूक्ष्म स्वरूप सेवेत तैनात** करू शकत होते आणि त्यांनी तसं केलं. शरीराबाहेर सूक्ष्म शरीराच्या अनुभवांव्यतिरिक्त, महागुरूंनी आम्हाला दृष्टांतांमध्ये आणि स्वप्नांमध्ये संदेश दिले, आम्हाला बरं केलं आणि आम्हाला इतरांना बरं करायला लावलं, आमचं भविष्य दाखवलं, आमचा भूतकाळ उघड

केला आणि आम्हाला पवित्र तीर्थक्षेत्रांना आणि संतांच्या सभांना घेऊन गेले. आमच्या बाबतीत ज्या प्रतिकूल घटना शारीरिक रीत्या संभवणाऱ्या होत्या, त्या गुरुदेव स्वप्नावस्थेत घडवू शकले आणि त्यायोगे, त्या घटनांची कधीही शारीरिक रीत्या घडण्याची शक्यता नाहीशी केली. थोडक्यात, ते लोकांची कर्मं त्यांच्या भौतिक अवस्थेऐवजी, स्वप्नावस्थेतच संपवू शकत.

गुरुदेवांनी सजीव रूपांचा संयुक्तपणे सेवा करण्यासाठी, **प्रगत नि सामर्थ्यशाली स्वतंत्र अस्तित्वांशी युती** केली. भृगू संहितेत गुरुदेवांच्या अश्विनीकुमारांबरोबरच्या युतीचा उल्लेख येतो. शिर्डीचे साई, गुरू नानक, गुरू गोबिंद सिंग, गुरू वसिष्ठ, परशुरामजी, भगवान कृष्ण, दत्तात्रेय, गणपती आाणि हनुमानजी, काही मुस्लीम संत, शिव नि महाकाली, लक्ष्मी, सरस्वती नि रेणुका अशा देवींची अनेक प्रकटीकरणं अशी काही त्यांच्या आध्यात्मिक सहकाऱ्यांची नावं आहेत. महागुरूंचे गुरू म्हणून बुढ्ढे बाबांचं योगदान अपरिमेय राहिलंय.

एकाच वेळी अनेक लोकांच्या समस्या सोडवण्याकरता, गुरुदेवांनी अनेक निर्माण काया किंवा सूक्ष्म ऊर्जा शरीरं विकसित केली होती. त्यांच्या अनेक शिष्यांच्याही निर्माण काया आहेत. मला माझ्या निर्माण कायेची जागरूक जाणीव नाही. पण, ती निर्माण काया लोकांच्या स्वप्नांमध्ये प्रकट झाल्ये, तिनं त्यांना बरं केलंय, त्यांच्या समस्यांवर उत्तरं दिल्येत आणि कधी कधी, मी यापूर्वी न ऐकलेले मंत्र सुध्दा दिलेत.

या जगाचा निरोप घेण्यापूर्वी, महागुरूंनी नजफगड इथं त्यांच्या समाधीचं बांधकाम सुरू केलं. महागुरूंच्या मृत्यूनंतरच्या दशकांमध्ये, काही भक्तांना, तिथं महागुरू, त्यांच्या इच्छेनुसार वारंवार जरी नाही, तरी दिसलेत.

## आच्छादनाचा त्याग!

महागुरूंचा आपल्या अलौकिक क्षमता आच्छादित करून ठेवण्यावर विश्वास होता. त्यांनी साधेपणा आणि नम्रतेनं युक्त असं मानवी भाग्य स्वीकारलं आणि आपल्या नशीबाचं नाटक करण्यासाठी एक साधीसुधी संहिता निवडली.

महागुरूंच्या सुरात सूर मिसळत, मी त्यांचे चित्तथरारक चमत्कार अधोरेखित करणं पसंत केलंय, जेणेकरून, तुम्ही तुमच्या जीवनाच्या ‘आध्यात्मिक परिवर्तनाची क्रिया आणि सक्षमता’ या मूळ कथावस्तूपासून विचलित होणार नाही. महागुरूंनी आपल्याकडे असलेली सर्व शक्ती त्या सेवेत वापरली. परंतु, तुमच्या दृष्टिकोनानुसार, तुम्ही (त्यांना) एकतर एक सामान्य माणूस म्हणून पाहिलंय किंवा असामान्य महागुरू म्हणून पाहिलंय.

वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी, बहुतेक पुरुष जेव्हा त्यांच्या पेरण्यांचे फायदे घेण्याकरता त्यांच्या लाभांश वर्षांमध्ये प्रवेश करतात, तेव्हा, गुरुदेवांनी आपल्या दिव्य धामाकडे घाईघाईनं निघून जाणं पसंत केलं. तोपर्यंत, महागुरूंनी मागील ५०० वर्षांतील आपले शिष्य गोळा केले होते, त्यांना शिव-परिवाराच्या प्रतिष्ठित शक्ती प्रदान केल्या होत्या आणि त्यांना सिध्द गुरू म्हणून उन्नत केलं होतं. शिष्यांचं आध्यात्मिक संयोजन म्हणजे त्यांची पूर्वनियोजित योजना होती, जणू काही त्यांनी नशिबाच्या ‘प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करा’ (ट्रेन द ट्रेनर्स) या अभ्यासक्रमात, शिष्यांची जवळजवळ नोंदणी केली होती!

महागुरूंचं अलौकिकत्व त्यांच्या नशिबानं सीमित झालं नव्हतं, मात्र, त्यांनी आपलं अलौकिकत्व व्यक्त करण्याकरता आपलं नशीब मर्यादित करणं पसंत केलं. त्यांची अमर्यादता जगभरातील त्यांच्या स्थानांमध्ये नि नजफगड येथील त्यांच्या समाधीच्या ठिकाणी अजूनही जाणवते.

**अदृश्य मानव अजूनही एक दृश्य शक्ती आहे.**

# ०८

# उल्लेखनीय व्यक्तींची ओळख -निर्देशिका

*‘उल्लेखनीय व्यक्तींची ओळख-निर्देशिका’ हे एक पंचांग आहे प्रख्यात स्वभावाच्या, विविध पार्श्वभूमीच्या लोकांविषयी, जे महागुरूंच्या आधिपत्याखाली, उत्कृष्ट संत बनण्याकरता फिनिक्ससारखे उठले ते जरी महागुरूंच्या कामगिरीचा भाग बनण्यासाठी, उच्च लोकांमधून पृथ्वीवर एकत्र आले होते.*

*या पुस्तकात निर्दिष्ट झालेल्या सर्वांची मूळाक्षरांनुसार यादी केल्ये. हेतू हा आहे की त्या सर्वांच्या कथांच्या पलीकडे, तुम्हाला त्यांची ओळख व्हावी.*

**ए (अ)**

**अभय तनेजा** हे एक साक्षात योगी आहेत. त्यांनी सुमारे १०० वर्षं आत्म्याच्या रूपात महागुरूंची आपल्याला मानवी जन्म देण्याकरता प्रतीक्षा केली होती. व्यवसायानं हॉटेल मालक आणि स्वेच्छेनं, सॉकर चाहता असलेल्या या व्यक्तीचा आध्यात्मिक कल हळूहळू समोर येतोय.

**अमितचंदजींनी** कोटला येथील एका स्थानाची देखरेख केली. ते सभ्यतेचे प्रतीक होते आणि त्यांनी अनेक लोकांची उत्कटतेनं सेवा केली. विशिष्ट मुद्रेत झोपण्याची त्यांची आवड ही त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण विशेषांपैकी एक होती. मुस्लीम ज्या स्थितीत नमाज करतो, त्याच स्थितीत ते झोपायचे. जेव्हा मी त्यांना त्याबद्दल विचारलं, तेव्हा ते हसले आणि त्यांनी बिनधास्तपणे स्पष्टीकरण दिलं की त्यांनी ही सवय लहानपणीच लावून घेतली होती.

**अलकाजी** या गुरुदेवांच्या सर्वात धाकट्या कन्या. साध्या पण आनंदी. विनोदाच्या कलेतील त्यांच्या प्रावीण्यामुळे त्यांच्या सहवासात रहाणं एक आनंददायी बाब असते.

**अशोक भल्लाजी** हे तपशिलाकडे कटाक्षानं लक्ष देणारे एक चतुर व्यापारी आहेत. आपल्या तारुण्याच्या दिवसांमध्ये, ते रागाच्या तीव्र झटक्यांना बळी पडायचे. तरीही, महागुरूंच्या चिकाटीनं त्यांना शांत, शांति-प्रिय आध्यात्मिक ब्रिगेडियर (कर्नलच्या वरचा परंतु मेजर जनरलपेक्षा कनिष्ठ असा सेनाधिकारी) म्हणून घडवलं.

**आनंद पराशरजी** हे कार्यालयात गुरुदेवांचे कनिष्ठ होते. त्यांनी आपल्या कार्यालयात नि शिबिरांमध्ये महागुरूंचं निरीक्षण केलं. कालांतरानं, ते महागुरूंचे निस्सीम भक्त बनले. जेव्हा आम्ही त्यांची मुलाखत घेतली, तेव्हा, त्यांचे डोळे भूतकाळातील आठवणींच्या ओढीनं भरून आले.

**बी (ब)**

**बग्गा साहेबांनी** आपल्या पत्नीच्या सक्रिय पाठिंब्याच्या जोरावर हमीरपूर इथं एका स्थानाचं व्यवस्थापन केलं. वयस्कर माणसाच्या वेषातील अघोरीला बग्गा साहेब ओळखू शकले नाहीत. म्हणून, गुरुदेवांच्या एका परीक्षेत ते

अयशस्वी झाले. या त्यांच्या कहाणीनं, त्यांचं नाव महागुरूंच्या शिष्यांमध्ये संस्मरणीय बनवलं. महागुरूंना खळखळून हसवणारी ती घटना वगळता, बग्गा साहेब हे निर्मळ मनाचे प्रामाणिक *सेवादार* होते.

**बलजीतजींनी** अध्यात्माचा पाठपुरावा करण्यासाठी आपला वेळ, आपले श्रम आणि आपल्या संपत्ती यांची आहुती दिली आहे. गुरगाव सेक्टर १० इथं नीलकंठ धाम आणि स्थान बांधण्यासाठी बलजीतजी कारणीभूत आहेत. ते अत्यंत तत्त्वनिष्ठ आहेत. रोज पहाटे ५.३० वाजता ते स्थानात दिया प्रज्वलित करायला जातात. आजच्या वेगवान जगात, भक्तीच्या शिस्तीचं पालन करणं सोपं नाही, पण, थोर मनाच्या बलजीतजींना हे कार्य अतिशय सहज आणि सोपं वाटतं.

**बक्षीजी** हे सिमला स्थानाची देखरेख करतात. ते हिमाचल प्रदेश मंत्रालयाचे माजी कर्मचारी असून, त्यांनी चार दशकांहून अधिक काळ लोकांची सेवा केली आहे. ते बुध्दिमान असून, त्यांची संभाषण शैली आकर्षक आहे. त्यांचा प्रभाव सिमला आणि आसपासच्या अनेक गावांमध्ये वृध्दिंगत झालाय.

**बिट्टुजी** हे चौदा वर्षांचे असताना गुरुदेवांना भेटले आणि अखेरीस, त्यांनी आपल्या मर्जीनं, स्थानाच्या कारभाराला मदत केली. त्यांच्या कौशल्यामुळे, गुरगावमध्ये मुक्कामादरम्यान, गर्दीची व्यवस्था चांगली आणि आरामदायक असण्याची खात्री असायची.

सुस्वभावी **बिमलाजी** या गुरुदेवांच्या मोठ्या भगिनी होत्या. त्यांच्या बालपणी, त्या गुरुदेवांबरोबर कडक असायच्या. त्या गुरुदेवांच्या खोडकर कृत्यांकडे सतत लक्ष देत असत. त्या बऱ्याचदा गुरुदेवांच्या विनोदांचा विषय व्हायच्या, पण, गुरुदेवांप्रमाणेच, त्यांच्याकडे विनोदाची विलक्षण जाण होती.

**बिल्लुजी** हे गुरुदेवांना जेव्हा भेटले, तेव्हा ते निर्ढावलेले मद्यपी होते. प्रामाणिक प्रयत्न करूनही, ते दारू सोडू शकले नाहीत. तरीही, महागुरू त्यांच्यावर खूप प्रेम करायचे आणि त्यांना सरळ मार्गावर चालायला लावण्यासाठी महागुरूंनी कोणतीही कसर सोडली नाही. बिल्लुजींना आपले गुरू हयात असताना जे करता आलं नाही, ते त्यांनी महागुरूंच्या मृत्यूनंतर करून दाखवलं. आज ते दारूला किंवा मादक पेयांना स्पर्शही करत नाहीत. आपल्या परिवर्तनाचं श्रेय ते आपल्या गुरूंच्या कृपेला देतात. जर दारू ही बिअरच्या बरोबरीची असेल, तर बिल्लुजींनी गुरुदेवांच्या मृत्यूनंतर कदाचित १८००० किंवा त्याहून अधिक बाटल्यांचा त्याग केला असावा.

**भगत रामजी** हे गुरुदेवांचे वडील होते. ते एक चांगल्या मनाचे माणूस होते. रसायनांचा व्यापारी म्हणून ते काम करायचे आणि व्यावसायिकरीत्या ते अंशत: यशस्वी झाले.

**सी (च)**

**चंद्रमणी वसिष्ठ** यांनी रेणुकातील स्थानाचं व्यवस्थापन सांभाळलं. ते स्थानिक राजकारणी असून, गुरुदेव नि परशुरामजी यांचे शिष्य होते. त्यांचं व्यक्तिमत्त्व शक्तिशाली होतं. त्यांनी रेणुका येथील मंदिरांमध्ये पुष्कळ सुधारणा केल्या, तसंच, अनेकांना अध्यात्माची ओळख सुध्दा करून दिली.

**चरणसिंगजी** हे गुरुदेवांच्या काळात राधा स्वामी सत्संग ब्यासाचे प्रमुख होते. ते निपुण अध्यात्मवादी होते. एक-दोन प्रसंगी, त्यांच्या पत्नीनं वैयक्तिक बाबींसंदर्भात महागुरूंचा सल्ला घेतला होता.

**चाचाजी** हे गुरुदेवांचे धाकटे भाऊ होते. ते सतीशजी म्हणूनही ओळखले जायचे. चाचा हे देखणे, गोड स्वभावाचे असून, त्यांच्याकडे आकर्षक विनोदी

बुध्दी होती. त्यांना आपल्या मोठ्या भावाच्या आध्यात्मिक उंचीचं आश्चर्य वाटायचं. काही लोकच करू शकतील, अशा प्रकारच्या सेवेत चाचा गुंतलेले होते. शक्तिशाली तांत्रिक आणि काळी जादू करणाऱ्यांनी चाचांवर वारंवार हल्ले केले. पण, चाचांचा दृष्टिकोन तटस्थ होता आणि ते बहुधा आपल्याच जगात हरवलेले असत. त्यामुळे ते त्या प्रयत्नांतून वाचले, जणू काही घडलंच नाही, आणि त्यांचे हल्लेखोर अगदी सहज पडले!

**चाचीजी** किंवा स्नेहलताजी या सतीशजींच्या पत्नी आहेत. त्या गुरुदेवांनी बांधलेल्या मंदिराची आणि स्थानाची व्यवस्था बघतात.

**डी (द)**

**दास साहेब** हे माजी वकील असून, लोकसेवेसाठी अत्यंत कटिबध्द आहेत. ते चंदिगड आणि अंबाला इथं सेवा देतात.

**द्वारकानाथजी** हे गुरुदेवांचे घरमालक नि मित्र होते. गुरुदेव आणि नागपालजी यांच्याबरोबर ते सुमारे पाच वर्षं १ २ ० चौरस फुटाच्या खोलीत एकत्र राहिले. त्यांची गुरुदेवांबद्दलची धारणा गुरुदेवांना एक भाडेकरू म्हणून पहाण्यापासून ते त्यांची एक गुरू म्हणून पूजा करण्यापर्यंत बदलली. असा बदल करणं सोपं नाही. पण, त्यांनी तो अतिशय कौशल्यानं केला.

**डॉ. शंकरनारायण** हे गुरुदेवांच्या सहकाऱ्यांपैकी एक होते. त्यांनी आणि गुरुदेवांनी सहकारी म्हणून आनंदानं एकत्र वेळ घालवला. एक शिष्य म्हणून, डॉ. शंकर नारायण यांनी स्थानाच्या सामुदायिक स्वयंपाकघराची देखरेख केली नि त्याचं स्तुत्यपणे व्यवस्थापन केलं. त्यांनी बंगलोरमध्ये काही दशकं एक स्थान चालवलं.

**एफ (फ)**

**एफ.सी.शर्माजी** हे गुरुदेवांचे एक सौम्य स्वभाव असलेले सहकारी होते. ते लवकरच, गुरुदेवांच्या ज्येष्ठ शिष्यांच्या संघात सामील झाले. ते साधी रहाणी आणि उच्च विचारसरणीचा उत्कृष्ट नमुना होते. शेवटच्या श्वासापर्यंत, ते सेवेत मग्न होते. पण, त्यांनी त्याचं ना प्रदर्शन केलं अथवा ना श्रेय घेतलं. त्यांनी त्यांच्या वागण्याच्या पध्दतीतून मला नम्रतेचं मूल्य शिकवलं.

**जी (ग)**

**गग्गुजी** हे गुरुदेवांचे भाचे. लोक त्यांच्याकडे सहज आकृष्ट व्हायचे. कारण, ते अतिशय सहृदयी आणि उदार माणूस होते.

पण म्हणून काही, याचा अर्थ त्यांच्यात खोडकरपणा नव्हता असं नाही. ते महागुरूंनाही चिडवायचे. त्यांचा 'अंकलजी' (मामा) असा उल्लेख करायचे. त्यांची महागुरूंना धमकावण्याची प्रवृत्ती काही कमी झाली नाही. त्यांची आई बिमलाजी या गुरुदेवांच्या मोठ्या भगिनी होत्या.

**गिरीजींनी** महागुरूंसमवेत पुष्कळ वर्षं घालवल्यामुळे, त्यांचं आयुष्य नि त्यांची संभाषणं ही प्रामुख्यानं महागुरूंभोवती केंद्रित आहेत. ते मूळचे मुंबईचे असून, सेक्टर ७ जवळ मोहम्मदपूर इथं त्यांचं शेत आहे. तिथं ते गुरं पाळतात. गुरुदेवांच्या हयातीत, गिरिजींच्या शेतातील माल लंगर मध्ये वापरला जायचा.

**गुड्डुनजी** या सुरुवातीला एक रुग्ण म्हणून आल्या आणि त्यानंतर गुरुदेवांच्या शिष्या बनल्या. १९७४ पासून, त्यांनी आपला भाऊ सुरेंदरजी यांच्यासमवेत कानपूरमधील स्थानाचं सह-व्यवस्थापन केलंय. ढोंग किंवा अभिमान ही वैशिष्ट्यं गुड्डुनजींना लावता येत नाहीत. या बहिण-भावाच्या जोडीसाठी 'धन्य

आहेत नम्र, कारण त्यांना पृथ्वीचं वतन मिळेल’ हे काव्यवचन विशेषकरून समर्पक आहे.

हिमाचल प्रदेशातील परवाणू इथं एक स्थान चालवणारे **गुप्ताजी** यांनी स्वत:साठी कडे वाला *महात्मा* म्हणून टोपणनाव कमावलंय. प्रत्येक बड्या गुरुवारी, अजिबात विराम न घेता, ते सकाळ ते रात्रीपर्यंत लांबच लांब रांगा लावलेल्या लोकांची सेवा करतात. ते जवळजवळ चाळीस वर्षं सेवेशी निगडीत आहेत. तरीही त्यांचा उत्साह कालांतरानं कमी झालेला नाहीये.

**एच (ह)**

**हरिबाबू गुप्ता** हे गुप्ताजी या नावांनही ओळखले जातात. ते आपल्या चहा आणि ज्यूसच्या स्टॉलसाठी प्रसिध्द आहेत. गुरुदेव कामावर असताना, हरिबाबूंचा स्टॉल हा महागुरूंना भेटण्यासाठी वाट पहाणाऱ्या भक्तांकरता नि शिष्यांकरता एकत्र येण्याचं ठिकाण होतं. गुरुदेवांचे पलायनातील साहाय्यक म्हणून, ते हातात हेल्मेट आणि गतिमान स्कूटर यांच्या साहाय्यानं महागुरूंना गर्दीतून वाचवायचे. खूप वर्षांनंतर, गुरुदेवांच्या कामाच्या शेवटच्या दिवशी, गुरुदेवांनी आपलं ओळखपत्र गुप्ताजींना दिलं. ते गुप्ताजींनी स्मृतिचिन्ह म्हणून जपून ठेवलंय.

**हरीशजी** हे महागुरूंच्या हरियाणा या मूळगावातील एक शिष्य आहेत. ते (होशियारपूरपासून १६-१७ किलोमीटर अंतरावर असलेल्या) या नगरातील भक्तांची मेहनत नि तडफदारपणानं तीन दशकांहून अधिक काळ सेवा करत आलेत.

**आय (इ)**

**इंदुजी** या सामान्य स्त्री नव्हत्या. त्या शेवटच्या श्वासापर्यंत सेवेला समर्पित झाल्या होत्या. आमच्यापैकी जे त्यांना ओळखायचे, त्या सगळ्यांचा विश्वास आहे की त्या एक संत होत्या. त्यांची काळजी घेण्याची मनोवृत्ती, दुसऱ्यांना देण्याची इच्छा आणि हसतमुखानं सेवा करण्याची क्षमता यांबद्दल मला सर्वात जास्त आदर आहे.

**इलाजी** या गुरुदेवांच्या दुसऱ्या कन्या आहेत. त्यांनाही आपल्या वडिलांच्या विनोदबुध्दीचा वारसा लाभलाय. त्यांना मौज-मस्ती करायला आवडतं. त्यांच्या डोळ्यांत एक खोडकर चमक आहे.

**जे (ज)**

बडे जैन साहेब म्हणूनही ओळखले जाणारे **जैन साहेब** हे असामान्य नशीब असलेले एक विलक्षण पुरुष होते. सुरुवातीला ते कार्यालयातील कामामुळे गुरुदेवांचे मित्र झाले होते. त्यांनी गुरुदेवांबरोबर पुष्कळ वेळ व्यतीत केला. ते दोघं एकत्र चित्रपट बघायला जायचे नि जेवण करायचे. जैन साहेबांना हळूहळू, गुरुदेव एक आध्यात्मिक पुरुष असल्याचं जाणवलं आणि ते गुरुदेवांचे शिष्य बनले. खास करून, ते अध्यात्माचं वेड असलेला शिष्य झाले आणि लवकरच, महागुरूंच्या सर्वात शक्तिशाली साधकांपैकी एक बनले. तथापि नशीबानं त्यांना वाईट हात दाखवला आणि ते काहीसे धर्मद्रोही बनले. जेव्हा त्यांच्या मनानं त्यांचं स्वत:चं नि गुरूंचं वास्तव स्वीकारण्यास नकार दिला, तेव्हा त्यांचा आध्यात्मिक प्रवास अचानक थांबला. मला वाटतं की महागुरूंच्या कृपेमुळे लाभलेल्या शक्तीनं, महागुरूंना शरण जायला कारणीभूत न बनता, जैन साहेबांचा अहंकार फुगवला नि त्यांच्या मनावर प्रभाव पाडला. अर्थात, गुरुदेवांनी सरतेशेवटी त्यांना माफ केलं. परंतु, जैनसाहेबांनी स्वत:ला माफ

केलं का? तरीही, ते एक चांगला माणूस होते आणि माझ्यासाठी एक जुना मित्र. त्यांच्या घरातील शंकराच्या चिनी मातीच्या मूर्तीतून प्रकट झालेल्या शिवरूपाचं दर्शन  हा त्यांच्या जीवनातील एक उच्च बिंदू होता.

**के (क)**

**कुंदनलाल सहानीजी** हे द्वारकानाथजींच्या शेजारी रहायचे. त्यांना गुरुदेवांसमवेत वेळ घालवायला आवडायचा. ते पुढे गुरुदेवांचे भक्त बनले.

**कुलबीर सेठीजी** ऊर्फ पापाजी हे गुरुदेवांचे मुंबईतील पहिले शिष्य होते. त्यांना शहरातील पहिल्या स्थानाचे प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आलं होतं. मुंबईतील इतर सर्व स्थानं ही या स्थानाच्या शाखा आहेत. गुरुदेवांनी कुलबीर सेठींच्या धाकट्या भावाला यशला चमत्कारिक रीत्या बरं केलं. स्ट्रेचरवर पडून रहाणं ते पायऱ्या चढण्यापर्यंतची मजल गाठण्यात यशनं आपली ८० टक्के ताकद परत मिळवली. नामवंत वैद्यकीय संस्थांनी यशच्या बाबतीत हात टेकले असले तरी, महागुरूंनी टेकले नाहीत.

**क्वात्राजी** हे गुरगावमध्ये महागुरूंचे शेजारी होते. त्यांचं मन सहजासहजी वळायचं नाही. गुरुदेवांचं माहात्म्य कळल्यावर मात्र, ते दररोज स्थानाला भेट देऊ लागले. गुरगावमधील माझ्या वास्तव्यामध्ये, मी त्यांना दररोज सकाळी कारखान्यात जाण्यापूर्वी, न चुकता स्थानात पहायचो. ते एक अनुकरणीय भक्त होते.

**म (एम)**

**मल्होत्राजी** ऊर्फ आर.सी.मल्होत्राजी हे गुरुदेवांचे पहिले शिष्य होते. त्यांच्या नात्याची सुरवात कार्यालयीन ओळखीपासून झाली. ते नातं मित्र म्हणून प्रगत

झालं आणि शेवटी, अध्यात्मावर पुष्कळ चर्चा करणाऱ्या लोकांमध्ये विकसित झालं. मल्होत्राजी जितके आपल्या *गुरुभाईंशी* एकनिष्ठ होते, तितके ते गुरुदेवांशी नव्हते आणि आपल्या *गुरुभाईंना* भेटावं नि त्यांच्याबरोबर अधिक वेळ घालवावा याकरता, ते जवळजवळ नेहमीच गुरुदेवांशी लढले. विनोदानं सांगायचं झालं तर, मल्होत्राजींनी गुरुदेवांच्या शिष्यांसाठी नि भक्तांसाठी संघप्रमुख म्हणून काम केलं. ते मल्होत्राजींचा छोटे गुरुजी म्हणून प्रेमानं उल्लेख करायचे.

**माताजी** या गुरुदेवांच्या पत्नी होत्या. त्यांचे पती हे निव्वळ त्यांच्यासाठी अभिमान वाटावा अशी गोष्ट नव्हते, तर त्यांच्या वादाचा प्राथमिक स्रोत सुध्दा होते. तो माणूस माताजींना जेमतेम झोपू द्यायचा! अधूनधून, माताजींना गोंगाट करणाऱ्या खोलीत झोपावं लागायचं. कारण, त्यांचे पती आपल्या शिष्यांशी खूप उशीरापर्यंत बोलत असायचे. वारंवार, महागुरू माताजींना मध्यरात्री आपल्यासाठी चहा तयार करण्याकरता उठवत असत. त्यांच्या सहचर्यामुळे, माताजींना गुरुदेवांच्या शिष्यांची काळजी घेण्यात मदत करणं आवश्यक होतं. त्यामुळे, त्यांना स्वत:साठी खूप कमी किंवा अजिबात वेळ मिळायचा नाही. दिवसा, त्या गुरगावमधील सरकारी शाळेत शिकवायच्या. दिवसाचे किमान अठरा तास कामात आणि सेवेत असल्यामुळे त्यांना बसायलाही फुरसत नसायची. त्यांचं आत्मत्याग हा त्यांच्या संपूर्ण आयुष्याचं एक वैशिष्ट्यपूर्ण चिन्ह होतं. ते अविश्वसनीय होतं. अशी पत्नी कल्पनेच्या बाहेर अस्तित्वात नसते! माताजी मात्र सच्च्या होत्या आणि हे खरोखर घडलं.

**मोहन सिंग चिराजी** हे जरी वास्तवात असले, तरी काल्पनिक लुका ब्रासीसारखे होते. गुरुदेवांनी त्यांचा उपयोग जोखमीच्या आध्यात्मिक कार्यासाठी केला. जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्या कुटुंबाला दुखवायची किंवा मारण्याची इच्छा असणाऱ्या नकारात्मक आत्म्यांच्या प्रभावाखाली असायची, तेव्हा, त्या आत्म्यांना दूर ठेवण्यासाठी मोहन सिंग चिराजी यांना नियुक्त केलं जायचं आणि हे काम कधीही सोपं नसायचं! माझे ते गुरगावमधील पहिले

मित्र होते. मी त्यांच्याबरोबर खूप वेळ घालवला. त्यांनी मला अनेक युक्त्या शिकवल्या. ते गुरुदेवांच्या शिष्यांसाठी लिटमस टेस्ट होते. कारण, ते उध्दट नि असभ्य होते नि अजिबात मुत्सद्दीही नव्हते.

**एन (न)**

**नरेंदरजी** हे एक नोकरशहा होते. ते त्यांचा मोठा भाऊ विरेंदरजी यांच्या बरोबर स्थानात नेहमी येत असत. गुरुदेवांना ते खूप आवडायचे. नरेंदरजींनी स्वत:ला सेवेकरता सतत वाहून घेतलंय. दरवर्षी, ते आपल्या गुरूंच्या सन्मानार्थ रुद्र अभिषेक *यग्य* (यज्ञ) करतात.

**नागपालजी** यांचं पूर्ण नाव कुंदनपाल नागपाल होतं. ते गुरुदेवांचे सहनिवासी, माती सर्वेक्षण विभागातील सहकारी आणि गुरुदेवांच्या शिबिरातले सहकारी होते. तथापि, ते तक्रार विभागाच्या उपाध्यक्षासारखे आणि जवळजवळ सर्वच गोष्टींबद्दलच्या दृष्टिकोनातून, 'मला तुमच्यासाठी तुमचं काम करू द्या' या विभागातील महाव्यवस्थापकासारखे होते. महागुरू हे नागपालजींशी व्यवहार करताना मुत्सद्दी होते, परंतु, त्यांच्या प्रयत्नांबद्दल आनंदी नि प्रसन्न होते.

**निक्कुजी** हे माताजींचे भाचे होते. गुरुदेवांनी त्यांचं लुधियाना येथील त्यांच्या कौटुंबिक घरातून जवळजवळ अपहरण केलं होतं. निक्कुजी स्थानात एक दशक किंवा त्याहून अधिक काळ राहिले. त्यांनी अविश्वसनीय प्रामाणिकपणा, विनोदबुध्दी आणि पुष्कळ खोड्यांच्या साहाय्यानं सेवा केली.

**पी (प)**

**पप्पुजी** हे गुरगावमध्ये कायमचे स्थायिक झालेले दिसत होते. ते तिथं वर्षानुवर्षं राहिले आणि निक्कु, गग्गु नि ते स्वत: असे हे तीन बाहुबली गुरुदेव आणि त्यांचे शिष्य यांच्याकडे लक्ष पुरवायचे नि महत्त्वाच्या दिवशी घडणाऱ्या

कार्यक्रमांचं व्यवस्थापन करत अवडंबर सांभाळायचे. ते अतिशय स्वच्छ मनाचे नि निष्पक्षपाती होते. त्यांच्यावर कुणाचा सहजासहजी प्रभाव पडायचा नाही आणि त्यामुळे, त्यांनी आपलं कर्तव्य मोठ्या मेहनतीनं पार पाडलं.

**पप्पु** पहाडिया ऊर्फ पप्पुजी हे शंभूजींचे पुत्र. मूळ घर ज्वालामुखी इथं असूनही, पप्पुजींनी गुरुदेवांच्या घरी रहाणं पसंत केलं. त्यांनी तिथं बराच काळ घालवला. गुरुदेवांना ते खूप आवडायचे. पप्पु पहाडिया हे गुरू संस्कृतीचे निस्सीम समर्थक आहेत.

गुरुदेवांचे मोठे पुत्र **परवेशजी** यांना बाबा म्हणूनही ओळखतात. ते लहान असल्यापासूनच सेवा करत आहेत. गुरगावात सेक्टर-७ येथील स्थानाचे ते प्रमुख आहेत. ते इतर ठिकाणी सुध्दा सेवा करतात. ते गुरुदेवांच्या आजोबांचा पुनर्जन्म असल्याचं मानलं जातं.

**पहेलवानजी** हे मला भेटलेले सर्वात निस्सीम *सेवादार* आहेत. त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ खांडसा शेतात काम केलं आणि स्थानात उपयोग करण्यासाठी आणि गरज भागवून शिल्लक उरेल इतक्या भाज्या, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ असतील याची ते हमी घ्यायचे. असं समर्पण जवळजवळ अविश्वसनीय आहे.

गुरुदेवांचे धाकटे पुत्र **पुनीतजी** हे प्रेमानं नितू म्हणून ओळखले जातात. गुरुदेव त्यांचा पंडितजी असा उल्लेख करायचे. पुनीतजी हे गुरुदेवांच्या वडिलांचा पुनर्जन्म असल्याचं म्हटलं जातं. त्यांचं सर्वात प्रिय वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या डोळ्यांतील खोडकर चमक, जे पूर्वी होतं आणि पुढेही आहे. ते एक मोहक, दयाळू आत्मा आहेत.

**पुरणजी** हे एक पराक्रमी संत आहेत. ते गुरगाव स्थानाचा एक महत्त्वाचा भाग होते. तिथं त्यांनी एका दशकाहून अधिक काळ लोकांची दररोज सेवा केली.

गुरुदेवांनी त्यांना पुत्रासमान वागवले.

गुरुदेवांचे वरिष्ठ अधिकारी **प्रताप सिंगजी** हे नास्तिक होते. त्यांचा कोणत्याही गोष्टीवर अथवा कुणावरही विश्वास नव्हता. पण, ते गुरुदेवांचं कौतुक करायचे, मात्र, त्यांच्या आध्यात्मिक शक्तींबद्दल नाही, तर त्यांच्या दयाळूपणाबद्दल आणि प्रत्येकाची सेवा करण्याच्या त्यांच्या इच्छेबद्दल.

**प्रदीप सेठीजी** हे मुंबई आणि लोणावळा इथं सेवा देतात. त्यांची पत्नी पूंचोजी या राजपालजींची कन्या आहेत. त्या दोघांची मुलगी प्रज्ञा.

**आर (र)**

**आर. पी. शर्माजी** हे गुरुदेवांचे सहकारी होते. ते महागुरूंच्या ब्रिगेडचा अविभाज्य भाग बनले होते. ते कणखर, उदार नि खंबीर होते आणि लोकांना तोंड द्याव्या लागणाऱ्या जवळजवळ प्रत्येक आध्यात्मिक समस्येचा सामना करू शकत होते आणि तिचं निराकरण करू शकत होते.

**रवी त्रेहानजी** अथवा रविजी हे गुरुदेवांना अनेक जन्मांपासून ओळखतात. महागुरूंनी रविजींना त्यांच्या मागील काही जन्मांची झलक दाखवली. गेल्या जन्मी, रविजी हे मल्होत्राजींचे धाकटे भाऊ होते. त्यांनी चार दशकाहून अधिक काळ लोकांची सवा केल्ये आणि सध्या ते दिल्लीच्या कीर्ती नगरमध्ये एक स्थान सांभाळतात.

**राजपालजी** हे एक प्रभावशाली, उत्तम बोलणारे माणूस आहेत, त्यांची रहाण्याची शैली अगदी वेगळीच आहे, अगदी **suspenders** परिधान करणं वगैरे वगैरे. डॉन जुआनच्या साच्यातील वाणी, शरीर आणि व्यक्तिमत्त्वानं आकर्षक असा एक शिष्य. राजपालजी हे जवळजवळ चार दशकांपासून पंजाबी बाग इथं सेवा करत आलेत आणि ते गुरुदेवांचे आवडते आहेत.

**राजी कपूरजी** हे विचित्र भक्त नव्हते. पण, नम्र होते नि त्यांची वागणूक सौम्य नि शांत होती. मी त्यांना गुरगावमध्ये वारंवार पाहिलंय. गुरुदेवांसमवेत काही अद्भुत अनुभव घेण्याचं भाग्य राजीजींना लाभलं.

**राजी शर्माजी** हे गुरुदेवांचे फार पूर्वीपासूनचे आवडते आहेत. परंतु, ते खूप काही समर्पित शिष्य नव्हते. कारण, ते जगभर फिरत असायचे, ज्यावेळी, आम्हा खांडसा शेतात मातीची मशागत करत होतो! जेव्हा केव्हा राजी शर्माजी गुरगावला यायचे, तेव्हा गुरुदेवांचे डोळे चमकत असत. खरोखरंच, आपल्यापैकी अनेकांसाठी मत्सराचा स्रोत. तथापि, हा माणूस सहृदयी आणि साधा आहे. त्यांच्याकडे पुष्कळ ज्ञान आहे आणि ते शास्त्रांत पारंगत आहेत.

**रामनाथजी** हे कथोग येथील स्थानिक शाळेत शिक्षक होते. जरी ते पूर्ण आस्तिक नसले, तरी ते गुरुदेवांवर मोहित झाले होते आणि गुरुदेवांना गुरगावमध्ये भेटत. एकूणच, ते एक अद्भुत गृहस्थ होते.

गुरुदेवांच्या आई **राम प्यारीजी** या गुरुदेवांशी एकनिष्ठ होत्या आणि गुरुदेवांना त्यांच्याबद्दल खूप आदर होता.

**रुद्रजी** हे निक्कुजींचे वडील आणि गुरुदेवांचे मेहुणे होते. त्यांनी गुरुदेवांची आपल्या बहिणीचा (माताजींचा) पती म्हणून निवड केली. रुद्रजींच्या गुरुदेवांशी असलेल्या नात्याचा असा अनोखा पैलू होता की त्यांच्यात घनिष्ठ बंध असूनही, रुद्रजींना जाणीव नव्हती की आपला मेहुणा गुरू आहे. मग, तो महागुरू असेल, हे कसं माहीत असेल? जरी मला विचित्र वाटत असलं, तरी माझा विश्वास आहे की रुद्रजी हे कुणालाही वारश्यानं मिळू शकणारे असे सर्वात आराध्य मेहुण्यांपैकी एक होते.

**रेणुजी** या गुरुदेवांच्या मोठ्या कन्या आहेत. त्यांनी जवळजवळ आपल्या सर्व लहान भावंडांचं संगोपन केलंय. रेणुजींचे आई-वडील सकाळपासून रात्रीपर्यंत

व्यस्त असल्यामुळे, रेणुजींना महत्त्वाची जबाबदारी स्वीकारावी लागली आणि भावंडांनी शाळेचा अभ्यास केला का नाही, गृहपाठ केला का नाही इत्यादी गोष्टींची खात्री करावी लागली. हे एक मोठं ओझं होतं आणि त्यामुळे, रेणुजी एक गंभीर व्यक्ती बनल्या. त्या आता वडील नि गुरू यांच्यातील फरक सांगू शकतात आणि आपण ज्यांना गुरुदेव म्हणतो, त्यांच्याशी रेणुजींचं व्यावहारिक नातं आहे.

**एस (स)**

**संतलालजी** हे सोनिपतमधील स्थानाचे प्रमुख होते. मी त्यांचं दुरूनच कौतुक केलं. कारण, ते एक उल्लेखनीय व्यक्ती होते. ते एक निर्भय अध्यात्मवादी होते, ज्यांनी आपली आध्यात्मिक कर्तव्यं जबरदस्त उत्साहानं पार पाडली. गुरुदेवांनी त्यांच्यावर गुरगाव येथील वरिष्ठ पातळीवरच्या व्यवस्थापनासह बऱ्यापैकी प्रशासन आणि नियोजन सोपवलं. संतलालजींनी नक्कीच चार दशकांहून अधिक काळ सोनिपत आणि आसपासच्या भागांतील लोकांची सेवा केली असावी.

**सीताराम टाकीजी** हे एक प्रभावी व्यक्तिमत्त्व असून, ते गुरुदेवांचे एकनिष्ठ शिष्य होते. त्यांनी बँक ऑफ अमेरिकेत काम केलं. पण, वैयक्तिकरीत्या त्यांचा गुरुदेवांवर भरवसा होता. ते सदैव मदत करण्यास, सेवा करण्यास आणि स्वत:च्या आध्यात्मिक बचत खात्यात योगदान देण्यास तत्पर असत.

**सुभाष सभ्रवालजी** ऊर्फ सुभाषजी हे हरियाणा येथे गुरुदेवांचे वर्गमित्र होते. त्यांनी महागुरूंची सेवा करून गुरगाव स्थानाच्या प्रशासनात पुष्कळ वर्षं मदत केली. ते अध्यात्मिक प्रवृत्तीचे नव्हते. पण, ते अत्यंत गुरुदेव-प्रवृत्तीचे होते आणि याच वेगळेपणानं त्यांना वेगळं बनवलं.

**सुनीलजी** हे लंडनहून स्थान पहाण्यासाठी आले होते. गुरुदेवांचे एक शिष्य विंग कमांडर वर्मा यांच्या मुलीशी सुनीलजींनी विवाह केला.

**सुरज शर्माजी** हे गुरुदेवांच्या कार्यालयातील आणखी एक कर्मचारी होते, ज्यांना गुरुदेवांनी शोधून काढलं आणि त्यांचं आध्यात्मिक दृष्ट्या परिवर्तन केलं. सुरजजी हे एकनिष्ठ कार्यालयीन कर्मचारी आणि *सेवादार* होते.

**सुरिंदर कौशलजी** हे शिकागोमध्ये एक स्थान चालवतात. गुरु गोबिंद सिंगजी यांनी दृष्टांत दिल्यामुळे, ते स्थानात यायला प्रवृत्त झाले.

**सुरेश कोहलीजी** हे एक अनुभवी बुजुर्ग असून त्यांच्यावर कथोग इथं शिबिरात येणाऱ्या  हजारो लोकांची सेवा करण्याचं काम सोपवलंय. ते कथोग जवळ सुनेत या गावात रहातात. सुरेशजींकडे, त्यांनी गुरुदेवांबरोबर घालवलेल्या काळात घडलेल्या किश्श्यांचा विलक्षण आणि श्रवणीय संग्रह आहे.

**सुरेश प्रभू** हे साधे चार्टर्ड अकाउंटंट म्हणून गुरगावला आले. गुरुदेवांनी त्यांना अशा गोष्टी सांगितल्या ज्या आम्हा दोघांनाही अविश्वसनीय वाटल्या. महागुरूंनी असा एक दिवस अगोदरच पाहिला होता की ज्या दिवशी सुरेश एक सुप्रसिध्द राजकारणी बनतील नि जगभरात ओळखले जातील. कित्येक दशकांपूर्वी, प्रत्यक्ष घडण्याअगोदर, ती कथा मी ऐकली होती.

कानपूरचे **सुरेंदरजी** हे एक असे आसामी होते, की ज्यांचं मी कौतुक करतो. आपल्या आध्यात्मिक कार्यात कुणी इतका सरळ, नम्र आणि यशस्वी कसा असू शकतो याचं मला आश्चर्य वाटतं. गुरगाव स्थानानंतरचं पहिलं स्थान **सुरेंदरजींनी** स्थापन केलं होतं.

गुरुदेवांच्या सर्व शिष्यांपैकी **सुरेंदर तनेजांनी** मला सर्वाधिक प्रभावित केलं. ते नेहमीच स्पष्टपणे नि मोजकं बोलायचे. त्यांच्या बोलण्यात कधीही मुत्सद्देगिरी

नव्हती. प्रत्येकाला मदत करायला ते कायम उत्सुक असत. गुरुदेवांनी त्यांच्या समवेत बराच काळ घालवला. जवळजवळ, प्रत्येक दिवशी, ते गुरुदेवांना कामावरून गुरगावला परत नेत असत. शिष्य होणं म्हणजे काय? हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिलं आणि माझ्याकरता ते वैयक्तिक प्रेरणा बनले.

**सुशीला चौधरीजी** गुरुदेवांच्या कार्यालयात काम करायच्या. त्यांचे पती नास्तिक होते. पण, एका शिबिरात महागुरूंना चमत्कारपूर्ण उपचार करताना पाहिल्यानंतर, ते आस्तिक झाले. सरतेशेवटी, ते गुरुदेवांच्या प्रेमाच्या नि आपुलकीच्या सागरात बुडून गेले. गुरुदेवांनी त्यांना सेवा करण्यास प्रवृत्त केलं आणि प्रारंभिक संकोच असूनही, मागाहून, त्यांनी पटेल नगर मध्ये एक स्थान स्थापन केलं, जे त्यांच्या मृत्यूपश्चात अनेक वर्षं चालू आहे.

**शंभुजी** हे पप्पु पहाडिया यांचे वडील आणि ज्वालामुखी मंदिराचे विश्वस्त होते. त्यांना कथोग इथं गुरुवादात सामील करून घेण्यात आलं. ते वारंवार गुरुदेव यांना असामान्य आणि अलौकिक अनुभव देण्यास भाग पाडत. मृत्यूनंतर, शंभुजींचा पप्पुजींचा मुलगा म्हणून पुनर्जन्म झाला आणि तो मुलगा आता ऑस्ट्रेलियात अतिथी-सेवा उद्योगात (हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्री) काम करतो.

**शोभा तनेजाजी** या स्वतःच एक आगळं व्यक्तिमत्त्व आहेत. जन्मासाठी १०० वर्षं प्रतीक्षा करणाऱ्या एका योग्याच्या आत्म्यानं शोभाजींना बथरी इथं शोधलं. अशा प्रकारे, अभय तनेजा यांचा जन्म अनाकलनीय गर्भधारणेतून झाला. शोभाजी नेहमी गुरुदेवांकडे जाऊन वस्तूंची मागणी करण्याइतक्या धाडसी होत्या. जरी त्या वस्तू महत्त्वपूर्ण नसल्या, तरी गुरुदेव नेहमी उदार असत. शोभाजींचे पती सुरेंदरजी हे महागुरूंच्या आध्यात्मिक संघटनात्मक रचनेतील एक अग्रगण्य व्यक्ती होते.

**यु (उ)**

पोलीस अधिकारी असलेले **उध्दवजी** अगदी लहान वयात गुरगावला आले. मुंबईतील कुलबीरजींच्या स्थानात त्यांनी निष्ठेनं सेवा केली. उध्दवजींच्या बाबतीत डोळ्यांमध्ये भरणारी गोष्ट म्हणजे त्यांची आध्यात्मिक उत्सुकता. त्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरं देताना महागुरू थकायचे. उध्दवजी आता न्यूझीलंडमध्ये स्थायिक झालेत आणि त्यांनी अध्यात्मातून लवकर निवृत्ती घेतली आहे.

**व्ही (व)**

सामान्यपणे, ज्यांचा कॅप्टन शर्मा म्हणून उल्लेख केला जायचा, त्या **व्ही.पी.शर्मांना**, मुंबईतील खार स्थानात अध्यात्माची दीक्षा मिळाली. तिथंच, त्यांना तीसएक लोकांसमोर एक ज्योत प्राप्त झाली. व्ही.पी.शर्मांना आध्यात्मिक वादात पराभूत करणं कठीण होतं. तथापि, ते अधूमधून, काहीतरी कठोर बोलायचे आणि मग त्याचे दुष्परिणाम सहन करायचे.

**विरेंदरजी** हे हरियाणात न्यायाधीश होते. गुरुदेवांनी विरेंदरजींच्या पत्नीला बरं केल्यानंतर, विरेंदरजींनी स्वत:ला गुरुदेवांना वाहून घेतलं. कठोर परिश्रमाची भीती न बाळगता, ते अनेकदा बॅरिस्टरसारखे सफेद कपडे घालून खांडसा शेतावर यायचे नि चिखलानं माखलेल्या कपड्यांत निघून जायचे. हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या भृगू संहितेत त्यांचा उल्लेख आहे.

**विश्वामित्रजी** हे सौम्य, लाजाळू नि निगर्वी माणूस होते. त्यांच्यावर बहुतेक वेळा गुरगाव स्थानात स्वयंपाकघराची सेवा सोपवली जायची. ते पंजाबात मुकेरियन इथं एक स्थान चालवतात.

# ०९

# शब्दकोश

**ए (अ)**

**अजपा-जप-** मंत्रांचं मनातल्या मनात शांत पठण

**अमावास्या -** चंद्र नसलेली रात्र

**अघोरी -** अघोरी पंथाचा सदस्य असलेली एखादी व्यक्ती. तो शिवाचा भक्त असतो आणि भीती नि द्वैत यांच्या पलीकडे जाण्याचा कसोशीनं प्रयत्न करतो. सामान्यत:, अघोरी हे सामाजिक सुसंवाद टाळतात

**अघोर** / **अघोरी विद्या -** अघोर तत्त्वज्ञानाचं ज्ञान

**अन्न -** अन्नधान्य / अन्न

**अन्न दान -** अन्नाचं दान

**अन्नपूर्णा -** अन्न आणि पोषण देणारी या अर्थी संस्कृत शब्द

**अवेलना -** अवहेलना- आध्यात्मिक गुरूंच्या इच्छेविरुध्द जाणं अथवा त्यांचा अपमान करणं

**अंश -** एखाद्या गोष्टीचा अथवा एखाद्याचा भाग

**आण्णा -** भारतीय चलनात सेंट च्या समतुल्य (आणा)

**आत्मा -** व्यक्तीचं मूलतत्त्व जे शाश्वत, अपरिवर्तनीय आणि शेष विश्वापासून वेगळं न करता येणारं आहे. आत्मा याचा अर्थ सर्वोच्च चैतन्य, एकतर साकल्यानं अथवा प्रत्येक अस्तित्वात विभाज्य वैयक्तिक विभाग म्हणून (ज्या बाबतीत, त्याचा जीवात्मा म्हणून उल्लेख केला जातो) सुध्दा करता येतो,

**आत्मिक -** आत्म्याशी संबंधित विशेषण

**आदमी -** व्यक्ती

**आरती -** प्रार्थना

**आलू गोबी -** बटाटे आणि फुलकोबी यांचं मिश्रण

**आश्रम -** धार्मिक अथवा आध्यात्मिक पध्दती आणि शिक्षणासाठी सामुदायिक घर / एकाकी स्थळ

**आहुति-** यज्ञ / देवांना अर्पण केलेल्या वस्तूंचं प्रतीक

**बी (ब, भ)**

**बडा -** मोठा

**बडा गुरुवार -** एका महिन्यातला गुरुवार ज्या दिवशी गुरुदेव किंवा त्यांच्या शिष्यांनी सुरू केलेल्या स्थानांमध्ये सेवा घडते

**बर्फी -** एक भारतीय मिठाई

**बरकत -** तुमचा पैसा जास्त काळ टिकेल असं नशीब

**बसंत पंचमी -** बुध्दीची हिंदू स्त्री देवता सरस्वती हिचा सन्मान करण्याचा आणि वसंत ऋतूच्या आगमनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस. या दिवशी अनेक लोक पिवळे कपडे घालतात नि पिवळे पदार्थ खातात

**बाबा -** सामान्यपणे वृध्द व्यक्तीकरता वापरलेला शब्द; बऱ्याच वेळा आध्यात्मिक दृष्ट्या ज्ञानी व्यक्तीचा या शब्दाद्वारा उल्लेख केला जातो

**बारात -** नवऱ्याची वरात

**बुडिया -** किंवा  बुढिया म्हणजे वृध्द स्त्री

**बुड्ढे बाबा -** प्राचीन संत. तसंच, गुरुदेवांनी आपल्या आध्यात्मिक गुरूंना दिलेलं नाव

**बेटा -** मूल

**ब्रह्मांड -** आकाशगंगा

**ब्राह्मण -** जातिव्यवस्थेतील शीर्षस्थान, जे सूचित करतं की एखादी व्यक्ती ज्ञानी आहे अथवा ज्ञान-प्रवृत्त कुटुंबातून आल्ये. या वर्गात पंडित, पुजारी, वैद्य, शिक्षक आणि इतरांचा समावेश होतो

**भक्त -** उपासक

**भक्ती -** शास्त्रं ही ईश्वराच्या वैयक्तिक स्वरूपावर उत्कट प्रेम आणि त्याच्याप्रती समर्पण / एकनिष्ठता असा भक्ती या शब्दाचा अर्थ मर्यादित करतात. आम्ही, मात्र या शब्दाचा निर्विकार आत्म-पूजा असा अर्थ योग्य मानतो

**भगवान -** देवासाठी अथवा परम चैतन्यासाठी संज्ञा

**भाईसाहेब -** भावाला किंवा वडिलधाऱ्या जवळच्या व्यक्तीला हाक मारण्याकरता वापरली जाणारी संज्ञा

**भाव -** विचार / भावना

**भृगु संहिता -** भृगू ऋषींनी लिहिलेला एक प्राचीन भारतीय, ज्योतिषशास्त्रावरील, उत्कृष्ट श्रेणीचा ग्रंथ. हा वैदिक कालखंडातील आहे आणि यात, तेव्हापासून आतापर्यंत जगलेल्या लोकांच्या सुमारे ५,००,००० तपशीलवार कुंडल्या आहेत.

**सी (च, छ)**

**चरण -** पाय

**चाचा -** वडिलांचा धाकटा भाऊ

**चाय -** चहा

**चाय मसाला -** चहाचा मसाला

**चिराग -** तेलाचा दिवा

**छोटे -** लहान

## डी (द, ध, ड)

**दर्गा -** मुस्लिम संताचं तीर्थस्थान

**दर्शन -** जागृत अथवा स्वप्नावस्थेत पवित्र व्यक्ती दिसणं

**दही -** दही

**दान -** दान

**दाल -** डाळ / मसूर डाळ

**दिया -** एकतर तूप किंवा मेणानं प्रज्वलित केलेला दिवा

**दिव्य -** दिव्य / दैवी

**दिव्य आत्मा -** दिव्य आत्मा / दैवी अस्तित्व

**दिव्य ग्यान -** दिव्य ज्ञान / साक्षात्कार

**दिव्य दृष्टि** - दिव्य दृष्टी / तिसरा डोळा

**देवता -** पुरुष देवता किंवा शक्ती जिची हिदूंकडून पूजा केली जाते

**देवी -** स्त्री देवता किंवा शक्ती जिची हिदूंकडून पूजा केली जाते

**देसी घी -** (कढवलेलं) तूप

**धाम -** निवासस्थान

**धाबा -** रस्त्याच्या कडेला असलेलं उपहारगृह

**धूप -** अगरबत्ती

**धोती -** एक सैलसर कपड्याचा तुकडा जो कमरेखालच्या अर्ध्या भागावर गुंडाळला जातो, दक्षिण आशियाई पुरुष परिधान करतात

**ध्यान अवस्था -** ध्यानाची स्थिती

**डबल रोटी -** ब्रेड

**डमरू -** एक वाळूच्या घड्याळाच्या आकाराचा ड्रम. शिवाचं वाद्य म्हणून ओळखला जातो धोती  शरीराच्या खालच्या अर्ध्या भागाभोवती गुंडाळलेला

एक सैल कपड्याचा तुकडा, जो दक्षिण आशियाई पुरुष परिधान करतात

**डोसा -** एक दक्षिण भारतीय नाश्ता

**ए (इ, ए)**

**इलायची -** वेलची

**एक ओंकार -** एक शीख प्रतीक जे सर्वोच्च चैतन्य दर्शवतं

**एक वाक्य -** एक वाक्य / एक ओळ / विनोदी टिप्पणी

**एफ (फ)**

**फकीर -** लोभ किंवा अधिकारापासून मुक्त असलेल्या संताची पदवी. बोली भाषेत याचा संदर्भ एक तपस्वी असू शकतो, जो उपकारकर्त्यांकडून मिळालेल्या भिक्षेवर जगतो

**जी (ग, घ)**

**गण - घटक**.

**गण्ण -** आध्यात्मिक गुरूंच्या पातळीवर विकसित होण्याची क्षमता असलेले आध्यात्मिक वारस

**गती -** स्वप्नातीत गती / वेग

**गद्दी -** गुरूंच्या शक्तीचं स्थान

**गिलेरी -** ऊर्जेच्या स्त्रीलिंगी तत्त्वाचं प्रतीक असणारा, योनीसारखा दिसणारा अंडाकृती पाया, ज्यावर शिवलिंग विसावलेलं असतं

**गुडिया -** तरुण मुलगी

**गुण -** तमस्, रजस् आणि सत्त्व हे तीन गुण सूक्ष्म ऊर्जा आहेत, ज्यांद्वारा, आपलं मन नि गहन चेतना कार्य करतात. या गुणांचा स्वत:मधील परस्पर सुसंवाद साधणं आवश्यक असतं

**गुरु -** एक आध्यात्मिक शिक्षक

**गुरुचरणप्राप्ति -** आज्ञाचक्रावर प्रतीकात्मकतेनं विसावणारे गुरूंचे पाय सजीव झाल्याचं दर्शवलं जातं, त्याद्वारा, सहाव्या अथवा तिसऱ्या डोळ्याचं चक्र सक्रिय झाल्याचे संकेत मिळतात

**गुरुजी -** गुरूंना संबोधित करण्याची एक आदरयुक्त पध्दत

**गुरु तत्त्व -** गुरूंचं आंतरिक सार

**गुरुद्वारा -** सामान्यपणे एक शीख मंदिर, पण तांत्रिकदृष्ट्या सांगायचं तर, गुरु मंदिर

**गुरु-पहेर -** अर्थात गुरु-प्रहर म्हणजेच पहाटे १.१५ ते ३.३० पर्यंतची वेळ

**गुरु पूर्णिमा -** एखाद्याच्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरता पाळला जाणारा दिवस

**गुरुभाई -** आध्यात्मिक सहकारी

**गुरुवार -** गुरुवार

**गोल-गप्पा -** एक भारतीय नाश्ता

**गृहस्थ -** गृहस्थ

**गृहस्थ आश्रम -** व्यक्तीच्या जीवनातील चार टप्प्यांपैकी दुसरा टप्पा. याचा अर्थ असा होतो की एखाद्यानं गृहस्थ म्हणून जगलं पाहिजे नि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये कर्तव्यपूर्वक सहभागी झालं पाहिजे

**ग्यान -** ज्ञान-आध्यात्मिक परिवर्तनाचा चौथा टप्पा; सामान्यत: ज्ञान दर्शवण्यासाठी सुध्दा वापरला जातो

**ग्यान-योग -** ज्ञान-योग - अंतर्दृष्टी, अभ्यास किंवा ज्ञानाद्वारा चैतन्य शोधण्याचा मार्ग

**घाट -** जलसमितिकडे / जलकुंभाकडे घेऊन जाणाऱ्या पायऱ्या किंवा घेऊन जाणारा रस्ता

**आय (इ)**

**इंद्र -** हिंदू पौराणिक कथांमधील हवामानाची देवता

**इष्ट -** अशी देवता जिची वैशिष्ट्यं आणि शक्ती प्राप्त करण्याची अथवा आत्मसात करण्याची एखाद्याला इच्छा असते

**जे (ज)**

**जल -** बोलीभाषेत पाण्याचा निर्देश करण्याकरता वापरला जातो. आध्यात्मिक दृष्ट्या बोलायचं तर, मंत्र आणि आभा वापरून ऊर्जायुक्त केलेल्या पाण्याचा निर्देश केला जातो

**जालंधर बंध -** हठयोग सरावांशी संबंधित हनुवटी / घशाची कुलूप मुद्रा

**जी -** भारतीय उपखंडात हिंदी आणि इतर अनेक भाषांमध्ये सन्मानार्थी वापरला जाणारा प्रत्यय

**जीवात्मा -** सर्वोच्च चैतन्याचं वैयक्तिक स्वरूप

**ज्योत -** अग्नीची ज्योत

**के (क, ख)**

**कडा -** एक ऊर्जायुक्त कडं जे गुरू आणि शिष्य यांच्यामधील दुवा बनते

**कढई -** तळण्याचं भांडं

**कन्यादान -** एक हिंदू समारंभ ज्यामध्ये वधूचे वडील तिला लग्नात देतात. हे सेवेचं उच्च रूप देखील मानलं जातं

**कर्म -** ही एक अशी संकल्पना की प्रत्येक क्रियेची प्रतिक्रिया असते आणि कोणतीही क्रिया तिच्या परिणामापासून वेगळी केली जाऊ शकत नाही. अशा प्रकारे, ती कारण नि परिणामाची कल्पना सूचित करते ज्याद्वारा, माणसांच्या कृती त्यांचं भविष्य तयार करतात. सकारात्मक क्रिया (विचार, शब्द, भावना कृती) चांगलं कर्म तयार करतात, तर नकारात्मक क्रिया वाईट कर्म तयार करतात, जे दु:खाला कारणीभूत होतं

**कर्मयोग -** नि:स्वार्थ कृतीचा सराव

**कर्मयोगी -** जो नि:स्वार्थ कृती करतो, तो

**कुंडलिनी -** एखाद्याच्या मणक्याशी पायथ्याशी गुंडाळलेली ऊर्जा दर्शवते. योगासनं, नियंत्रित श्वासोच्छ्वास आणि ध्यान हे जागृत करण्याचे आणि सात चक्रांद्वारा ती वरच्या दिशेनं नेण्याचे मार्ग आहेत. जेव्हा कुंडलिनी वरच्या दिशेनं नेली जाते, तेव्हा ही ऊर्जा प्रत्येक चक्राला अडथळ्यांपासून मोकळं करते आणि सराव करणाऱ्याला अनुभवाच्या पातळीचा अनुभव घेण्यास मुक्त करते. कुंडलिनी ही एखाद्या व्यक्तीच्या विकसित वृत्ती आणि कार्यपध्दतींद्वारा सुध्दा वाढू शकते, ज्यात जीव स्वरूपांची नि:स्वार्थ सेवा समाविष्ट असते

**कुर्ता पायजमा -** भारतीय वांशिक पोशाखाचा प्रकार

**कुल -** वंश

**कुश -** ध्यानाच्या दरम्यान ज्यावर बसतात, असं एक प्रकारचं गवत

**कृपा - कृपा**

**खिचडी -** तांदूळ आणि डाळ / मसूरपासून बनवलेला भारतीय पदार्थ

**एल (ल)**

**लंगर -** सामुदायिक / सार्वजनिक स्वयंपाकघरांमध्ये बनवलेलं आणि लोकांना मोफत दिलेलं अन्न; नि:स्वार्थ सेवेचा एक प्रकार

**लड्डू -** बेसनापासून बनवलेली भारतीय गोलाकार मिठाई

**लस्सी -** ताक

**लक्ष्मी देवी -** संपत्तीची हिंदू स्त्री देवता

**लुंगी -** भारतीय लुंगी (एक पारंपारक वस्त्र)

**लोक -** लोक जिथं आत्मिक शरीरं अस्तित्वात असतात. हे लोक १४ असावेत

**लौंग -** लवंग

**एम (म)**

**मक्की दि रोटी -** मक्याची रोटी / भाकरी

**मल्लिक -** सर्वोच्च चैतन्य

**मसाण -** स्मशानातील रक्षा / राख

**महात्मा -** एक आदरणीय व्यक्ती जिला प्रेम नि आदरपूर्वक मान दिला जातो; एक पवित्र व्यक्ती अथवा ऋषी माताजी - आई

**माया -** भ्रम / भ्रांती

**मास्टर -** शाळेतील शिक्षक

**मुक्ति -** जीवन आण मृत्यूच्या चक्रातून (हजार अथवा कित्येक हजार वर्षं अशा) दीर्घ कालावधीसाठी मुक्तता, पण उच्च लोकात

**मूर्ति -** पुतळा / प्रतिमा

**मुहूर्त -** ग्रहांच्या संयोगानं निश्चित केलेला शुभ क्षण

**मोक्ष -** वैयक्तिक स्वत्वाचं संपूर्ण विघटन, स्वत्वाची सर्व ओळख वजा करून. कोणत्याही जीवासाठी शक्य असलेली ही सर्वात मोठी उपलब्धी आहे

## एन (न)

**नंदी -** दैवतरूप बैल

**नमाज -** इस्लामनं विहित केलेल्या विधिपूर्वक प्रार्थना

**नाडी -** सूक्ष्म वाहिन्या ज्यांद्वारा ऊर्जा शरीराच्या अंतर्गत फिरते

**निंबू पानी -** लिंबू पाणी

**निर्माण काया -** प्रगत योग्यांनी स्वत:चे संस्कार जगण्याकरता निर्माण केलेली शरीराची प्रतिकृती. हे ऊर्जा शरीर किंवा भौतिक शरीरासारखं दिसणारं शरीर असू शकतं, जे मानवी शरीरासारखं गुंतागुंतीचं नसतं

**नि:स्वार्थ -** नि:स्वार्थ / स्वार्थरहितता

## पी (प, फ)

**पकोरे-** पकोडे-एक भारतीय नाश्ता

**पंचायत -** एक ग्राम परिषद

**पंडित -** पवित्र हिंदू विधींची अंमलबजावणी करण्याचं ज्ञान असणारी व्यक्ती

**पत्तिसा -** साखरेच्या लाह्या

**पद्मासन -** एक प्रकारची योगासनात बसण्याची मुद्रा

**परम-आत्मा -** सर्वोच्च चैतन्य

**पराठा -** भारतीय ब्रेड

**परिवार -** कुटुंब

**पाथ -** ध्यानाच्या दरम्यान विशिष्ट प्रकारे पहुडलेले किंवा बसलेले असताना मंत्रांचा एकाग्रतेनं केलेला सराव. गुरुदेवांसाठी, याचा अर्थ शरीराबाहेर सूक्ष्म शरीरानं केलेला प्रवास असाही होता.

**पापाजी -** वडिलांसमान व्यक्तिरेखा असणाऱ्या व्यक्तिसाठी पंजाबी संज्ञा

**पुत्त -** मुलगा

**पुरी -** गहू न आंबवता, त्यापासून बनवलेल्या, खूप तेलात तळलेल्या ब्रेडचा गोल तुकडा

**पूजा -** आराधना

**पिंडी -** ऊर्जायुक्त रचना ज्या स्त्रीच्या अवयवांचं (शक्तीचं प्रतीक म्हणून ) प्रतिनिधित्व करतात

**पिन्नी -** एक लोकप्रिय उत्तर भारतीय गोड पदार्थ

**पितृ पीडा -** शिक्षेच्या रूपात कुटुंबांना त्यांच्या पूर्वजांनी (आत्म्याच्या रूपात) दिलेली शारीरिक / मानसिक वेदना

**पोहा -** पोह्यापासून बनवलेला नाश्ता

**प्रकाश -** प्रकाश

**प्रसाद -** धार्मिक अथवा आध्यात्मिक केंद्रात अभ्यागतांना दिल्या जाणाऱ्या अन्नाचा ऊर्जायुक्त प्रसाद

**प्राण -** मूलभूत ऊर्जा / श्वास

**प्राणप्रतिष्ठा -** पुतळ्याला / प्रतिमेला ऊर्जायुक्त करण्यासाठी केले जाणारे विधी

**फुलियां -** साखरेचा लेप दिलेलं बार्ली धान्य

**आर (र)**

**रूप -** रूप

**रोटी -** भारतीय ब्रेड

**एस (स, श, श्र)**

**संचालक -** प्रभारी / व्यवस्थापक

**सत्संग -** अध्यात्मवादावर चर्चा किंवा अध्यात्मवादाचा सराव करण्यासाठी अध्यात्मवाद्यांचा मेळावा

**संत -** संत

**संन्यास -** त्याग

**सप्तर्षि -** वेदांचं गुणगान करणारे सात ऋषी

**सब्झी -** भारतीय भाजीचा शिजवलेला पदार्थ

**समाधि -** सामान्यत: सर्वोच्च चैतन्याचा निर्देश केला जातो. यातून सिध्द गुरू किंवा संत यांच्या अंतिम विश्रांतिस्थानाचा सुध्दा निर्देश केला जाऊ शकतो

**सरसों का साग -** मोहरीच्या हिरव्या पाल्यापासून बनवलेला पदार्थ

**संस्कार -** वर्तमान आणि मागील जन्मांतील अनुभवांद्वारा अवचेतन मनावर उमटलेले ठसे

**संस्कारिक -** विशेषण, संस्कारांशी संबंधित

**सात्त्विक -** विशेषण, सत्त्व गुणाशी संबंधित

**साधु -** एक पवित्र हिंदू माणूस

**सिध्द -** सिध्द

**सिध्द गुरू -** एक परिपूर्ण गुरू जे लोकांना मदत करण्यासाठी आध्यात्मिक शकतीचा उपयोग करू शकतात

**सिध्दि -** योग नि ध्यान यांसह कठोर आणि परिपूर्ण आध्यात्मिक पध्दतींद्वारा प्राप्त केलेली आध्यात्मिक क्षमता

**सुदर्शन चक्र -** भगवान विष्णूचं चक्रासमान फिरणारं शस्त्र

**सूक्षम शरीर -** सूक्ष्म / आत्मा / सूक्ष्म शरीर

**सेवा -** सेवा

**सेवादार -** जो इतर प्राणिमात्रांची सेवा करतो, तो

**सेह शरीर -** सह शरीर अर्थात शरीरासह. मानवी शरीराच्या अणू संरचनेच्या पुनर्रचनेच्या द्वारा मानवी शरीराचं अभौतिकीकरण करण्याची / मानवी शरीर अदृश्य होण्याची क्षमता सूचित करते

**स्थान -** मदत नि उपचार केंद्र

**शक्ति -** ऊर्जेचं स्त्रीलिंगी तत्त्व दर्शवण्याकरता संदर्भानुसार वापरली जाणारी विद्युत् चुंबकीय शक्ती

**शिव परिवार -** शिव परिवार

**शिवलिंग -** शिवाचं प्रतिकात्मक प्रतिनिधित्व (पुरुष ऊर्जा)

**शिव स्वरूप -** एक शिवाचं प्रकटीकरण

**शिष्य -** विद्यार्थी / शिष्य

**शीतला देवी** - हिंदू जिची पूजा करतात अशी एक स्त्री देवता

**श्रध्दा -** भक्ती

**श्राध्द -** एखाद्याच्या मृत पूर्वजांसाठी केला जाणारा विधी

**टी (त)**

**तत्त्व -** तत्त्व अथवा पैलू

**तंत्र -** शारीरिक आणि भौतिक पध्दतींचा संच जो आध्यात्मिक शक्ती निर्माण करतो. याचा उपयोग सकारात्मक अथवा नकारात्मक ऊर्जा मिळवण्यासाठी केला जाऊ शकतो

**तपस्या -** एक प्रखर आध्यात्मिक शिस्त जी संचित कर्म नि संस्कार संपवायला हातभार लावते, त्यायोगे आत्मशुध्दीचा मार्ग मोकळा करते

**तवीझ -** दुष्ट शक्तिपासून रक्षण करणारा ताईत

**तांत्रिक -** तंत्राचा अभ्यासक

**तिलक -** कपाळावर कुंकू किंवा सिंदूरचं चिन्ह

**त्रिशूल -** त्रिशूल जो शिवानं वापरलेल्या तिहेरी शक्तींचं प्रतिनिधित्व करतो

**त्रिवेणी -** तीन शक्तींच्या संमीलनाचा बिंदू

**यु (उ)**

**उपमा -** एक हलका भारतीय नाश्ता

**उल्टा -** उलट

**व्ही (व)**

**वानप्रस्थ आश्रम -** वैदिक आश्रम व्यवस्थेचा तिसरा टप्पा. एकाकी / एकांतवासातील जीवनाचा कालावधी दर्शवतो

**वाहन -** वाहन

**विचार -** विचार

**विद्या -** आध्यात्मिक ज्ञानाला कारणीभूत होऊ शकणाऱ्या बौध्दिक किंवा अंतर्ज्ञानानं प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचं वर्णन करण्यासाठी वापरली जाणारी संज्ञा

**विराट रूप -** २० फूट किंवा त्यापेक्षा जास्त उंचीपर्यंत विस्तारण्याची क्षमता असलेल्या स्वतंत्र अस्तित्वाचं दिव्य / अलौकिक रूप

**विश्वास -** विश्वास

**विषय -** वस्तू

**वैराग्य -** भौतिक व्यासंगांपासून अलिप्ततेची अवस्था. ही अवस्था अहंकार, उध्दटपणा, तिरस्कार इत्यादी सोडण्याशी संबंधित आहे

## वाय (य)

**यग्य -** भक्तिपूर्वक केलेला यज्ञ. सर्वसाधारणपणे, वैदिक विधीचा निर्देश केला जातो ज्यात अग्नी हा मानवी आणि आध्यात्मिक शक्तींमध्ये एक माध्यम म्हणून कार्य करतो.

**यंत्र -** सामान्यपणे, देवतेशी संबंधित, मानवी मनाला अगम्य, गूढ अशी आकृती. हे आध्यात्मिक रेखाचित्र समजलं जाऊ शकतं आणि कधी कधी मंदिरासारख्या त्रिमितीय आकृतीचं द्विमितीय प्रस्तुतीकरण मानलं जाऊ शकतं

**यागशाळा -** हिंदू विधी पार पाडण्यासाठी यज्ञवेदी

**योगी -** योगामध्ये पारंगत असणारा

# लेखकाबद्दल

हिंगोरी यांनी आपला आध्यात्मिक प्रवास महागुरूंचा प्रशिक्षणार्थी म्हणून सुरू केला आणि तेव्हापासून ते कित्येकांचे शिक्षक नि गुरू बनलेत. आपल्या सौभाग्याविषयी इतरांना सांगणं आणि त्यांना अगणित लोकांची सेवा करण्यासाठी तयार करणं हे त्यांचं ध्येय आहे. पण त्याच वेळी, हिंगोरीजी असंही मानतात की ते कर्ता नाहीयेत, तर, इतरांच्या परिवर्तनाचा निव्वळ सूत्रधार आहेत. या दृष्टीनं, ते आपल्याला बहाल केलेल्या क्षमता आणि शक्ती यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. हिंगोरीजी हे आत्मपौढी नि आत्म-गौरव यांच्याकडे आध्यात्मिक विकासातील अडथळे म्हणून पहातात. परिणामवश, ते निनावी रहाणं पसंत करतात, नम्रतेपेक्षा, जास्त धोरण म्हणून. ज्ञानाची देवाणघेवाण करणं हा हिंगोरीजींचा मार्ग आहे 'तरंग लाट बनतो आणि मागाहून महासागर बनतो', याची खातरजमा करून घेण्याचा.

त्यांचं आयुष्य, त्यांच्या कथा,
त्यांच्या शिकवणुकी, त्यांचं वैभव.


नम्रता, साधेपणा, काटकसर.
विश्वास, करुणा, अद्वैत.
भूमिका निभावण्याची त्यांची मानसिकता.
त्यांचं चित्ताकर्षक व्यक्तिमत्त्व.
त्यांची आध्यात्मिक व्यावहारिकता.
त्यांची नियोजित समानता.

त्यांची उपाख्यानं आणि उतारे
त्यांनी लिहिलेल्या युगाची वचनपत्रं आहेत.

या पानांमधील वारसा म्हणजे
सर्वांत महान ऋषींपैकी एकाचं देवत्व.

त्यांच्या ज्ञानामध्ये प्रवेश करा.
आध्यात्मिक कूटप्रश्न सोडवा.
मर्यादेचं स्वातंत्र्यात रूपांतर करा.
त्यांचा आध्यात्मिक वारसा मिळवा.

महागुरू.
गुरूंचे गुरू.



www.gurudevonline.com
answers@gurudevonline.com